

# झूल

भालचंद्र नेमाडे




भालचंद्र नेमाडे

चांगदेव चतुष्टय : ४

# झूल

# भालचंद्र नेमाडे यांचे प्रकाशित साहित्य्

## कादंबरी

कोसला *(१९६३)*
बिढार *(१९७५)*
हूल *(१९७५)*
जरीला *(१९७७)*
झूल *(१९७९)*
हिंदू *(२०१०)*

## कविता

मेलडी *(१९७०)*
देखणी *(१९९१)*

## समीक्षा व संशोधन

तुकाराम *(१९८०)*
साहित्याची भाषा *(१९८७)*
द इन्फ्लुअन्स ऑफ इंग्लिश ऑन मराठी *:*
अ सोशिओलिंग्विस्टिक ॲण्ड स्टायलिस्टिक स्टडी *(१९९०)*
टीकास्वयंवर *(१९९०)*
इंडो-ॲंग्लिअन रायटिंग्ज · टू लेक्चर्स *(१९९१)*
मराठी रीडिंग कोर्स *(*इअन रेसाइडसह*) (१९९१)*
मराठी फ़ॉर बिगिनर्स *(१९९४)*
साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण *(२००३)*
निवडक मुलाखती*? (२००८)*
सोळा भाषणे *(२००९)*

नेटिव्हिज्म *:* देशीवाद *(२००९)*
होउ मच स्पेस डझ ॲन
इंडियन रायटर नीड*? (२०१३)*

चांगदेव चतुष्टय : ४

# झूल

भालचंद्र नेमाडे

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

ZOOL
(Marathi : Novel)
Bhalchandra Nemade

झूल
(मु-४३९)
पॉप्युलर प्रकाशन
ISBN 978-81-7185-233-8

© १९७९, भालचंद्र नेमाडे

पहिली आवृत्ती : १९७९/१९०१
दुसरी आवृत्ती : २०००/१९२२
पाचवे पुनर्मुद्रण : २०१६/१९३७

प्रकाशक
हर्ष भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि.
३०१, महालक्ष्मी चेंबर्स
२२, भुलाभाई देसाई रोड
मुंबई ४०० ०२६

अक्षर जुळवणी
गोकर्ण एन्टरप्रायझेस
माहीम, मुंबई ४०० ०१६

# अनुक्रमणिका

चांगदेव चतुष्टय : ४   झूल

सर्वज्ञे म्हणीतले : बाई : हा अवघा डोंगरु पोकळ असे : कोन्ही एथीचे रिगणेनिगणे जाणे ना :

**लीळाचरित्र :** पूर्वार्ध

## चांगदेव चतुष्टय : ४

# झूल

नर्मदेच्या पुलावरून गडगडाट करत दणाण दणाण एकेक खांब मागे टाकत गाडी सरकत राहिली तेव्हा नामदेव भोळे भयंकर अस्वस्थ चेहऱ्यानं खालच्या संथ अवाढव्य पात्राकडे पाहात शरीरासकट मनासकट ताठ होत गेला. हा प्रचंड आवाज लहानपणापासून त्याच्या स्थलांतराशी जखडला गेला आहे. इथून त्याला नेहमी महाराष्ट्राची हद्द केव्हा येईल याचे वेध लागायचे. हा विंध्य, मग सातपुडा, नंतर पुन्हा असाच तापीचा प्रचंड पूल की महाराष्ट्र. दर वेळी नवीन नवीन गावात जावं लागायचं. कधी कृष्णेपलीकडे, कधी गोदावरीपलीकडे. कधीतरी पूर्वी खानदेशात मेंढ्या चारणारे मर्द पूर्वज तलवारी घेऊन होळकरांबरोबर सातपुडा ओलांडून उत्तरेत गेले, पराक्रम केले. आता म्हाताऱ्यांकडून त्या गोष्टी ऐकणं फक्त राहिलं. आता खंडोबा राहिला. जिभेवर मराठी राहिली. आणि जातीयतेनं सडलेल्या महाराष्ट्रात गावोगाव नोकरीसाठी हिंडत राहाणं.

अंधारात मागे धावणाऱ्या अंतराकडे पाहात तो उग्र होऊन गेला. परवा आईच्या अस्थी नर्मदेत सोडतांना आपण हिंदुधर्माच्या लाखो पिढ्यांच्या परंपरेतले एक सनातन धर्माभिमानीच आहोत असं त्याला वाटलं. आपला सगळा बुद्धिवाद, नास्तिक तत्त्वज्ञान, पाश्चात्त्य शास्त्रांचं अध्ययन अध्यापन-सगळं ढोंग. तर नाही ना असं त्याला वाटून गेलं. पिंडदान करतांना एका अनाकलनीय प्रांताच्या सीमेवर आपण उभे आहोत ही जाणीव खरी होती. त्यामुळे तो असहाय होऊन सगळे विधी करत राहिला. आम्ही इतके शिकलेले आधुनिक तरुणसुद्धा ह्या देशातल्या पुरातन संस्कृतीच्या अँटेनीसारखे आहोत. ही सनातन संस्कृतीच नवं ज्ञान चाचपून घेण्यासाठी आमचा वापर करून घेते आहे. आम्ही सगळे बुद्धिवादी विचारवंत ह्या प्रचंड लोकसमुदायाच्या गतीमधील प्रायोगिक बळीसुद्धा ठरू. आम्ही निव्वळ अँटेना आहोत, निव्वळ झुरळाच्या मिशा.

आई अतिशय धार्मिक होती. तिच्या माहेरी सातपुड्यातल्या कुसुंब्याला भयंकर धार्मिक वातावरण आहे. ती नेहमी रामायण-महाभारतातल्या पुराणातल्या गोष्टी उदाहरणादाखल वापरायची. मरायच्या दिवशीसुद्धा माय सकाळी उठली. अंघोळ केली. डोई विंचरली. माथ्याला कुंकू लावलं. गायीला कुंकू लावून शेपटी डोईला लावली. मग घरात गेली. मूठभर जोंधळे संपुटात घातले. मग निघाली. डहलजीच्या दाराआड काढून ठेवलेला घासतेलाचा डबा आणि आगपेटी घेतली. गावाबाहेर देवळात आली, खंडोबाच्या पायाशी घासून घासून डोई लावली. बांगड्या वाहिल्या. मग झपाझप खाली नदीवर आली आणि जरा वेळानं लोकांच्या आरोळ्याच ऐकायला आल्या. लोक म्हणाले, आम्ही पळत गेलो तेवढ्यात म्हातारी पूर्ण पेटली होती. राम राम म्हणत होती. कोणी

म्हणालं, म्हातारीला विरक्ती आली होती. कोणी म्हणालं, म्हातारी उबगली होती. म्हातारीनं झिजून झिजून भोळ्यांचं घर उभं केलं. चौदा वर्षांची पोर म्हणून इथे आली तेव्हा हे धनगर निव्वळ रानटी होते. हिनं कुसुंब्याकडची शेतीची रीत आमच्या घराला शिकवली. गायरानाची शेती करत आणली. ते रानटी दिवस डोक्यातून अजून जात नाहीत. त्यावेळी बहुतेक पुरुष मंडळी चारचार महिने उन्हाळ्यात परमुलखात उक्त्यानं विहिरी खणायला जायची. आपली भावंडं आपल्याबरोबर मेंढ्या चारायची. पावसाळा आला की पुरुष परतायचे. पूर्वीपासून एक मोठं इनाम गायरान होतं. आमच्या घरात आल्यापासून आईनं ह्या गायरानाची मशागत करून शेतजमीन करायचं मनावर घेतलं. डोंगर फोडून दगड वेचायला सगळी घरातली माणसं लागली. विहीर खणली. लहानपणी मुलाबाळांसकट सगळे ह्या गायरानात राबत होते. त्यात ऊन लागून मोठा बाप मेला. साप चावून नाना मेला. मोठी आई थकली. आईनं तिच्या माहेरी असलेलं शेतीचं खानदेशी वेड आमच्या भटक्या घरात आणलं. मेंढ्या कमी होत गेल्या. कांबळं विणायचा माग बंद झाला. नंतर नानांची लग्नं होत आली. नव्या बायका घरात आल्या. आई थकली. घरात तिचे हाल झाले. म्हणून गेल्या वर्षी तिनं आपल्याला लग्न करायला भाग पाडलं. थोरला भाऊ मेल्यापासून ती खचली होती. पंढरपूरला न्या म्हणायची. पण म्हाताऱ्या बायकांचं अशा घरात काही खरं नसतं. आपलंही बूड स्थिर नव्हतं. आणि आता तर गेलीच...

तार मिळाल्याबरोबर भोळे गाड्या बदलत गावी जाऊन पोहोचला. नुकताच त्याला मुलगा झाला होता. त्यामुळे बायकोला बरोबर आणता आलं नाही. आईलाही नातू दिसलाच नाही. लोकांनी प्रेत झाकून ठेवलं होतं. आईचा चेहराही ओळखू येत नव्हता. इंदूरच्या आसपासच्या दहावीस खेड्यांतली सगळी मराठी वस्ती ह्या प्रकारानं गदगदून गेली. गावच्या मराठा पाटलानं आपलीच माणसं म्हणून पोलिसावगैरेचं लफडं मिटवलं होतं. तिथे बोरखेड्यात तेरा दिवस काढून आज निघणं आवश्यक होतं. आई गेली. आता परत गावी जाणं नको. ते घरही नको. गायरान नको. म्हाताऱ्या बापाला त्यानं बरोबर चला म्हटलं, पण बाप नको म्हणाला. आता पुन्हा इकडे येणं नको. स्वदेश संबंधू त्याज्य. संबंधियांचा संबंधु तो विशेषत: त्याज्य. हे घर आता संपलं.

आपल्या त्या वेळच्या घरात एकूण वीस माणसं होती. आधी पुरुष आणि मुलं जेवून घ्यायची. नंतर आपापल्या नवऱ्याच्या आणि मुलांच्या ताटात बायका उरलंसुरलं वाढून जेवायच्या. ही आमची संस्कृती. आंब्याचा रस असला की पुरुषमंडळीच सगळा रस ओरपून संपवायचे. बायकांना कधी रहायचाच नाही. मग आपण एक युक्ती शोधली होती. आपल्या वाटीत खूप वाढा म्हणून आमरस वाढून घ्यायचा. खूप उष्टं ठेवायचं. तो उरलेला रस आईला मिळायचा.

आई आई आई ऽ म्हणून नामदेव भोळेनं डोकं दाबून धरलं. त्याला नंतर अस्वस्थ अशी डुलकी आली.

पुन्हा दणाण दणाण पुलावरून प्रचंड आवाजाचे हादरे बसायला लागले आणि तो जागा होत म्हणाला, तापी! महाराष्ट्र आला. आपल्या पूर्वजांचा प्रदेश. आपल्या भाषेचा प्रदेश. आपल्या खंडोबाचा प्रदेश. उदेऽ उदेऽ. ज्याच्यात आपण गटांगळया खात आपलं अस्तित्व टिकवून धरत आहोत अशा तापट, भांडखोर, जातीय मराठी लोकांचा प्रांत. आपले पूर्वज पराक्रम करायला ह्या नद्या आणि पर्वत ओलांडून वर गेले, तर आपण या भाषेच्या बंधामुळे परत इकडे ह्या चिखलात धडपडायला आलो. त्याचा चेहरा एकदम काळवंडून गेला. लहानपणापासून ही इकडून तिकडे पायपीट चाललीय ती संपायची लक्षणं नाहीत. आपली इतकी स्वतंत्र विचारशक्ती, इतका व्यासंग, इतकी उमेद असूनही आपल्याला ह्या भोवऱ्यातून बाहेर पडता येत नाही. किती गावं...किती वर्षं...गावातल्या चौथीपर्यंतच्या शाळेतलं शिक्षण संपल्यावर नवव्या वर्षी आईनं पुढच्या शिक्षणासाठी मामाकडे कुसुंब्याला पाठवलं. तेव्हा बोरखेडं सोडलं. तिथून तर आजपर्यंत किती गावं...किती मुलुखगिरी? एका जुनाट लोखंडी पेटीत दोन अर्ध्या खाकी चड्ड्या आणि दोन पांढरे सदरे घेऊन कुठेकुठे दरवर्षी ह्या नातेवाइकाकडून त्या नातेवाइकाकडे निव्वळ अडचण म्हणून रहाणं. परीक्षा पास करत रहाणं. कुठेही जायची तयारी ठेवणं. पोरगा हुशार आहे, शिकला पाहिजे असं सगळे म्हणायचे आणि काहीतरी व्यवस्था आयत्या वेळी व्हायचीच. सातवी फायनलपर्यंत मामाकडे कुसुंब्याला. ते दिवस कधी विसरता येणार नाहीत इतके सुंदर आहेत. नंतर मामानं मावशीकडे उंदीरखेड्याला इंग्रजी शाळेची व्यवस्था केली. तिथून काकूचं माहेर भडगाव. तिथून बऱ्हाणपूरला धर्मदाय बोर्डिंगात. नंतर बहिणीकडे सावद्याला दोन वर्षं. तिथलं दोन खोल्यांचं घर. रात्री एवढ्याशा घासतेलाच्या चिमणीवर बाहेरच्या लाकडी रिफा मारलेल्या खोलीत अभ्यास करत बसणं. मिळतील ती पुस्तकं वाचणं. आतली खोली बहीण आणि मेहुणा बंद करून घ्यायचे, मग सकाळपर्यंत बाहेरच्या खोलीत. कितीही थंडी असो, आपण रात्रभर तिथे वाचत बसायचो. इथून आपलं वळण बदललं. सकाळी आपणच आधी उठून पाणी भरायचं. आपणच ताक घेऊन यायचं. मुलं चिडवायची. त्या सबंध काळात खाली मान घालणं हे प्रतिकाराचं मोठं शस्त्र तेव्हा नेहमी कामाला यायचं. त्यामुळे शाळेत कधी कोणा मुलावर गुरकावणंही शक्य व्हायचं नाही. असे अनेक तडफडाट सहन करावे लागायचे. आपण कायम उपरे आहोत असं विष भिनवणारी ती सगळी वर्षं. सुट्टीची वाट पहात अभ्यास करत रहाणं. मग आईचा डोक्यावरून फिरणारा हात, कौतुक. आई भयंकर महत्त्वाकांक्षी होती. पण आपण काहीच विशेष करू शकलो नाही. भराभर शिकत गेलो एवढंच. मोठा भाऊ त्यावेळी इटारसीला रेल्वेत लागला आणि आपणही मॅट्रिकला पहिल्या विसांमधे पंधरावे आलो. स्कॉलरशिप होती. कॉलेजची दोन वर्षं भावाच्या खोलीत राहून नीट पार पडली. मग भाऊ पटकीनं मेला. इटारसी सुटलं. बोरखेड्याचा एक मराठा गृहस्थ अमरावतीला प्रिन्सिपल होता. तो म्हणाला, तू बुद्धिमान आहेस, आमच्याकडे चल. मग त्याच्याकडे बंगल्याबाहेरच्या बागेत एका छानशा खोलीत दोन वर्षं. त्याच्या घरची सटरफटर कामं करून अहोरात्र वाचन, अभ्यास. पहिल्या वर्गात बी.ए. मग प्रिन्सिपलसाहेबांनी नागपूरला एम्.ए.ची सोय करून दिली. एम्.ए.च्या वेळचे खोलीतले चार पार्टनर.

त्यातला एक आता खासदार आहे. सपाटून अभ्यास. समाजशास्त्र अतोनात आवडलं. तिथे पुन्हा पहिले आलो. पीएच्.डी. करायची इच्छा होती. पण जात आडवी आल्यानं शिष्यवृत्ती मिळाली नाही. हळूहळू महाराष्ट्रातली जातीयता जाणवायला लागली. तिथपासून फुल्यांचे भक्त झालो. मग महाराष्ट्रभर प्राध्यापकीसाठी वणवण सुरू झाली. त्यात कधी स्वास्थ्य नाही. आईला इकडे आणायचं होत, तेही जमलं नाही. ब्राह्मण, मराठा, महार- सगळ्या जातीयतेतून पोळून निघालेला हा एक धनगर प्राध्यापक.

असं म्हणून तो बाकावर स्वत:शी पुटपुटत लांब पाय करून आडवा झाला. झोप येत नव्हती पण डोळे गच्च दाबून तो बाकावर पडून राहिला. मग त्याला डुलकी आली.

अत्यंत पडलेल्या चेहऱ्याचा एक देखणा तरुण घाईघाईनं डब्यात चढला. ट्रंक, कशीतरी बांधलेल्या गादी आणि सूटकेस एवढं सामान त्यानं संडासाजवळ नीट लावलं. आणि तिथेच तो संडासाला टेकून उभा राहिला. नामदेव भोळेला कुणीतरी समवयस्क माणसाशी नेहमीच्या स्वभावानुसार चिकार बोलावंसं वाटतच होतं. त्याला वाटलं हा तरुण आत शिरून आपल्याला उठवीलच. म्हणून तो पडून राहिला. पण गाडी सुरू झाली तरी तो तरुण शांतपणे बिडी पेटवून डब्याच्या दारातून बाहेर पाहात निर्विकारपणे संडासाजवळच उभा होता. एवढ्यात दोनतीन जण भोळेच्या पायाशी बसलेही. डब्यात विशेष गर्दी नव्हती, पण एकदोन स्टेशनातच उभं राहायला मिळणार नाही अशी गर्दी होते हे भोळेला माहीत होतं. पण साधे धुतलेले सुती कपडे घातलेला, शरीराकडे अतिशय दुर्लक्ष केलं आहे इतका बारीक, पण उंच आणि नाकीडोळी एकदम आकर्षक वाटणारा हा तरुण मात्र कायम उभं रहायच्या तयारीत संडासाला टेकून बिडी पीत राहिला.

मग लोकशाहीवर आणि नागरिकांच्या हक्कांवर जिथे तिथे भाषणं देणाऱ्या आपल्यासारख्या समाजशास्त्राच्या प्राध्यापकाला असं एक बाक अडवून झोपणं शोभत नाही असा विचार भोळेच्या मनात आला. आणि तो एकदम उठून त्या बिडी पिणाऱ्या तरुणाला ओरडूनच म्हणाला, या होऽ मालक इकडे! घ्या बसून. पुढे तुफान गर्दी होईल. या.

पण तो तरुण आपली तंद्री मोडून आत पहात पुन्हा नुसता उभाच राहिला. आपला कोणाला उगाच त्रास होऊ नये अशा अतिशय निरुपद्रवी चेहऱ्याचा हा तरुण पाहून भोळे वैतागला. आधीच आईचा सबंध भाजलेला. कोळसा झालेला लहानसा आडवा देह त्याच्या मनातून जात नव्हता. अशा अस्वस्थ मनःस्थितीत एकट्यानं क्रूर विचार करत रात्र काढणं कठीण होतं. तिकडे लहानशा जागेवर उभा असलेला हा तरुण इतका सोशिक, सज्जन, लोभस वाटत होता की भोळे त्याच्यावर मग संतापूनच ओरडला, या की होऽ...कुठे जायचंय तुम्हाला?

मग तो तरुण आपली विचारमुद्रा मोडून त्याच्याकडे पहायला लागला. त्याचे अत्यंत प्रसन्न डोळे पाहून भोळेचा त्याच्यावरचा संताप झटक्यात विरून गेला. मग भोळेच

अजीजीनं म्हणाला, बसून घ्या म्हणालो तुम्हाला मी...मलाही तिथेच उतरायचंय्. रात्रभरचा प्रवास आहे मालक. माहीत नाही दिसतंय तुम्हाला. या. ते सामान राहू द्या तिथेच. गप्पाच मारत बसायचं की रात्रभर. तुम्ही लवकर झोपत नाही ना?... वा! बसा आरामात.

तो तरुण प्रसन्न हसत भोळेजवळ थोड्याशा जागेवर बसला. बिडी पीत थँक्यू म्हणाला. भोळेही सिगरेट पेटवत म्हणाला, खरं तर तुम्हीच उठवायचं मला. का घाबरलात का काय मला? माझ्या ह्या मिशा वगैरेंमुळे? ह ह हऽ मी नामदेव भोळे. समाजशास्त्राचा प्राध्यापक आहे. तुमचा काय उद्योग? नाव काय म्हणालात?

मी चांगदेव पाटील. इंग्रजी शिकवतो. आता पुराणिक कॉलेजात जॉइन होतोय—

भोळे एकदम टाळी देत ओरडला, भले ऽ! मालक! द्या टाळी. मी पण एक वर्षापासून पुराणिकमध्येच आहे. तुमच्या इंग्रजीच्या जागेबद्दल फार चाललं होतं, मी परवा गावाकडे जायच्या आधी. शेवटी ऑर्डर पाठवली म्हणायची. बरं झालं एक नवा माणूस तरी येतोय्. आधीच आमच्याकडे वशिल्याचे बैल जमा झालेत. तुमचा इंटरव्ह्यू फार मजेदार झाला म्हणे. वेणुगोपाल सांगत होते. बरं झालं आपली इथेच ओळख झाली ते. आता सोडलं ते कुठलं कॉलेज तुमचं?

मग त्यांनी एकमेकांचे इतिहास तुलनात्मक पद्धतीनं सांगायला सुरुवात केली.

भोळे म्हणाला, मला पुराणिकमध्ये एक वर्ष झालं, आता हे दुसरं. ह्याच्या आधी येवल्याला एक वर्ष-राजीनामा. त्याच्या आधी अलिबागला दोन वर्षं-राजीनामा. त्याच्याही आधी सावंतवाडीला-डिसमिसल! त्याच्या आधी एम्.ए. नागपूरला केलं. त्यांच्याही आधी-जाऊ द्या. मलाच कंटाळा येतो, तुम्हाला तर येणारच. तर कुठून हा धंदा घेतला असं झालं असेल तुम्हालाही. माझंही जवळपास तसंच चाललंय. मॅनेजमेंटशी खटके. प्रिन्सिपलशी भांडणं. जातीय राजकारण. गटबाजी. राजीनामे-कंटाळा आलाय. दर वर्षी ही धागधुग की गाव सोडावं लागतं का काय? त्यात माझं असं की जिथे रहायचं तिथे आसपास चार फुलझाडं लावायची, खडकीतून दिसेल असं शेवग्याचं, हादग्याचं भराभरा वाढणारं झाड पावसाळ्यात लावायचं. पण दरवर्षी हे सोडून जावं लागतं त्याच्या आयला. शेवगे पेरत चाललोय आम्ही महाराष्ट्रभर!

चांगदेव पाटील म्हणाला, म्हणजे तुम्ही इतर चळवळी, सामाजिक खटपटीही करत असणारच दर ठिकाणी.

कसं ओळखलं?

तुम्हाला भोवतालचा परिसर सुंदर करावासा वाटतो! हे तुमच्या स्वभावातच असणार. माझं उलटं आहे. मी कधी खोलीबाहेर क्वचित लक्ष देणारा प्राणी आहे. तुम्ही समाजकार्य वगैरेवाले—

फार जोरात स्वभावाचा अभ्यास आहे ही तुमचा. वा. मानलं तुम्हाला! मी तसा फार चळवळ्या माणूस, मालक! चला, चहा घेऊन येऊ. इंदूरपासून बसून बसून वैताग आलाय. या.

चहा घेऊन ते पुन्हा येऊन बसले. चांगदेव आपले अनुभव सांगत होता. भोळे त्याच्यावर मल्लीनाथी करत होता.

भोळे म्हणाला, प्राध्यापकाबद्दल आपल्या काय कल्पना असतात विद्यार्थिदशेत? नवी गुलामगिरीच आहे हो ही. मी आपल्या प्राध्यापक संघाचा अध्यक्ष आहे. गेल्या महिन्यात दिल्लीला पंतप्रधानांकडे निवेदन देऊन आलो आम्ही. आमचे एक खासदार पंतप्रधानांच्या फार जवळचे आहेत. अर्धा तास मिळाला बोलायला. मी बाईंना सांगितलं की बँकांसारखं ह्या खाजगी संस्थांचंही नॅशनलायझेशन केलं पाहिजे. आमच्या संघाचाही तसा ठराव आहे. ह्या मॅनेजमेंटवाल्यांची गुलामगिरी किती दिवस चालवायची? आपल्या प्राध्यापकांची युनियन जरा जास्त कडवी केली पाहिजे मालक.

चांगदेव कडवट चेहरा करून म्हणाला, म्हणजे सुखवस्तू लोकांच्या ट्रेड युनियनचे तुम्ही अध्यक्ष.

मग काय चालू द्यायचे हे प्रकार? आता तुमचीच केस पहा की. इंटरव्ह्यूनंतर इतका उशीर का झाला तुमच्या ऑर्डरला माहीत आहे? तुमची जात कुठली याच्यावर आमच्या माठूराम आणि मुरलीमोहन यांच्यात एकमत होईना! गावभर हिंडत होते म्हातारे तुमची जात शोधत. मलाही भेटले. हे जातीयतेचं पीक ह्या खाजगी शिक्षणसंस्थांनी सुरू केलं आहे. हे नेस्तनाबूत केलं पाहिजे. मी तर गेली दोनतीन वर्षं सारखं व्याख्यानांतून, लेख लिहून हेच पटवून देतोय एकसारखं. ठरावही पास करून घेतला आणि देऊनही आलो शिक्षणमंत्र्यांना आणि इंदिरा गांधींना.

तुम्ही कम्युनिस्ट वगैरे की काय?

कम्युनिस्ट वगैरे नाही, पण ही भंपक लोकशाही आपल्याला पसंत नाही. कोट-टायसारखी अनुकरण करणारी लोकशाही आपल्याला नको. खास आपल्या देशाला परवडेल अशी लोकशाही असावी ह्या मताचा मी आहे. अर्थात् मी लोकशाहीचा कट्टर पुरस्कर्ता आहे. लहानपणी मेंढरं चारणारं माझ्यासारखं छप्पन्न पिढ्या विद्येचा स्पर्श नसणारं पोरगं आज प्राध्यापक होऊन स्वतंत्र विचार करू शकतं ही किमया ह्या गुलामी देशात लोकशाहीमुळेच झाली मालक. पण ही विचारस्वातंत्र्याच्या नावाखाली चालणारी जातीयता वाढवणारी वर्तमानपत्रं अन् मूलभूत हक्कांच्या नावाखाली चालणारं स्मगलिंग अशा गोष्टी ज्या आजच्या लोकशाहीत चालतात, ती आपल्याला नको.

हे कसं थांबवणार तुम्ही? हे विष पचविण्याची ताकद ज्याच्यात्याच्यात आली पाहिजे.

कसल्या व्यक्तीव्यक्तीनं विष पचवावं अशा पाश्चात्य गप्पा मारता मालक? हे विसावं शतक उलटत आलं तरी किमान सुधारणा नाहीत ह्या देशात. तेच म्हणतो की नुसत्या थिएरीवर इथली लोकशाही चालणार नाही. आता कोणत्याही सरकारला देश पुढे न्यायचा असेल तर नाड्या आवळायची ताकद पाहिजे. व्यक्तीव्यक्तींनी ह्या प्रचंड राक्षसी शक्तींशी झगडत रहाणं ही नुसती सतराव्या शतकातली कल्पना आहे. व्यक्ती काहीच झगडू शकत नहा. अशक्यच आहे ते. आता प्रगतीलाही काही निश्चित वेग पाहिजे. हे पहा, ह्या डब्यात लोक कसे जनावरासारखे कोंबलेले वाटताहेत? तिकडे कोण झोपलेले आहेत त्यांना उठवायची हिंमत ह्या उभ्यानं झोपणाऱ्या भित्र्या प्रवाशांमधे

नाही. आणि ती खाली बसून पेंगणारी बुरख्यातली मुसलमान बाई गरोदर आहे, पुन्हा हातात एवढंसं किड्याएवढं मूल, आजूबाजूला किरकिरणारी तीनचार पोरं पुन्हा तिचीच आहेत. हिच्यात कधी येणार ती झगडण्याची शक्ती-जोपर्यंत तिच्या अडाणी नवऱ्याची खच्ची करत नाहीत तोपर्यंत जन्मभर हाच ताप बिचारीला. तिथे कोणी हेऽ ओकून ठेवलंय, त्याच्यावर पाय ठेवून सर्रास लोक इकडे तिकडे जाताहेत येताहेत. संडासात जायची सोय नाही, कोणी उलटं हागून ठेवलं आहे. ह्या इथे बाकाखाली दोन भिकाऱ्यांची कोवळी पोरं झोपली आहेत. तो बहुधा टी.बी. झालेला माणूस सरळ बाकाखाली बेडके टाकतोय. नरक आहे हा एवढासा डबा घेतला तरी! त्या दाराशी मोठमोठे गाठोडे सुपापरातीसकट बांधून एक कोरकू कुटुंब आमच्या तिकडून मध्यप्रदेशातून गांजून इकडे कुठेतरी निघालायं, त्यांना कुठे काम मिळेल, कुठे रहायला फुटपाथवर तरी जागा मिळेल की नाही, त्या प्रचंड स्तनं असलेल्या तरुण बाईचं शहरात काय होईल-काही कुणाला आज माहित नाही. हे वर झोपलेले मारवाडी मघाशी दहादहा रुपये एका मवाल्याला देऊन वरचे बर्थ घेऊन निजलेत. कशाची आणलीय् व्यक्तीव्यक्तीची जबाबदारी न् व्यक्तिस्वातंत्र्य ब्राम्हणांच्या सभासमारंभांतलं आणि वर्तमानपत्रांमधलं! ह्या देशात मोडून काढण्यासारखं चिकार आहे, त्यानंतर काही आधुनिक करता येईल. सुदैवानं आता आपल्या देशाला चांगल्या पंतप्रधान मिळाल्या आहेत. बाई निश्चित बरंच साफसूफ करून ठेवील. मार खायचा तरी किती शतकं ह्या देशानं व्यक्तीव्यक्तीनं किती घाण उपसायची मालक? मोठ्या आणि जुनाट देशाचं सरकार कडकच असायला पाहिजे. स्वातंत्र्य उपभोगा असं म्हणणारी हुकूमशाही झाल्याशिवाय इथे कोणाला स्वातंत्र्यसुद्धा मिळायचं नाही!

चांगदेव म्हणाला, हे राजकारणी लोकांनीच सांगायला पाहिजे असं नाही.

भोळे म्हणाला, माझा राजसत्तेवर अतोनात विश्वास आहे. दोनशे साहित्यक आणि विचारवंत करू शकणार नाहीत इतकं एखादा नेपोलियन किंवा केमाल पाशा करून टाकतो. आमच्यासारखी लंगोटी लावणाऱ्यांची पोरं धाड्दिशी एक मंत्र्यानं फी माफ केली म्हणूनच एका पिढीत वर आली की नाही?

पण एखादा हिटलर कायमचं खड्डयातही टाकतो.

चांगलं-वाईट हुकूमशाहीतच असतं असं नाही. पण करायचं काहीच नाही आणि फक्त लोकशाहीच टिकवत राहायची असं भोंगळ सरकारसुद्धा देशाला खड्ड्यात टाकतंच. आपल्याला धडाक्यानं काहीतरी केलं पाहिजे. वेग पाहिजे मालक, वेग. ॲक्शन.

काही काही गोष्टींना शॉटकट नसतो, त्या हळूहळूच व्हाव्या लागतात.

आपल्याला हे तत्त्वज्ञान मान्य नाही. हळूहळू म्हणजे पन्नास वर्षं की पाच हजार? ह्या देशात पाच हजार वर्षं समानता हळूहळूच होते आहे म्हणा की. माझी तर ह्या अशा हळूहळूवाल्यांशी कायम भांडणं होतात. तसा मी फार भांडखोर माणूस आहे. दोन मैलावरच्या गावी जायचं तरी माझी बसच्या कंडक्टरपासून दहा लोकांशी भांडणं होतात. आता हळूहळू मीही थंड होत चाललोय. आता लग्न झालं. एक मूल झालं. हार्मोन्समधले रस कमी झाले की सगळी दृष्टीच बदलते की काय कुणास ठाऊक?

सगळी ऊर्मीच नाहीशी होते. त्यामुळेच पुराणिकमधे यंदाही चालू राहिलो. तरी माझं नाव घेतलं की आपले चेअरमन माठूराम, ठोसर वगैरे मंडळी कपाळाला आठ्या घालतातच. एकदोघे मुरलीमनोहर वगैरे सेक्युलर विचारांचे लोक आहेत आपल्या संस्थेमधे. म्हणून तर आम्ही गोपाळ देशपांडे, चिपळूणकर, शेंडे वगैरे मंडळी सगळ्यांना भारी आहोत. उद्या भेटूच आपण देसाई वगैरे सगळेजण. आम्ही बाजूच्या शोभा हॉटेलमधे रोज बसतो. स्टाफरुममधे आम्ही कधी बसत नाही. निव्वळ कुचाळक्या चालतात तिथे.

त्यानंतर एका स्टेशनवर चहा घेऊन ते दोघे एकमेकांबद्दल, नव्या कॉलेजबद्दल, मित्रांबद्दल बोलत बसले. चांगदेवचा इतिहास ऐकून भोळे एकदम खूष झाला. तो म्हणाला, एकूण तुमचं बूड स्थिर नाही मालक. माझंही असंच होतं. लग्न झाल्याशिवाय ही पायपीट संपत नाही पहा. तुम्ही अजून कारे आहात; म्हणजे तुमचं आमच्या चिपळूणकर, गोप्या, शेंडे, देसाई वगैरेंशी झक्क जमेल. तुमच्यासारखेच सगळे मनमोकळे आहेत. मीही संसारी माणूस असली तरी पिंडानं काराच आहे. लग्नाचा तसा माझ्यावर फारसा परिणाम झाला नाही. घरची कामं नेमानं पद्धतशीर करून द्यावी. म्हणजे मग आपण मोकळे. उलट लग्नानंतरच माणूस जास्त मोकळा होतो असा माझा अनुभव आहे. बायको तुम्हाला एकदम मोकळं करून टाकते, मालक. सगळीकडे फिरणारे तरुण कारे लोक पाहिले की मला आपल्या समाजाच्या आरोग्याची काळजी वाटते.

एका दृष्टीनं हे चांगलंच आहे. आपली जुनी हिंदू स्थितीशीलता नष्ट होतेय. आपल्याच पिढीत हा भटकेपणा सुरू झालाय्. तुमचेआमचे पूर्वज किती फिरले तरी पुन्हा त्यांच्या गावी त्यांना जागा असायची. आपल्याला नाही.

आमचे पूर्वज शेतांवर खतासाठी मेंढ्या बसवायला म्हणून ह्या गावाहून त्या गावी असे हिंडायचे. त्यांच्यात आणि आपल्यात तसा काही फरक नाही म्हणा की.

फरक नाहीच. उलट ते जास्त उपयोगी होतं. माझं तर ह्या हिंडाहिंडीत निव्वळ भोवऱ्यासारखं झालं आहे.

तुम्ही कारण नसता संवेदनशील दिसत. माझा अनुभव वेगळा आहे. तसं माझं कुठे कुणाशी पटत नाही. दर गावात चार जिवाभावाचे मित्र मिळतात, तेवढं एक ओयासिस. बाकी तुकारामासारखा रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग...आता चार कॉलेजं बदलून इथे आलो, पण तरी त्याही काळात माझं लिहिणं वाचणं अव्याहत चाललेलं होतं. अर्थात सिस्टिमॅटिक काही नाही. आर्किऑलॉजीपासून मार्क्सिझमपर्यंत वाट्टेल ते वाचत असतो आम्ही. आता एकदा बैठक मारून माझे जुने सगळे प्रोजेक्ट लिहून काढायचे आहेत. आता हे समाजकार्य सोडतोच. कंटाळा आला.

मी तर माझ्यापलीकडे काहीच करू शकलो नाही. ते सुद्धा नीट नाही.

तेच बरोबर आहे मालक. मी पहा ना. गावोगाव प्राध्यापकांच्या संघटना बांधायच्या,

धिक्काराच्या सभा घ्यायच्या, मोर्चे काढायचे. सारख्या विचारांचे लोक जमवून चर्चामंडळं काढायची, महिला मंडळं स्थापायची- एका गावात तर मार खायची पाळी आली महिला मंडळापायी. आम्ही कशाला प्रेमफ्रीम करणार तसल्या मध्यमवर्गी पोचट पोरींशी? पण स्वभावच आमचा. लहान मुलांचे खेळ घडवून आणायचे. ग्रामपंचायतींच्या मागे लागून सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानं घडवून आणायची, वाचनालयं उघडायला लावायची-आपल्याला असं सामाजिक काही केल्याशिवाय चैन पडत नाही. आणि शेवटी आम्ही उपऱ्यासारखे त्या गावातून बाहेर पडतो! आम्ही ना त्या प्रदेशातले ना ह्यापैकी कुठल्या जातीचे. माझ्या जातीतला मी कदाचित् पहिलाच प्राध्यापक असेन. बाकी सगळे मेंढ्या हाकणारे आणि विहिरी खोदणारे. ह्या देशात सगळं खालच्या वर होणं आवश्यक आहे मालक. औषधाची बाटली हलवावी तसं...इतकं करून युनिव्हर्सिटीतल्या एका निवडणुकीत उभा राहिलो तर सगळ्यात कमी मतं आम्हाला. जात ह्या देशात किती पक्की रुजली आहे हे त्यावेळी मला कळलं. मला तर हल्ली एका जातीचे दोन लोक एकत्र दिसले तरी डोक्यात सणक उठते!

तुमच्यासारखे लोक वाढले पाहिजेत—

काय वाढणार मालक? ...मी त्या भागात इतकी कामं केली. प्राथमिक शिक्षकांची संघटना बांधली, माध्यमिक शिक्षकांचा जबरदस्त संघ तयार केला. रात्रंदिवस राबलो मालक. पण मराठ्यांची मतं काँग्रेसवाल्या मराठा प्राध्यापकाला पडली, ब्राम्हणांची मतं एस्.एस्.पी.वाल्या ब्राम्हण प्राध्यापकाला पडली. आम्हा धनगराला कोण मतं देणार? जाऊ द्या. त्या निमित्तानं ओळखी झाल्या. समाजाच्या नाड्या कळल्या. तशी आपली प्रतिष्ठा इथे ह्या गावातही चांगली आहे. आणि अंग मोडून काम केल्यानं आपल्या माठूराम-ठोसर टाईपची करंटी विफलता येत नाही हेही काही कमी नाही. पण हा समाज नुसत्या मलमपट्टीवर सुधारणार नाही, हे अगदी पटलं आहे आपल्याला. सर्जिकल ऑपरेशन पाहिजे मालक. राजकारणातूनच हे शक्य आहे! ह्यावर दहाबारा लेख लिहायचा विचार आहे, पण अजून स्वच्छ चिंतन झालं नाही. चिंतनाला वेळ तरी पाहिजे ना मालक. इथे पुराणिकमधे च्यायला इतकी कामं पाठीमागे लावून देतात, पुन्हा इतक्या चर्चा करतात माठूराम वगैरे लोक की बोअर व्हाल तुम्ही! एकदिवसाआड स्टाफ मिटिंगा घेऊन जगात शांती कशी प्रस्थापित होईल याच्यावर रात्ररात्रभर प्राध्यापकांना बोअर करतात साले. पण इलाज नाही. निव्वळ ब्राम्हणी वाद. निष्कर्ष शून्य. तुका म्हणे वादे-वाया गेली ब्रम्हवृंदे!

हा तापच आहे एकूण म्हणजे इथे.

ताप! अहो निव्वळ डोकेदुखी आहे. मी अलीकडे फुल्यांना फार मानायला लागलो आहे. ब्राम्हणांना करायचं काहीच नसतं, निव्वळ वाद. दिवसेंदिवस मी फार कडवट होत चाललोय असं मित्र म्हणतात. पण वाटतं ते तर बोलल्याशिवाय आपल्याला राहवत नाही. परवाच्या मिटिंगमधे तर मला काढून टाकावं ह्याच्यावर मतदान झालं! खरं कारण काय तर मी एका पत्रकावर सही केली.

कसलं पत्रक?

खरं तर आम्ही दोघातिघांनीच ते पत्रक काढलं मुळात. आपल्या कॉलेजातल्या एका

ब्राम्हण पोरीनं एका मुसलमान पोराबरोबर लग्न केलं. पळूनच गेली म्हणा की. आम्ही ह्या लग्नाला पाठिंबा देणारं पत्रक काढलं. एवढ्यावरून मला काढून टाकायला निघाले साले. संस्थेत दोघेतिघे आधुनिक विचार करणारे आहेत आणि शिवाय आपलं शिकवणं, इतर कामं करणं, सगळं जिथल्या तिथे असतं. त्यामुळे काढून टाकणं सोपं नव्हतंच. नाहीतर बायको आणि तान्हं पोरगं घेऊन कुठे जावं ह्या काळजीनं झोप उडाली होती...नंतर त्या पोरीच्या बापानं तिचं लग्न बळजबरीनं लांबच्या एका हिंदुत्ववादी माणसाशी लावून तिला तिकडेच कैदेत टाकल्यासारखं पाठवून दिल्यामुळे हे प्रकरण मिटलं. नाहीतर दंगाच होणार होता.

कठीण आहे बायकांचं ह्या देशात.

मीही आता हे उद्योग सोडून आपलं संशोधन करत बसतो मालक. दोनतीन पुस्तकंच काढतो आता. हे प्राध्यापक संघाचं कामही सोडून देतो. हा त्याग आता पुरे झाला. अशी आपली आंडं कुटून टाकत असतात हे लोक.

जिथे त्यागाला महत्त्व असतं अशाच समाजात त्याग वगैरे ठीक असतो. एरवी तुम्ही फक्त त्याग करत राहावा आणि तुमची नोकरी गेल्यावर तुमची बायकापोरं रस्त्यावर भीक मागायला लागली तर कोणी एक दिडकीची मदत करणार नाही.

अगदी माझाच विचार मांडला तुम्ही. हे तत्त्वज्ञान अर्थात तिरस्करणीय आहे. बैलांचं आहे. पण ते खरं आहे. हा का देश आहे की भूतखाना?

नंतर दोघेजण डुलक्या घेत बसले.

मग मधेच रुळांवर करकचून गाडी थांबली आणि सगळेजण बाहेर डोकावून पहायला लागले. डब्यात अतोनात माणसं जमेल तसे सोशिकपणाची मर्यादा ओलांडून मरतुकड्यासारखे रात्रभर वेळ काढत अंतर कापत होते. त्यांना मधेच गाडी थांबलेली पाहून मनापासून उबग आला.

गाडी बराच वेळ हालेना तेव्हा काहीजण खाली उतरून इंजिनापर्यंत जाऊन आले. एकदोघे अशी बातमी घेऊन आले की कुणीतरी तरुण मुलगी गाडीखाली सापडली आहे. पंचनामा झाल्याशिवाय गाडी हालणार नाही.

दुसरा म्हणाला, कोवळी पंधरा-सोळा वर्षांची पोर आहे हो. अगोदरच पोरीला तोडून रुळावर टाकलंय्.

काहींनी अरेरे केलं. काहींनी बिड्या पेटवल्या. काही वैतागून पुन्हा पेंगायला लागले.

भोळे चांगदेवला हलवून म्हणाला, बोला ही काहीतरी. वेळ काढणं जिवावर आलंय.

पण चांगदेव नुसती बिडी पीत राहिला. भोळे मग आणखी अस्वस्थ होत डोळे मिटून बसून राहिला. मागचे सगळे दिवस, हे असे नरकासारखे आगगाडीतले प्रवास, नवी गावं, गावात प्रथम शिरणं आणि शेवटून कडू तोंड करून निघणं, सगळ्या गावोगावचे रस्ते, दुकानं, हॉटेलं, चौक, घरं, मित्र, गावाबाहेरची कुरणं, टेकड्या, झाडं, रेल्वे स्टेशनं, बस स्टेशनं, गाड्यांच्या शिट्टया, गाडी पकडणं, बस पकडणं, धावपळी,

हॉस्पेटलात पाय झटकून झटकून मेलेला भाऊ–आता आई—
आणि डोळे उघडून तो स्वत:शी म्हणाला, मी वेडाच होईन तो सगळा कोलाहल एकत्र झाला तर.
मग जरा वेळानं गाडी सुरू झाली. कोण कोवळी पोरगी, कोणी मारून रुळांवर ठेवली, कशाकरता-सगळं विचित्र होतं. मग गाडीनं वेग घेतला.
जरा वेळानं घड्याळ पहात भोळे म्हणाला, मालक, आता आपलं गाव येईल... हे दिवे आपलेच. तुम्ही कुठे उतरणार? आज सकाळीच गोप्या, चिपळ्या माझ्याकडे येतील. त्यांना तुमच्याकरता खोली शोधायला सांगतो. तरी ह्या गावात महिन्यादीडमहिन्याशिवाय जागा मिळत नाही. चला, आता आमच्याकडेच उतरा. मग ठरवा कुठे जायचं ते.
चांगदेव म्हणाला, मी इंटरव्ह्यूच्या वेळी उतरलो होतो ते हॉटेल मला फार आवडलं. तिथेच राहू जागा मिळेपर्यंत. तिकडेच जातो मी. दुपारी कॉलेजात भेटू.

लांब लांब मैलाच्या मैल झगमगते दिवेच दिवे असलेलं हे आपलं गाव दुरून पाहून चांगदेवला स्थिती झाली. तो म्हणत होता, माझ्या मनात जायला म्हणून एक जागा नेहमी असतेच. पण आता इथे नखं रोवून रहायचं. हादरे बसू द्यायचे नाहीत. कुठल्याही आतल्या बाहेरल्या चक्रात सापडून घ्यायचं नाही. अत्यंत बैलासारखं रहायचं. त्याच्यात जास्त कसोटी आहे.

दुसऱ्या दिवशी भोळे उशिराच कॉलेजात आला तेव्हा देसाई आणि चांगदेव स्टाफरुमच्या दारातच उभे होते. देसाई मोठमोठ्यानं चांगदेवला आत बसलेल्या सगळ्यांचा परिचय करून देत होता. ही मिस् जोशी-लइ नटूनथटून येती. ही वेगवेगळी झंपरं वर्गातल्या पोरांना दाखवीतं. ते कुर्कळनी-ते चमचमत्या केसावालं. ते लठ्ठया देशपांडे-ठोसराच्या कचेरीत रोज संध्याकाळच्याला जाऊन बसतं ते. ठोसर आपल्या संस्थेच्या बॉडीवर है की,-दैनिक समाजवाद नावाचा पेपर चालवत्यात. हाँ! तर हा कुर्कळनी लई हिंदुत्ववादी है. बारा हजार रुपये हुंडा घेतला ह्येनं परवा लग्नात. हा बोटनीचा अत्रे-ह्येला कदी उसने पैशे देऊ नये, परत मिळत न्हाईत. तो कुर्कळनी पुना वेगळाच है-हा मंजे ह्येनं ठोसराच्या नात्यातल्या पोरीशी लग्न केल्यागुनं घेतलेला. हे गुंडेचा सर-लई सभ्य हे. प्राध्यापक होऊन लई त्याग केला म्हंत्यात हे, न्हाइतर एक लॉरी तांदुळाची ब्लॅकनं आनली बॉर्डरवरून की चाळीस हाज्जार रुपये नेट प्रॉफिट होतो म्हंत्यात हे. ह्येंचा भौ मोठा व्यापारी है. विद्यापीठातल्या गाईडला दरवर्षी उन्हाळ्यात भावाकडनं सबंध वर्षाचं धान्य न् किराना ठोक भावामधी घरपोच पाठवून दिऊ हेनं. त्या कारनानं विद्यापीठात यम्.ये.चे क्लासेस शिकवायला मिळतात ह्येंना. त्या अनुभवावरच ह्येंना यंदा वरची ग्रेड मिळनार है. ते देशपांडे दात पुढं आलेलं काळंभोर-

येक टेक्स्टबुक लिवलं यानी गेल्या वर्षी स्वत: आनि वरतूनं नुस्तं लावायला उपयोग म्हणून विद्यापीठातल्या एका प्रोफेसरचंबी याच्या जोडीला नाव टाकलं आपखुषीनं. हे जवाहरलाल-लई सोदं है हे. कायम पोरींच्या भानगडी ह्येंच्या. हे उर्दूचं लांडं फरूकी-भल्लाचं घर ह्याच्यागुनंच बांधून झालं. कभी हम उनको कभी अपने घरको देखते है... हॅ हॅ हॅ... हा बाहेर गेला हा कुर्कळनीच है पुना एक आनखी-ह्येनं इस्टेटीसाठी भाऊ नसलेल्या कुरूप मुलीबरोबर लग्न केलं है. हे आलं हे जोशी-हे चहा पिऊन आलं असंल. येकटं गुपचुप चा पिऊन येऊ हे. ते त्याच्या पलीकडचं वयस्कर तेबी एक जोशीच-स्वत:बद्दल एकदीडतास सलग बोलू यानं. ते इंग्रजी पेपर वाचतायेत ते कुर्कळनी पुना आनखी येक-आल्याआल्या ते इंग्रजी वर्तमानपत्र ताब्यात घेतात. आनि स्वत:ची बायकोबी इथेच इंग्रजीला तुमच्या डिपार्टमेंटमधी लावून घेतलीय ह्येंनी. ते तिकडे पोरगेलं गोरंपान ते जोशी. लई रोम्यांटिक है ते. रोम्यांटिक जोशीच म्हंतात त्येला. आन् ते तिकडे डॉक्टर मुसा-चांगलं मानूस है ते, पन वरची ग्रेड देईनात त्येला पीएच्डी असून मुसुलमान असल्याकारणानं. ते याज्ञिक-चाला पुरे झालं आता. ते भोळे साहेब उभे ठाकलेत बघा. चा पिऊन यिवू. चिपळूनकर आन् शेंडे तुमच्या जागेच्या तपासाला गेले हैतं. तेबी तिकडं शोभामधीच येनार हैतं.

शोभामधे चिपळूणकर आणि शेंडे आधीच येऊन बसले होते. भोळे, देसाई गोपाळ देशपांडे आणि चांगदेव आले तेव्हा चांगदेवच्या जागेबद्दल सगळ्यांनी सखोल चर्चा केली. चांगदेव सकाळी आल्यापासून हे जागेचंच चाललं होतं.

शेंडे म्हणाला, पाटलाला खोली वगैरे नको, मोठा फॅमिली ब्लॉकच पाह्यजे. तीनतरी खोल्या पाह्यजेतच. फुकट फेरी झाली.

भोळे म्हणाला, बरोबर आहे. लग्न झाल्यावर धावाधाव करण्यापेक्षा आधीच—

चांगदेव म्हणाला, एरवीही आपल्याला मोठीच जागा लागते. लहानशा जागेत डोकं फिरायची पाळी येईल बाबा.

देसाई म्हणाला, या गावात ब्लॉक मिळनं लई कठीन है. नोकऱ्या धडाधड वाढल्या, वीस कॉलेजं आन् विद्यापीठ झालं पन घरं कुटं कोन बांदतंय त्येवडी? मोठा ब्लॉक कठीन है—

भोळे म्हणाला, मोठा म्हणजे केवढा? भाडं भयंकर पडेल मालक.

चांगदेव म्हणाला, अर्धा पगार गेला भाड्यात तरी चालेल. राहण्याशिवाय आपण आणखी कशावर खर्च करणार?

चिपळूणकर म्हणाला, पाटलांचं आपल्याला फार आवडलं हे सकाळीच आम्हाला सांगितलं तेव्हा बरोबर आहे. खाण्यापेक्षाही रहाण्यावर जास्त पैसे खर्चावे. मीसुद्धा वर्षापासून चांगली प्रशस्त जागा शोधतोय्. पण मिळेना. खाणं काय तासदीडतास, रहाणं चोवीस तास असतं.

गोपाल देशपांडे म्हणाला, तुझं वेगळंच कारण आहे. उगा सांगायला लावू नकोस आता. तोच ब्लॉक प्रशस्त आहे बेट्या तुझा. पण तुला वेगळीच सोय पाह्यजे आहे—

भोळे म्हणाला, इतकं भाडं भरायचं बरोबर नाही. पण तयारीच असली तर आमच्या पोफळे बंगल्याचा एक भाग बांधून पुरा होत आलाय्. मी विचारतो तुमच्याकरता. भाडं

मात्र भयंकर-यजुर्वेदी आहे आमचा मालक. शंभराच्या वरच घेईल म्हातारा.

गोपाळ देशपांडे म्हणाला, पुन्हा शेजारी कोणी मराठी भावगीतं रेडिओवर लावणारं कुटुंब नको. सुधीर फडके न् गीतरामायण म्हणजे रहाणं मुष्किल व्हायचं.

भोळे म्हणाला, तसं काही नाही आमच्या आसपास. आम्ही चुकून मराठी सेंटर लावत नाही. वरती पोफळेंकडेही नाही. मागे वैद्य रहातात त्यांच्याकडे बहुधा रेडिओच नाही.

चांगदेव म्हणाला, मग येतो मी पहायला एकदोन दिवसात. तुम्ही विचारून ठेवा आज-उद्या मालकाला.

शोभामधे ते दोनेक तास गप्पा मारत बसले. मधे ताज्या भज्यांचा वास आला. तेव्हा एकामागून एक चिकार भजी सगळ्यांनी खाल्ली. त्याचंच बिल तेरा रुपये झालं. गावातल्या अनेक घडामोडी सगळ्यांनी सांगितल्या. बहुतेक ह्या लोकांची शोभामधली बैठक गावातल्या वेगवेगळ्या जातींच्या वेगवेगळ्या कॉलेजांमधल्या भानगडींनी संपायची. ह्या गावात सबंध महाराष्ट्रातले सांस्कृतिक संघर्ष प्रकर्षानं एकवटून चाललेले असायचे. प्रत्येक जातीचं एक अशी विसेक कॉलेजं होती. ब्राम्हण-ब्राम्हणेतर, मराठा-बिगरमराठा, महार-मराठा, महार-मांग, मुसलमान-हिंदू-सगळ्या प्रकारचे सामाजिक संघर्ष इथे उघड चाललेले असल्यामुळे ह्या जातीजातींच्या कॉलेजातल्या सगळ्या भानगडींमधून त्यांना सगळे प्रवाह तासभर गप्पा मारून इत्थंभूत कळायचे.

भोळे म्हणाला, आपलं पुराणिक कॉलेज सुरू व्हायच्या आधी ह्या गावात इतकी जातीय तेढ नव्हती असं सगळे म्हणतात. ब्राम्हण विद्यार्थी सगळीकडे विखुरलेले असायचे. हे कॉलेज झाल्यामुळे ब्राम्हण सगळे एकत्र आले. पेशवाईच झाली ही. मग जातींचं धृवीकरण झालं.

गोपाळ देशपांडे म्हणाला, आपण आपली संस्था तरी सेक्युलर करूच. मायला फार घाण चालवलीय् ह्या माठूराम-ऋग्वेदी वगैरे म्हाताऱ्यांनी. आपण लवकरच संस्थेची मेंबरशिप घेऊन गव्हर्निंग बॉडीवर जाऊ की बरंच काही करता येईल.

चिपळूणकर म्हणाला, आपल्याला ते मेंबर करून घेणारच नाहीत. बघशील तू.

गोपाल देशपांडे म्हणाला, कोर्टात जाऊ. मायला, परवा विद्यापीठातले इंटरव्ह्यू झाल्यावर आपले ठोसर तिथल्या रजिस्ट्रारला काय विचारत होते फोनवर माहीत आहे? मी स्वतः ऐकलं. म्हणाले, आपले एकूण किती घेतले! आपले! म्हणजे ब्राम्हण. आणि ह्यांच्या पुराणिक कॉलेजात दुसरे किती घेतले असं कोणी विचारलं तर?

पापय्या देसाई हसून म्हणाला, येवडा मी तर हायेच दाखवायला लिंगायत, आन् आपला मुसा येक मुसुलमान पन हैच दाखवायला, आता येक चांगदेव पाटीलबी घेतलाच, आडनावानं तरी कोनाला वाटंल मऱ्हाटं है सकृदर्शनी असं. पुरे झाले की येवढे दुसरे!

भोळे म्हणाला, आपलेआपलेसुद्धा घ्यायला हरकत नाही, पण मेरिट थोडं तरी पाहिजे प्राध्यापक म्हटल्यावर—

देसाई म्हणाला, आरे, कोण्या येकाला मेरिट नै, पन जो तो उलट आसं समजतं पुरानिकमधे की आपन ब्राम्हन तर म्हंजे आपल्याजवळ मेरिट हैच!

चिपळूणकर म्हणाला, पण पुषोत्तम देशपांडेनं याच्यावरही कडी केली परवा तो म्हणाला की आपल्याला मेरिट वगैरे काही नाही, आपल्याला माठूरामचे आणि ठोसरांचे पाय धरल्याशिवाय दुसरा मार्ग नाही! इतके वस्ताद आहेत हे सगळे खूषमस्करे लोक!

चांगदेव म्हणाला, पुर्षोत्तम देशपांडे कोणता! जाडेला का?

शेंडे म्हणाला, तो जाडेला दात पुढे आलेला तो पी. पी. देशपांडे, हा पुर्शा म्हंजे पी.वाय. देशपांडे आहे, दुसरा एक जाडेला ढब्बू देशपांडे पुन्हा आहेच, तो जी. जी. देशपांडे.

चिपळूणकर म्हणाला, हॅट रे, ह्याला म्हणायचाय् तो एल. टी. देशपांडे जाडेला—

चांगदेव म्हणाला, आता हे सगळे ओळखायचे कसे?

देसाई म्हणाला, येक आर. यू. देशपांडेबी है, आन येक आय. एम्. देशपांडेबी हैच! हू हू हू देशपांड्यांचं येक सोडा पन कुर्कळनी वळकणं आनखी कठीण है. आन् जोशी तर आठनऊ हैतं येकून त्याच्या मायला. कोनी समजेना गेलं आपल्याला तर. आपल्याला फक्त हा गोपाळ देशपांडे समजेल तूर्ताला.

चांगदेव म्हणाला, आता आपण दुसरीच तरकीब शोधली पाहिजे याच्यासाठी. आपण आपल्या ह्या देशपांड्याला तरी चांगला देशपांडे म्हणत जाऊ.

चिपळूणकर म्हणाला, पटलं आपल्याला. चला चहा पिऊन निघू. आजचा दिवस पाटलासाठी जागा पहाण्यातच गेला वाया.

गोपाळ देशपांडे म्हणाला, ते तरी बरं. आम्ही साले आज माठूराम आणि ऋग्वेदी या दोघांच्या तावडीत सापडलो स्टाफरूममधे! साले फुकट येऊन बसतात आणि सापडेल त्या प्राध्यापकाला डेमॉक्रसीबद्दल तुमचं काय मत आहे आणि एज्युकेशनबद्दल तुम्हाला काय वाटतं असले प्रश्न विचारत बसतात चारचार तास. साल्यांना दुसरे उद्योगच नाहीत. दुसऱ्या कुठल्या कॉलेजात नसेल बाबा असला ताप.

शेंडे म्हणाला, बाहेर कोणी विचारीना ह्यांना. शाहू कॉलेजमधे चेअरमन शिंदे कुणी अजून पाहिला नाही. मोठमोठ्या राजकारणात त्याचे चेअरमन आणि सेक्रेटरी अडकलेले असतात, त्यांना कुठे वेळ आहे स्टाफरूममधे बसायला.

चिपळूणकर म्हणाला, खरं तर काळा देशपांडे रोज संध्याकाळी नवसमाज कॉलनीत जाऊन स्टाफरूममधे कोण काय बोललं हे रिपोर्ट करतच असतो—

चांगदेव म्हणाला, नवसमाज कॉलनी म्हणजे काय?

गोपाळ देशपांडे म्हणाला, ब्राम्हणांचा महारवाडा आहे तो. आपले ठोसर, ऋग्वेदी वगैरे सगळेजण तिथेच रहातात. एका ब्राम्हणेतराला जागा मिळत नाही तिथे. आपले अर्धे प्राध्यापक तिकडे संध्याकाळी ठोसरांकडे बसलेल्या असतात कुचाळक्या करत. आपला जाड्या देशपांडे तर तिकडे गेल्याशिवाय जेवत नाही संध्याकाळच्याला. इकडचं तिकडे करणारा तिकडंबाज.

चिपळूणकर म्हणाला, त्याला तिकडंबाज देशपांडेच म्हणू या आजपासनं.

भोळे म्हणाला, हे सगळे प्राध्यापक रिकामे आहेत म्हणून असले उद्योग करतात. आम्ही आपल्या संघटनेतर्फे विद्यापीठात मोर्चे नेऊन ओरडून ओरडून कंटाळलो की सगळ्या सुधारणा सुरू करा, सिस्टिम बदला, पण काही होत नाही. आपल्या

विद्यापीठातली पोरं ऑगस्टमधे ॲडमिशन घेतात आणि सप्टेंबरमधे दसरा आला की पार दिवाळीच्या सुटीसाठी निघून जातात. मग येतात सुटी संपल्यावर डिसेंबरमधेच. आपले माठूराम-ठोसरही ह्यात कधी लक्ष घालत नाहीत. निव्वळ राजकारण फक्त खेळतात आणि व्हाइस-चॅन्सलरला गोत्यात आणून मजा पाहात बसतात. स्टॅण्डर्ड वाढवावं, पोरांना अभ्यासाकडे लावावं याचा कोणी प्रयत्न करत नाही.

गोपाळ देशपांडे म्हणाला, त्याच्यावर तर यांची लीडरशिप अवलंबून असते बाबा. चांगलं करायला लागले तर यांना लीडरशिप कशी मिळेल? पोरं पेटवून द्यायची आणि गोंधळ करायचा याच्यासाठी तर शाळा-कॉलेजं अन् वर्तमानपत्रं चालवायला निघालेत हे.

भोळे म्हणाला, आपल्या माठूरामला एकदा व्हाइस-चॅन्सलर केल्याशिवाय आपलं विद्यापीठ चांगलं चालतं असं वर्तमानपत्रांमध्ये भरभरून लिहून येणार नाही!

गोपाळ देशपांडे म्हणाला, पण हे व्हाइस-चॅन्सलर झाले की तिथले सगळे प्राध्यापक राजीनामे देतील की हो. फार दिलदार माणूस लागतो तशा ठिकाणी. कुठलाही माणूस असो, त्याला हे ब्राम्हण त्रासच देणार कायम. सेक्युलर ब्राम्हण व्हाइस-चॅन्सलर आला तरी देणार.

भोळे म्हणाला, नवा व्हाइस-चॅन्सलर येतो तेव्हा पहिल्या वर्षात हे माठूराम-ठोसर त्याच्याकडून आपली सगळी बेकायदेशीर कामं करून घेतात. त्यानं नाही ऐकलं तर त्याच्याबद्दल खोट्या बातम्या देऊन त्याची इमेज खराब करतात. मग तो यांच्या विरुद्ध काही करायला गेला की हे जोरात महाराष्ट्रातल्या सगळ्या ब्राम्हण संपादकांतर्फे त्याची बदनामी सुरु करतात. यांच्या प्रेशरमुळे यांची कामं त्यानं करायला सुरुवात केली की हा प्रचार थोडा थंड होतो, पण मग तिकडे मराठे संतापतात की हा व्हाइस-चॅन्सलर ब्राम्हणांच्या मुठीत गेला म्हणून. आणि मराठे संतापले की मग धांगडधिंगाच सुरू होतो. तेव्हाही माठूराम-ठोसर यांना आनंदच होतो! हे आपले लोक म्हणजे जातीयतेचा अर्क प्यालेले आहेत. काही करून दुसऱ्या जातीच्या व्हाइस-चॅन्सलरला बदनाम करायचं ह्याची खूणगाठ बांधून ठेवतात हे. म्हणून माझं मत आहे मालक की एकदा तरी माठूरामला व्हाइस-चॅन्सलर करावंच. ब्राम्हण व्हाइस-चॅन्सलर झाल्यामुळे तरी मराठी वर्तमानपत्रांमधून आमच्या विद्यापीठांत चांगलंही काम खूप होतं हे छापून येत जाईल. विद्यापीठाची प्रतिमा तरी चांगली होईल.

शेंडे म्हणाला, सत्ता कधी मिळाली नाही म्हणून फ्रस्ट्रेशन आलंय ह्या ब्राम्हण मंडळींना. आताच पाहा ना, गावातलं काही काम असो माठूराम तिथे असणारच. कम्युनिस्टांच्या सभेचा हाच अध्यक्ष, जनसंघाचा पुढारी आला की सभेत हाच अध्यक्ष, मुसलमान मंत्र्यांच्या सत्काराला पुन्हा हाच कोषाध्यक्ष, भूदान चळवळीचाही हाच मुख्य! गंमतच आहे मायला सगळी.

चिपळूणकर म्हणाला, बाहेरचं राजकारण काही करोत हे लोक, पण आपल्या संस्थेत काय घाण करून टाकलीय. मीटिंगावर मीटिंगा घेतात साले चर्चेसाठी आणि चर्चेत कोणी प्रामाणिकपणे स्पष्ट बोललं की त्याच्यावर डाव धरून वर्षअखेर खोटेनाटे आरोप लावून काढून टाकतात.

दिवसेंदिवस हे सगळेच जास्त जास्त कडवट होत चालले आहेत. गेल्या वर्षी सादिकला काढणं म्हणजे निष्ठुरपणाचा कळस होता. मुसलमानांच्यात बरं मत व्हावं म्हणून माठूरामनं भरीला पडून त्याला घेतलं. आपल्याकडे वर्गात सगळी गुंड पोरं, आरडाओरडा, गोंधळ! सादिकला महिनाभर तुफान त्रास दिला.

लावून दिली होती ठोसर-ऋग्वेदी ग्रुपनं पोरं. करा म्हणाले गोंधळ; कसा मुसलमान घेतला माठूरामनं तर. फट्कन काढूनच टाकलं मग दोन महिन्यांनी. सादिक साला नुकतीच शादी वगैरे करून आला होता नोकरी लागल्याच्या आनंदात. घरबीर लावलं होतं हौसेनं. आणि एकदम नोकरीच गेली! आम्ही वाजवलं होतं मीटिंगमध्ये माठूरामला न् भल्लाला. की दुसरे शिकवता न येणारे आहेत त्यांनासुद्धा असं मधेच का नाही काढत, ते ब्राम्हण आहेत म्हणून राहणारच.

मायनॉरिटीज्ना असं वागवलं तर काय फरक पडेल आपल्या समाजात?

भोळे म्हणाला, असा हजारोंवर अन्याय होतो, त्यांची नंतर आपल्याला आठवणही रहात नाही. ह्या खाजगी शिक्षणसंस्थांमुळे जातीयता वाढते आहे, वशिल्याचे निर्बुद्ध लोक वर जाताहेत. इतक्या वर्षांत एक खाजगी संस्था आदर्श झाल्याचं माझ्या ऐकिवात नाही. सरळ राष्ट्रीयीकरण केलं सरकारनं ह्या सगळ्या खाजगी शिक्षणसंस्थांचं तरच पुढच्या पिढीवर काही चांगले संस्कार होतील मालक.

चिपळूणकर म्हणाला, आधीच सगळीकडून लोक संतापलेयत ब्राम्हणांवर, त्यात हे मागासलेले ब्राम्हण पुढारी फालतू उद्योग करून मार खायची पाळी आणतात आमच्यावर. आपल्या कॉलेजवर आधीपासून सगळ्या गावातल्या कॉलेजांची तिरपी नजर आहे. संप करा म्हटलं की आपण आधी केला पाह्यजे! नाहीतर दगडं पडतात पुराणिकवर. प्रिन्सिपल भल्ला आधीच भित्रा. तो अशा वेळी बरोबर कॉलेजात नसतो. आणि सगळे ब्राम्हण प्राध्यापक दडून बसतात. गेल्या वर्षी नाही का, शाहू कॉलेजची पोरं म्हणाली संपावर जा आणि दलित कॉलेजची पोरं म्हणाली आम्हाला संप नको! तेव्हा आपल्या भल्लाला काय करावं कळेना. कॉलेज सुरू ठेवावं तर इकडची पोरं दगड मारणार, नाही ठेवलं तर तिकडची! स्वतःची काही पॉलिसी असून उपयोग नाही अशी परिस्थिती आहे इथे.

पर पुडारीपन करा कशाला येत नाही तर? सरळ आपलं आपलं कॉलेज नीट चालवावं, स्टॅण्डर्ड वाढवावं, ती बी काय कमी समाजसेवा है? गप्प तरी बसावं ह्या माठूराम-ठोसरनी.

नुस्तं कॉलेज चालवायचं असतं तर ह्यांनी काढलंच नसतं कॉलेज. पुढारी व्हायचं म्हणून तर हा उपद्व्याप सुरु केला. एरवी घरात बसून राह्यले तर ह्यांना कोणी विचारणार क्षुद्र विचारांच्या लोकांना?

पर त्येच्यामुळे ह्यांचे सगळे नातेवाईक आन् त्येंच्या बायका लागल्या नोकरीला. तोबी फायदा कमी है का? पुना पेपरामधे उरलेले नातेवाईक च्या मायला.

गोपाळ देशपांडे म्हणाला, परवा मला ठोसरानं निरोप पाठवला पुर्शा देशपांड्याजवळ की टी.एस्. इलियट मेला तर त्याच्यावर एक लेख लिहून द्या रात्रीच्या आत तीनचार कॉलमी दैनिक समाजवाद साठी! मी पुर्शालाच वाजवला. म्हणलं पुराणिव

कॉलेजचा स्टाफ का दैनिक समाजवादचे कॉलम भरायला लावलाय का गाढोच्यांनो. असेल हणमंतराव ठोसर मॅनेजमेंटमधला राजकारणी दादा.

देसाई म्हणाला, आता पुडल्या वर्षी तुला ठिवत नाही ते हितं. कन्फर्मेशन है की रे तुजं यंदा!

नको ठेवू दे. आपण आहोत तोपर्यंत असेच तडाके लगावत रहाणार भडव्यांना. चला उठू या. बाहेर मराठी सिनेमातल्यासारखा पाऊस पडायला सुरुवात झालीय. वाढायच्या आत पळालं पाहिजे.

मग ते सगळे उठले. चांगदेवला आपले नवे मित्र पाहून आनंद झाला होता. उंच, अपरिमित लठ्ठ, काळाभोर आणि सदैव खदखदा हसणारा आनंदी वृत्तीचा पापय्या देसाई. त्याचं नाक भयंकर मोठं पुढे आलेलं असल्यानं तो भोळा वाटायचा, पण आतून अतिशय बेरकी होता. गोपाळ देशपांडे ठेंगणा, बारका, तिरसट, तीक्ष्ण नजरेचा होता. त्याच्या दोन्ही ओठांवर नेमकं पांढरं कोड पडायला सुरुवात झाली होती. लांबून त्याचा चेहरा भयंकर वाटायचा. अगदी लहानपणी त्याची आई वारली होती आणि भयंकर हालअपेष्टांतून तो मोठा झाला होता. त्यातून ऐन तारुण्यात हे कोड सुरू झाल्यामुळे की काय त्याला श्रद्धाहीन कडवे विचार सुचत असायचे. चिपळूणकर गरुडासारख्या नाकाचा, मध्यम उंचीचा, गोरापान, सगळ्यांकडे तुच्छतेनं पहाणारा असा. आणि भोळे पोक्त, उंच भक्कम बांध्याचा, सरळ नाक आणि प्रचंड मिशा असलेला, आणि रात्रीच्या अव्याहत जागरणांनी नेहमी डोळे तांबारलेला असा होतं. प्रत्येक गावात आपल्या विचारांचे चार लोक असतात याचं त्या सगळ्यांनाच फार समाधान वाटत होतं.

भोळेनं सांगितल्याप्रमाणे एक दिवशी चांगदेव पोफळेबंगल्यातली जागा पहायला गेला. गावाबाहेरचा मोकळा परिसर, हिरवीगार जमीन, नवे तुरळक बंगले, प्रचंड मोथा डांबरी रस्ता, दोन्ही बाजूंनी प्रचंड जुनी वडाची झाडं, लांब दिसणाऱ्या टेकड्या -हे सगळ त्याला फार आवडलं.

भोळे त्याला म्हणाला, पोफळे पूजा करायला बसलेयत. नंतर वर जाऊ-आमच्या उजव्या बाजूच्या काटकोनात हा तयार होतोय हाच तो ब्लॉक. डावीकडे पोफळेचं सामानसुमान भरलेल्या खोल्या आहेत. समोरच्या बाजूला पोफळेचंच काहीतरी गोडाऊन आहे. त्याच्या मागच्या बाजूनं वैद्यांची जागा आहे.

भोळेचा तीन महिन्यांचा तान्हा मुलगा पाळण्यातच काहीतरी गडबड करीत होता. एका खोलीत भोळेची पुस्तकं ढीगचे ढीग करून जमिनीवर, फळ्यांवर, कपाटात, खाटेखाली, वाट्टेल तशी छतापर्यंत भरलेली होती. मासिकांचेही उकिरडे सर्वत्र होते. हे त्याच्या व्यासंगाचं आणि वाट्टेल ते वाचत गेल्याचं चित्रच होतं. ह्यामुळे भोळेवहिनींच्या संसारोपयोगी सर्व वस्तू बसायच्या खोलीतच जागा मिळेल तिथे दिसतील न दिसतील

अशा ठेवलेल्या दिसत होत्या.

खोलीतल्या टापटिपीकडे पहात चांगदेव म्हणाला, वहिनी हुशार दिसतात.

भोळे म्हणाला, मीच शिकवलं हो तिला सगळं लग्नानंतर.

मग भोळेवहिनींनी चांगदेवला पटवून दिलं की लग्नानंतरच भोळेमधेही थोडीफार सुधारणा झाली. नंतर त्या आत गेल्यावर चांगदेव भोळेला म्हणाला, तुमच्यासारख्यांनी जुन्या पध्दतीनं लग्न केलं म्हणजे काही दिवस शहरी रहाणी शिकवणं वगैरे आलंच. त्याच्यातही गंमत असते. रेडीमेड बायकोपेक्षा खेड्यातल्या एका मुलीला शिकवणं चांगलंच.

भोळे म्हणाला, खरं बोललात एकदम. ही त्यावेळी दहावी शिकलेली होती फक्त. सुखवस्तू शेतकरी घरातली असल्यानं थोराड होती. आमच्यात काही लोक शेती करतात, काही भटके मेंढ्यावाले असतात. आमच्या आईकडून आमच्याही घरात शेती शिरली. आईनंच ठरवलं होतं लहानपणापासून हिलाच सून करायचं म्हणून.

चांगदेव म्हणाला, ते चांगलं. आपल्यात कधी पूर्वी हा इंग्रजी व्यक्तिवाद अस्तित्वात नव्हता. एकदम इंग्रजांनी इथे व्यक्तिवाद आणला आणि सगळं समाजाचं स्वास्थ्य बिघडून गेलं.

भोळे म्हणाला, मी आमच्या आईच्या अशिक्षित सुसंस्कृतपणाला नेहमी शरण जायचो. आईनं शपथ घातली आणि मीसुद्धा लग्नाच्या बाबतीत फार नखरे करू नये कसं ठरवलं. तेवढा लग्नाचा जुनाट सोहळा मात्र माझ्या आयुष्यातला अत्यंत नीचेचा प्रसंग मला वाटला. हेही तुम्ही म्हणता तसा व्यक्तिवादाचा रोगच असावा. शिवाय मी वेड्यावाकड्या गावातून परप्रांतात मार्ग काढत असल्यानं मुलींशी बोलणंसुद्धा तसल्या गावात चर्चेचा विषय व्हायचा. एकदा तर मार खायची विनाकारण पाळी आली होती. प्रेमफीम करायला कोणाला वेळ होता. सतरा सामाजिक कार्य आणि पुन्हा आमचं वाचन इतकं असायचं की बाकीची लफडी कधी करणार? शिवाय तुमच्यासारखा मी दिसायलाही गोड नाही हे सोडा. पण मुख्य म्हणजे आपली जात कितीही उमदी, कष्टाळू, स्वाभिमानी असाली तरी उच्चवर्णीय मुलींसमोर मिनतवारीनं आपले हे गुण सांगत बसा न् फुकाचे संघर्ष करत बसा हा प्रकार माझ्यासारख्याला शुक्लकाष्ठासारखाच वाटतो. त्यातून हळूहळू आम्ही जोतिबा फुल्यांचे भक्तच होऊन बसल्यानं वरच्या सगळ्या आढ्यताखोर ब्राम्हणमराठ्यांबद्दल उगाच द्वेष वाटायचा. मी अजूनही बहुजनसमाजवादी आहे. फुले आपल्याकडचे मार्क्सच आहेत, पण त्यांना एंगल्सही मिळाला नाही आणि लेनिनही मिळाला नाही.

मग भोळेवहिनी पोहे घेऊन आल्या तेव्हा भोळे म्हणाला, आपल्या लग्नाबद्दल यांना सांगत होतो. म्हटलं हे काही स्फूर्ती घेतील! हिनं गेल्या दोन वर्षांत माझे सगळे मनस्ताप सोसून बाळंतपण सोसून मॅट्रिक पास होऊन शिवाय बरंच वाचनही चालवलं आहे. बरं का चांगदेवराव, कसंही करून ह्या वर्षी भारतीय स्त्रियांबद्दल मला एक पेपर पुरा करायचा आहे. त्याचं इंग्रजी जरा तपासून द्या बरं का मला नीट. इतक्या गुलामगिरीत ह्या देशात बायकांना वागवलं जातं एवढ्या एका मुद्दयावरून सुद्धा हा देश शहाण्या माणसांनी सोडून द्यावा.

भोळेवहिनी चांगदेवला म्हणाल्या, ह्यांचे बाहेरचे उद्योग कमी करायला सांगा हो यांना जरा. घरात नुसता उकिरडा झाला आहे पुस्तकांचा. काही लिहित नाहीत न् काही नाही. फेकूनच देईन एकदा सगळा कचरा....

भोळे म्हणाला, यंदा मी निव्वळ ह्या कामातच बुडून घ्यायचं ठरवलं आहे. सगळे मागचे अपुरे प्रोजेक्टस् लेख पुरे करतो ह्या एकदोन वर्षांत. यंदा बघशील तू.

भोळेवहिनी आत गेल्यावर भोळे म्हणाला, बायको वैतागली आहे आमच्यावर आमच्या सामाजिक भानगडींमुळे. इलाज नाही. आमच्या बायकोला फार त्रास झाला दोन्ही वर्षं लग्नानंतर. आमच्या चळवळी, खूप मित्र घरी कायम उतरायला, जेवायला केव्हाही कितीही लोक, कधी न पुरणारा पगार-पण हिनं कधी कुरकूर केली नाही. आम्ही एकदम बायकोला सांगणार, मी राजीनामा दिलाय. महिन्याभरात हे गाव सोडावं लागणार. की ही करुण होऊन घरामागच्या बागेत लावलेल्या शेवग्याकडे, फुलझाडांकडे, नीट लावलेल्या स्वैंपाकघराकडे करुण पहात गप्प. एवढा सोशिकपणा आपल्यात यायला पाहिजे असंही वाटतं. गेल्या वर्षी तर हिला नववा महिना असताना मी सामान गुंडाळायला सांगितलं होतं. कारण ते मुसलमान पोराच्या लग्नाचं फारच पेटलं होतं. ते हुकलं. मला बायकोबद्दल फार आदर आहे. आपल्या बायकांकरता देशभर खवूपच काहीतरी केलं पाहिजे. जे काही ह्या बिचाऱ्यांसाठी केलं ते इंग्रजांनीच केलं-सती, बालहत्या वगैरे सगळं. आता पंतप्रधान स्त्री असून साधी हुंडाबंदी करता येत नाही, गर्भपात कायदेशीर अजून होत नाही. मी तीन लेख लिहिले गर्भपात कायदेशीर व्हाल म्हणून, आमच्या खासदारांना नेहमी सांगत असतो बायकांचे किती प्रकारचे हाल, किती प्रतीच्या अपेष्टा ह्या देशात होतात याची गणती नाही. मला आता माझं लोकशाहीवरचं पुस्तक पुरं केलंच पाहिजे मालक. सुधारणांचा अव्याहत भडिमार आणि त्या राबवून घेणारं कणखर सरकार आलं पाहिजे, असं आपलं मत आहे. नाहीतर ह्या देशात लोकशाही टिकत नाही मालक.

नंतर भोळे चांगदेवला बाहेर घेऊन गेला आणि बंगल्याबाहेरून आतून फिरवून सगळं समजावून सांगून म्हणाला, पोफळे अजून पूजा करतोय! त्याला दर सोमवारी एक जीपभरून बेलाची पानं लागतात. ती सरकारी नोकर सरकारी जीपमधून नियमित आणून देतात. पहा अजून मोठमोठ्यानं मंत्र म्हणतोय म्हातारा. साला एखाद् दिवशी दोनदोन तीनतीन तास पूजा करतो! त्यावेळी समजावं ह्यानं काल खूप पैसे खाल्ले असावेत म्हणून. आपलं सरकार अशा ब्युरोक्रॅट्सवर चालतं. काय सुधारणा होणार ह्या देशात? मात्र एरवी पोफळे निरुपद्रवी प्राणी आहे. नंतर दुरुस्त्या वगैरे करून देत नाही. आताच स्वतंत्र संडास करायला सांगावा. चला, बंद झाला त्याचा घोष.

वरती मालक पोफळे अत्यंत म्हातारा, सज्जन वाटणारा असा जानवं बोटात खेळवत आला. खिडकीतून वाकून खाली ड्रायव्हरला गाडी बाहेर आण असं सांगून तो चांगदेवकडे अभ्यासू नजरेनं पहात मग म्हणाला, भोळेसाहेब, बसा हो. ऑफिसात

माझ्या समोर कायम लोक उभे रहातात, घरी तरी ती फीलिंग नको. बसा. कोण आपण? अच्छा. यंदाच आलात? कुठले आपण? अहो, मूळचं गाव सांगा. बरं शाकाहारी आहात ना?... मिसअंडरस्टॅण्ड करू नका बरं, जात विचारत नाहीय मी, शाकाहारी का मांसाहारी एवढ्या दोनच जाती मी मानतो. अच्छा अच्छा, छान. भाडं कळलं ना? एक रुपया कमी नाही. दर महिन्याच्या एक तारखेला सव्वाशे रुपये द्यायचे. उशीर मला चालणार नाही. बरं! पावती देऊ. लवकर ठरवा. मी गेली दौऱ्यावर की आठ आठ दिवस येत नाही. संडास? संडास...हं...तुम्हाला कशाला हो स्वतंत्र संडास? तेवढी कोऑपरेशनची सवय जडते...बऽऽरं!ठीक आहे. भाडं कबूल आहे ना? संडासी आज करायला सांगतो. आहे मटेरियल तयारच. मग? सांगा नक्की काय ते. ठीक आहे. चलू या. कळवा.

नंतर चांगदेव भोळेला म्हणाला, मोठया गावात हे बरं असतं. पैसा फक्त हवा असतो, बाकी कारा आहे की लग्न झालेला, जातफीत-काही नाही. व्यापारी वृत्ती एका दृष्टीनं सेक्युलर असते. एक स्वार्थ सोडला तर जातदेशधर्मवंश समान!

तसं पोफळे मांसाहाराचं म्हणाला, पण तुमच्या तुम्ही काहीही खात चला बरं का. आम्ही नाही का, अधूनमधून मटण वगैरे करतोच. तसे आम्ही शाकाहारी, पण आता बायकोही मटण करायला शिकली आहे.

चांगदेव जेवायला म्हणून थांबला. मधेच वरून खूप गोंधळ, हसणं, आरडाओरडा ऐकायला आला. भोळेवहिनी म्हणाल्या, ह्या पोफळेंच्या पोरी फार दांडग्या आहेत. दिवसभर हैदोस घालत असतात.

जेवून निघतांना वरतून एकदम मोठ्यानं रेडिओ लागला आणि गाण्याचे सूर ऐकायला आले : किसने चिलमनसे माऽराऽऽ

नजाराऽ मुझे किसने चिलमनसे माराऽऽ

तेव्हा भोळेनं चांगदेवला टाळी दिली. चांगदेव म्हणाला, हीच जागा घ्यावी. बसल्या बसल्या हिंदी गाणी ऐकायचेच सव्वाशे रुपये भाडं होईल.

पोफळेचं घर लवकर तयार होईना. तोपर्यंत चांगदेवचं गावात व्यवस्थित बस्तान बसून गेलं. मुरलीमोहनलाही तो चांगला वाटला. कॉलेजवर सगळ्यांशी त्याचं नीट जुळलं. काही वर्ग सुरू झाले तेव्हा पोरापोरींना तो चांगलं शिकवणारा वाटला. त्याचं कोणीशीच खटकलं नाही. वारंवार हुसकून लावलेल्या भटक्या जमातींनी निरीच्छपणे कुठल्याही नव्या जागेवर बिढार करावं तसा तो ह्या गावात महिन्याभरात रुळून गेला. कॉलेजच्या कोणी घरी बोलावलं तर गेला, स्टाफरूममध्ये सगळ्यांबरोबर नीट वागला. नीट बोलला. सगळ्यांबरोबर चहाला गेला. कोणाला हिणवलं नाही. प्रिन्सिपल भल्लानं जी सांगितली ती सगळी हमाली कामंसुद्धा इतमामानं केली. होतील ते मित्र केले. चर्चा केल्या. अपमान न करता स्पष्ट बोलला. कोणी अपमान केला तर शांत राहून चेहऱ्यावर नापसंतीचा संताप व्यक्त केला. सगळे जण म्हणाले, उमदा माणूस आहे. अशी माणसं संस्थेत का घेत नाहीत?

पोफळेंनी घराचं काम पुरं करायला खूपच दिवस लावले. तोपर्यंत चांगदेव टूरिस्ट इंटरनॅशनल ह्या महागड्या हाटेलमधेच रहात होता. ह्या हाटेलात वरच्या दोन मजल्यांवर दोनेकशे सिंगल, डबल अशा खोल्या होत्या. समोर मोठ्ठी बाग होती. मागे परदेशी लोकांना आवडेल अशी रानासारखी मोठमोठी झाडं, हिरवळी, त्यावर बाकं ठेवलेली होती. त्याच्याही मागे एक नाला होता आणि नाल्याच्या पलीकडे एक जुनी मोगलांच्या काळातली रोशन बाग नावाची घनदाट झाडांची, आंब्याच्या बनाची रम्य बाग होती. ह्या बागेत एक छोटंसं पशुसंग्रहालय होतं. त्यात माकडं आणि पक्षीच ज्यास्त होते. चारपाच चित्ते, दोनचार वाघ, हरणं असे प्राणी होते. एखाद्या रात्री हे प्राणी मोठमोठ्यानं ओरडायचे.

ह्या हाटेलात चारपाच दिवस राहून निघून जाणारे प्रवासी ज्यास्त होते. मुंबईच्या एका स्मगलरनं ही अवाढव्य जागा एका वर्षांत बांधून काढली असं लोक म्हणायचे. जागेच्या मानानं भाडं अतिशय कमी होतं. शिवाय महिन्याच्या बोलीनं राहणाऱ्यांना आणखी कमी भाडं होतं. त्यामुळे क्वचित काही जण चारसहा महिनेसुद्धा इथे रहायचे. मागच्या हिरवळीवर रोज संध्याकाळी गावातले लोक चहा प्यायला, गप्पा मारायला वगैरेही जमायचे. ट्रिपला येणाऱ्या बसेस बाहेर सुटलेल्या दिसायच्या. दुरून दुरून येणाऱ्या तरुण मुलामुलींचे थवे हंगामाच्या दिवसात सारखे गलबलाट करायचे. दोनचार दिवसांनी नवेच चेहरे दिसायचे. त्याची महिन्याभरात चांगली दोस्ती झाली. कारण चांगदेव एकटाच बरेच दिवस तिथे टिकला.

नंतर नंतर एक राजेश्वरी नावाची इंग्रजी बोलणारी सुबक नटवी बाई तिथे रहायला आली. ती सरकारच्या टूरिझम डिपार्टमेंटतर्फे इथे टूरिझमचा डिप्लोमा सुरू करण्यासाठी दोनतीन महिन्यांसाठी खास आली होती. ती तिशीतली, तेजदार, बरीचशी तिरसट, अमेरिकन पद्धतीनं छान बोलणारी आणि अमेरिकन रंगरंगोटी पापण्यांवर, डोळ्यांभोवती लावणारी होती. पण तरी तिला भारतीय वेशभूषेचं प्रचंड वेड होतं. वेगवेगळ्या भारतीय खादी ग्रामोद्योगमधल्या रंगीत साड्या, चोळ्या, शाली ती ऐटीनं मिरवत हाटेलात वावरायची. परदेशी प्रवाशांबरोबर दिमाखानं काय काय पहायचं हे अमेरिकन बोलीभाषेत सांगायची. एका इंग्रज जोडप्याला ती एकदा म्हणाली, इंडियन फूड तुम्हाला आवडत नाही हे आश्चर्य आहे. लंडनमध्ये महिन्यातून एकदा तरी इंडियन रेस्तराँमध्ये जायचं असा बायकांचा नवऱ्याजवळ हट्ट असतो. इथे रोज खाऊन घ्या.

ती अमेरिकेत अनेक वर्षं आणि इंग्लंडमध्ये एक वर्षं राहून आल्यामुळे तिकडच्या प्रवाशांना ती तिकडचीच उदाहरणं सांगून फटकावायची. तिच्या संपूर्ण कृत्रिम वेषभूषेबद्दल आणि केशभूषेबद्दल चांगदेवला पहिल्यापासून विनाकारण तिरस्कार वाटत होता. तिच्या पापण्यांवरचा रंग, डोळ्यांभोवतीचे मोरपंखी रंग, गालांवरची लाली, ओठांवरचा गुलाबी रंग, तिच्या रोज वाळणाऱ्या कपड्यांमधील कमरेला बांधायची पॅडिंग्ज-वगैरे सगळ्या गोष्टींचा परिणाम विचित्र होता. एखाद्या वेळी संध्याकाळी ती बाहुलीसारखी मागच्या हिरवळीवरच्या रेस्टॉरंटमधे लांब बाकावर शांत बसलेली असायची, कायम नाटकांची इंग्रजी पेपरबॅक वाचत असायची. तिच्याभोवती परदेशी टूरिस्टांचा घेरा असायचा.

पहिले काही दिवस चांगदेव तिच्याकडे पहायचासुद्धा नाही. पण बऱ्याचदा ती कुठलं नाटक वाचते आहे म्हणून तो तिरपी नजर टाकत पुढे जायचा. एखाद्या वेळी जेवायची टेबलं सगळी भरून गेली की तिच्याच टेबलावर त्याला जेवावं लागायचं. मग ती दोघं मुकाट्यानं मान खाली घालून जेवणं संपवायची. हेही चांगदेवच्या जिवावर यायचं. राजेश्वरी त्याचं हे वागणं पाहून स्वतःशी मिष्किल हसायची.

पावसाळा सुरु झाल्यावर प्रवाशांची गर्दी एकदम कमी झाली. दोनचार परदेशी प्रवासी फक्त दिसायचे. आता चांगदेवला ह्या बाईला टाळणं कठीण झालं. कारण बऱ्याचदा त्या दोघांचीच ताटं एका टेबलावर मांडलेली असायची. दोघंही जेवणाला उशीर करत रहायचे. शेवटी नोकर बोलवायला यायचा.

एकदा जोरात पाऊस कोसळत होता. आकाशात ढगांची प्रचंड ढकलाढकल चालली होती. एक जर्मन जोडपं हे मान्सूनचं रौद्रसुंदर स्वरूप पाहून खूष होऊन एकमेकांना चिकटून दारातल्या पायरीतच बाहेरच्या पावसाकडे पाहात चुप्प पाखरांसारखं बसून होतं. मधेच पाऊस थोडा वेळ संथ झाला. लांब बागेत मोर केकावायला लागले. त्यानंतर एकाएकी वाघांच्या राहून राहून प्रचंड गर्जना.

चांगदेव शिकवायची एक कादंबरी संपवत वाचत बसला होता तेव्हा नोकर जेवायला बोलवायला आला. कादंबरी फेकून तो जिन्यावरून खाली उतरत असताना समोरच्या जिन्यावरून लहानशा बांध्याची नटलेली पुष्ट राजेश्वरीही ऐटीत पायऱ्या उतरत होती. तिच्याकडे न पहाता तो सरळ खाली टेबलापुढेच येऊन बसला. ती सुद्धा त्याच्या समोर बसली. मग उगाच ताटात वाटी फिरवीत हलक्या सुरात इंग्रजी पद्धतीनं ठराविक अंतर राखणाऱ्या सलगीनं ती म्हणाली, हे वाघांचं ओरडणं किती हॉरिबल वाटतं? कशामुळे ओरडतात हे प्राणी?

चांगदेव तिच्याकडे न पाहता म्हणाला, त्यांनाच माहीत!

मग पुन्हा तिकडे कान देऊन ती मान हलवून म्हणाली, स्ट्रेंज! स्ट्रेंज! एकसारखं ओरडताहेत.

चांगदेव वैतागून म्हणाला, मला आवडतं ते.

ती चेहऱ्यावरचे भाव बदलवून म्हणाली, डू यू?... एखाद्या ॲब्सर्ड ड्रामाला चांगलं बॅकग्राउंड होईल हे.

चांगदेव काहीच बोलला नाही, पण त्याला ते आवडलं.

मग त्यालाही भाजी वाढत ती म्हणाली, इथे गावात कुणाकडे काही ॲन्टीक्स्, पेटिंग्ज असं काही तुला काही माहीत आहे? डू यू नो? तसं फार जुनं ऐतिहासिक गाव आहे हे.

चांगदेव स्वतःपुरतंच वाढून घेत म्हणाला, मला माहीत नाही.

हं. तू सुद्धा इथे नवीन आहेस?

येस.

यूऽ बॅचलर?

येस.

काय करतोस?

टॉचिंग.
म्हणजे?
इंग्लिश.
म्हणजे?
इंग्लिश.

मग जेवण संपेपर्यंत दोघेही गप्प. हे फारच कृत्रिम आणि जिवावर आलं म्हणून मधेच तो तिच्या केसांकडे, रंगीत कपड्यांकडे कुतूहलानं पहात म्हणाला, तू-काय करतेस, बाय द वे?

मी टूरिझम डिपार्टमेंटमधे एक्स्टेन्शन विभागात आहे. टूरिझमचा डिप्लोमा सुरु करून द्यायला आले आहे, गाईड्स ट्रेन करायचा. शिवाय आम्हाला इथे एक म्यूझियम बांधता येईल का याचाही रिपोर्ट द्यायचं काम मला सांगितलं आहे. म्हणून मी विचारलं, काही वस्तू कुणाजवळ असल्या तर सांग. लांबून लांबून इथे टूरिस्ट्स् येतात, त्यांना गाईड्स् मिळत नाहीत, गावातल्या बारक्या गल्ल्या सोडल्या तर पहायला काही नाही, संध्याकाळी टूरिस्ट्स् ह्या जोडप्यासारखे नुस्ते बिअर पीत बोअर होतात. एखादं म्यूझियम, गॅलरी तरी पाह्यजेच. एक दिवस एक टूरिस्ट थांबला तर एका वर्षात सगळ्यांचे एकूण दहा कोटी रुपये ह्या देशात ज्यादा खर्च होऊ शकतो. परदेशी टूरिस्ट्स् इंडियातून ठरवलेले पैसेसुद्धा पूर्ण खर्च करू शकत नाहीत. इथे किल्ले न् देवळं न् लेणी पाह्यलं की संपलं. गावात वेळ जात नाही. पंधरा दिवस इंडियात काढावे म्हणून येणारे प्रवासी आठ दिवसांत परत जातात. नुस्तं ह्या कोपऱ्यातून त्या कोपऱ्यात देशभर हिंडण्याशिवाय काही करमणूक नाही. पुन्हा दारूबंदी! आमचं डिपार्टमेंट तर झोपाच काढत असतं.

चांगदेवनं आता तिच्याकडे निरखून पाह्यलं. अतिशय बुद्धिमान, सरळ नाक, तेजस्वी नजर आणि पक्कता असलेल्या हनुवटीवरच्या रेषा. रंगांचा सर्व शरीरावर आकर्षक उपयोग. आणि खोटा आडपडदा नसलेलं सरळ थेट बोलणं. शिवाय इंग्रजीमुळे अहोजाहोचा ताप नाहीच. सरळ तू, तुला, तुझं....

मग तिची गंमत करावी म्हणून तो म्हणाला, तू खरं तर ते टूरिझम वगैरेपेक्षा नाटकात किंवा फ़िल्ममधे का नाही जात?

ती मनमोकळं हसून म्हणाली, मी सिनेमाची फार वेडी आहे. पूर्वी नाटकांचंही वेड होतं. पण मग कळलं की तो एक डर्टी धंदा आहे. ती एक मेलेली कला आहे-विणकाम, सुतारकाम अशांपैकी एक मेलेली कला. निव्वळ बकाली धंदा.

तो तिच्या खांद्यांवर रुळणाऱ्या केसांकडे दुर्लक्ष करत म्हणाला, मला तसं वाटत नाही. अभिनय खरं तर एकमेव जिवंत कला आहे. अभिनय, नाट्य सगळीकडे लागतंच. तुमच्या टूरिझमच्या कोर्समधेही गाईड्स्ना अभिनय लागतो. तो पहा एक तरुण मुलगा हाटेलच्या मागच्या दारात उभा आहे. त्याची नेहमीची पोरगी अजून रेस्टराँमधे

पावसामुळे आली नाही. अगदी नाटकातल्या प्रवेशासारखंच जग वाटतं आहे की नाही त्याला? निदान आपल्याला तरी तो नाटकातल्यासारखा वाटतोच आहे. आपला मॅनेजर पहा लाल बोऽ वगैरे लावून ऐटीत त्या अमेरिकन जोडप्याशी नाटकातल्यासारखा माहिती सांगतोय्. वाकून वाकून. हा अभिनय नाही? लोकांशी संबंध आला की नाट्य आलंच. तूसुद्धा मला कायम सिनेमातल्यासारखीच वाटतेस. प्रत्येक जण मनोमन अभिनयच करत असतो.

ती मनापासून हे आवडून खदखदून हसली आणि म्हणाली, म्हणजे आत्ता तू सुद्धा अभिनय करतो आहेस?

तोही मनापासून हसला. मग ती म्हणाली, यू आर व्हेरी ओरिजिनल. व्हेरी प्रोफेसोरिअल! तुला नाटकं आवडतात?

नाही. अलीकडची सामाजिक समस्या असलेली नाटकं म्हणजे विचारू नका. आय हेट इट.

मग कुठली आवडतात?

कुठेतरी ॲब्स्ट्रॅक्ट, अद्‌भुताचा स्पर्श असला पाहिजे. ग्रीक, शेक्सपिअर, अलीकडे टेनिसी विल्यम्स्, स्ट्रिंडबर्ग, योनेस्को, बेकेट—

माय गॉड, मला नाटककार बोलायला इथे कुणी मिळेल असं वाटलं नव्हतं.

त्याला स्त्रियांबद्दल काहीही आसक्ती राहिली नव्हती. असं त्याला मनापासून वाटतही होतं. आता आयुष्य एकदम रिकामं ठेवावं असं त्याला मनापासून वाटत होतं.

ह्याउलट राजेश्वरी तिशी उलटून गेल्यावर जुनं कौमार्य परत आणायचं ठरवून कायम वागत होती. तिला हे उपजतबुद्धीनं माहीत होतं की काही वर्षांनी हे सुद्धा शक्य होत नाही. तिचा सगळा उत्साह हिमखंडावर थोडे दिवस काढायचे, तो वितळून जाईल हे माहीत असूनही उत्साहानं तरुण रहायचं, असा. खोटा पण तितकाच वास्तविक. गेली दहा वर्षं ती स्वतःच्या बुद्धीनं नोकऱ्या बदलत आज चांगल्या सरकारी नोकरीवर स्वाभिमानानं रहात होती. ती अमेरिकेत एका स्कॉलरशिपवर जाऊन आली होती. एका इंग्रजी पेपरमध्ये नाटकावर-फिल्मवर तीन वर्षं रिव्ह्यू लिहीत होती. त्याच वेळी इंग्लंडमधे जाऊन आली होती. आता तिचं स्वतःचं स्वतंत्र आयुष्य होतं. ती कुणाची काही लागत नव्हती. मुंबईला म्हातारी आई आणि ती कुलाब्याला एका खोलीत रहायची. कामात अतिशय हुशार, जबाबदारीनं सगळं नीट करणारी. शरीर सजवत होती तसंच.

चांगदेवला ती स्त्रीत्वाचा आदर्शच वाटली. तिचं पूर्वायुष्य कधी चुकूनही विचारावंसं वाटलं नाही इतकी ती स्वयंसिद्ध होती. तिनं लग्न केलं असेल, नवऱ्याशी फारकत घेतली असेल. पूर्वी तिची नीतिमत्ता ढिली असेल, परदेशात ती कशी वागली असेल- याचा आत्ताशी संबंध काय? तिचं काजळ, पापण्यांवरचा अमेरिकन रंग, लिपस्टिक, काळजीपूर्वक खांद्यावर रुळणारे केस-सगळं झाडाच्या सालीसारखं आवश्यकच होतं.

ती चांगलीच होती.

ते हल्ली बरोबरच जेवू लागले. नंतर मागच्या हिरवळीवरच्या रेस्टारंटमधे उशिरापर्यंत गप्पा मारत बसायला लागले. दोघांमधे लैंगिकतेचा स्पर्शसुद्धा नव्हता. नुस्तं चांगला वेळ घालवणं. ती म्हणाली, भारतीय पुरुष कायम भुकेले, वखवखलेले असतात. बाई पाहिली की हात लांबवणार, पाय घासणार. चांगदेवसारखा विरळा. एका ठिकाणी रहातो तोपर्यंत निर्मळ रहावं. ही सगळ्यात थोर नितीमत्ता.

तो तिला एकदा म्हणाला, तुझ्यासारख्यांनी खरंच नृत्य नाट्य फिल्ममधे रहावं. ह्या कलांमधे माणसाचं सबंध शरीरच भावभावनांसकट जसंच्या तसं स्थलकालाच्या परिणामांमध्ये चिरंतन होऊन जातं. तुमचे नाकडोळे, खांदे, चेहऱ्याच्या बाजू- सगळं कायम स्वरुपात कोरलं जातं. अशी दुसरी कोणतीच कला नाही. आणि बाकीच्या सगळ्या कलांच्या कलाकारांना हीच उणीव पछाडत असते. म्हणून मोठमोठे शिल्पकार, चित्रकार सेल्फ पोर्ट्रेट काढून ठेवतात.

ती म्हणाली, मायकेल अँजेलोचा स्वतःचाच पुतळा मी रोममधे पाहिला-किती कुरूप. माझ्या हे लक्षात आलं नव्हतं. यु आर व्हेरी ओरिजिनल—

तो म्हणाला, आणि आपले सगळे साहित्यिक तरी लोकांसमोर सशरीर यायची किती धडपड करतात? स्टेजवर यायची कोण धडपड? हे म्हातारे अन् म्हाताऱ्या स्टेजवर म्हणजे किती भयानक वाटतं. करुणच वाटतं. सगळ्यांची जनमानसात आपलं अस्तित्व अजरामर करायची केविलवाणी धडपड—

ती म्हणाली, तू काहीतरी लिहीत जा. यू विल बी ए ग्रेट क्रिटिक. मी सांगू का मुंबईच्या एका पेपरात—

तो वैतागून म्हणाला, नको.

एकदा ती म्हणाली, एका नबाबाकडे बरीच पेटिंग्ज आहेत. आपण लवकरच पहायला जाऊ. तू वेळ काढ. सध्या त्याबद्दल माझा पत्रव्यवहार चाललाय्.

तो म्हणाला, ह्या एक तारखेला मी गावात रहायला जातोय. इथे छान गेले दिवस तुझ्यामुळे. थँक्यू सो मच.

ती म्हणाली, इतक्यात जाणार? ह्या एक तारखेला? मग इथे जेवण बोअरच होईल. मला इथे आणखी एखादा महिना तरी राहावं लागेल असं वाटतं. पण तू भेटत जाणारच ना? जेवायला नाहीतरी बाहेरच जावं लागेल तुला, नाही? मग इकडेच येत चल.

तो म्हणाला, इकडे तीन मैल रोज येणं कठीण आहे. पण येत जाईन.

ती म्हणाली, नाहीतर मी तिकडे येत जाईन. एक दिवसाआड तरी आपण भेटत जाऊ.

तो म्हणाला, हे तसं जुनाट गाव आहे. इथे प्रवाशांच्या वातावरणात ठीक आहे, गावात ते बरं दिसणार नाही.

ती चिडून म्हणाली, वॉट डज इट मॅटर? आणि आपण असं काय करणार एकत्र भेटून? हाऊ सिली? गॉड! दोन सारख्या विचाराच्या माणसांनी भेटू नये? डू यू माइंड?

तो म्हणाला, नाही. मी उगाच म्हणालो.

त्याला ती अतिशय आवडली. खरी आदर्श स्त्री. मूलद्रव्यासारखी.

भोळेचा पोफळे बंगला दिवसभर शांत असायचा, पण मागच्या वैद्यांच्या आडव्या ब्लॉकमधून दिवसभर आणि रात्रीही नाना तऱ्हेचे एकत्र-कौटुंबिक आवाज येत असायचे. बंगल्यात तळमजल्यावरचे तिन्ही ब्लॉक मिळून इंग्रजी सी सारखा आकार व्हायचा. चौथी बाजू नुसते सिमेंटचे खांब लावून त्यांच्यावर मात्र पोफळ्यांनी खोल्या बांधलेल्या होत्या, त्यांत त्यांचं स्वैपाकघर वगैरे होतं. बाहेरच्या कंपाउंडची हमरस्त्याला लागून असलेली बाजू पुरुषभर भिंत बांधून ठेवलेली होती आणि बाकीचं कंपाउंड किरकोळ जुनाट तारांनी पुरं केलेलं होतं. कंपाउंडच्या ह्या दर्शनी भिंतीत लोखंडी गेट होतं. गेटमधून आत आल्यावर सुंदर फुलझाडं, नव्यानं लावलेली शेवगा, गोडलिंब, बेल, चाफा वगैरे उपयुक्त झाडं चिकार होती. मग मोठ्या लाकडी दरवाजातून आतल्या चौकात प्रवेश व्हायचा. ह्या मुख्य दरवाजाशी लागून डावीकडे भोळेचा आडवा ब्लॉक, उजवीकडे चांगदेवाचा उभा ब्लॉक, चांगदेवच्या ब्लॉकमागे दहाबारा असा फूट जमीन सोडून वैद्यांचा पुन्हा काटकोनात आडवा ब्लॉक असा एकूण आकार होता. जसजसा कॉन्ट्रॅक्टरांकडून माल फुकटात खाता आला तसतसा एक-एक भाग पुरा केलेला होता. वरच्या मजल्यावर चांगदेवच्या ब्लॉकला साधी सपाट गच्ची होती. भोळ्यांच्या वर आणि सिमेंटच्या खांबांच्या वर असा काटकोनात पोफळ्यांचा खुद्द ब्लॉक होता. तो उत्कृष्ट रंगवलेला होता. नवाच बंगला असल्यानं पोफळेमंडळींना बाग वाढवण्यात उत्साह होता. पोरी तर रोज संध्याकाळी गड्यांना हुकूम सोडत बागेतच हिंडत असायच्या. त्यामुळे संध्याकाळी बागेत येणं चांगदेवला अप्रशस्त वाटायचं. तो मधल्या खोलीच्या खिडक्यांतून बाहेर नव्यानं वाढणारा चाफा, गुलाब वगैरे पहात बसायचा. बंगल्याच्या चाऱ्ही बाजूंनी निव्वळ शेतं, मोठमोठं गवत, काटेरी झाडंझुडपं होती. व्हरांड्यातून दोन्ही बाजूंच्या जाळीतून बाहेरचा लांब प्रचंड वडाच्या झाडांमधला रस्ता आणि रहदारी दिसायची. पाऊस, उगवणारं गवत, जोमानं वाढणारी फुलझाडं सगळं छान होतं. त्याच्या व्हरांड्याच्या जाळीवरूनही एक रातराणीची वेल वर चढत होती. पोरींना ह्या बाबतीत चांगली सौंदर्यदृष्टी असावी. शिवाय सरकारी नोकर आणि पैसा असल्यानं बंगला सुंदर होणार यात शंका नव्हती. मालकमालकीण तशी फार साधी होती. हा बंगला बांधून व्हायच्या आधी गावात एका जुनाट घरात दोन खोल्यांच्या कोंदट जागेत हे कुटुंब राहायचं असं एक गडी चांगदेवला सांगत होता. पण आता अचानक आलेल्या श्रीमंतीमुळे मालकिणीला विशेषतः फार माज आला होता. ती भाडेकरुंशी चांगली वागत नव्हती. शिवाय पूर्वी नुस्ती आमटीपोळी खाऊन खाऊन आता अशी श्रीमंती आल्यामुळे बंगल्यावर कुठेतरी ती मध्यमवर्गी वृत्ती दिसतच असायची. उदाहरणार्थ, रात्री कुठेही एक दिवासुद्धा जळत नसायचा. कायम अंधार. पण सरकारी मोटार असल्यामुळे दळायला सुद्धा गड्याला मोटारीतून पाठवायचे आणि भोळेवहिनींनी त्याच गड्याला आपलंही दळण घेऊन जा म्हटलं तर मालकिणीला हे आवडायचं नाही. मग खुद्द भोळेला किंवा वहिनींना दळायला लांब गावात जावं लागायचं. इलेक्ट्रिकची बिलंसुद्धा गड्याबरोबर दिलेली मालकिणीला आवडायची नाहीत. फोनसुद्धा करायचा तर फोन झाल्यावर दहा पैसे मिळतील की नाही याची खात्री नसल्यानं मालकीण फोन बंद आहे असं कायम सांगायची.

एक ऑगस्टला चांगदेव पोफळे बंगल्यावर रहायला आला. चांगला देशपांडे, देसाई, शेंडे, चिपळूणकर, आणखी त्यांच्या कॉलेजमधला इंग्रजीचाच कारा प्राध्यापक गंगातीरकर हे सगळे त्याचं सामान आणायला होते. ट्रान्सपोर्ट कंपनीत त्याचं सामान येऊन महिना झाला होता. तिथून लोटगाड्यांवर सामान टाकून ते सगळेजण पोफळे बंगल्यावर आले. मग सगळं सामान लावणंही सुरू केलं. भोळेनं सगळ्यांना खायला वगैरे बोलवलं. शेजारी एक चांगला माणूस आला म्हणून त्यालाही उत्साह आला होता. चांगदेवची पुस्तकं लावत ते गप्पाविनोद करत होते. पुस्तकांखाली ठेवायला म्हणून त्याला वर्तमानपत्रांची रद्दी हवी होती. भोळे वर्तमानपत्र वाचत नसल्यानं घरात नाहीत हे त्यानं सांगितलं तेव्हा चांगदेव एकदम त्याच्यावर खूष झाला. दुसऱ्या दिवसापासून दूधवाला, मोलकरीण वगैरे सगळं लावून देतो असं भोळेनं सांगितलं. मोलकरीण सकाळी मधल्या चौकात हौदावर भांडी घासते, तिच्यासाठी मधला दरवाजा उघडा ठेवला तर ती भांडी बाहेर नेऊन परभारे आणून ठेवत जाईल म्हणजे झोपमोड नको असाही त्यानं सल्ला दिला.

तेव्हा देसाई मधला दरवाजा सताड उघडत म्हणाला, हा दर्वाजा चांगला है पाटील. लागूनच उजव्या हाताला थेट वर मालकाच्या पोरींच्या खोलीपर्यंत जाणारा जिनाच है हा इकडे! पोरींनाबी बरं हिकडच्या हिकडून झटकन जायलायायला! हू हू हू हू! दर्वाजा उगडाच ठिवत जावा रात्रीच्याला! हू हू हू हू ख्यॅ ख्यॅ ख्यॅऽ

शेंडे म्हणाला, सालं तरण्या पोरी अशा असून काऱ्या माणसाला घर द्यायचं बंगल्यातच, तर असा दरवाजा बंद का करत नाही हो भोळे हा- उगा फट् म्हणता ब्रह्महत्या कशाला?

चिपळूणकर म्हणाला, ह्या पोफळे पोरी फार उंडारलेल्या आहेत बरं पाटील. सांभाळून रहा. थोरलीची कॉलेजमध्ये एक भानगड झाली होती बरं.

शेंडे म्हणाला, तेच म्हणतोय मी. हा दरवाजा बंद का नाही करून घेत मालक कायमचा.

भोळे म्हणाला, अशा लोकांना अशा प्रकारांची भीती वाटत नाही मालक! समजा, झालंच लफडं तर भाडं देणारा कारा माणूस जावई झाला हे चांगलंच आहे त्यांच्या दृष्टीनं. पोटफीट आलं तर ह्या लोकांची ताकद असते सगळं निभावून नेण्याची. हे लोक गर्भपात करू शकतात, खाल्लेल्या प्रचंड पैशातून गबर हुंडा देऊन पाटलांपेक्षा चांगला जावईही वेळ आलीच तर मिळवू शकतात. तुमच्यासारखे दरिद्री लोकच असली भीती बाळगून जगत रहातात.

शेंडे म्हणाला, सालं भोळेचं समाजशास्त्रीय विश्लेषण सुरु झालं की बोलणंच खुंटतं! भोळे कधी एकदम भावनाप्रधान होतो तर कधी निव्वळ असली विश्लेषणं!

चांगदेव म्हणाला, आणि गेले दिवस पोरींना तर काय एवढं आभाळ फाटतं काय सालं? खरं तर जन्मलेल्या मुलाला पुढे जितका खर्च लागेल साठसत्तर वर्षं मरेपर्यंत तितके पैसे बक्षीस म्हणून अशा गर्भपात करणाऱ्या कुमारी मातांना राष्ट्रपतींच्या हस्ते द्यायला पाहिजेत.

भोळे म्हणाला, मी आमच्या खासदारांना सांगितलं परवा की गर्भपात कायद्यानं

मान्य झाला पाहिजे. जन्म द्यायचा की नाही याचा अधिकार आईलाच पाहिजे. ते सगळं बाळंतपण आणि दूध पाजणं न् गू धुणं—

चांगदेव म्हणाला, कोण शहाणी बाई करेल असलं. आणि आपलं मूल मोठं झाल्यावर अशा आपण करतो तसल्या नोकऱ्या करणार हे जर गरोदर बाईच्या आधीच नीट लक्षात आलं तर कोण शहाणी बाई गर्भपात करणार नाही?

चिपळूणकर म्हणाला, म्हणजे स्त्रीच्या पावित्र्याला काही अर्थच नाही का? मी तर स्त्रीला निव्वळ मातृत्वाच्या भूमिकेवरूनच महत्त्व देतो. वाट्टेल ते धंदे करायचे आणि—

चांगदेव म्हणाला, दर ऋतूस्रावाला स्त्री पुन्हा पुन्हा पवित्र होते, शुद्ध स्त्रीत्व नदीसारखं वहात असावं. द्रौपदी, हेलन ह्याच खऱ्या स्त्रिया.

चिपळूणकर म्हणाला, बहुतेक सगळ्याच स्त्रिया पतिव्रता आहेत म्हणून अशा प्रच्छन्न स्त्रियांबद्दल तुम्हाला रोमँटिक प्रेम वाटतं. सगळ्या स्त्रिया राजेश्वरीसारख्या झाल्या तर तुम्हाला पतिव्रतांबद्दल रोमँटिक प्रेम वाटेल!

चांगदेव म्हणाला, एकट्या बाया, एकटे पुरुष खूप असणं हे माझं भावी समाजाचं चांगलं स्वप्न आहे.

चिपळूणकर म्हणाला, आपण तसे फार मॉरल आहोत. गेल्या वर्षी आमच्या लॅबच्या डार्करूममध्ये एका पोराच्या गालात ठेवून दिली मी. अंधारात तिच्या ब्लॉउजमध्ये हात घालत होता साला.

भोळे म्हणाला, तुझं लग्न होणं आवश्यक आहे चिपळ्या. तरच तू ह्या गोष्टींकडे उदार दृष्टीनं पहाशील. ह्या गोप्या देशपांडेचे वडीलही गेल्या उन्हाळ्यात याच्या फार मागे लागले होते. ते रिटायर्ड व्हायच्या आत लग्न कर गोप्या-तू सहा महिन्यांचा होतास तेव्हापासून म्हातारा संन्याशासारखा रहातोय. तुझ्या बापाचे फार हाल झाले लेका गोप्या तुझ्यामुळे. तू नसतास तर निदान दुसरं लग्न करायला म्हातारा तेव्हाच मोकळा झाला असता.

चांगला देशपांडे म्हणाला, मी बाबांना कायम लिहितो की एक आई करून घ्या आम्हाला बऱ्यापैकी, उगाच आम्हाला मातृसुखापासून वंचित करू नका, सावत्र का असेना, तर आयुष्यभर मनावर घेईना आमचा बाप. आम्ही त्यांचा वैराग्याचा आदर्श पुढे ठेवतो तर तेच आमच्यासमोर गृहस्थाश्रमाचा आदर्श ठेवतात. आणि करू म्हटलं तरी आम्हाला कोण पोरगी देणार? घरसुद्धा नाही आम्हाला. गांधींच्या हाकेला ओ देऊन खेड्यात जाणारे आमचे वडील. आम्हाला प्रॉपर्टी म्हणजे हा रिटायर होणारा बापच. पुन्हा असली कोडं पडणारी पोरं झाली तर—

कोड म्हणजे काही रोगबिग नसतो मालक. चालायचंच.

तेही ठीक आहे. पण आमची देशपांडे भटं सगळ्या जातीत हरामखोर जात आहे. आमच्या वडलांना ह्या वयात पोरगी देतील प्रॉव्हिडंट फंड पाहून, पण मला प्रॉपर्टी नाही म्हणून एक पोरगी सांगून येत नाही. उगा नुस्ती पोरगी आहे असं ध्यान घरात बाळगायला जनावर आहो का आपण?

भोळे म्हणाला, आपण विशिष्ट कल्पनांवरच जगत असतो मालक! संसार करावा हीही एक कल्पना असते. लग्नाचीही कल्पनाच असते. रांगणारं मूल असावं, पाळणा

हलावा, घरात एक बाई असावी ह्या कल्पनाच असतात. कशी मुलं, कशी बायको हे सगळं गौण असतं. उर्वशीमेनकेसारखी बायको पाह्यजे अन् रतिमदनासारखी मुलं व्हावीत म्हणून लग्न करणारे मूर्खच म्हटले पाह्यजेत. असे लोक ह्या गोष्टींचं स्पिरिटच घालवून बसतात. ह्या फालतू गलिच्छ प्राकृतिक गुंत्यांतून आपली सुटका करून घ्यावी, म्हणजे जगणं सुंदर होतं.

चांगला देशपांडे म्हणाला, हे सगळं तत्त्वज्ञान म्हणून ठीक आहे. एकदा पोरींच्या बापासमोर उभं राह्यलं की कळतं भटं कशी हरामखोर असतात आमची ते. माणसाची सुद्धा ह्या समाजात किंमत राह्यली नाही तिथे तुमच्या त्या कल्पनांची काय किंमत असणार?

सगळं सामान चांगदेवनं धडपडून भराभर लावून टाकलं. तो एकदम थकला होता. घामानं सगळे कपडे ओले झाल्यासारखे निथळायला लागले. चेहरा पांढराफटक पडला. डाव्या छातीतून एकदम दणके यायला लागले. त्यामुळे तो घाबरला. मग जरा पडतो म्हणून तो आडवा झाला. सगळे जणही बाहेर पडले.

जरा वेळानं चांगदेवला बरं वाटायला लागल्यावर त्याला वाटलं, हे असं वारंवार होत राह्यलं तर चांगलं नाही. बिड्या कमी केल्या पाह्यजे. चहा कमी केला पाह्यजे. मन प्रसन्न ठेवलं पाह्यजे. पौष्टिक आहार केला पाह्यजे.

पण ओकीओकी खोली पाहून त्याला विचित्र वाटलं. त्याला वाटलं आजच रेडिओ लावला पाह्यजे. वस्तू खरेदी करून आणाव्या. इथे पडून राहणं जास्त कठीण आहे. बाजारात गेलं तर बरं वाटेल.

म्हणून तो कुलूप लावून रिक्षानं गावात आला. डबे, झाडू, बादल्या, टमरेल, माठ-अशा वेड्यावाकड्या वस्तू खरेदी करताना त्याला उबग आला. त्यापेक्षा टूरिस्ट हॉटेलवर जाऊन राजेश्वरीबरोबर गप्पा मारत बसलो असतो तर बरं झालं असतं. पूर्वी नव्या जागेवर सामान विकत घ्यायचा उत्साह तरी असायचा. याचा अर्थ आपण म्हातारे होत आहोत, असं त्याला वाटलं. आता पूर्वीची उभारी नव्हती. येथे डौलदार बादल्या मिळतील-असं लिहिलेल्या एका दुकानात दोन बादल्या घेऊन पाट्या वाचत, नवी दुकानं धुंडत तो जिरं, चहा, साखर, तेलासाठी डबा, मग तेल, मिठासाठी बरणी, मग मीठ, रिकामे डबे कुठे मिळतात हे पुसत तिकडे जाऊन पाचदहा डबे, बल्ब-हे सगळं घेत दोन्ही हातांत मडकं, बादली, काखेत झाडू वगैरे सांभाळत हिंडत होता. मधे एका दुकानात ठेवून दिलेलं सामान परत घ्यायला गेला तर ते दुकानही विसरलं. असं सगळं करून पुन्हा आठवण येऊन रेडिओची एरिअल लावायला खिळे वगैरे घेऊन टांग्यानं परत आला. बंगल्याबाहेर टांगा उभा करून वरून गॅलरीतून कुतूहलानं पाहणाऱ्या पोफळ्यांच्या पोरीदेखत एकेक सामान अवघडून बाहेरच्या लोखंडी दारातून वाकत आणून पायरीशी ठेवलं. त्यात मडकं अलगद ठेवलं तरी ते घरंगळत गेलं. त्या गडबडीत टांग्यावाल्यानं ज्यादा पैशे घेतले. त्याच्याशी हुज्जत घालणं त्याला जमलं नाही.

कारण वरून पोरी कायम हे सगळं पहातच उभ्या होत्या. खाली मान घालून तो फेऱ्या करत होता. रिकामे डबे वाजू नये याची खबरदारी घेत होता. तरी शेवटच्या फेरीत टांग्याचे पैशे ज्यास्त गेल्यानं खिन्न होऊन त्याच्या ठोकरीमुळे डबे फेकले गेलेच! एकदाचा व्हरांड्याच्या दारात उभा राह्यल्यावर वरच्या आडोशानं त्याला एकदम बरं वाटलं. धापा टाकत घाम पुसत खोकला दाबून टाकत तो थोडा वेळ पायरीवर विश्रांती घेत बसला.

मग पुन्हा नेहमीचं परिचयाचं स्थिर कुलूप. नेहमीच खिशात जणू काही स्वतःचा अवयवच कायम होऊन बसलेल्या किल्ल्या शोधून कुलूप उघडून आत थकून आलेल्या घोड्यासारखं धडधडून घुसणं. आत शांत तिन्ही खोल्यांत अंधारात पुन्हा भुतासारखा तो दोन मिनटं वावरला आणि सामान आत आणून बूटही न काढता खाटेवर गादीची गुंडाळी पसरून चादर नीट कशीबशी लावून निपचित पडून राह्यला. अजून सगळीकडे बल्ब लावायचे होते. पण त्याला ह्या अंधारात नव्याच कुठल्यातरी जागेवर अचानक आपण तरंगत असल्यासारखं वाटायला लागलं. आणि त्याला तशीच गुंगी येऊन अचानक डावीकडे हृदय जड झाल्यासारखं वाटून तो पडून राहिला. किती तरी वर्षं भराभरा मागून पुढे येत गेली. सहा वर्षांपूर्वी सुरुवातीला हे असंच व्हायचं. ह्या कल्पनेनं तो घाबरून गेला. असाच फुटणारा घाम. डावीकडे अचानक रात्री दुखायला लागणं. विचित्र ठोके. खोकला. एकट्यानं त्या वेळी पेललेलं ते दुःख. मधली इतकी वर्षं कधी जाणवलं नाही. जणू लांबून गिधाडं पंख पसरून उड्या मारत मारत कळपचे कळप येत आहेत. अत्यंत अनाकलनीय अंतरं डोळ्यांसमोर फिरायला लागली. मधेच केव्हा कुणीतरी सगळे दरवाजे ठोठावतं आहे, असं वाटत राह्यलं. अंधारात चाचपडत तो बाहेरच्या व्हरांड्यात आला. मग दार उघडून बाहेरच्या पायरीवर बसून पुढे वाकून त्यानं डोकं दोन्ही हातांनी गच्च दाबून धरलं. सगळीकडे अंधार. लांबवर रस्त्याचे दिवे. पेट्रोल पंपावरची उघडझाप करणारी जाहिरात. अंधारात घुमणारी झाडं. वर आकाशात लखलखाट करणाऱ्या चांदण्या. प्रचंड भीतिदायक अवकाश. एकटेपणाची जीवघेणी जाणीव. मग त्याला मुसमुसून आलं.

तो म्हणाला, माझी उमेदीनं जगण्याची इच्छा कमी होता कामा नये. दगदग नाही सांगितली होती. तंबाखू, खूप चहा नाही सांगितला होता. काळजी तर विषासारखी हेही माहीत होतं. ती त्या वेळची हास्पिटलं. ती वर्षं. ऐन उमेदीत खाक झालेले विशीतीले दिवस. एकट्यानं सापासारखं जवळ बाळगलेलं दुःख. सगळं आठवून तो हादरून गेला. पायाखालची जमीन निसटून चाललीय असं वाटलं.

दुसऱ्या दिवशी चांगदेवला अंथरुणावरून उठता येईना इतका थकवा आला. अत्यंत बेफिकिरीनं तो पुन्हा निजून राहिला.

संध्याकाळी भोळे कॉलेजातून आला आणि त्याचा निस्तेज फिक्का चेहरा पाहून म्हणाला, काल उगाच दगदग केली मालक तुम्ही. इतकी धावपळ एकाच दिवशी

करायला नको होती. तुमच्या रजेचं मी केलं परभारे. आजारी आहे अशी थाप मारली तर तुम्ही खरंच आजारी! काय भानगड आहे? ताप अन् घाम आहे काय?

चांगदेव उठून बसत म्हणाला, कुणास ठाऊक. अचानक थकवा आला. तापही जाईल, होईल ठीक उद्यापासून.

आता आमच्याकडेच जेवा. मला वाटतं तुम्ही नेहमीसाठी एक सायकल घेतलेली बरी. रात्री जेवायला लांब जावं लागणार. तसं आमच्याकडेही नेहमी जेवलं तर हरकत नाही, पण तुम्हाला वाटलं तर बघा. तुम्ही बिड्या पिणंही एकदम कमी केलं पाह्यजे मालक. तशी ह्या वयात तुमची तब्येत चांगली पाह्यजे.

चांगदेव काहीच बोलला नाही.

मग विषय बदलून भोळे दिवसभराच्या कॉलेजातल्या हकीकती सांगत बसला: नेहमी आल्याआल्या इंग्रजी वर्तमानपत्र घेऊन वाचत बसणारे कुळकर्णी एक बातमी वाचून कुजक्या सुरात म्हणाले, यशवंतराव चव्हाणाला काय कळतं ह्यातलं? पहिलवानकी आहे काय तिसऱ्या पंचवार्षिक योजनेवर बोलायचं म्हणजे? त्यावर तिघेचौघे खदखदून हसले. मग चव्हाणांची टिंगल तासभर. निव्वळ गुंड आहे असंही एक जोशी म्हणाले. हे खास ब्राह्मणी श्रेष्ठत्वाचं उदाहरण पहा... आणि एवढ्याशा खोलीत साठ प्राध्यापक एकदम बसूही शकत नाहीत. काही वर्गांच्या खोल्या बांधूनच होत आहेत, इकडे दोन हजार विद्यार्थ्यांना ॲडमिशन देऊन ठेवलीय्. दीडदीडशे मुलं बसणार आहेत एकेका वर्गात. विद्यापीठाचा नियम ऐंशीवर एका वर्गात मुलं घेऊ नये म्हणून.

चांगदेव म्हणाला, आपल्याला काय, शिकवलं की मोकळे.

आता काही दिवस थांबा मालक! कॉलेजात रोज संध्याकाळी मीटिंगा सुरू करतात आपले माठूराम आणि मुरलीमोहन. सगळे प्राध्यापक वैतागून जातात इतक्या निष्फळ चर्चा सुरू करतात आपले चेअरमन आणि सेक्रेटरी. जरा सांभाळून तुमची खरी मतं सांगत चला.

आपल्याला अर्थात खोटं मत सांगता येत नाही, पण गप्प बसायला अलीकडे शिकलो आहे. पुन्हा आता कुठलंही काम करायचं हे आपण ठरवून टाकलं आहे. शरीर थकलं की आपोआप मनही थकून जातं. त्यासारखं दुसरं समाधान नाही. मन थकलं की भलते भोवरे मनात तयार होत नाहीत.

भोळे म्हणाला, पण एवढ्यावर तुमच्यासारख्या तरुण माणसानं थांबावं असं मला वाटत नाही. शरीराला आणि मनाला थकवणारं काहीतरी असलं पाहिजे, पण काही तरी चांगलं करायचंही एक मनात असलं पाहिजे. त्याशिवाय जगण्यात काही पॉइंट नाही. चांगलं म्हणजे आपल्या दृष्टीनं जे काही चांगलं असेल ते-पण तसं काहीतरी पाहिजेच.

मला तसं काहीतरी करायचं आहेच. पण काय ते नेमकं अजून मलाच कळत नाही. सगळं भ्रमंतीत आयुष्य चाललंय्. इथे मी काहीतरी करेन असं वाटतं. नीट आनंदानं जगणंसुद्धा जुळलं तरी खूप होईल.

तुम्ही थोडंसं बाहेर पडायला शिकलं पाहिजे मालक. आतल्या आतच काही ठरवलं तर माणूस विघटित होत जातो. मग त्याला बाहेरचं पहाणं जमण्याइतपतही तो संघटित

होऊ शकत नाही.

मला तुमच्यासारखा प्रयत्नवाद बरा वाटत नाही. प्रयत्नवादी माणूस अनेक मूल्यांचं भेंडोळं करत शेवटी त्याच्यातच फसून जातो. दया, क्षमा वगैरेपासून तर राष्ट्रीयता, युद्धं सगळं असल्या बुद्धीवादातून निर्माण होतं. सगळे मानवी समाज ह्या भोवऱ्यात सापडले आहेत असं तुम्हाला वाटत नाही? तटस्थ राहून पहाणारे हल्ली उरलेलेच नाहीत. महाकाव्यातल्या लढणाऱ्यांपेक्षा काठावर उभे राहून पहाणारे व्यासहोमर मला अधिक शूर वाटतात. लढायला काही फार शौर्य लागतं असं मला वाटत नाही. कुठलाही भित्रा माणूस लढायला तयार होतो असं हल्ली वातावरण आहे. ही गवतातली अळी एक दिवस जगणारी असते. तिच्या एका दिवसाच्या चक्राचं नीट निरीक्षण केलं तर आपुल्या आयुष्याच्या चक्राएवढं आहे की नाही त्या त्या परिमाणानं? लाख वर्षांच्या संदर्भात आपलं आयुष्यही ह्या अळीएवढंच आहे.

तेव्हा बाहेर रस्त्यावरून हळूहळू जाणाऱ्या बैलगाड्यांच्या ओळीकडे उत्साहानं पहात तो पुन्हा म्हणाला, पहा. हे वंजारी बायकापुरुष साखर कारखान्याकडे ह्या हंगामासाठी जायला निघाले आहेत. प्रत्येक बैलगाडीवर एक सुंदर रंगीबेरंगी कपड्यांची हस्तिदंती पाटल्या घातलेली वंजारी बाई, किरकोळ सामानाची पेटी, आणि बैलं हाकणारा तिचा नवरा. अमेरिकेत दोघा नवराबायकोंनी धडपडून कामावर निघण्यात आणि यांच्यात काय फरक आहे? उलट हे जास्त सुंदर आहे.

मग भोळे एकाएकी आठवून म्हणाला, अरे हो, टूरिझम डिपार्टमेंटमधून राजेश्वरीबाईचा फोन होता तुम्हाला.

चांगदेव एकदम उत्साही सुरात म्हणाला, आज जायचं होतं तिकडे. नंतर बघू... चांगली बाई आहे, स्त्रीस्वातंत्र्याचं उदाहरणच म्हणा की. अशी एकदम आधुनिक बायांबद्दलसुद्धा आपल्याला आदर वाटतो. स्वातंत्र्य स्वतः होऊनच मिळवावं लागतं, आपला समाज ते कधीच देणार नाही.

कसलं स्वतः होऊन स्वातंत्र मिळवणार हो असल्या बायका? तिकडे युरोपात बारक्याबारक्या हक्कासाठी लोकांनी अतोनात त्याग केले, आयुष्यं बरबाद केली, कुर्बान्या केल्या म्हणून त्यांच्या समाजात आताआता हे व्यक्तिस्वातंत्र्य आलं. ते जसंच्या तसं काही कवडीची तोशीस लागू न देता ह्या शहरी लोकांनी इकडे अनुकरणानं उचललं. मला असल्या फॅशनेबल स्वातंत्र्याबद्दल काहीच आस्था नाही. इथल्या ह्याच आपल्याच समाजात सगळ्या अंगांनी जे मिळवता येईल ते खरं, कायम टिकणारं होईल. आपण वृत्तपत्रस्वातंत्र्यासाठी काय त्याग केले? आयतं इंग्रजांकडून घेतलं आणि आता त्यात सगळे जातीय हिंदुत्ववादी घुसून बसले. काय उपयोग?

ते मरू द्या हो. मला एवढंच सांगायचं होतं की बायकांना स्वातंत्र्य असतं ते एकतर जुन्या आदिवासी समाजांमध्ये किंवा अशा एकदम पुढारलेल्यांमध्ये—

तेच तुम्हाला सांगतोय मी की स्वातंत्र्य वगैरे सगळं सापेक्ष असतं. आपण फक्त समाजातच राहू शकतो, समाजाव्यतिरिक्त राहूच शकत नाही. समाजात मिळतील त्या साधनांनी माणूस जमेल तशी स्वातंत्र्याची हौस फेडून घेतोच. म्हणून राजकीय दडपणानं हे समाज नीट केल्याशिवाय आपल्या परिस्थितीत सुधारणाच होणार नाही.

आता आमच्या घरातलं तुम्हाला बऱ्याचदा मी सांगितलं आहे...बायकांची जीवघेणी कुचंबना, कायम काम काम, क्रूर पितृसत्ताक वातावरण, गुरांसारखं रात्रदिवस घरातलं आणि शेतातलं राबणं, माती, दगड, पेरणी, निंदणी, कापणी, उपनणी, पुन्हा स्वयंपाक, घरदार, दूध काढणं, भांडी घासणं, स्वैंपाक, गरोदरपणं न् बाळंतपणं-ह्याच्यात स्वतः होऊन कोण कसलं स्वातंत्र मिळवणार? कारण सगळे तेच करत असतात. पुरुषही तेच करतात- अंगावरचा घाम वाळत नाही अशी कामं, नांगरणं, वखरणं, कुळपणं, औत हाकणं, माल नेणं- आणणं, बाजारात जाऊन विकणं, चारापाणी, मेंढ्या चारणं, कळपांमागोमाग धावणं, गवत कापणं, थंडी ऊन पाऊस कायम अंगावर घेणं, उरल्या वेळात कांबळं विणणं, गायी-सगळी जुनाट रानटी अर्थव्यवस्था.

चांगदेव म्हणाला, आता तुम्ही जरा वेगळ्या दृष्टीनं ह्याच जीवनाकडे पहा. ते कायम निसर्गचक्रात स्वतःला विसरून जाणं, हिरव्या जमिनीचा स्पर्श, कापताना गवताचा येणारा हिरवा वास, मेंढरांचे उपजतबुद्धीला चालना देणारे अर्थपूर्ण आवाज, पान्ह्याला ढूसण्या देणारी वासरं, जोराची भूक लागणं, जोराची तहान लागून पाण्याची मूळ चव अंगात पसरणं. टवटवीत स्त्रिया, जोरकस पुरुष, प्राणिजगाची सगळी सुखं भोगणं, कच्ची फळं खाणं, निवाऱ्यापुरतं घराकडे पहाणं, गायींची थानं दाबून फेसाळ दूध काढणं, कृष्णासारखं आडदांड स्वैर बालपण भोगणारी दांडगी पोरं, धमन्यातून कायम जोरानं रक्त वहात रहाणं आणि आकाशातली नक्षत्रं पहात झोपी जाणं, चंद्रावरून वेळ ठरवून उठणं, कडाक्याच्या उन्हात घामाच्या धारा वहाणं आणि थंडगार झाडाच्या सावलीत पडून रहाणं-ह्यांच्या इतकं आयुष्य सार्थकी लागणं आणखी कोणतं असणार? हेच खरं जगणं. आपण किती ज्ञानेंद्रियविरहित यंत्रासारखे जगत असतो? दुर्दैव हेच की आपल्याला याच्यातून सुटका नाही. याच्यातच कसं स्वातंत्र्य मिळेल हेच शोधून काढणं आता आपल्याला शक्य आहे.

भोळे त्रस्त आवाजात म्हणाला, मानलं तुम्हाला मालक. पण हे सगळं लिरिकल भाषेतच चांगलं वाटतं. मला हे अर्धसत्यच वाटतं. माझी आईही भावनावश व्हायची तेव्हा भयंकर लिरिकल बोलायची. पण मला कधी ह्या जड जगाच्या पलीकडे पहायची सवयच नाही. माझ्या भावाला आईसारखंच भावनावश लिरिकल होऊन दुःख गिळायची सवय होती. मला नाही. आमच्या काकूच्या माहेरी उंदीरखेड्याला सातवीनंतर मला ठेवलं होतं. तिथे मी म्हणजे निव्वळ अडचण. त्या वेळी मला डांग्या खोकला झाला. दररोज रात्रभर पाय छातीला लावून लावून गडबडा लोळत छाती फुटेपर्यंत मी खोकत रहायचो. एकटा. तीन महिने. संध्याकाळ आली की भीतीनंच मी रडवेला व्हायचो. घरात मायेचं कुणी नाही. रात्री ओसरीत एकटा गुरासारखा खोकत बेवारशी मी छाती चोळत लोळत असायचो. रडायचोही एकटाच सहन झालं नाही की. असाच खोकत असताना एका मांगाच्या बायकोनं कळवळून सांगितलं, नागफण्याचं फूल खा रे लेकरा, बरा व्हशील. सकाळी मी ते केलं. त्या खेड्यात डॉक्टर नाही, कुणी काळजी करणारं नाही असा मी कशाच्या बळावर दिवस काढत होतो? माझं मलाच माहीत...अशा हजार गोष्टींमुळे मी भयंकर व्यवहारी होऊन गेलो. फालतू फर्स्ट क्लास मिळवण्याची जिद्द पुढे ठेवत गेलो. आडवी वाढ होऊच दिली नाही. माझ्यासारख्याला

आडवं वाढणं परवडणारं नव्हतं. उंच वाढ करायची, वर जात रहायचं, कॉम्पीटीशन-हेच. तसं मी खूप दाबून ठेवलेलं आहे. तुमच्याजवळच हेसुद्धा पहिल्यांदाच पोटतिडीकीनं सांगतो आहे—

चांगदेव अस्वस्थ होऊन म्हणाला, अशा मानसिक अपेष्टांमुळेच आयुष्याला पोत येतं. दाबून ठेवलं तरी ते असतंच आपल्याजवळ.

माझा थोरला भाऊ-पटकीनं वारला तो-त्यानं उत्तेजन दिलं म्हणून मी कॉलेजात शिकण्याचं धाडस केलं. त्याच्या खोलीत आम्ही आनंदानं रहायचो. स्वयंपाक करायचो. मी तेव्हा भयंकर वाचन केलं. भाऊ रेल्वेत किरकोळ खलाशाच्या नोकरीवर होता. चांगला होता. साठ रुपये पगार होता त्याला. त्यातले फक्त तीस रुपये खर्च करायचा आणि तीस मला लागायचे. तो आमच्या घरातून नोकरीसाठी शहरात जाणारा पहिला. त्याची पत्रंही सुंदर असायची...तो आईला लिहायचा, मग आम्ही वाचून दाखवायचो...रेल्वे लाईनच्या काठाला खडीच्या ढिगावर छोटंसं आंब्याचं रोपटं डूलताना पाहून आज कामावर जाताना मला वाटलं आपल्यालाही असं तग धरून जगता येईल. आई, तू काळजी करू नकोस...असं काहीकाही आमच्या अडाणी आईला तो लिहायचा. त्याला कॉलऱ्याची लागण झाली. परक्या मुलखात मध्यप्रदेशात इटारसीजवळच्या वस्तीत आम्ही रहायचो. तो अंथरूण धरून पडला तेव्हा मी एकटा होतो. शेजारीपाजारी म्हणाले, तुलाही संसर्ग होईल. तू घरी निघून जा. निदान गावात रहायला जा. प्रत्यक्ष भाऊ मरायला टेकला आहे आणि आपण जाऊन पाहूसुद्धा नये, लांबून चहाकॉफी ठेवून निघून जावं हे मला सहनसुद्धा होईना. झाला तर झाला आपल्याला कॉलरा. माणूस टाळून असं मरतुकडं जगण्यापेक्षा न जगलेलं चांगलं. करायचं काय तसं भेकड जगून? पण भाऊ दोन दिवसांत मेला. माझ्याकडे प्रेमानं पहात डोळे मिटून मेला. मला तो क्षण ज्यास्त मोलाचा वाटतो. अजून त्याची पत्रं वाचली की मला अभिमान वाटतो. निव्वळ स्वत:पुरतं स्वातंत्र्य मिळवायची तुमची कल्पना मला पटत नाही.

तुम्ही तुमचं लोकशाहीवरचं पुस्तक लवकर लिहा भोळे.

काय काय करायचं मालक! मला पन्नास प्रॉब्लेम्सवर लिहायचं आहे ते अजून जमेना. आपल्याला वाचणं तेवढं जमतं. हातात पेन घेतलं की दोन ओळी लिहवत नाहीत. त्यातून कॉलेजची हजार कामं, घराच्या जबाबदाऱ्या, पोरांचं काही काही, घासतेल आणा, रॅशन आणा, हे संपलं, ते नाही, चर्चा, येणारे जाणारे. हे सोशल वर्क तर आता गुंडाळतच आणलंय मी. आता एकदम घरातच बुडून घ्यायचं, लिहायला घ्यायचं आता एक एक...

पुराणिक कॉलेजातलं सगळ्यात महान संकट अशा माठूराम-मुरलीमोहन-ठोसर ह्यांनी घेतलेल्या स्टाफ मिटिंगा आता नेमानं सुरु झाल्या. दर मिटिंगला माठूराम तर हजर असायचेच, पण बाकीचे संस्थेचे पदाधिकारी आळीपाळीनं संध्याकाळचा वेळ घालवायला म्हणून मजेशीर येऊन बसायचे. संध्याकाळी सहाला जेवून आलेले माठूराम भुकेल्या पोटी मीटिंगा संपायची वाट पहाणाऱ्या गृहस्थी प्राध्यापकांचा अक्षरश: अंत पहायचे. एखाद्या वेळी माठूराम आणि मुरलीमोहन यांच्यातच तासभर खडाजंगी

बौद्धिक पोरकट वाद सुरु व्हायचा. एखाद्या शब्दाची व्याख्या काय याच्यावरसुद्धा हे दोघेजण खडाजंगी करायचे. आपण शिक्षणशास्त्रात किती तज्ज्ञ आहोत हे प्राध्यापकांना पटवनू देण्यासाठी ते इंग्रजीतून वैताग चर्चा सुरू करायचे. नऊ वाजायला आले की सगळे प्राध्यापक बोअर होऊन जायचे. कोणाची उठून जायचीही हिंमत व्हायची नाही. त्यातून नेहमी प्राध्यापकांपैकी कोणीतरी-बहुधा चिपळूणकरच मग बूट सोडून पाय बाहेर काढून बसायचा आणि त्याच्या मोज्यांचा भयंकर उग्र दर्प हॉलभर पसरायचा. मग हळूच तिकडून चांगला देशपांडे ओठ मिटून कोण आवाज करतं आहे हे समजणार नाही अशा रीतीनं गाणं गुणगुणत रहायचा. पापय्या देसाई एकसारखा कशावरही मोठमोठ्यानं हसायचाच.

ह्या मीटिंगांमध्ये भल्लावर सगळ्यात कठीण जबाबदारी यायची. इकडे प्राध्यापकांना माठूरामची खुळं पटवून द्यायची, तिकडे माठूराम-मुरलीमोहन दोघांचं म्हणणं त्यांच्यात्यांच्या परीनं योग्यच आहे असं त्यांनाही पटवून द्यायचं-हे भल्ला कुशलतेनं अनाकलनीय इंग्रजीत नीट करायचा. भल्ला कुठल्याही मुद्यावर आपलं मत कधीच व्यक्त करायचा नाही. मीटिंग संपल्यावर एकदीड तास तो माठूराम, मुरलीमोहन यांना मीटिंगचा निष्कर्ष खुबीनं सांगायचा. कोण प्राध्यापक काय बोलला, कोण आज्ञाधारक नाही, कोण टिंगलवजा बोलला हे तो कौशल्यानं त्यांना सांगायचा.

ह्या मीटिंगांनी पंधरा दिवसांत चांगदेव संपूर्ण बुद्धिनिराश होऊन गेला. एकतर तिथे तीनचार प्राध्यापकच प्रमाणिक मतं मांडायचे. बाकीचे सराईत लोक माठूराम-मुरलीमोहनची तळी उचलून पुढे फायदा होईल या इराद्यानं मामुली विरोध करून मग आपल्याला मुद्दा पटला असं जाहीर करायचे. बाकीचे सगळे ह्या वेळ घालवण्याच्या प्रकाराला प्रथमपासून कंटाळलेले असायचे. लहान लहान आकाराचे प्राध्यापक मागून हळूहळू पसार व्हायचे. तशा सगळ्यांनाही पळून जाणं नंतर अशक्य व्हायचं. मुरलीमोहन, माठूराम, ठोसर, सहस्रभोजने, मोठा मेंदू लहान व लहान मेंदू मोठा असलेला देशपांडे-ह्या संस्थाचालकांना ह्या उतारवयात घरी संध्याकाळी काहीच उद्योग नसायचे. त्यामानानं सुशिक्षित प्राध्यापकांना जमवून आपलं वर्तमानपत्रं वाचून मिळवलेलं थिल्लर ज्ञान त्यांना दाखवणं त्यांना आल्हाददायक वाटायचं.

उदाहरणार्थ, एकदा संध्याकाळी सहा वाजता बिहारमधल्या दुष्काळाला मदत करण्यासंबंधी मीटिंग बोलावली. माठूराम बेणीराम दीक्षित हे सामाजिक कार्यकर्ते असल्यामुळे ते शहरातल्या बिहार दुष्काळ निधीचे अध्यक्ष होते. नोटिस वाचून सगळ्यांनी वैतागून सह्या केल्या आणि आज पुन्हा घरी जायला दहा वाजणार म्हणून संतापून शिवीगाळ सुरू केली. काही गप्प बसले. तिकडंबाज देशपांडे स्टाफरूममध्ये असेपर्यंत कोणी बोलत नव्हतं. तो बाहेर गेल्याबरोबर याज्ञिक विद्यासागरना म्हणाले, काय विद्यासागर, किती मदत देणार?

विद्यासागर क्षीरसागरांना म्हणाले, तुम्ही आम्ही ठरवून काय उपयोग? ठरलं असेल काल संध्याकाळी सगळं! एक दिवसाचा पगार म्हणताहेत.

क्षीरसागर आतापर्यंत झालेल्या अन्यायाला वाचा फोडत म्हणाले, आपण पाच रुपये द्या की दहा द्या, शेवटी नाव होणार माठूरामचंच! की ह्या थोर समाजसुधारकानं

आपल्या संस्थेतून इतके रुपये एकट्यानं काढून दिले! आपण काय प्यादी आहोत!

संध्याकाळी सहानंतर कोणालाही न भेटणारे याज्ञिक यांना यंदाही वरची ग्रेड मिळणार नाही असं गुप्तपणे समजलं होतं. त्यामुळे ते तिरस्कारानं म्हणाले, पण थोडं काही झालं की ह्यांनाच अध्यक्ष व्हायची काय हौस असते हो? आंतरभारती, हिंदू-मुसलमान सलोखा समिती, दुष्काळ निवारण समिती, समाजवादी मंडळ, उर्दू-मराठी साहित्य सेवा मंडळ-किती गोष्टींचे अध्यक्ष हे?

आडनावांची चौकशी करून बरोबर जात ओळखणारा बुटका कुलकर्णी म्हणाला, सगळ्या गावाचे आवडते नेते आहेत ते.

विद्यासागर म्हणाले, पण साध्या नगरपालिकेच्या निवडणुकीत पाचशे मतं पडत नाहीत माठूरामजींना ते कसं काय? डिपॉझिटं जप्त होतात त्यांची कायम.

पाच रिसर्च पेपर फॉरेन जर्नलात प्रसिद्ध झालेला एक देशपांडे म्हणाला, जातीवर जातात शेवटी लोक. माठूरामजी ब्राह्मणांच्या सर्कलमध्ये आल्यापासून त्यांचं सगळं पोलिटिकल करिअर खलास झालं आहे. सत्तेचा मोह त्यांनी आजन्म टाळला.

याज्ञिक म्हणाले, पण साध्या साध्या गोष्टींना नेहमी अध्यक्ष व्हायचं आणि संस्थेतल्या लोकांना जुंपायचं हे कसं काय? उपोषणाला बसायचं तरी प्राध्यापक लागतात ह्यांना पाचपंचवीस!

तुलाच पुढे प्रिन्सिपल करू असं ठोसर व ऋग्वेदी ह्या दोघांनी वचन दिलेले व्हाईस-प्रिन्सिपल ऋषिपाठक म्हणाले, मनापासून काम करणारे निरिच्छ लोकच पाह्यजेत अशा समित्यांवर. नाहीतर झेडूपीचे कदम न् मोरे समितीत असले की पैशे सगळे इथल्या इथेच गडप व्हायचे! हॅ हॅ हॅ.

मग सगळे हसले. कोपऱ्यात बसलेला गायकवाड नावाचा डेमॉन्स्ट्रेटर वर्तमानपत्रात तोंड घालून बसला.

मग क्षीरसागर म्हणाले, तुम्हाला असं वाटतं काय की हे फार लायक आहेत म्हणून यांना अध्यक्ष करतात? अहो, अशा किरकोळ दीडदमडीच्या समित्यांवर काँग्रेसचे लोक येतील कशाला? कुणाला फालतू वेळ आहे एवढा? मोठमोठी कामं उमजू देत नाहीत खऱ्या पुढाऱ्यांना! कदम का उर्दू-मराठी मंडळाचा अध्यक्ष होईल? चार दिवस गावात नसतात ते लोक. आज मुंबई-उद्या दिल्ली. हे फालतू धंदे—

याज्ञिक म्हणाले, मला तर एकजण परवा म्हणाला शाहू कॉलेजातला की तुमचे माठूराम कुणाचं तेरावं असो का कुणाकडे बारसं असो-अध्यक्ष व्हायला तयार! तरी बिचाऱ्याला व्हाईस-चॅन्सलर कोणी करत नाही.

प्रतिकूल परिस्थितीशी सतत झगडावे लागल्याने आपली उशीरा प्रगती झाली असे म्हणणारा एक कुळकर्णी म्हणाला, त्यांच्या छत्रपती लोकांची गुंडगिरी नाही म्हणावं आमच्या लोकांत.

पुस्तक मिटून चांगला देशपांडे म्हणाला, फिजुल बाता करता राव तुम्ही. आणि मीटिंगमध्येच काय धाड भरते तुम्हाला बोलायला? आणि माठूरामला अध्यक्ष करतात याचं कारण तो प्रामाणिक वगैरे काही नाही. रिकामचोट असतो, पुन्हा घरात बायको लाथ घालून बाहेर काढते आणि इथे ह्याला अध्यक्ष केलं की ऑफिसची जागा कॉलेजवर

मस्त मिळते, प्यून, टायपिंग, मीटिंगा घ्यायला खोल्या, लाइट, सगळा सेट तयार असतो! असं आहे ते! चला पाटील, चहाला चला. मग मीटिंग सुरू झाली की डोकं उठेल.

याज्ञिक आणि क्षीरसागर खूष होऊन चांगला देशपांडे किती हुशार आहे याबद्दल बोलून पुन्हा माठूरामच्या कुचाळक्या करत बसले. याज्ञिक म्हणाले, आपलं होस्टेल सुरु होतंय ऑगस्टमधे. आता रेक्टरचा ब्लॉकसुद्धा मस्त रंगबिंग लावून तयार केलाय. कोण होणार हो रेक्टर?

स्वत:वर एकदीड तास सलग बोलणारे जोशी म्हणाले, हॅ हॅ हॅ, हे विचारायला कशाला पाह्यजे राव, आपल्या-पुरुषोत्तम देशपांड्याची बायको तिकडे तयारी करायला लागलीसुद्धा भाड्याचं घर गुंडाळायची. त्यांचे घरमालक सांगत होते १५ ऑगस्टला घर सोडताहेत देशपांडेसाहेब म्हणून. सगळं तयार असतं क्षीरसागर इथे!

या एकदा फुरसतीनं घरी असं म्हणणारा देशपांडे म्हणाला, कमाल आहे! अजून परवा मीटिंग होणार आहे बॉडीची ह्या वर्षीच्या नेमणुका, रेक्टरशिप, ग्रेडस वगैरसाठी आणि आधीच ठरलंसुद्धा का? ग्रेडचंही ठरलंच असणार कोणाला कोणाला द्यायची ते. तुमचं होतंय का ग्रेडचं? हेड तुम्ही.

याज्ञिक बाजूच्या पेपरमध्ये तोंड घालून कान टवकारणाऱ्या जोशीकडे तिरपं पहात म्हणाले, आम्ही कधी ठोसरांच्या मठीत जात नाही ना! आम्ही आपले येड्यासारखे एक्स्ट्रा तास घेत आणि संध्याकाळी लॅबमधे इन्स्टुमेंटस साफ करत बसलो तिन्ही वर्षं! संस्थेचा एक डेमॉन्स्ट्रेटर वाचवला आम्ही सगळ्यांना ज्यादा कामं देऊन! म्हणून आमची हेडशिपसुद्धा जातेय आता!

इतक्यात एक जोशी नावाचा लठ्ठ प्राध्यापक आत आला आणि सगळे गप्प बसले. बसलेल्यांपैकी दुसऱ्या एका जोशीनं त्या लठ्ठ प्राध्यापकाशी यजुर्वेदी-ऋग्वेदी अशी थट्टा सुरू केली.

चांगदेव चांगल्या देशपांडेला म्हणाला, हा बिल न देणारा यजुर्वेदी आला! आता आपण चहाला निघालो की हाही लठठ्या चिकटणारच नेहमीप्रमाणे.

चांगला देशपांडे टाळी देऊन म्हणाला, हा बिल न देणारा यजुर्वेदी फार वस्ताद आहे बरं! पहा कसे सगळे गप्प बसले तो आल्याबरोबर. हाही कायम ठोसराबरोबर पूर्ण वेळ बॉडीगार्डसारखा हिंडत असतो. खुषमस्कऱ्याच आहे तो ठोसरांचा. यालाच रेक्टर करायचं चाललं होतं ठोसरग्रुपच्या लोकांचं. पण ह्याला शिकवता येत नाही, वर्गातसुद्धा पोरं सांभाळता येत नाहीत, हा होस्टेलच्या पोरांना काय काबूत ठेवणार असा मुरलीमोहननी मुद्दा लढवून ते हाणून पाडलं. तिकडंबाज देशपांडेलाही शिकवता येत नाहीच. पण तो पोरांना चहाबिहा पाजनू वर्ग तरी नीट सांभाळतो. शिवाय दैनिक समाजवाद मध्ये रकाने भरून तिकडे ठोसरलाही खूष ठेवतो, इकडे माठूरामचं सामाजिक कार्यसुद्धा करू लागतो. आधी कारकून होता तो माठूरामच्या हाताखाली दहा वर्षं! कॉलेज निघाल्या निघाल्या त्याला लेक्चरर केलं! तरी त्याचं बी.ए.ला मराठी होतं आणि एम.ए.ला हिस्ट्री.

म्हणजे ह्या लोकांसाठी तर कॉलेज काढलं नाही? तेवढी सरकारी पैशावर आपल्या लोकांची बसल्या बसल्या सोय!

तसंच जवळपास. परवा बिल न देणाऱ्या यजुर्वेद्याला होस्टेलची पोरं सांभाळता येणार नाही, असं मुरलीमोहननी सांगितलं तेव्हा ठोसर आणि बाकीचे म्हणालेच ना की मुलींचं होस्टेल बांधू तेव्हा याला तिकडे रेक्टर करू! लगेच भल्लाकडून यू.जी.सी.कडे लेडीज होस्टेलचं प्रपोजल पाठवलंसुद्धा! इतक्या व्यवस्थित पद्धतीनं चाललेलं असतं त्याच्या आयला! फार भयंकर लोक आहेत साले. एक वर्ष काढलं फक्त तरी यांच्यात. नुस्ती यांची तोंडं पाह्यली की संताप येतो. बरं, चला. आता असं करू, एकेक बाहेर जाऊ. मी तिकडे देसाईच्या लॅबमध्ये चिपळूणकरही असेल त्याला घेऊन येतो. तुम्ही व्हा पुढे. पहा, बिल न देणारा यजुर्वेदी आपल्यावर लक्ष ठेवूनच आहे आपण ह्या वेळी चहाला जातो म्हणून!

नंतर ते चहा पिऊन आले. पुन्हा स्टाफमधे सहा वाजेपर्यंत कुचाळक्या ऐकत. मग मीटिंग. नेहमीची भल्लाची सुरुवात : वी शुड नॉट लेट अवर बॅटरी डाऊन! वी शुड गो ऑन द राइट ट्रॅक. रेकलेसनेस इज डेंजरस! वगैरे. मग किती रुपये प्रत्येकानं द्यावे म्हणजे आपल्या संस्थेचा मोठेपणा दिसेल वगैरे. एकदोघांनी म्हटलं की आम्ही स्वतः होऊन स्वतंत्रपणे बिहार फंडाला द्यायचे ते देऊ. पुन्हा चर्चा, पुन्हा माठूराम आणि मुरलीमोहनचं तासभर एकमेकांशी मोठ्यानं हितगुज, बुद्धी म्हणजे काय? भावना म्हणजे काय? चॅरिटीची डेफिनेशन काय, वॉट इज चॅरिटी? वॉट इज फिलॅन्थ्रपी? वगैरे. चांगल्या देशपांडेनं नेहमीप्रमाणे जोरदार भाषण करून असं कलेक्टिवली फंडाला मदत करायची काय आवश्यकता आहे वगैरे सुरु केलं. तेव्हा भल्ला विनोदानं चांगल्या देशपांडेला गोंजारायला लागला. भल्ला म्हणाला, यू बॉय, देशपांदे, इतने टॉप गिअरमे मत बोलो यार. बैठिये, लोअर गिअरमे बात किजिये, यू चिकन, बैठकर बोलिये.

आणखी हळूहळू काही जण फंडाला एकदम सगळ्यांनी द्यायची गरज नाही असं म्हणायला लागले. पण मधेच बोलता बोलता भोगीशयनम् असं वैतागून बोलून गेले की ऑफिसमधून स्टाफच्या नावानं आधीच एक हजार रुपये फंडाला परभारे देऊनही टाकले आहेत, येत्या पगारामधून प्रत्येकाचे पैशे कापून पेशीट तयार केलेलं आहे. तेव्हा बॉटनीचे वृद्ध देशपांडे म्हणाले, मग एवढी चर्चा सुरू केलीच कशाला? जाऊ द्या आता. मग सगळेच गप्प झाले. कोणीतरी फक्त डेमॉक्रसी असं बोलून हसला. भोळे, क्षीरसागर मात्र नेटानं आमच्या संमतीशिवाय पैशे कापणं अयोग्य आहे असं रेकॉर्ड करायचा आग्रह धरून बसले. तेव्हा भल्लानं अर्धा तास कोणाला न समजणारं गोलमाल इंग्रजी सुरू केलं-अवर ग्रेट इन्स्टिट्युशन-इट्स हाय रेप्युटेशन-कलेक्टिव रिस्पॉन्स ॲण्ड इंडिविज्जुअल गुडनेस-आफ्टर ऑल वॉट इज मनी? मनी इज नथिंग-वगैरे. असं मेस्मेरिझमसारखं चिकार बोअर करून मग नियोजित इष्ट परिणाम झाल्यावर सगळे प्राध्यापक मलूल झाल्यावर आणि स्वतःलाही गोलमाल बोलायचा पूर्ण कंटाळा आल्यावर भल्ला म्हणाला, सो डिअर लर्नेड कलीग्ज! शाल आय टेक योअर कन्सेन्ट फॉर ग्रॅण्टेड?

संसाराचा गाडा ओढणारी, बहिणीच्या लग्नासाठी हुंडा जमवणारी, लहान भावांना शिकवणारी आणि एक तारखेच्या पगाराचं वारंवार अंदाजपत्रक करणारी ही विचारवंत प्राध्यापक मंडळी विरोध करायला गांगरून गेली. कोणी बोलेना. जो तो घडयाळाकडे पहात घरच्या काळज्यांनी अधीर झाला होता. बाहेर पाऊसही वाढतच होता. तिकडे चांगला देशपांडे इतका वेळ हम बेखुदीमे तुमको पुकारे ऽ ऽ चले गयेऽऽ सागरमे जिंदगी को उतारेऽ चले गयेऽऽ असं गुणगुणत होता. चिपळूणकरनं बुटातून पाय बाहेर काढले, त्याचा उग्र वास हॉलभर पसरला. सगळेजण कुजबुजत आपसात माठूराम आणि मुरलीमोहनला शिव्या देत होते. हरी प्यूनही हे केव्हा संपेल आणि सगळं बंद करून घरी केव्हा जाऊ ह्या काळजीनं दाराशी खिन्नपणे उभा होता. शेवटून भल्लानं आम्ही प्रत्येकी वीस रुपये पगारातून कापून घ्यायची समंती देतो अशी आधीच टाईप करून ठेवलेली नोटीस फिरवली. ठोसर-माठूरामच्या मर्जीतल्या लोकांनी भराभर सह्या करून नोटीस पुढे सरकवली. भोळे, क्षीरसागर, गोपाळ देशपांडे, चांगदेव, चिपळूणकर, देसाई, शेंडे यांनी सही न करता कागद पुढे सरकावला. माठूरामचा चेहरा संतापलेला होता. भोळे म्हणाला, आम्ही स्वतः होऊन वेगवेगळे पैसे भरू. आमच्या पगारातून रक्कम कापू नये.

चांगदेव सायकलवरून पावसाचा मारा चुकवत नेहमीप्रमाणे चिंब भिजून एका हॉटेलमधे कसा तरी बकाबका जेवून अंधारातून सायकल मारत पाऊस अंगावर घेत चौकात पोलिस असेल म्हणून उतरून थोडंसं पायी चालून पुन्हा बसत आता पगार झाल्याबरोबर रेनकोट आणि सायकलचा दिवा ताबडतोब घ्यावा असं ठरवत पोफळे बंगल्यापर्यंत नेहमीसारखा चिंब भिजून आला. नेहमीसारखं खुडबुडून कुलूप उघडून सगळे कपडे बाथरूममधे फेकून कोरडे कपडे घालून चहा पिऊन रेडिओ लावून बिडी पेटवत बिछान्यावर आडवा झाला. मग पूर्ण पांघरून तो म्हणाला, हे असंच वर्षानुवर्षं चालणार असेल तर काही खरं नाही. आधीची कॉलेजं ह्यापेक्षा कितीतरी चांगली होती. माकडासारखे आपण ही फांदी मोडली तर दुसरीवर उडी घ्यायची, तीही मोडतेय म्हणून पुन्हा वरची घ्यायची असं करत करत इथपर्यंत आलो आहोत. पण केव्हातरी फांदी मोडून आपण कोसळणार हीच परिस्थिती कायम आहे. कठीण आहे.

बाहेर सपाटून पाऊस वाजत होता. सगळा बिछाना भिजेल इतका घाम सुटला. पुन्हा डाव्या बाजूनं थडथडून दणके बसायला लागले. त्याला अतिशय ग्लानी आली आणि सगळं घर गरगर फिरायला लागलं.

झडी लागली होती आणि गारठ्यात चांगदेवला अजिबात उठावंसं वाटेना. आज पुन्हा कॉलेजात मीटिंग होतीच. अंगात ताप वाटत होता. बाहेरच्या एकसारख्या पावसाच्या आवाजात मन मिळवून तो पुन्हा झोपी गेला. भूक खूप लागली होती, पण

झोप खूप आली. अधूनमधून जाग यायची तेव्हा त्याला गुंगी फक्त जाणवायची. दिवसभर अंधारल्यासारखं वातावरण होतं. समुद्रातून कुठेतरी तरंगत जात आहोत असं कायम वाटेल असे पावसाचे बाहेर आवाज. पुन्हापुन्हा गुंगी, झोप, जाग, आवाज, पांघरून पुन्हा थंडीच्या माऱ्यानं थडथड, घाम, जाग असं चाललं होतं. केव्हातरी उठून तोल सावरत त्यानं दूध ब्रेड खाल्ला. पुन्हा खाटेवर गुरफटून वेळ काढला. आपलं कुठेच कुणी नाही ह्या कल्पनेनं त्याचं डोकं सणकून दुखत राह्यलं.

संध्याकाळी बाहेरून मोलकरणीनं घातलेली आतल्या दाराची कडी उघडून भोळे आला.

काय मालक, काही चाहूल नाही! पुन्हा आज रजा. मी पुन्हा अंदाजे सांगितलं भल्लाला आजारी आहे म्हणून. तर तुम्ही खरंच आजारी. तुम्ही एकदा हॉस्पिटलवर चला. कंप्लीट चेकअप करून घ्या. डॉक्टरला बोलावू का? आहे काय भानगड?

माझ्या रजेचा अर्ज उद्या देऊन या. कॉलेजात यावंसंच वाटत नाही. भयंकर काहीतरी वाटतं तिथे.

अगदी भटभटीत वाटतं ना? खरंच आहे. पण नोकरी करायची म्हणून चाललंय. काय ती इमारत, गर्दी, गोंधळ, बाहेरची रहदारी, आजूबाजूची घरं. ग्राऊंडसुद्धा नाही सालं. दुसरी कॉलेजं किती हवेशीर मोकळी लांब आहेत. कॉलेजला जागाच चांगली पाह्यजे. ते शाहू कॉलेज पहिल्यांदा गावामधेच होतं. गावाबाहेर जागा घ्यायच्या वेळी त्यांच्या मॅनेजमेंटवरचे काही लोक म्हणाले, की दूर गेल्यामुळे आपल्या संख्येवर परिणाम होईल. पण त्यांचे प्रेसिडेंट म्हणाले, पाचशे पोरं असली तरी चालतील पण ही गावातली बुजबुज नको. ही आपल्या भटांची व्यापारी वृत्ती पहा नाहीतर.

चांगदेव रजेचा अर्ज लिहीत असतानाच बाहेरून छत्र्या वगैरे मिटवीत देसाई, चांगला देशपांडे, शेंडे आले. त्यांनाही चांगदेवकडे यायचंच होतं का दोन दिवस आला नाही ते पहायला. भल्लानंही खास काळजी दाखवून चांगल्या देशपांडेला पाहून या म्हणून सांगितलं होतं. सगळ्यांसमोर काळजी व्यक्त करत.

चांगदेव म्हणाला, सज्जन आहे तसा भल्ला.

चांगला देशपांडे म्हणाला, दृश्य पद्धतीनं चांगलं वागणं हे व्यापारी वृत्तीच्या लोकांना आवश्यकच असतं. म्हणून तर इंग्रज मॅनर्स वगैरेचे स्तोम माजवतात. सॉरी वगैरे शब्द शोधून काढणारे ते लोक किती व्यापारी असतील कल्पना करवत नाही. भल्ला त्यांचा बबर्जी होता म्हणजे पहा.

देसाई म्हणाला, चांगलं झालं तुमी दोन दिवस आला नाही तेच. काल दिवसभर बोअर केलं भल्ला. सगळं टाइमटेबल मीटिंगमध्ये डिस्कस केलं भल्ला. वर्ग किती तेबी कळंना त्येला.

टाईमटेबलवर काय डिस्कशन असतं बुवा! हेडनी आपापल्या डिपार्टमेंटची टाईमटेबलं बसवायची झालं.

इतकं सोपं केलं तर मग आपुन खूप काही करतोय हे कसं दाखिवता यील भल्लाला. साल्याला किती हॉलस् हैतं, किती वर्ग हैतं, किती मुलं, किती विषय काहीकाही म्हाईत नै!-निव्वळ काही म्हाईत नसताना डोकं खात असतो आनखी. काल

कितीदा सांगावं लागलं येड्याला की साहा नंबर हॉलमधी मुतारी केलेली है! पुना पुना साहा नंबरमधीच वर्ग टाकत हुता टायमटेबलात! कुर्कळनी त्येवडं मान खाली घालून खाडाखोड करत हुतं.

कोणते कुलकर्णी?

काय त्याचं यिनिशिलं बघा-यम् यस् कुर्कळनी—

म्हणजे पोलिटिकल सायन्सचे का?

कोनतं का आसेना हो-कोनतं कुर्कळनी हे इम्मटेरील है. यम यस कुर्कळनी म्हंजे ते हिंदुत्वादी हो. बारा हाजार रुपये हुंडा घेतल्यालं-तर ते नुस्तं खाडाखोड करूनं पुनापुना दुरुस्त्या करत बसलं आन् शेवटून फायनल वाचा म्हनलं तर त्येचं त्येलाच कळंना कुटं काय खोडून काय लिवलं ते! ह्यात त्याच्या मारी! पुना बसले उजळनी करीत आन चार घंटे आमचेबी वाया घालावीतं. पुना भल्लाचं आपलं त्येच की साहा नंबर मोकळा है, थिंत एक डिविजन टाका म्हनून! हात त्येच्या मायला. शंभर रुप्यावर पोस्टात येच्यापेक्षा हुशार लोकं कामं करत्यातं! कसे मायला प्रिंशिपल न् प्राध्यापक झालेतं हे! टाइमटेबल सकाळी सव्वाआठ ते संध्याकाळी सव्वासहा!

सव्वाआठ ते सव्वासहा?-शाळा आहे की कॉलेज यार आपलं! आणि मधला वेळ रिकामा सगळ्यांना दोन दोन तीन तीन तास!

बरा असतो की मधला वेळ स्टाफमधी कुचाळक्या करायला. पोरं घेतलीत दोन हाजार, आन् हॉल हैत चौदाच-मंग काय? बशीवले सक्काळपासून सगळे वर्ग. मधे हॉलच रिकामे नैतं. म्हून पोरंपोरी उंडारणार कॉलेजच्या व्हरांड्यामधी दिवसभर मोकळ्या वेळात. लायब्रीबी कुटाय बसत्याल तर? ग्राऊंड तरी कुटाय जात्याल तर? डिसिप्लीनचे प्रॉब्लेम येनार यंदा खूप. आदीच पोरी खूप गावातल्या गावात कॉलेज म्हून, तर गावातली सगळी गुंड पोरं उलटतात पुराणिकवर दोन घंटे डोळं मारायला.

शिकवायचं सोडून निव्वळ पोलीसासारखा बंदोबस्तच असतो आपल्याला वर्षभर.

माठूराम येड्याला कळतं सगळं, पर निव्वळ पोलिटिक्सपायी असं करायला तो. फुडे आर्टस, सायन्स आन कामर्स आशी ती येगयेगळी कॉलेजं करायचा प्लॅन है त्येचा. प्रतिष्ठा वाढते म्हनतं ते संख्या वाढल्यानं.

प्रिन्सिपलनं तरी ह्या लोकांना समज द्यायला पाहिजे.

भल्ला? अन् माठूरामला समज देनार? हॅ हॅ हॅ. उद्या काडून टाकतील भल्लाला! त्येला निस्ता पगार पायजे. सुदारना न् स्ट्याण्डर्ड काय करायचं त्येला. हेला गाभण दाहवा मैना है-असं है भल्ला न् माठूरामचं.

प्रिन्सिपल लोकलच पायजे. लोकल माणसाला संस्थेचे खरं हित स्पष्ट बोलूनही सांभाळता येतं, हिंमत असते पुन्हा वेळेवर असल्या मॅनेजमेंटला ठणकावून गप्प बसवण्याची. ऐकावं म्हणून तर बाहरेचा उपरा माणूस अशा ठिकाणी आणून बसवतात.

पुना परका मानूस दाखवायलाबी हुतो, आमी कसे लिब्रल है म्हनून सांगायला. बाकी आतमध्ये सगळे कुर्कळनी न् देशपांडे न् जोशी न् ऋषिपाठक असेच.

हुशार ब्राह्मणही मिळत नाहीत साल्यांना. आता तो जोशी—

कोणता जोशी-मराठीचा को-रोमँटिक जोशी का?

कोनताबी घ्या, ते इम्मटेरिअल है. सगळेच मिडिऑकर हैतं ही ही ही ऽ

शाहू कॉलेजातही असे मराठे आहेतच. मुल्ला फिदाअलीमधेही असे मुसलमान आहेतच.

पण त्यांच्याकडे इतकं मुळासकट कम्यूनल नाही मालक. त्यांच्याकडे वंजाऱ्यांपासून ब्राम्हणांपर्यंत सगळे लोक आहेत. इतरांनाच आता मेरीटची कदर आहे. म्हणून महाराष्ट्रातल्या सगळ्या ब्राह्मणांच्या संस्था खराब होऊन गेल्या. एक असं चांगलं कॉलेज पुण्यातसुद्धा नाही जिथे आपल्या मुलांना पाठवावसं वाटेल.

शाहू कॉलेजच्या गव्हर्निंग कौन्सिलमधे परवा चर्चा झाली की पुराणिकमधे एक मराठा घेत नाहीत तर आपण इतके ब्राह्मण कशाकरता ठेवायचे म्हणून. नोटिसा देऊन काढा सगळ्यांना म्हणाले एकदोन जण. अर्थात हे कोणी मानलं नाही पण माठूराम-ठोसर ह्यांनी हे स्पिरीट वाढवलं तर पुढे मागे सगळीकडून ही रिॲक्शन सुरु होईल. चांगल्या ब्राम्हणांना तेवढा याचा त्रास होईल.

माठूराम तर उघड म्हणतो की ब्राम्हणच चांगला शिक्षण असू शकतो!

उलट फुल्यांचं असं म्हणणं होतं की ब्राम्हण शिक्षक नेमू नयेत, कारण ब्राम्हणांच्या मनात बहुजनसमाजाबद्दल कधी खरीखुरी आपुलकी नसते. अहंतेनं पछाडलेले ब्राह्मण मुलांच्या मनात विद्येबद्दल तिटकारा निर्माण करतात. ह्या माठूराम-ठोसरसारख्या पुढाऱ्यांना गावातल्या समंजस ब्राम्हणांनी थोडं समजावलं पाह्यजे.

चांगला देशपांडे म्हणाला, भोळेसाहेब, गावातले ब्राम्हण इतके मूर्ख आहेत का ह्या च्यूत्यांना आपले पुढारी समजायला? हेच जातीचं भांडवल करून लीडरशिप टिकवत असतात.

त्यानंतर तिथे चिपळूणकर एका मेघे नावाच्या मराठीच्या प्राध्यापकाला घेऊन आला. मेघे हे महार समाजाचे मोठे जहाल पुढारी होते. विशेषतः त्यांच्या कॉलेजातली सगळी महार मुलं त्यांच्या हाकेसरशी काहीही करायला तयार असायचे, त्यामुळे गावात मेघ्यांचा मोठा दरारा होता. एकवेळ जेवून, याच्यात्याच्याकडे वाट्टेल ती कामं करून ते एम्.ए. झाले. पिढ्या न् पिढ्या अस्पृश्यता भोगायला लागलेल्या आपल्या समाजाबद्दल त्यांना कडवा अभिमान होता. गावात त्यांनी अनेक ठिकाणी बाबासाहेबांचे पुतळे उभारले होते. महारांनी संघटित व्हावं, विचारी व्हावं, प्रगती करावी म्हणून ते अहोरात्र काम करायचे.

त्यामुळे त्यांच्या जातीतल्या राजकीय पुढाऱ्यांचं आणि त्यांचंही जमत नसे. ते दर सुटीत गावाकडे जाऊन तिकडच्या गरीब महारांना इकडे चंबूगबाळ्यासकट घेऊन यायचे. आणि गावात जिथे कुठे मोकळी जागा सापडेल तिथे सरळ त्यांना झोपडपट्टी वसवायला सांगायचे. कुठे म्युनिसिपालटीनं बागेसाठी जागा राखून ठेवलेली असली की हे म्हणायचे, बांधा इथे झोपड्या. बागा पाह्यजेत भडव्यांना! भरून टाका ही सगळी जागा! ह्यासाठी त्यांनी दोन महार वकीलही खास झोपडपट्टीवाल्यांचे प्रश्न सोडवायला नेमले होते. मेघे म्हणजे फार तरुण वयातच पावरफुल पुढारी होऊन बसले होते. सगळे त्यांना घाबरायचे. कारण मनात आणलं तर ते कुणाच्याही मागे पोरं लावून द्यायचे, कुणावर जातीय बदनामीकारक खटले भरायचे.

चिपळूणकरनं त्यांची चांगदेवशी ओळख करून दिली. मग चांगदेवनं देसाईला चहा ठेवायला सांगितला. पुन्हा सगळेजण गप्पा मारत बसले. मेघे चांगदेवची पुस्तकं पहात असताना खूष होऊन म्हणाले, फार चांगली चांगली सगळ्या विषयांवरची ग्रेट ग्रेट पुस्तकं आहेत हो पाटील तुमच्याकडे! वा! तेव्हा चांगला देशपांडे टाळी देत म्हणाला, तिथे एकदोन आंबेडकरांची पुस्तकं आहेत. ती दिसली म्हणून मेघे असं म्हणाले!

मेघे ओशाळून म्हणाले, अर्थात! पण इथे महाराष्ट्र सारस्वत सारखी घानेरडी पुस्तकंही आहेतच की. हॅ हॅ हॅ.

भोळे म्हणाला, बरं मेघेसाहेब, तुमचा घराचा प्रॉब्लेम मिटला की नाही मालक? वहिनी काय म्हणताहेत?

मेघे वैतागून म्हणाले, चाललाय त्याच जुन्या खोलीत संसार. सगळी घरं भटांची-मऱ्हाठ्यांची असतात. महाराला कोन देनार घर प्राध्यापक झालो तरी? त्याच ठिकानी वर्षं घालवत बाहेर न्याय न् समता अशा गप्पा ऐकत रहाव्या लागनार आम्हाला.

दोनेक दिवसांनी बरं वाटायला लागल्यावर तो राजेश्वरीकडे गेला. तिला मॅनेजरनं फोनवरून कळवल्यानंतर खूप वेळानं ती जिन्यावरून खाली येतांना दिसली. चांगदेव मॅनेजरशी गप्पा मारत उभा राहिला. ती आल्यावर त्याच्या लक्षात आलं की हिनं डोळ्यांभोवतीचे रंग आणि लिपस्टिक लावायला इतका वेळ घेतला. तरी ती आली तेव्हा त्याला प्रसन्न वाटलं.

मागे खुर्च्या टाकून ते बसले तेव्हा ती म्हणाली, काल रात्रभर मागच्या बागेतले वाघ काय भयंकर ओरडत होते! गॉड! झोपच आली नाही. अरण्यासारखंच वाटलं.

मी असतांनाही बऱ्याचदा ते कण्हल्यासारखे ओरडायचे. मजेदार वाटतं. वाईटही वाटतं.

तू खूप दिवस लावलेस. मी एकदोनदा फोनही केले मधे. फार काम असतं का? आता जर तू आला नाहीस तर मीच येईन तिकडे... येत जा. इथे काय करावं हेच कळत नाही. बाय द वे, मधे एक नाटकही लिहून काढलं मी! ऽयू अफ्रेड? घाबरू नकोस. तुला वाचायला देत नाहीय् मी. फाडून टाकलं सगळं इतकं भिकार होतं. तुला कसं वाटेल ह्या पद्धतीनं वाचून पाह्यल्यावर भिकार वाटायला लागलं. तू म्हणतोस तसा ॲब्स्ट्रॅक्ट डिव्हाइन टच काही जमत नाही मला. फेटची कल्पनाच नाहीशी होत चाललीय्-सगळं सोशल. तू म्हणतोस तसं डॅम सोशल!

तो म्हणाला, तुझं इंग्रजी फारच चांगलं आहे. तुला चांगलं लिहिता येईल—

म्हणजे? माझी मातृभाषाच आहे इंग्रजी. आईला थोडं मलयालम येतं. पण माझं इंग्रजी अमेरिकेत छान झालं. खूप सगळ्यांमधे मिसळायचे मी अमेरिकेत. जगात इतकी चांगली माणसं मी पाह्यली नाहीत. ग्रेट कंट्री. आपण माणूस आहोत असं नेहमी फीलिंग येतं तिथे. इंग्लंडमध्ये तसं मला कधीच आलं नाही. निव्वळ काळं माणूस असं

फौलिंग येतं इंग्लंडमध्ये. मी नाटक लिहिलं तर अमेरिकेतच स्टेज करायला पाठवीन.

तू आपल्याकडची एखादी जुनी गोष्ट नाटकासाठी का नाही बघत?

हे माझ्या अगदी अलीकडे लक्षात यायला लागलंय् की इंडियात राहून आमच्यासारख्यांना आपली इंडियन ट्रॅडिशन माहीतसुद्धा नसते. मुंबईत छोटीशी इंग्रजी कल्चर करून रहाणं घाणेरडं आहे. एकसुद्धा इंडियन भाषा येऊ नये हा काय मूर्खपणा आहे? पण लहानपणापासून आम्ही इंग्रजी वाचत आलो-आता लक्षात येतं आहे आपण किती घालवून बसलो ते...जाऊ दे...आज तू इथेच जेव.

मग त्यांनी फ्रेंच आणि इटालियन फिल्म डायरेक्टरांवर अतिशय सुरस चर्चा सुरू केली. नाट्याची तिची समज विलक्षण होती, सबंध दृश्य ती डोळ्यांसमोर उभी करायची. नंतर म्हणायची, तिकडे जगणंच अ-वास्तव झाल्यामुळे तिकडच्या कलाकारांना जीवनातून काहीही कलेत घेणं सोपं जातं. त्यामुळे गेल्या वीस वर्षांत अमेरिकेत आणि युरोपात कलाविष्काराचा उद्रेक झाला. आपल्याकडे एक चांगला दिग्दर्शक निघत नाही, कारण प्रत्येक जण कुठल्या ना कुठल्या गुलामगिरीतच जगत असतो. स्वातंत्र्य नाही.

तो म्हणाला, माझ्या बाबतीत तरी हे खरंच आहे. पण मनातल्या मनातून आपण ह्या परंपरांच्या, समाजाच्या ओझ्याखाली तीव्र प्रतिक्रिया करत असतो. हा ताणही कलाविष्काराला पोषक असतो.

ती म्हणाली, असंच नाटक होतं माझं...पण फार सोशल झालं ते. बाय द वे तुला जेव्हा खूप बोअरडम येतं त्यावेळी तू काय करतोस? म्हणजे सगळ्या गोष्टींचा कंटाळा आल्यावर—

मी बाहेर पाय दुखतील इतका वेळ हिंडत रहातो.

दॅट्स इंटरेस्टिंग! मलाही ते करून पाह्यलं पाह्यजे. मला कंटाळा आला की मी सिनेमा पहायला जाते. अर्थात मुंबईतच शक्य आहे ते.

समजा याचाही कंटाळा येईल पुढे. तेव्हा तू काय करणार? स्वत: काहीही करायचा कंटाळा येईल तेव्हा?

ती उत्तर शोधत केस मागे करत इकडेतिकडे पहात म्हणाली, कुणास ठाऊक! ही परिस्थिती भयानकच होईल. माझ्या आईसारखी.

पण तुझ्या आईला निदान एक मुलगी आहे. आपल्या मुलीचं काहीतरी चाललं आहे ह्यामुळेही मन प्रसन्न रहात असेल.

शोधून काढू आपणही काही तरी. आपल्याजवळ आपली बुद्धी आहेच. पण तू असले भयानक विचार आतापासूनच कशाला करतोस? उत्साहवर्धकच विचार करावे माणसानं. आजचा दिवस छान गेला, खूष झालं.

इच्छा असूनही राजेश्वरीकडे वारंवार जाणं त्याला जमेना. त्यात मधे आठ दिवस ती तिच्या म्यूझियमच्या वस्तूंसाठी जवळच्या दोनतीन गावांकडे गेली. आता शिकवणंही

जोरात सुरू झालं. तो मन लावून शिकवण्यात दंग झाला. कॉलेजची एवढीशी कोंदट इमारत पोरापोरींच्या धिंगाण्यानं बाजारासारखी वाटायची. पण त्यानं पहिल्यापहिल्या तासांतच सगळ्या वर्गांवर नीट जम बसवला. सगळ्या वाईट मुलांचं आणि त्याचंसुद्धा नीट जुळलं. पण पूर्वीसारखी शिकवायला जाण्याआधी वाटणारी हुरहूर आता नाही याचं त्याला वाईट वाटलं. ह्या अंगी आलेल्या सराईतपणामुळे त्याला स्वारस्य वाटेना.

भल्लानं त्याला दोनतीन कारकुनी कामं सांगितली, त्यानं ती मुकाट्यानं हो म्हणून केली. सर्व डिपार्टमेंटची सगळी हजेरीपुस्तकं जूनपासून भरून ठेवायचं एक काम होतं. मुलं आता आता वर्गात नियमित यायला लागली होती, तरी त्यांची पहिल्या दिवसापासूनची खोटी हजेरी लावायची, प्रत्येकाच्या नावापुढे पीपी टाकत जायचं. कारण हजेरी अपुरी पडली तर पोरांना सरकारी अनुदान मिळत नाही, पर्यायी कॉलेजचा तेवढा पैसा जातो. कॉलेजला विद्यार्थी हवे आहेत, विद्यार्थ्यांना कॉलेजची गरज नाही. हे काम देऊन भल्ला म्हणाला, ठीक है ना?

चांगदेव म्हणाला, मला इंटलेक्चुअल कामांपेक्षा हल्ली नॉन-इंटलेक्चुअल कामंच इंटरेस्टिंग वाटू लागली आहेत. दोनतीन दिवसांत पुरं करतो...

भल्ला लबाड हसत हॅ हॅ हॅ करत अच्छा म्हणाला.

मग दोनतीन दिवस रजिस्टरांमधे रोल नंबर आणि नाव आणि कॅलेंडरात पहात सुट्टया वगळून बाकीच्या तारखांच्या रकान्यात पोरांची खोटी हजेरी एकसारखी मांडत त्यानं स्वतःची अशी समजूत करून घेतली की आता फालतू गोष्टींत आधीसारखा स्वाभिमान वगैरे दाखवायचा नाही. कामात अडकवून घ्यायचं. कामानं माणूस झिजत नाही, आळसानं पडून राहण्यानं जास्त झिजतो.

नंतर पुन्हापुन्हा भल्लानं त्याला स्कॉलरशिप कमिटी, डिसिप्लिन कमिटी, मॅगझिनचं काम, इंग्रजी नाटकाचं काम, टाईमटेबल कमिटी वगैरे अनेक भानगडींत गुंतवून टाकलं. चांगदेव काही न बोलता हो म्हणत गेला. आपला रिकामा पडून राहण्याचा वेळ जास्तीत जास्त कमी करावा, पूर्ण कॉलेजशी जखडून टाकावं असं त्यानं ठरवून टाकलं. भल्लाही निष्ठुरपणे त्याच्यावर चिक्कार ओझं टाकत राहिला.

प्रिन्सिपलची बायको मिसेस भल्ला मात्र सकाळचे छोटे-छोटे तास घेऊन बारा वाजेशी मोकळी होऊन घरी जायची. घरी भल्ला आणि ती बरोबर जेवून मग एकदीडपर्यंत भल्ला कॉलेजात जायचा. आल्याआल्या इकडेतिकडे फिरून ऑफिसात खुर्चीवर चिकटून मुरलीमोहनची वाट पहात टपाल घेऊन बसायचा. हे टपाल पहाणं एवढंच काम तो पान खात नीट करायचा. उजव्या हातात पेन घेऊन एकेक पाकिट टरकावत आतला मजकूर नुसता पाहून तो कागद कोणाकडे पाठवायचा हे तो मोठमोठ्या अक्षरांत वर लिहून टाकायचा. बहुतेक मासिकं वगैरे लायब्रीतच जायची. त्यांच्या मुखपृष्ठांवर मोठ्या अक्षरांत लायब्ररी असं इंग्रजीत लिहून हा मोकळा. लायब्रियन जोशी पुस्तकांवर अत्यंत प्रेम करणारा होता. तो कळवळून म्हणायचा, पहा, पहा हो, चांगली चांगली कव्हरंसुद्धा हा वरच्या भसाड्या अक्षरानं कशी घाण करून टाकतो!

जाक्लिीन केनेडीच्या चेहऱ्यावरसुद्धा लायब्ररी असं लिहून ठेवलेलं दाखवून

लायब्रेयन जोशी म्हणायचा, पहा हे उदाहरणार्थ! काही जरूर आहे का याला बसल्या बसल्या खरडायची? दुसरी कामं कर की म्हणावं.

जुलैपर्यंत कॉलेजच्या पोरांची फी जमली की पुराणिक कॉलेजच्या इमारतीचं बांधकामही जोरात सुरु व्हायचं. मजुरांचा गोंधळ, आरडाओरडा, ठोकठाक, अर्ध्या वर्गांना दारंखिडक्या नव्हत्या, बाकांवर चुना, रेती पडलेली, पोरांना बसायला कुठे कॉमनरूम नाही, मुलींना बसायला जागा नाही, प्राध्यापकांनासुद्धा तोंड धुवायला जागा नव्हती. मुतारी मुलांना एकच, मुलींना नाहीच. संडास नव्हतीच. त्यामुळे लागलीच तर गरजू लोक काय करायचे हे प्रसंग गुदरल्यावरच कळण्यासारखं होतं. संडास लागली तर कोणी म्हणायचं भल्लाच्या खोलीत बसा परसाकडला! इतके विद्यार्थी आणि वर्ग एकदम ह्या वर्षी वाढवायची गरज नव्हती, पण माठूरामला हे सांगायची कुणाची हिंमत नव्हती. पडसं झालेला गंगातीरकर एकदा म्हणाला कुठे नाक साफ करायची सोय नाही. पोरं म्हणणार काय शेंबडे प्राध्यापक नेमले साले! ह्यामुळे टीचिंगवर परिणाम होतो.

चांगदेवनं हा सगळा प्रकार, पोरांचा गोंधळ अन् लायब्रची आठदहा कपाटं पाहून काय ठरवायचं ते ठरवलं. आणि तो मुकाट्यानं शिकवायला लागला. सकाळी अकरासाडेअकरापर्यंत चहा पाव वगैरे आटपून तो सायकलवरून कॉलेजात यायचा. रोज घराबाहेर पडतांना आपण काहीतरी अती अमंगळ काम करायला निघालो आहोत अशी भावना व्हायची. कसातरी उत्साह एकवटावा लागायचा. गावातल्या गल्ल्या-बोळांतून, गटारांमधून कॉलेजकडे जाताजाता एकदम पोरांचा गलबलाट माशांसारखा घों घों करतांना ऐकायला यायचा. त्यात दिवसभर बुडून घ्यायचं. मधे तासातासातून खूप मोकळा वेळ असायचा तेव्हा केव्हातरी मित्रांबरोबर जेवायला जायचं. सगळेजण कॉलेजच्या अधिकाऱ्यांना शिव्या देत, टाइमटेबलबद्दल कुरकुरत, गुंड पोरांच्या त्रासामुळे नर्व्हस होऊन एकूण शिकवण्याबद्दल वाईट मत करून घेत गप्पा विनोद करत जेवायचे. तास, चहा, तास, कुचाळक्या, चहा, तास, बटाटेवडे-चहा, तास-अशा चक्रात संध्याकाळपर्यंत सगळे चिपाडासारखे झालेले असायचे. त्यातून संध्याकाळी मीटिंग असली की खलास. चांगदेव सव्वासहाला मोकळा व्हायचा तेव्हा कॉलेजात सगळं शुकशुकाट झालेलं असायचं. सायकलवरून घरी येवून चहा घेऊन रेडिओ ऐकत तो पडून रहायचा. नऊच्या सुमाराला पुन्हा सायकलवरून स्टेशनवर उडप्याकडे जेवून यायचा. एखाद्या वेळी राजेश्वरीकडे जाऊन तिकडेच जेवायचा. जेवून आल्यावर अर्धा पाऊण तासात शिकवायचं पाहून पुन्हा डोक्याखाली उंच उशी घेऊन रेडिओ ऐकत पडून रहायचा. इथे स्पेशल वगैरेचे तास नव्हते त्यामुळे शिकवायला काही वाचायची गरज नव्हती. चारपाच टेक्स्टबुकं वर्षभर शिकवायची. ती सगळी आठवडाभरातच तयार झाली. शिवाय वर्गात थोड्याशा पोरापोरींजवळ पुस्तकं असायची. फार तयारी करून शिकवणं म्हणजे विनोदच होता. तासभर चांगदेवच्या वर्गात शांत असायचं. हीच मुलं दुसऱ्या गंगातीरकरसारख्या नव्या प्राध्यापकांना शिकवूच द्यायची नाहीत, इतका धुमाकूळ घालायची. पण त्याच्या तासाला कोणी हूं का चूं करीना. हाही त्याला बथ्थडपणाच वाटला. कुठेही उत्साह नव्हता. पूर्वी तो त्याच्या

अनुभवी प्राध्यापक मित्रांना चिडवायचा तसं त्याचंच आता झालं होतं: लघ्वी केल्यासारखं शिकवायचं. घंटा झाली, वर्गात पोरांसमोर तोंड केलं की सुरू! घंटा झाली की मोकळं.

एरवी कॉलेजची हमाली कामं त्याच्यावर एकामागून एक येऊन पडायची. एकदा शोभामधे शेंडे, भोळे, चिपळूणकर, चांगला देशपांडे वगैरे गप्पा मारता मारता म्हणाले, पाटील, कशाला घेता राव इतकी कामं तुम्ही? तो भल्ला फार चालू माणूस आहे बरं. वरूनवरून तो तुमची स्तुती करत रहातो, सगळ्यांसमोर तुम्ही बेस्ट टीचर आहात म्हणून गुणगान करून तुमच्याबद्दल मत्सर निर्माण करत असतो, हे तुम्हाला कळतं का? कसा खड्डयात घालील हे कळू देणार नाही! या भोळेचं तसंच केलं त्यानं.

चांगदेव म्हणाला, त्याला मी पहिल्यापासून इथे नको होतो पण आता करणार काय?

मी सुरुवातीलाच सांगितलं त्याला फटकावून की मी शिकवण्याशिवाय एक दिडकी काम करणार नाही. हाँ! मला एकदा म्हणाला तुमच्या वर्गात गोंधळ होतो देशपांडे, तर दुसऱ्या दिवशी त्याच्याच वर्गात पोरांना लावून दिलं. एका ओळीचा अर्थ भल्लानं चुकीचा सांगितला की पोरांनी हा गोंधळ केला! मजा आली!

भोळे म्हणाला, तुमचं ठीक आहे देशपांडे, तुमच्यासारख्या लोकल माणसांना काहीही करता येतं. आमच्यासारख्या उपऱ्या माणसांना हे स्वातंत्र्य नसतं. आम्हाला ढोरमेहनत करूनच आमचं अस्तित्व सिद्ध करावं लागतं. तसा मी सुद्धा सुरुवातीला तिकडे असाच वागायचो. पण नंतर माझ्या लक्षात आलं की जोपर्यंत तुम्ही ह्या जगन्नाथाच्या रथाच्या गर्दीत स्वत: होऊन घुसत नाही, रथ ओढत नाही, तोपर्यंत तुमच्या विचारांनाही कोणी किंमत देत नाही. नाहीतर वावदूक समजतात तुम्हाला हे गाढवकाम करणारे. आता मी बदल म्हणून ठरवलं आहे की हेही करून पहायचं. आहे तसं जग स्वीकारायचं तर हा चिखूल खायचीही तयारी ठेवावी असं म्हणून मी इथे आलो. आता बघू याच्यातून काय निघतं ते. एक वर्ष तर पार पडलं!

चिपळूणकर म्हणाला, नोकरीफिकरी करणं म्हणजेसुद्धा कायकाय प्रकार करावे लागतात साले! भल्लाला, आपण तिघेचौघे जण नकोच वाटतो इथे. माझा फार वाईट रिपोर्ट दिला होता भल्लानं दोन वर्षांपूर्वी. मी पोर्शन अपुरे ठेवले असा रिपोर्ट दिला होता साल्यानं. मी माठूरामपासून ठोसर-ऋग्वेदी ह्या सगळ्यांना शिव्या देत असतो हे भल्लाला माहीत आहे, देतो लावून थोडी फट दिसली की साला.

चांगदेव म्हणाला, तरी आपण शिकवणं वगैरे नीटच सांभाळलं पाहिजे, चिपळ्या! पोरांसाठी सगळं केलं पाहिजे!

मी सगळं करतो बाबा. सगळं डिपार्टमेंट माझ्यामुळे नीट चाललंय. घमेंड म्हणून म्हणत नाही मी. माझ्यामुळे ह्या कॉलेजात पोरं मुद्दाम येतात. पण गुंड पोरं कधी वर्गात आलीच नाही तर त्यांना मी डबल तास घेऊन त्यांच्या सोयीप्रमाणे शिकवू का? जे वर्गात यायचे त्यांचं सगळं मी पूर्ण केलं होतं. ह्या गुंड पोरांना मी सांगितलं पुन्हा शिकवणार नाही तेच. त्यांनी तक्रार केली आणि भल्लानं त्याच्या आधारावर तसा रिपोर्ट दिला. आणि तिकडंबाज देशपांडे वगैरे लोक माठूरामच्या निवडणुकीच्या प्रचारावर दोन महिने फिरत होता-त्याचा अर्धासुद्धा पोर्शन त्या वर्षी झाला नव्हता. त्याचा मात्र रिपोर्ट

उत्तम!

भोळे म्हणाला, आपल्यासारख्यांनाच ह्या दुष्ट प्रवृत्तींचा त्रास होणार हे लक्षात ठेवूनच आपानही लढाऊ झालं पाह्यजे मालक.

चिपळूणकर म्हणाला, काय होणार रे होऊन होऊन? मी तर वाटच पाहतोय दुसरीकडे कुठे जायची.

चांगला देशपांडे म्हणाला, ह्यापेक्षा इथेच नीट काम करून आपलं महत्त्व वाढवून इथेच ठोसा द्यायची भोळेसारखी लाईन आपल्याला आदर्श वाटते. काम नीट करून भांडवलदारीसारखं गबर होत मग ठोसा द्यायचा.

चांगदेव म्हणाला, पण कुठपर्यंत आपण हमाली करत करत हे ठोसा देता येण्यासारखं भांडवल जमवणार? हे लोक आपल्यापेक्षा जास्त भांडवल जमा करत रहाणार. तसंच करायचं तर मग ठोसरांच्या मठीतही जाऊन बसायची तयारी पाह्यजे. ते जमले तुम्हा-आम्हाला?

तेही खरंच आहे. काही कळत नाही च्यायला कसं वागावं तेच.

चांगदेव म्हणाला, पण निदान आपण सावध रहायला पाह्यजे. मी तर जास्तजास्त प्रामाणिक होऊन वाट्टेल ते काम करत रहायचं धोरण ठेवलं आहे. आपला गंगातीरकर तुमच्या बरोबरच लागला का हो इथे? तो फार बेफिकीर रहातो. हजेरी घेत नाही. वर्ग आधीच सोडून देतो-अशांना काहीही करता येणार नाही एवढं लक्षात ठेवा. आपण त्या मानानं असे आहोत की कोणी हात लावू शकणार नाही.

गंगातीरकरच बरा म्हणायची पाळी आहे इथे. मस्त तास मधेच सोडून घरी निघून जातो, कॉलेजात कधीच दिसत नाही. तसंच वागलं पाह्यजे.

भोळे म्हणाला, मला नाही वाटत तसं. अशांची ह्या जमान्यात अशी एखाद्या वेळी फजिती होते की कुत्रा विचारत नाही.

हा भल्ला तर आपल्या बायकोला सगळ्यांचा वर घालायच्या विचारात आहे, हे तुमच्या लक्षात आलंच असेल. कायम बायकोला प्रोटेक्ट करत असतो. सोपे छोटे-छोटे वर्ग तिला दिले आहेत. कॉलेजमध्ये ती आहे की नाहीही अशी येऊन जाते. तरी एक पोरगं बसत नाही तिच्या तासाला. आपल्यासारख्यांना एक्सपोज करून टाकील हा दोनतीन वर्षांत, मग हिला पुढे आणील हळूच. तोपर्यंत आपल्याला बदनाम करायचे सगळे मार्ग शोधतोच आहे हा.

भोळे म्हणाला, काही करू शकत नाही कोणी आपलं. आपण मान मोडून शिकवावं. भानगडीत पडू नये, कॉलेजच्या कुठल्याही ॲक्टिव्हिटीत चुरशीनं भाग घ्यावा. मगच आपल्याला थोडीफार किंमत येईल. कसलंही हमाली काम करावंच. किरकोळ गोष्टी सहन करत रहाव्या. वेळ पाहून ठोसाही देत रहावं, तेवढी ताकद मिळवत रहावी. आपण किती गावं बदलावी आता? तिशी आली तरी ठिकाणा नाही.

चांगला देशपांडे म्हणाला, मी मॅट्रिकपासून कायम मास्तरकी करत ह्या गावाहून त्या गावी, ह्या शाळेतून त्या शाळेत फुकट स्वाभिमान दाखवत एनर्जी घालवली. त्यामुळे मनस्ताप फक्त झाला. परिस्थिती तर आपण काही बदलू शकत नाही. आता ठरवलंय आपण की भटकंती बंद करावी. एकदम वर घुसत रहावं.

भोळे म्हणाला, आपल्यातल्या कुणालाच वर घुसणं जमणार नाही मालक. तशी वृत्तीच असावी लागते. आपल्या सगळ्यांच्या वागण्यात एक प्रकारचा निष्काळजीपणा आहे. असे लोक अधेमधेच फक्त तरंगत रहातात. चिपळूणकर फक्त तसा वर जाईल असं वाटतं. कपडे इस्त्री केलेले, नीट भांग पाडलेला, नीटनेटकं सगळं.

आणि हा पाटील तर कधी केसांना तेलसुद्धा लावत नाही च्यायला. कपड्यांचं तर विचारूच नका. तो मुळातच दिसायला चांगला असल्यानं त्याला शोभतंही म्हणा ते.

चांगदेव म्हणाला, सरळ सुती कपडे साबणात धुऊन बुचकळून काढावे. इस्त्रीची घडी वगैरे विनोदीच वाटतं! मला तर आता दाढीमिशीसुद्धा वाढवावी असं वाटायला लागलं आहे.

आता ते सुद्धा करणार का! मग मेलोच आम्ही. आणि तुझ्या त्या टूरिझमच्या राजेश्वरीबाईला आवडेल का ते?

सगळे हसले. चांगदेव म्हणाला, साल्यांनो, इंग्रज यायच्या आधी कुठे रेझर न् काही होतं आपल्याकडे? अगदीच भल्लासारखं रोज दाढी, स्नोपावडर, टाय, सुट घालून येणं म्हणजे मूर्ख असल्याचं लक्षणच की!

चिपळूणकर म्हणाला, पण गलिच्छ माठूरामसारखं दिसण्याबद्दल दुर्लक्ष करणंही काय बरं आहे? काय घाणेरडं दिसतं ते म्हातारं? साठीला आलेली ही दिसण्याबद्दल उदासीन असलेली माणसं समाजात विद्रूपपणा वाढवत असतात, असं माझं मत आहे.

पुराणिक कॉलेजचं नवं होस्टेल बांधून झालं. होस्टेलचं उद्‌घाटक करायच्या वेळी माठूरामनं मोठा समारंभ घडवून आणला आणि उद्‌घाटक म्हणून आपले मित्र विरोधी पक्षाचे अप्रसिद्ध नेते बाबासाहेब जोशी म्हणून खास बोलावले. हे गृहस्थ संस्थेचे एक संस्थापक होते आणि गावात संस्थेच्या शाळा, हे कॉलेज, एक मोठं मुद्रणालय, दैनिक समाजवाद हे वर्तमानपत्र-वगैरे बऱ्याच संस्था त्यांनी नेटानं स्थापल्या होत्या. ह्या संस्थांचे शेअर्स फक्त ब्राम्हण मंडळींनाच दिले जायचे आणि क्वचित एखाद दुसरा मूर्ख ब्राम्हणेतर पाहून त्यालाही शेअर्स दिले जायचे. प्राध्यापकमंडळींतही तिकडंबाज देशपांडे, बिल न देणारा यजुर्वेदी, विद्यासागर, ऋषिपाठक, कुळकर्णी, जोशी वगैरे बरेच लोक ह्या संस्थांचे शेअरहोल्डर होतेच. ह्या बाबासाहेबांबद्दल अनेक बऱ्यावाईट गोष्टी गावात ऐकू यायच्या. एक म्हणजे ते पट्टीचे गुदबाज असून त्यांची बायको दुसऱ्याजवळ झोपते अशी. दुसरी म्हणजे त्यांना नेहमी पोरं लागत असत अशी. पूर्वी हे काँग्रेसमधे गेले असते तर मंत्री झाले असते पण समाजवादाचं व्रत पाळण्यासाठी म्हणून त्यांनी तो त्याग केला असंही काही प्राध्यापक अभिमानानं सांगायचे. त्यांना शिष्यगणही समाजवादी म्हणवून घ्यायचा आणि बाबासाहेबांच्या थोर देशभक्तीच्या आठवणी दैनिक समाजवादा तून वारंवार प्रसिद्ध व्हायच्या. त्यातली एक आठवण अशी होती की त्यांनी प्रचलित रूढीविरुद्ध क्रांती करून आपल्याच जातीतल्या एका दुसऱ्या शाखातल्या बाईबरोबर विवाह केला. बाबासाहेबांचा शिष्यगण त्यांच्या प्रभावाखाली राह्यल्यानं

सत्तेवर येऊ शकला नाही. त्यामुळे वीस वर्षांपासून दैनिक समाजवाद मध्ये सरकारविरुद्ध, मंत्र्यांविरुद्ध शिवीगाळ येत होती. फक्त एकदोन मंत्र्यांनी संपादक ठोसरांची मुलं मोठमोठ्या जागांवर लावून दिल्यामुळे ह्या मंत्र्यांविरुद्ध काहीही मजकूर येत नव्हता. पण बाबासाहेबांचे सगळे शिष्य त्यांनी आपल्या संस्थामध्ये लावून सुखवस्तू करून सोडल्यामुळे त्यांच्या कार्यक्रमाला तेवढे शिष्य, मास्तर, प्राध्यापक वगैरेसुद्धा शंभरदीडशे हजर रहायचेच. बाबासाहेब अप्रतिम इंग्रजी बोलतात असाही सगळ्यांनी प्रचार केलेला होता. पण आपलीच माणसं घुसवावीत हा बाबासाहेबांचा सगळ्यात महत्त्वाचा मानदंड असायचा. ते तसे हल्ली निवृत्त झाले होते पण सर्वत्र त्यांची नजर असायची.

उदाहरणार्थ कॉलेजचे पहिले प्रिन्सिपल गोरे हे फार कडक शिस्तीचे होते. ते ह्या सगळ्या प्रकाराला नवीन होते. ठोसरांनी परभारे कॉलेजची जाहिरात लागोपाठ तीन अंकांत देऊन जाहिरातीचं बिल जेव्हा गोऱ्यांकडे पाठवलं तेव्हा गोरे म्हणाले, मला विचारल्याशिवाय अशी दुकानासारखी जाहिरात तुम्ही का म्हणून टाकली? सबब याचे पैसे मिळणार नाहीत. मला कॉलेज खरोखरच आदर्श संस्था करायची आहे, अशी जाहिरात वगैरे मला पसंत नाही.

हे कळताच ठोसरांनी बाबासाहेबांना कळवलं, मग बाबासाहेबांनी माठूरामना कळवलं की ह्या पुण्याच्या प्रिन्सिपलला आत्ताच्या आत्ता काढून टाका. माठूराम म्हणाले, लवकरच त्रास देऊन गोऱ्याला काढून टाकण्यात येईल. मग गोऱ्यांचा जिथेतिथे अपमान करून त्यांची खाजगी पत्रंही स्वतःच फोडून वगैरे माठूरामनी गोऱ्यांना सहा महिन्यांत त्रस्त करून सोडलं! शेवटी कंटाळून ते प्रिन्सिपल गेले. पण त्यांनी पुण्याहून बरोबर आणलेले दोनतीन तरुण प्राध्यापक अजून होते. त्यांच्यावर अर्थात संस्थेतल्या लोकांची करडी नजर होती. चिपळूणकर, भोपटकर हे त्यांपैकीच.

उद्घाटनाचा कार्यक्रम सुरू झाला तेव्हा भल्लानं सुरुवातीला नेहमीप्रमाणे बाबासाहेबांचं गुणगान गाऊन अशी माणसं सत्तेच्या लोभापासून दूर राह्यल्यामुळेच देशात नीती, चारित्र्य वगैरे टिकून आहेत असं सांगितलं. नंतर माठूरामशेठ उठल्यावर पोरांनी ए माठूऽऽए माठ्याऽऽ एऽमाठ्या असा मजेदार गोंगाट केला. माठूराम तासभर कशाचा कशाशी संबंध नाही असे इंग्रजीतून बोलत होते. प्राध्यापक समोरच बसलेले असल्यानं सगळे आपण लक्ष देऊन ऐकत आहोत असं दाखवत होते. मागे पोरं पोरींकडे आणि पोरी पोरांकडे मोठ्या प्रमाणावर पाहापाही करून आपल्या व्यक्तित्वाचा बसल्याबसल्या आविष्कार करायचे सर्व मार्ग अवलंबून गलबलाट करत होती. दैनिक समाजवाद चा फोटोग्राफर तयारच होता. दोनतीन वार्ताहरही तयारच होते. सरकार किती भ्रष्ट आहे ह्यावर माठूराम तासभर बोलत होते, ते वार्ताहरांकडे पाहूनच.

मुंबईपुण्याच्या वर्तमानपत्रांचे स्थानिक वार्ताहर ठोसरांच्या दैनिक समाजवाद मधेच नोकरीवर असल्यानं ह्या गावातल्या सगळ्या बातम्या ब्राम्हणमतवादी अशाच सर्वत्र यायच्या. त्यामुळे गावातले मराठा, मुसलमान व हरिजन पुढारी आतल्या आत ठोसरग्रुपवर संतापलेले असायचे. तेथील धनिक मराठा मंडळींनी किरकोळ

वर्तमानपत्रं काढून पाह्यली होती पण एक वर्षाच्या पुढे यांचं कुठलंही वर्तमानपत्र कधी चाललं नव्हतं. कोणी म्हणायचे वर्तमानपत्राला फार मिशनरी स्पिरीटनं चालवावं लागतं ते मराठ्यांमधे नाही. कोणी म्हणायचं नुस्ती स्थनिक वृत्तपत्रं अशी टिकत नाहीत, बाहेर सगळी वृत्तपत्रं ब्राम्हण स्पिरिटची आहेत तेव्हा आपला टिकाव लागणार नाही. कोणी म्हणायचं वीस-वीस वर्षं कारकुनी करायचं कसब आपल्या सणक माथ्याच्या मराठ्यांत नाही, इलेक्शनपुरतं वर्तमानपत्र चालवून काय उपयोग? उरलेल्या काळात भरताड भरती करायला आपल्याला कोण मिळणार? वगैरे. पण एकदा सर्व मराठा पुढारी एकत्र आले आणि दोन लाख रुपये जमवायचं नक्की करून त्यांनी शिवशक्ती नावाचं वर्तमानपत्र काढायचं ठरवलं. त्यांनी ह्या भागाचे कर्तबगार मंत्री नामदार बाळासाहेब जाधव यांना तशी गळच घातली. महाराष्ट्रातली विद्यमान वर्तमानपत्रं कशी खुबीनं ब्राम्हणेतारांची प्रतिमा डागळवत असतात हे त्यांनी सर्व वर्तमानपत्रांची कात्रणं त्यांच्यापुढे ठेवून सिद्ध करून दाखवलं आणि आपलंही एक जोरदार वर्तमानपत्र निघणं आवश्यक आहे असं बाळासाहेबांना समजावून सांगितलं.

तेव्हा बाळासाहेब जाधव म्हणाले, ही अवदसा तुमास कुठून सुचली मित्रहो? कोणी गू खाल्ला तर आपणही गू खावा काय? भट लिहून लिहून काय लिहितील? हे नंग्या हिजड्यांचे धंदे आपण करावे काय? तुमास माहीत नाही का कोणी श्रीमंत माणूस हिजड्यांना दहा रुपये देऊन गल्लीतल्या कोणाकोणाविरुद्ध लावून देतो, मग हिजडे कोणाचा काष्टा फेडतात, कोणाला घेरून गलिच्छ शिवीगाळ करतात? तसे हे पेपरवाले ब्राम्हण हिजडे लावून दिलेले असतात आमच्याच लोकांनी. मुंबईतले हे सगळे संपादक हिजड्यासारखे भाड्यानं लावून दिलेले आहेत आपल्या साहेबांनी! हे तुमास ठाऊक नाही का. त्यापशी ह्या दोन लाखांचा साखर कारखाना काढू या!

शेवटी ह्या जिल्ह्यात **शिवशक्ती साखर कारखाना** सुरू झाला.

माठूरामच्या भाषणात होस्टेलचे रेक्टर म्हणून आम्ही विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करणाऱ्या एखाद्या चांगल्या प्राध्यापकाची नेमणूक करणार आहोत असा उल्लेख आला. तेव्हा मागून पापय्या देसाई ओरडला, पुर्शोत्तम देशपांडे! नेलंबी त्येनं सामान! ह्यावर जवळपासची पोरं हसली. देसाई मात्र असा चेहरा करून होता की कोण बोललं हेही माहित नाही.

माठूरामचं भाषण संपल्यावर मुख्य पाहुणे बाबासाहेब जोशी इंग्रजीतून बोलायला उठले. दाहेक मिनटं जोरात सोशालिझमवर इंग्रजी बोलून झाल्यावर मग मुद्दा नसतांना ते निव्वळ इंग्रजी बोलत राह्यले. मधे एकदा काय झालं तर इंग्रजी बोलता बोलता ते एकदम मराठी शब्द बोलून गेले.... पावर इज इन द हॅन्ड्स् ऑफ द करप्ट... म्हणून...

त्यांनी मधेच म्हणून असं म्हटल्याबरोबर पोरंही म्हणून*!* म्हणून*!* करत ओरडली. भल्लानं हात वर करकरून पोरांना गप्प करायच प्रयत्न केला. अत्रे, ऋषिपाठक वगैरे प्राध्यापक दृश्य स्वरूपात उठून पोरांना गप्प करायला मागे गेले.

बाबासाहेबांचं भाषण संपल्यावर सहस्रभोजनाने यांनी समारोप करतांना नेहमीच्या स्टायलीत सुरू केलं: तर आजच्या भाषणात बाबासाहेबांनी सत्ता भ्रष्ट असल्याचा उल्लेख केलेला आहे! सोशालिझमची आवश्यता सांगून ठेवली आहे! उपाय सांगितलेले आहेत!...

ह्यानंतर पोरांनी शिट्टया, आरडाओरडा फार सुरु केल्यानं नेहमीप्रमाणे गोंधळात कार्यक्रम संपला.

विद्यासागर आणि ऋषिपाठक आपसात म्हणत होते, पोरं फार बेशिस्त होत चाललीत आपली. एक देशपांडे म्हणाला, मराठा एलिमेंट वाढतं आहे आपल्या संस्थेत.

नंतर चहाच्या वेळी बाबासाहेबांशी सगळ्या प्राध्यापकांची ओळख करून दिली. बाबासाहेब नव्या प्राध्यापकांची विशेष आस्थेनं चौकशी करायचे: कोणाचे चिरंजीव? कुठलं गाव? अच्छा, ते अमुक देशपांडे तुमच्यापैकी का? चांगला माणूस आहे, पण ह्या गलिच्छ राजकारणात फेकला गेला... तुम्ही कोण? जहागिरदार! वा! तुमचे वडील माझे सहकारी होते. फार निरिच्छ माणूस. शेती मोठी आहे तुमची? आता नाही? अरेरे, कूळ कायद्यानं आपली मोठमोठी ब्राम्हणमंडळी खलास झाली. टिकू देत नाहीत आपल्याला खेड्यात कोणी. बरं झालं तुम्ही आमच्याच संस्थेत आलात...

चांगदेवची ओळख भल्लानं करून दिली तेव्हा पाटील म्हटल्यावर ते म्हणाले, कुठले? फार गोरा रंग आहे तुमचा! ब्राम्हणच वाटता!

त्यावेळी भोळे विनोदानं म्हणाला, ब्राम्हणाचा कुठे गोरा रंग दिसतो तुम्हाला? पहा बरं हे सगळे ब्राम्हण कसे काळेभोर आहेत तुमच्यासकट!

बाबासाहेब अपमान झाल्यासारखं करून म्हणाले, हंऽऽ.

आजूबाजूच्या सगळ्यांना तो भोळेचा उद्धटपणा वाटला. भोळे भल्लाला म्हणाला, चांगलं इंग्रजी आणि गोरा रंग ब्राम्हणांची गंडं आहेत.

भल्लानं त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. मुरलीमोहन किरकोळ हसले. ठोसर ताठ होऊन संतापले. तिकडे बाबासाहेब गोऱ्या रोमँटिक जोशीला सांगत होते, लग्न करून टाक, बरं? तुझे वडील तुझ्याबद्दल सांगत होते... ऐकत नाही म्हणाले. अरे, त्यांना तुझ्या चार बहिणींचं उरकायचं आहे-असं करू नकोस हां. लग्नाला तयार हो बघू.

त्यानंतर एका कुलकर्ण्याची ओळख झाल्यावर बाबासाहेब त्याला म्हणाले, तू अजून डेमॉन्स्ट्रेटरच? एम्.एस्सी. झालास ना तू मागेच? मग

तिकडंबाज देशपांडे जवळच उभा होता. तो म्हणाला, बाहेर कुठेतरी मिळाली असती त्याला लेक्चररशिप. पण हाच म्हणाला, कुठे परक्यांच्या लाथा खा? बरं आहे आपल्याच संस्थेत...सध्यापुरतं...

तिकडे मागे देसाई हलक्या आवाजात म्हणाला, ते गायकवाडबी एम्.एस्सी. हायेच की डेमान्स्ट्रेटरशिपेवर. त्याला नाही असं म्हटलं?

मग तिकडंबाज देशपांडेपुढे बाबासाहेब उभे राहून म्हणाले, तुमची आहेच

ओळख! पूर्वी फार कष्ट घेतलेस तू. आता ठीक आहे ना इथं? तुझे सगळे भाऊ लागले ना लायनीवर? तुझे वडील अचानक वारले!

तिकडंबाज देशपांडे म्हणाला, जानव्यामुळे आमचे सगळे चान्सेस मार खातात. भिक्षुकांची पोरं बिचारी कुठवर जाणार?

इकडून देसाई फिफीफीफी करत म्हणाला, बरं है ना हेबी, श्राद्धाच्या वेळी टुक लावून जेवायची वाट पाहण्यापेक्षा. आता ह्येची आनखी काय प्रगती हुयाला हुवी हुती सांग बरं. कसंबसं बी.ये. सुटलं ह्ये. रेक्टरबी केलंच है आता. साबून, लाईट प्यून फुकट वापराया मिळनार. पुना घरभाडं वाचवायचं. पुना वरतून दोनशे रुपये मिळणार. पुना जवळच्या जवळ कॉलेज, हुटल्याबरोबर पाच मिनटांत कॉलेज.

मग सगळ्यांची ओळख संपत आली. उरलेल्या सगळ्यांकडे दुर्लक्ष करून बाबासाहेब सगळ्यांना सार्वजनिक नमस्कार करून म्हणाले, आनंद झाला. माझ्या संस्थेत आज इतके तरूण बुद्धिमान लोक पोटाला लागले त्याचा. तथापि सगळं श्रेय माठूरामजी आणि ठोसर-ऋग्वेदी यांचं आहे. त्यांच्या साथीला तुम्ही सगळे रहा. नमस्कार. नमस्कार.

दुसऱ्या दिवशी दैनिक समाजवाद **मध्ये नव्या बुद्धिनिष्ठ समाजरचनेसाठी तरुणांनी जीवनदान करावे** अशा मथळ्याखाली फोटोसकट बाबासाहेबांच्या व्याख्यानाचा समग्र उतारा, त्यात पुन्हा उपमथळा **इंग्रजीविरुद्ध तरुणांनी चळवळ उभारावी** असं. तिकडे मुंबईच्या वर्तमानपत्रांतही अशाच दोन दिवसांनी छोट्यामोठ्या बातम्या.

गंगातीरकर नवा प्राध्यापक होता. याचं वर्गात कधी जमायचं नाही. हा मुळात ठोसरांच्या शब्दावरून लांबच्या ओळखीनं लागला होता. पण नोकरी लागल्यानंतर हळूहळू ठोसरांकडे नुस्तं जाऊन बसणं विसरला. शिवाय हा बोलायला उद्धट आणि गर्विष्ठ असल्यानं ठोसरांच्याही मनातून तो उतरला होता. एकदोनदा तो ठोसरांविरुद्ध बोलल्याचंही काही प्राध्यापकांनी ठोसरांना कळवलं होतं. ही प्रगती गेल्या वर्षीच लक्षात आल्यानं भल्लाही हल्ली गंगातीरकरवर विशेष नजर ठेवून होता. ह्याच्या वर्गात नेहमी शिट्ट्या, आरडाओरडा ऐकू यायचा. मग संतापून ओरडत हा वर्ग सोडून घाम पुसत स्टाफरूममध्ये येऊन कोणाशी न बोलता खिन्न बसून राहायचा. हे सगळं चांगदेवला अस्वस्थ करणारं होतं. गंगातीरकरला कोणी विचारलं काही, तर तोही असा वस्ताद की आपलं काहीच सांगायचा नाही. उलट उद्धटपणे तुम्हाला काय करायचंय असं म्हणायचा. भल्लानंही ह्या बाबतीत विचारलं तर म्हणायचा, तुम्ही प्रिन्सिपल आहात म्हणून तुमच्या वर्गात पोरं गप्प बसतात. तुमची बायकोही प्रिन्सिपलची बायको असल्यानं पोरं वर्गात बसतात! टारगट पोरांना तुम्ही कधी शिक्षा केली आहे? उलट गुंड पोरांना तुम्ही घरची कामं सांगून माजवून ठेवलं आहे. वगैरे. माझी उंची कमी असल्यानं मुलं माझं ऐकत नाहीत.

तो कारा असूनही चांगदेव, देसाइ, चिपळूणकर वगैरे काऱ्या कंपनीतही फार काळ रमायचा नाही. चांगदेवनं मनावर घेऊन त्याला हळूहळू चहाला नेत नेत दोस्त करत आणलं. घरी आईवडलांशी कधी न पटणारा हा पोरगा कायम घराबाहेर राहून राहून तुसडा आणि अहंमन्य होऊन बसला होता. खूप नोकऱ्या करून एकूण ह्याही नोकरीबद्दल फारसं चांगलं मत नसलेला होता. हळूहळू चांगदेवच्या लक्षात आलं की, तो लक्ष देऊन वाचूनही येत नव्हता. एवीतेवी पोरं ऐकतच नाहीत तर वाचून जाच कशाला ह्या मुद्यावर तो हल्ली आला होता. त्याला एकदा पोरांनी फादरचं स्त्रीलिंग विचारलं तेव्हा यानं झटकन फादरेस सांगितल्यापासून कायम गोंधळ सुरु झालं होता. शिवाय ठेंगूही होता आणि इंग्रजीची स्पेलिंगं व व्याकरण रोज वाचून वाचून तो जास्त जास्त बारीक होत चालला होता.

सगळेच त्याच्या इंग्रजीची चेष्टा करायचे पण हाही सणकराम असल्यानं कुणी कुठे चुकीचं इंग्रजी वापरलं याची नोंद ठेवून लगेच त्याला ते सुनावून द्यायचा.

एकदा भल्लानं त्याला गुड मॉर्निंग केलं तर हा थांबून घड्याळात काळजीपूर्वक पाहून भल्लाला म्हणाला, मला वाटतं आता पी.एम्. सुरू झालं आहे! गुड आफ्टरनून!

मग स्टाफमधे येऊन चांगदेवला आणि चांगल्या देशपांडेला तो म्हणाला, भल्लाची मस्त चूक काढली! माझ्या इंग्रजीवर बोलतो भडवा! जी ए एन् डी वर एल् ए टी एच् घातली पाहिजे साल्याच्या. सी एच यू टी वाय् ए आहे!

चांगला देशपांडे म्हणाला, तरी तू इंग्रजी सुधारू नये असं नाही.

तो म्हणाला, आपली मातृभाषा नाही तेव्हा चुका होणारच. एकदम चांगलं इंग्रजी म्हणजे गुलामीनं शिकल्याशिवाय येणारच नाही. आणि तो बुटका कुलकर्णी तर कॅज्युअल लीवचा अर्जसुद्धा कसा लिहितो माहीत आहे?... आय वॉन्ट कॅज्युअल लीव बिकॉज आय एम गोइंग ऑन कॅज्युअल लीव! अशांनीसुद्धा मला इंग्रजी येत नाही म्हणावं!

चिपळूणकर म्हणाला, आपल्या गोऱ्या रोमँटिक जोश्यानं एकदा कॅज्युअल लीवचा अर्ज कसा केला होता माहीत आहे?... देअर इज ए हेडेक इन माय स्टमक, देअरफर ग्रँट मी कॅज्युअल लीव...

चांगदेव म्हणाला, हा प्रकार काय आहे या भीतीनं भल्लानं ताबडतोब रजा देऊन टाकली असेल गोऱ्या जोश्याला!

गंगातीरकर म्हणाला, आणि भल्लाला तर स्पेलिंगच येत नाहीत. म्हणून तो कठीण शब्द आला की लपेटीत नागमोड्या रेघेत सगळं बुडवून टाकतो! तुम्ही पहा त्याच्या नोटिशीत कमिटी शब्द एमनंतर कसा नागमोड्या रेघेत इंचभर मारत नेलेला असतो.

लग्नात बारा हजार रुपये हुंडा घेतलेला हिंदुत्ववादी कुलकर्णी म्हणाला, इंग्रजी भाषाच अशी अडाणचोट आहे की हे असंच चालणार.

गंगातीरकर म्हणाला, तरी तुम्ही तुमची पोरं लहानपणापासून कान्वेन्टमधे घालत जा!

दरसाल उन्हाळ्यात चार युनिव्हर्सिट्यांचे पेपर तपासणारे गुंडेचा म्हणाले, इंग्रजी पायजेही आणि नकोही अशा दोन्ही गोष्टी एकदम लागू होतील असा आपला देश आहे.

ठोसरांच्या नात्यातल्या मुलीशी लग्न करून नोकरी मिळालेला कुलकर्णी म्हणाला, देशबीश नाही, आपले मराठी लोक फक्त तसे आहेत. उत्तरेतल्या लोकांना इंग्रजी नको आहे, दक्षिणेतल्यांना पायजे आहे. आपणच मधे लटकलेले आहोत.

गोरा रोमँटिक जोशी लांबून म्हणाला, इंग्रजी हे पांढरपेशांच्या हातातलं अस्त्र होतं इतके दिवस. आता खेडवळ लोकही ह्या अस्त्राची उपासना करायला निघाले. आता होईल एकदा इंग्रजीतून शिक्षण द्यावं की मातृभाषेतून याच्यावर चर्चा आपल्याकडेच्यायला.

लायब्रीतल्या पुस्तकांवर खुणा करणारे देशपांडे रोमँटिक जोशीला म्हणाले, जोशी! तुम्ही मीटिंगमधे सांगा तुमचं खरं मत. नाहीतर बसाल नेहमीसारखे माठूरामजींना हो हो करत.

ह्यावर सगळेजण जोरात हसले.

मोठमोठ्यानं तोंड धुणारे शास्त्री म्हणाले, आजच्या मिटिंगमधे डिसिप्लिनवर चर्चा असावी. कारण भल्ला डिसिप्लीनची व्याख्या ऑक्सफर्ड डिक्शनरीत पहात होता! आज पुन्हा दहा वाजणार रात्रीचे.

इस्टेटीसाठी भाऊ नसलेल्या कुरूप मुलीबरोबर लग्न केलेला कुलकर्णी म्हणाला, मी बायकोला तर आज येतांनाच सांगून आलोय की अकरापर्यंत येईन म्हणून. तर म्हणाली, मीटिंग का हो पुन्हा आज?

लायब्रीतल्या पुस्तकांवर खुणा करणारे देशपांडे म्हणाले, अहो! मी तर आज मिटिंग आहे असं सांगितल्याबरोबर बायको म्हणते, म्हणजे अकरा वाजतील आजही. वैताग आहे मायला.

पीएच.डी. दहा वर्षांपासून करत असलेले पुरोहित अत्यंत हळू म्हणाले, अहो! तुम्हाला माहीत आहे आपले ह्या आधीचे प्रिन्सिपल ह्या चर्चांनाच वैतागून एकदा माठूरामला म्हणाले, जी काय चर्चा करायची ती माझ्याशी करत जा. तुम्ही माझ्या स्टाफला सतावत जाऊ नका. तर त्याला माठूराम-मुरलीमोहन यांनी धारेवर धरलं की तुम्ही माझा स्टाफ हा शब्दप्रयोग वापरलाच कसा? आम्ही पैसा उभा करून संस्था काढली आहे. संस्था आमची आहे. स्टाफही आमचाच आहे. सरकारी मदत आमच्यामुळेच मिळते.

मग त्या वर्षी व्हाइस प्रिन्सिपलच्या सहीनं मीटिंगा बोलवायला लागले माठूराम. प्रिन्सिपलला न विचारता. गेला मग तोही दोन महिन्यांत राजीनामा देऊन.

मग मीटिंग सुरू होईपर्यंत चांगदेव आणि चार-पाच मित्र शोभामधे जाऊन बसले. वाटेत गंगातीरकर खिन्न होऊन म्हणाला, काल माझ्या वर्गातच लफडं झालं. म्हणून ही मीटिंग बोलावली असणार. एका गुंड पोराची आणि माझी झोंबाझोंबी झाली. त्यानं माझा टाय धरला. माझं हे दुसरं वर्ष असून मला अजून क्लास कंट्रोल जमत नाही. कसंतरीच वाटतं.

चांगदेव त्याला विश्वासात घेत म्हणाला, तू दिसायला लहानसा, पोरकट आहेस बाबा. फार कंट्रोल वगैरेच्या भानगडीत पडत जाऊ नकोस. दुसऱ्याला विश्वासात घ्यायला चेहऱ्यावर निदान तिशी उलटल्यावरचा पोक्तपणा आवश्यक असतो. सुरुवातीच्या दोन-तीन वर्षांत आपण आपलंच एक हत्यार बनवून घेत असतो. ते नाही नीट बनवता आलं तर पुढे कायम त्रास होत रहाणार. आणि तू हे असलं अर्धवट टाय वगैरे घालून शिकवायला जाणं बंद कर बघू. त्यामुळे फुकट पोरांमधलं तुझं अंतर वाढत असेल.

गंगातीरकर तिथल्या तिथे रस्त्यात टाय सोडून म्हणाला, पटलं. हा आता ह्या गटारात टाकतो.

असं म्हणून त्यानं टाय गटारात फेकला.

नंतर गंगातीरकर आपल्याला काय काय अडचणी येतात हे सांगत होता आणि चांगदेव त्याला समंजस सल्ला देत होता. की बाबा रेऽ तू वर्गात गेल्या गेल्या फटाफटा हजेरी घेऊन लगेच भडभडा लेक्चर सुरू करतोस ते बरोबर नाही. आरामात जुन्या बैलासारखं जावं. एकदोन पोरांची गमंत करावी. पोरांशी काहीतरी खाजगी संबध थोडेफार प्रस्थापित केलेच पाह्यजेत. आणि शिकवायला सुरुवात म्हणजे रेकार्डसारखं फाडफाड सगळं सांगत सुटू नये. एका तासात ठराविक चार पाच मुद्दे क्रमाक्रमानं मुलांची कुवत पाहून सांगावे. मुद्दा संपला की थांबावं. तो समजला का विचारावं. उदाहरणं द्यावी. मग पुढचा मुद्दा द्यावा. प्रत्येक शब्दावर जोर देऊन बोलावं. शिकवणं सगळं कृत्रिम करून टाकावं. हे असं दीडशे चेहरे समोर असतांना एकानं तासभर बोलत रहाणं म्हणजे कृत्रिम प्रकारच नाही का?... तसं नाही गंगातीरकर, सगळ्या मुलांकडे पहात शिकवलं पाह्यजे. म्हणजे आपला सगळ्यांशी संबंध प्रस्थापित होतो. आपल्या धंद्याची सध्याच्या परिस्थितीत गुरुकिल्ली म्हणजे... भाषेतच अशी जादू आणावी की मुलं बुद्धी बंद करून नुस्तं मंत्रमुग्ध ऐकत रहावी! समजणं न समजणं हे हल्ली कोणी विचारात घेऊ नये. निव्वळ जादूटोणा. इतक्या तरण्याबांड पोरांना रोज चारचार तास जागच्या जागी खिळवून ठेवणं म्हणजे मंत्रतंत्र आहे.

चांगला देशपांडे म्हणाला, मला शिकवणं वगैरे सगळं एका वर्षातच जमलं, पण अजून वर्गात समरस वगैरे होणं जमत नाही. काहीतरी अंतर रहातचं. आपले बॉटनीचे वृद्ध देशपांडे शिकवतात तसं ह्या वयातच जमलं पाह्यजे. चांगदेवरावला जमलं आहे ते थोडंफार!

चांगदेव म्हणाला, तुम्ही ते वैताग टेबलामागे कायम उभं राहून शिकवत जाऊ नका हो. हे टेबल सालं आपल्या आणि विद्यार्थ्यांच्या मधे मोठी धोंडच असते. टेबलाच्या पुढे मुलांच्याजवळ कायम येत चला. नाहीतर आधीच हे सगळं कृत्रिम असतं आणि शिकवण्याला निव्वळ प्रेक्षणीय नाटकाचं स्वरूप येतं.

चांगला देशपांडे म्हणाला, पटलं आपल्याला. उद्यापासून टेबल भिंतीला लावूनच शिकवतो!

शेंडे म्हणाला, सराईत बैल जसा दावण कशी बांधू द्यावी हे सांगेल तसंच वाटतं हे चांगदेवराव! आपण साले सगळे बैल झाली आहोत. ही शिक्षणपद्धती म्हणजे देशातल्या

तरण्याबांड पोरांना हिजडे बैल बनवणारी धूर्त युक्ती आहे.

चांगदेव म्हणाला, भ्याडांचं काम तेच शौर्य म्हणून आपल्याला करत राह्यलं पाह्यजे! याच्यातून सुटकाच कुठे आहे? सगळं स्वातंत्र्य गेलंच आहे आपलं. ह्यालाच लोकशाहीतलं व्यक्तिस्वातंत्र्य म्हणायलोत आपण!

गंगातीरकर म्हणाला, असं म्हणू नका हो. तुम्ही मीटिंगमधे नाही का सडकावत माठूरामसकट सर्वांना? आमच्या पुढे तुम्ही दोघंतिघं आदर्श आहात ह्या धंद्यातला.

चांगदेव म्हणाला, आपली ही पिढी नुस्ती विचारात बंडखोर आहे. आता पुढची पिढी कृतीनं बंडखोर निघाली तर बरं होईल.

मग ते परत कॉलेजवर आले. त्या दिवशी माठूरामनं मुद्दाम आपली हुशारी दाखवायला म्हणून दानशूर गोयंकाशेटजींनाही आणलं होतं. आपल्या कॉलेजात विद्यार्थ्यांची बेशिस्त यंदा वाढली आहे, अशी चर्चेला सुरुवात केली. देसाई मागून म्हणाला, कारण यंदाच तुम्ही दोन हजार विद्यार्थी जागा नसतांना फीसाठी घेतले आहेत!

माठूराम पुढे म्हणाले, याला कारण आपल्यातलेच काही बेजबाबदार प्राध्यापक आहेत. क्षीरसागर हळूच कुजबुजले, सिलेक्शन आपणच केलं आहे. दोनचार जण हसले. माठूरामनं हा बेजबाबदार प्राध्यापकांचा विषय हळूहळू तत्त्वज्ञानात न्यायला सुरुवात केल्यावर सगळे जण वैतागत ऐकत राह्यले. खरी गोष्ट अशी होती की, कॉलेजात दहाबारा गुंड पोरं हैदोस घालायची. भल्लासुद्धा ह्या गुंड पोरांशी गोडगोड बोलून त्यांना खूष ठेवायचा. कारण ही पोरं माठूराम-ठोसर-ऋग्वेदी वगैरेंच्या ओळखी-पाळखीतली घरोब्याचीच होती. त्यांना कोणीच काही करू शकलं नसतं. ही श्रीमंताची पोरं प्राध्यापकांना तुच्छ समजायची. पोरींना सतावायची.

मग हळूहळू माठूराम ह्या मुद्यावर येत गेले की विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यात प्रेमळ संबंध का नाहीत याचा शोध घेतल्यावर हळूहळू हा प्रश्न सोडवायला त्याची मदत होणार आहे.

ह्यावर गोपाळ देशपांडे वा! म्हणाला. मग पुन्हा तासभर भारतीय संस्कृतीतील गुरूची संकल्पना काय याच्यावर त्यांनी डिस्कशनच सुरु केलं. कोणाला स्पष्ट बोलून अवलक्षण करून घ्यायचं नव्हतं. साही देशपांडे आणि आठी जोशी मन लावून माठूरामजींचे सखोल विचार ऐकून चेहऱ्यावर ज्ञानतृप्ती दाखवत बसले होते. मधेच नेहमी सूट-टाय घालून येणाऱ्या शिंगरून कामतृष्णेमुळे विशेषतः काऱ्या प्राध्यापकांबद्दल विद्यार्थ्यांना लिंगविषयक मत्सर वाटल्यामुळे हे प्रश्न उपस्थित होतात असा चांगला मुद्दा काढला. त्यावर भोळे म्हणाला की चांगल्या पद्धतीनं मुलंमुली एकत्र आणता येईल असे काही कार्यक्रम, सहली वगैरे किंवा कॉलेजच्या आवारात चांगलं वातावरण ठेवणं वगैरे आपण का करत नाही? ह्या अशा बकालीत मुलं असचं वागणार.

माठूरामला हे आवडलं नाही. ते चिडून म्हणाले, एकत्र आणा म्हणजे? एकत्र आणा म्हणतात! एकत्र आणून काय...काय भानगडी करायच्या?

सगळे हसले. मग पुन्हा कामतृष्णा म्हणजे काय याच्यावर तासभर सखोल वाद माठूरामनं घडवून आणला. तशात कोणीतरी इतकी गर्दी झाल्यावर गुणवत्ता कशी राखता येईल हा विषय काढल्यावर माठूराम पुन्हा संतापले. त्याच वेळी चिपळूणकरानं बुटातून आपले पाय बाहेर काढले आणि त्याच्या कित्येक आठवडे न धुतलेल्या मोज्यांचा भयंकर उग्र वास सगळीकडे पसरला. गोएंकाशेटजींनी तर रुमालच नाकाला लावला. तिकडे चांगला देशपांडे, देसाई हे आपसात विनोद करून आंग हालवून हालवून हसत होते. त्यांच्याकडे नुस्तं पाहूनही इतरांचे चेहरे सस्मित होत होते.

मग ज्यांची बायको इंग्रजीला इथेच लावून घेतली होती ते नेहमी पेपर वाचणारे कुलकर्णी म्हणाले, आपल्याकडे विद्यार्थिनी सुसंस्कृत वर्गातल्या येतात तर विद्यार्थी असंस्कृत वर्गातले येतात. त्यामुळे प्रश्न निर्माण होतात.

चिपळूकर म्हणाला, म्हणजे हे प्रश्न पोरी निर्माण करतात की पोरं हे तुम्ही सांगितलं नाही?

तेच कुलकर्णी पुन्हा म्हणाले, अर्थात विद्यार्थ्यांमुळे!

चिपळूणकर म्हणाला, गैरसमज आहे तुमचा. पोरीच उठावदार वगैरे पोषाख करून मेकअप करून नखरे करून कॉलेजात येतात, खेडवळ पोरांना वेडं करतात. ह्या पोरींनाच आधी भारतीय संस्कृती शिकवा.

वर्षभर टाय व कोट घालून येणारे मराठीचे शिंगरू म्हणाले, इतक्या-वर्षांत एकही मुलाला शिक्षा झाल्याचं माझ्या आठवणीत नाही.

ह्यावर भल्ला शिंगरूकडे रोखून पहायला लागल्याबरोबर शिंगरू त त प प करत म्हणाले, म्हणजे मी म्हणतोय, असंच बरोबर आहे, असंच पाह्यजे.

चिपळूणकराच्या मोज्यांचा भयंकर वास आता सबंध हॉलभर पसरला होता आणि दहा वाजत आले होते. त्यामुळे इतका वेळ नाकाला रुमाल लावून खाली मान घालून पेंगत बसलेले दानशूर व आपल्या जातीच्या प्राध्यापकांना वरची ग्रेड द्यायला लावणारे म्हातारे गोएंकाशेट पगडी नीट करून उठले आणि काठी वर करत म्हणाले, बकवास भौत हुयो! म्हारो तो कैणो हे की आपणा कॉलिजमां आर्ट्स पूरा बंद कर देवो! होर फक्त साइन्स के किलास चालू राखो! आर्ट्स फिजुल है.

यावर चांगला देशपांडे, देसाई वगैरे आठदहा लोकांनी जोरात टाळ्या वाजवल्या.

त्यानंतर विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यात आपुलकीचे संबंध कसे निर्माण करावे ह्यावर मीटिंगांवर मीटिंगा सुरू झाल्या. ह्या मीटिंगांमधे स्पष्ट बोलणारे माठूरामच्या काळ्या यादीत जायचे. त्यामुळे गप्प बसणारे वाढत चालले होते. शिवाय भल्लाही माठूरामच्या काळ्या यादीतल्या लोकांवर नजर ठेवून त्यांना पद्धतशीर त्रास देत रहायचा. असेच चांगलेचांगले लोक कॉलेजातून भल्लानं हाकलले असं सगळे सांगायचे.

दर मीटिंगला सहनशीलता संपत आली की नकळत चिपळूणकर बुटातून पाय बाहेर काढून बसायचा. देसाई मात्र मीटिंगमधे स्वतःची भरपूर करमणूक करून घेत

खिदळत रहायचा. नंतर अनेक दिवस ह्या मीटिंगमधले विनोद तो गावभर सांगत रहायचा. एखाद्या वेळी तो विचारायचा, सगळे जण अघोदर कोणतं शब्द वापरत होते हो-कॉम्पिटन्स न्हाई का? मग मधेच कोनीतरी कॉम्पीटन्सी असं शब्द त्या ऐवजी वापरायला सुरुवात केलं तर मंग सगळेच कॉम्पीटन्सी वापरायले! हू हू हू हू ऽ.

इकडे काही जण जीव तोडून बोलत असायचे, तर तिकडे देसाई मागे लपून शेरे मारत उंदरासारखा हसत असायचा. चांगला देशपांडे शक्य तो बोलायचं टाळून काहीतरी गाणं तोंड मिटूनच गुणगुणत राहायचा.

तशात पुन्हा विद्यार्थ्यांच्या निवडणुका आल्या आणि कॉलेजच्या इमारतीत निव्वळ मटण मार्केटसारखा गोंधळ चालला. भल्ला नेहमीप्रमाणे ऐन निवडणुकीच्या दिवशीही दुपारपर्यंत कॉलेजमधे आलाच नाही. सकाळपासून वर्गावर्गात मारठोक, गोंधळ, झुंडीच्या झुंडी इकडून तिकडे.

त्यात एक मजेदार प्रकारही घडला. मोठ्यानं तोंड धुणारे प्राध्यापक शास्त्री यांची कातडी बॅग स्टाफरूममधून कोणीतरी पुस्तकांसकट चोरुनच नेली. केव्हा कोणी हेही कळलं नाही. बॅग नेली हे कळताच मोठ्यानं तोंड धुणारे शास्त्री वेड्यासारखे हातवारे करून रडकुंडीलाच आले. मग स्टाफरूममधे पोरं घेऊन येणाऱ्या प्राध्यापकांवर ते घसरले. ते ओरडले, हे पांडेयगुरुजी निव्वळ शाळेत शिकवण्याच्या लायकीचे आहेत च्यायला. तास झाला की सगळा वर्गच त्यांना काहीही विचारायला उलटतो.

त्यावर या एकदा फुरसतीनं घरी असं म्हणणारा देशपांडे म्हणाला, विद्यार्थ्यांशी खेळीमेळीचे आईसारखे संबंध ठेवायला पाह्यजे असं परवा मिटिंगमधे माठूरामशेट म्हणालेच नाही का?

त्यावर उसने पैसे घेतल्यावर ते कधीही परत न करणारे व नंतर संपूर्ण विसरून जाणारे अत्रे म्हणाले, हे कारे लोक आहेत दोनतीन त्यांच्यामुळे पोरी कायम आत येतात त्यांना डिफिकल्टीज विचारायला! हे चिपळूणकर, पाटील-खरं की नाही हो?

शास्त्री म्हणाले, हे सगळं बंद केलं पाह्यजे. स्टाफरूममधे स्टाफशिवाय कोणी यायला नको. बाहेर प्यून ठेवला पाह्यजे कायम.

त्यावर पीएच. डी. दहा वर्षापासून करत असलेले पुरोहित म्हणाले, प्यून? आणि स्टाफला एक प्यून कसा मिळणार? भल्ला आला ऑफिसात की टपाल उघडून आधी कोंडाजीला एक पान आणि दोन गोल्ड फ्लेक आणायला पाठवतो. तिकडे तात्या देशपांडेला घरी भाजी, किराणा, औषध आणायला पाठवून देतो. उरलेले दोन प्यून पुन्हा त्यालाच लागतात कायम, ह्याला बोलावून आण, त्याला बोलावून आण ह्यासाठी! स्टाफला इथे काय महत्त्व आहे की प्यून मिळेल आपल्याला!

या एकदा फुरसतीनं घरी असं म्हणणारा देशपांडे म्हणाला, आणि आपला हरी प्यून कुठे असतो हो हल्ली? मला दिसलाच नाही हो बऱ्याच दिवसांत.

क्षीरसागर म्हणाले, हरी माठूरामच्या घरीच असतो-गावभर माठूरामची फालतू

मंडळांची पाकिटं वाटा, मुंबईचं रिझर्वेशन करा, स्टेशनवर माठूरामबरोबर जाऊन जागेवर सामान ठेवा, पुन्हा माठूराम यायच्या दिवशी स्टेशनवर जाऊन बसा.

याज्ञिक म्हणाले, आमच्या लॅबमधले दोन्ही प्यून हल्ली चेअरमनसाहेबांकडेच असतात! हिंदुमुस्लिम ऐक्यवर्धक सोसायटीचं काम करायला. पंधरा दिवस झाले. काल एक प्रयोग होऊच शकला नाही. मी लेखी पाठवलं प्रिन्सिपलसाहेबांना की प्यूनची कामं माझे लेक्चरर्स करणार नाहीत म्हणून.

क्षीरसागर म्हणाले, भल्ला तुमचं पत्र माठूरामला दाखवून तुमची आणखी लावालावी करील. मी मागे बॉडीचा मेंबर असतांना युसूफ प्यूनबद्दल विचारलं होतं-युसूफला तरी कोणी पाह्यलं आहे कॉलेजवर काम करताना? माठूरामचा ड्रायव्हर म्हणूनचं काम करतो तो आणि पगार मात्र कॉलेजकडून जातो!

शास्त्री रडकुंडीला येत म्हणाले, पुस्तकं न् बॅग जाऊ दे गेली तर-पण माझ्या नोट्स गेल्या ही बॅगेत. एम्.एस्सी. पासूनच्या नोट्स! कोणी त्या नोट्स तरी परत आणून देईल का हो?

लायब्रीत कधीही न जाणारा कुलकर्णी एकदम चर्रर्र झाल्यासारखा शास्त्रींना म्हणाला, अर्रर्र! नोट्स गेल्या बॅगेतच? च् च् च्, आता शिकवणार काय हो तुम्ही? किती कष्ट घेतलेले असतात आपण. आपल्या नोट्स सांभाळा बाबा सगळे जण. ह्या स्टाफमधे पोरंपोरी घेऊन येणाऱ्यांना—

तेवढ्यातच चांगदेव तास घेऊन आत आला आणि त्याच्या मागे मागे लगट करीत तीन मुली!

मग शास्त्री चवताळून त्या पोरींवरच भडकून ओरडले, चला, जा बाहेर! काय आहे इथे? स्टाफरूम आहे हे!... डिफिकल्टीज कसल्या? डिफिकल्टीज आहेत की फाजीलपणा? आँ? व्हा इथून.

पोरी खजिल होऊनच बाहेर गेल्या.

चिपळूणकर आत येता येता हे पाहून शास्त्रींना टोचून म्हणाला, चांगलं शिकवणाराकडेच येतात शास्त्रीबोवा पोरी ऽ

पीएच्. डी. दहा वर्षांपासून करत असलेले पुरोहित म्हणाले, प्राध्यापक कारा असल्यामुळे येतात पोरी, चिपळूणकरसाहेब! गैरसमज आहे तुमचा. आम्ही चांगलं शिकवत नाही वाटतं? आमच्यामागे का नाही येत पोरी? ते पहा, पुन्हा ती एक चावट पोरगी आली पाटलांना डिफिकल्टीज विचारायलाऽ हॅ हॅ हॅ.

चांगदेव म्हणाला, मी वर्गातल्याशिवाय बाहेर भेटायचं नाही म्हणून सांगितलं आहे एकदा. तुम्हीच हाकला त्या पोरीला. आपल्याला जमत नाही ते.

तिकडंबाज देशपांडे आत येत सगळ्यांकडे चौकशी करत होता, तुमच्या वर्गात कोण आलं निवडून?... तुमच्या? नीट झाली ना निवडणूक? भल्ला शेवटी प्रेसिडेंटच्या निवडणुकीच्या वेळी येईल आज नेहमीप्रमाणे! तिकडे कॉमर्सच्या वर्गावर मारामारी झाली दोन्ही ग्रुप्सची करणार काय? रस्त्यात सगळी झुंबड झाली आहे. ऋषिपाठकही गायब आहे.

बॉटनीचे वृद्ध देशपांडे वर्गावर जातांना म्हणाले, रस्ता आणि कॉलेज यांत फरकच

कुठे आहे आपल्या इथे! काय काय थेरं निघून राह्यलीत पहा- विद्यार्थ्यांची इलेक्शनं! विद्यार्थ्यांची कुठे इलेक्शन असतात का हो? उगा पोरखेळ मांडलाय् बाबा हल्ली!

भोळे म्हणाला, ते शाहू कॉलेजवाले शहाणेच म्हणायचे आपल्यापेक्षा. गावातून एकदम लांब नेलं त्यांनी कॉलेज.

तिकडंबाज देशपांडे म्हणाला, गावात पोरींना सुरक्षित वाटतं भोळे! दंगाबिंगा झाला तर पोरी कुठे लांब चालत जाणार? मध्यमवर्गी पोरी आहेत आपल्या. बसचं भाडंसुद्धा पालकांना परवडत नाही. तिकडे शाहुमधली मळेवाल्यांची पोरं इ.बी.सी. चा खोटा बाराशेच्या खाली उत्पन्नाचा दाखला आणून स्कूटरं घेऊन कॉलेजात जातात.

गोरा रोमँटिक जोशी म्हणाला, आपल्या नोकरीवाल्यांच्या क्लासला पगार असतो तेव्हा खोटं सर्टफिकिट दाखवता येत नाही. शेतकऱ्यांची सगळी पोरं बाराशेच्या खाली उत्पन्न दाखवू शकतात तलाठ्याला पैशे चारून. तपासलं तर दहा टक्के सुद्धा खरी गरीब पोरं सापडणार नाहीत. काय संस्कार होणार ह्या पोरांवर पुढे शिक्षण घेतल्यावर? लबाड्या, भ्रष्टाचार हेच.

उसने पैसे घेतल्यावर कधीही परत न करणारे व नंतर संपूर्ण विसरून जाणारे अत्रे म्हणाले, म्हणून तर स्टॅण्डर्ड घसरत चाललंय् शिक्षणाचं. डेमॉक्रसी नकोच आहे ह्या देशाला. क्वालिटीचा आणि बहुजनहिताय बहुजनसुखाय शिक्षणाचा मेळ बसणारच नाही. शिक्षण हे ॲरिस्टोक्रॅटिकच पाह्यजे. पण सरकारही ह्या पागोट्यावाल्यांचंच. होऊ द्या काय होतं ते. जनतेला असं गुन्ह्यात सरसकट गोवलं की बरोबर राज्य करता येतं.

तेवढ्यात बाहेर पळापळी ऐकायला आली. एक दगड खिडकीवर बसला आणि पूर्वीच फुटलेल्या एका तावदानाचे तुकडे तुकडे झाले. सगळे प्राध्यापक घाबरून खुर्च्यांसकट उठून कोपऱ्यात जवळजवळ बसून सिग्रेटी पेटवून भेदरून बसले. माठूरामचा दर निवडणुकीत प्रचार करणारा जोशी जो कधी सिग्रेट प्यायचा नाही त्यानंही गुपचूप एकट्यानं चहा पिऊन येणाऱ्या यजुर्वेदी जोशींकडून सिग्रेट मागून प्यायला सुरुवात केली. अनेकांनी सिग्रेटी घ्यायला सुरुवात केल्यानं गुपचूप चहा पिऊन येणाऱ्या यजुर्वेदी जोशींचा आत्मा तिळतिळ तुटत होता, पण ते प्रसंग ओळखून उदार होत होते. मिसेस अय्यर नवरा केव्हा स्कूटर घेऊन येतो हे पटकन खिडकीतून लांबवर पाहून पुन्हा मिसेस कुलकर्णीजवळ खेटून बसून प्रिन्सिपलची बायको आज कशी आली नाही ह्यावर बोलत बसली.

बाहेर पोरांचा हैदोस चालला होता. निवडून आलेल्या उमेदवारांनी गुलाल उधळायला सुरुवात केली. रस्ताभर पत्रकं इकडेतिकडे उडत होती. सगळ्या घरांच्या भिंती, रस्ते चितारलेले होते. हॉटेलवाल्यांनी आज तिप्पट दूध घेऊन चहाचा अखंड पुरवठा सुरु ठेवलेला होता. लाउडस्पीकर गल्लीभर टांग्यांतून ओरडत होते.

तिकडंबाज देशपांडे म्हणाला, आमचा अंदाज होताच की त्यांचाच प्रेसिडेंट येणार.

चांगदेव त्याच्याकडे रागावून पहात म्हणाला, त्यांचा म्हणजे कुणाचा? त्यांचा प्रेसिडेंट म्हणजे?

तिकडंबाज देशपांडे एक गुन्हा झाकायला म्हणून दुसरंच काहीतरी सांगायला लागला, हे मराठा एलिमेंट जास्त होत चाललंय आपल्याकडे म्हणून तर प्रॉब्लेम्स्

वाढलेत. पूर्वी असा गोंधळ नव्हता होत.

चांगदेव म्हणाला, पण तेही आपलेच विद्यार्थी की. तेव्हा प्रेसिडेंट त्यांचा वगैरे म्हणण्यात काय अर्थ आहे?

त्याच्याकडे साशंक पहात तिकडंबाज देशपांडे सावधपणे म्हणाला, अर्थात, अर्थात. निवडून कोणीही आला तरी तो आपलाच की. पण हे बाहेरून त्यांचे गुंड का यावेत त्यांच्या मदतीला? आपली पोरं असं कधी करतात का?

त्यांना हाकलू आपण आत्ता. चला.

मी येत नाही! कुठे गळा धरला तर काय घ्या फुकाचा? मी काय प्रिन्सिपल आहे काय इथला? पोरं माझ्यावरच बिथरली तर काय घ्या?

तुम्हालाच हा जातीचा गंड खातोय. पहा, नाहीतर आम्ही ह्यांना हाकलतो की नाही ते. चल रे गोप्या, चला भोळे सर-देसाई तिकडेच दिसतोय गर्दीत.

मग चांगला देशपांडे, चिपळूणकर, भोळे, चांगदेव सगळे उत्साहात बाहेरच्या गर्दीत घुसले. भोळेनं एका पोराच्या मुस्काटात दिली. चांगदेवनं एकाची कॉलर धरून रस्त्यावर ओढत नेलं. एक पहिलवान चांगल्या देशपांडेला म्हणत होता, सर, तुम्ही आम्हाला फक्त शहाणपणा शिकवता. ह्या कॉलेजात सगळ्यात ज्यास्त पार्शलिटी चालते. यंदा आम्ही ठरवलंय की इथे बामणाची पोरं विद्यार्थी संसदेवर येऊ द्यायची नाहीत. बगाल तुम्ही.

तिकडे देसाई काही पोरांना शिव्या घालत होता, आरे ऽ तुमच्या गांडीवर फटके मारून कालवे खोदायला नेलं पायजे सगळ्यांना सक्तीनं. नीट शिकायचं सोडून काय करायला येता रे भडव्यांनो कॉलेजमधे? लायब्रीत बसीत जावा—

एक मुलगा म्हणाला, लायब्री तरी आहे का ही सर ह्या कॉलेजात? एक पुस्तक घेयाचं तर एक तास रांगेत हुबं ऱ्हावं लागतं.

देसाई त्याला बाहेर ढकलत म्हणाला, लई टुरटूर करतू बे उंदरायेवढा तू- चल, जा घरी. चार दिवस आता कॉलेजात काइ हुनार नै-जा आईबापांला भेटून ये. पोळा झाल्यावर ये. हितं काय करतूस घरचे पैशे खर्चून फुकटच्या फुकट.

मग हळूहळू सगळी गर्दी नाहीशी झाली.

तरी प्रेसिडेंटच्या निवडणुकीच्या वेळी संध्याकाळी दोन्ही गटांत मारामारी झालीच.

मग दुसऱ्या दिवशी सगळ्यांना सक्तीनं हजर रहायची नोटीस फिरवून माठूरामनं आपली **विद्यार्थी-प्राध्यापक आपुलकी योजना** मीटिंगमधे एका तासात थोडक्यात पटवून दिली. प्राध्यापक आणि विद्यार्थी हे एकत्र येणं फार आवश्यक आहे, ह्या प्रचलित शिक्षणपद्धतीत ते जवळ येत नाहीत, एकमेकांची मनं समजली गेली पाह्यजेत, आपण मन लावून काम केलं पाह्यजे वगैरे.

मग भल्ला म्हणाला, ही योजना आपण तत्त्वतः मान्य करू. तपशील नंतर चर्चा करून ठरवता येईल.

पीएच्.डी. दहा वर्षांपासून करत असलेले प्राध्यापक पुरोहित म्हणाले, आधी ह्या योजनेचं संपूर्ण स्वरूप स्पष्ट झालं तरच तत्त्वतः मान्य करण्यात अर्थ आहे.

उसने पैशे घेतल्यावर कधीही परत न करणारे व नंतर संपूर्ण विसरून जाणारे प्राध्यापक अत्रे म्हणाले, एकूण एकच आहे. ज्यादा काम करावं लागेल आपल्याला, दुसरं काय?

परिस्थितीशी सतत झगडावं लागल्यानं आपली प्रगती व्हावी तितकी झाली नाही असं म्हणणारे एक कुलकर्णी अत्यंत संतापून म्हणाले, काहीही योजना आणा, आम्ही बसलो आहोत इथे त्या राबवायला!

गुपचूप एकटे चहा पिऊन येणारे जोशी त्या कुलकर्णींना म्हणाले, म्हणजेच त्या योजनांचा बोऱ्या वाजवायला!

त्यानंतर माठूरामनं मीटिंगांवर मीटिंगा बोलावून ही योजना चर्चेला पुढे दरवेळी मांडून सगळ्यांना इतकं हैराण केलं की सगळे वैतागूनच हो हो म्हणायला लागले. मग ह्या योजनेचा पक्का मसुदा तयार झाल्यावर पुन्हा मीटिंगांमागून मीटिंगा घेऊन चर्चा सुरू केल्या. दरवेळी चारचार तास चालणाऱ्या ह्या मीटिंगांनी पुराणिक कॉलेजचे सगळे प्राध्यापक वैतागले. दर वेळी माठूराम म्हणायचा, मी तुमच्यावर काही लादू इच्छीत नाही. तुम्ही रॅशनली विचार करून पद्धती सुचवा. प्रचलित शिक्षणपद्धतीत सुधारणा केली पाहिजे. हे तुम्हाला मान्य आहे की नाही? रॅशनली विचार करा.

त्या वेळी देसाई मागाहून मोठ्यानं म्हणाला, इथे प्राध्यापकांना रॅशनच्या रांगेत उभं रहावं लागतं, कुठे रॅशनल विचार करता राव! प्रचलित शिक्षणपद्धती!

तिकडे माठूराम सांगत होते की प्रत्येक प्राध्यापकाकडे काही विद्यार्थी सोपवून द्यायचे. प्राध्यापक त्यांचा पालक म्हणून राहील. ह्या विद्यार्थ्यांबरोबर प्राध्यापकानं आठवड्यातून दोन दिवस खेळीमेळीनं बसून एकमेकांची मनं समजावून घ्यायला हवी, अशानंच देशभर विद्यार्थ्यांत असलेला असंतोष कमी होईल. प्रचलित शिक्षणपद्धतीत सुधारणा होईल.

हे चालू असतांना चिपळूणकरनं बुटातून पाय बाहेर काढले आणि त्याच्या आसपासचे लोक वाकून वाकून खाली पहायला लागले. माठूरामचं भाषण संपल्यावर आठी जोशी, साही कुलकर्णी, पाचसहा देशपांडे गप्प बसून हूं चूं करत राह्मले. वशिल्याचे मुख्य मुख्य लोक व ग्रेड मिळायची शक्यता असलेले सगळे उघड छान छान म्हणाले. चांगदेव, चिपळूणकर, शेंडे, गोडेबाई, क्षीरसागर, चांगला देशपांडे हे सगळे आळीपाळीनं उठून विरोध करायला लागले. ते म्हणाले, प्रत्यक्षात ही योजना निरुपयोगी ठरेल. साठसाठ मुलं प्रत्येकाला येतील, त्यांची मनं काय समजावून घेणार? त्यांची नावंसुद्धा समजावून घेता आली वर्षअखेर तरी खूप होईल.

बाकीचे ह्यावर मुद्दाम सहेतुक चर्चा करायला लागले. पापय्या देसाई मोठमोठ्यानं हसत विनोदच करत होता. चांगला देशपांडे खिडकीतून बाहेर पहात मोठमोठ्यानं

गायला लागला. **प्रीतम गया विदेस सखीऽऽ कहो कासे कहू मनकी बतियाऽऽ**

त्यानंतर दुसऱ्याच दिवशी चारपाच प्राध्यापक जुंपून, छळ म्हणून चांगदेवला या योजनेचा कार्यवाह नेमून भल्लानं **विद्यार्थी-प्राध्यापक आपुलकी** योजनेचा आराखडा पूर्ण केला. सगळे ऑफिसचे कारकून ह्या गटातल्या सत्तर सत्तर विद्यार्थ्यांच्या याद्या टाईप करता करता वैतागून गेले. कोणत्या प्राध्यापकानं कोणत्या नंबरचा गट घेऊन कुठल्या दिवशी कुठल्या वेळी कुठल्या वर्गात बसावं याचं टाइमटेबल खूप दिवस आधी खपून तयार करण्यात आलं. भल्लानं मात्र आपल्याकडे एकही गट घेतला नाही. त्याला चांगदेव म्हणाला, तुम्हीही घेतलाच पाहिजे एक गट. तर संतापून भल्ला म्हणाला, मैं हररोज कितने स्टूडन्ट्सके साथ हार्ट टु हार्ट टॉक करता हूँ? मुझे इसमें मत डालिये. मुझे सुपरवाइझ करनाभी पडेगाच! मुझे मत डालिये इस झंझटमें.

हे कळल्यावर हिंदुत्ववादी भोपटकर म्हणाले, मग मी नाही का एन्.सी.सी. च्या कामात रोज पन्नास विद्यार्थ्यांना भेटत? आपण सगळेच काही ना काही कारणानं मुलांची मनं समजावून घेतोच. बदमाश आहे साला भल्ला.

तेव्हा शेंडेनं एक मजेदार गोष्ट सांगितली: आपले क्षीरसागर काल तीन तास शिकवून पुरे थकले आणि संध्याकाळी चौथ्या तासाला थर्ड इअरच्या वर्गावर गेले. अर्धाच तास बडबडून कंटाळा आल्यावर ते उगाच मुलांना म्हणाले, तुम्हीसुद्धा काही रिस्पॉन्स दिला पाह्यजे, प्रश्न उपस्थित केले पाह्यजेत, चर्चा केली पाह्यजे. मीच वर्गात का म्हणून एकटं बोलत रहावं?

तर वर्गातलं एक पोरगं ओरडलं, कारण तुम्हाला पगार दिला जातो! क्षीरसागर बिचारा आधीच नर्व्हस माणूस, पार खलास झाला काल!

चिपळूणकर म्हणाला, क्लासिक क्लासिक! पण ह्याच्या बरोबर उलट आपले इतिहासाचे जोशी-म्हणजे-आपले वामनराव! माठूरामचा दर निवडणुकीत प्रचार करणारा जोशी रे-दहा वर्षांपासून सुरुवातीलाच प्रत्येक वर्गात तो जाहीर करून टाकतो की मी शिकवत असतांना फक्त मीच बोलेन! कारण मलाच इथे बोलायसाठी पगार दिला जातो! तुम्हाला नाही! दुसरा कोणी वर्गात काहीही बोलतांना आढळला रे आढळला की त्याला बाहेर हाकलून लावीन!

ह्याला तोडच नाही. जबाबच नाही नंतर वर्षभर! तरीच हा जोशी नेहमी पोरं धरून त्यांना झाडत असतो!

शेंडे म्हणाला, आपले बॉटनीचे वृद्ध देशपांडे तर मुलांना कधीही काहीही बोलत नाहीत. परवा ह्या माठूरामचा दर निवडणुकीत प्रचार करणाऱ्या जोशीनं चार पोरं वर्गात गडबड करत होती म्हणून पकडून आणली आणि शिक्षा करतो म्हणायला लागला. तर बॉटनीचे वृद्ध देशपांडे कळवळून जोशीला म्हणाले, बोलू द्यावं हो पोरांच्या जातीला. वर्गातसुद्धा धंगडे काय करायचे ते करू द्यावं. काहून शिक्षा करून राह्यले? सगळ्या देशभर गोंधळ चाललाय् तेव्हा वर्गातच का नसावा? खेळू द्या पोरांना. आपल्याला माहीत आहे नं की ही चार वर्षं तर बिचाऱ्यांना जरा मोकळी मिळतात आयुष्यात. बी.ए. झाल्यावर मास्तर कारकूनसुद्धा कोणी करून नाही राह्यले यान्ला. देशात वरपर्यंत सगळे बदमास श्रीमंत लोकं मोठमोठ्या जागा अडवून बसून राह्यले वंशपरंपरा

मोतीलाल नेहरूपासनं बिलो बजाजपासनं सगळेच. आपल्याच गरीब लेकरांना वनवास आहे हो पुढे कायम. काहून काच लावता पोरांना? रडकुंडीला आली की हो लेकरं. जारे पोरांनो, खेळा. खेळा.

माठूरामनं व्हाइस-चॅन्सलरच्या हस्ते पंधरा सप्टेंबरला **विद्यार्थी-प्राध्यापक आपुलकी गटांचं** उद्‌घाटन केलं. विद्यापीठात आपलं वजन वाढावं आणि हा व्हाइस-चॅन्सलर गेल्यावर आपली वर्णी लागावी हा सुप्त हेतू आता माठूराम व्यक्त करत होते. दैनिक समाजवादमधे ह्यावर मोठा लेख माठूरामच्या फोटोसकट आला होता.

पहिल्या आठवड्यात कुतूहल म्हणून विद्यार्थी खूप गर्दीनं हजर राह्यले. पण कोणत्याही प्राध्यापकामागे कोणतेही सत्तर विद्यार्थी लावून दिल्यामुळे नावगाव ओळीनं विचारण्यापलीकडे कोणाला काय बोलावं हे कळेना. विद्यार्थीही गप्प बसून राह्यले. काही प्राध्यापकांनी विनोद सांगितले. काहींनी ह्या योजनेची टिंगल सुरु केली. गंगातीरकरनं तर इंग्रजी कसं सुधारावं ह्यावर लेक्चरच सुरु केलं-त्यामुळे त्यानंतरच्या बैठकीला एकही मुलगा हजर नव्हता. शेंडे तर मुलांवर ओरडला, अरे तुमची मनं समजावून घ्यायचीत! बोला बे!

बैठकींना गैरहजर रहाणाऱ्या विद्यार्थ्यांची नावं दररोज ऑफिसात द्यावी अशी माठूरामची शिस्त होती. पुढेपुढे अर्धे जास्त विद्यार्थी रजा रहायला लागल्यानं त्यांची पन्नासपन्नास नांवं लिहून घेण्यातच बैठकीचा पाऊण तास आपोआप जायला लागला. म्हणून काही अनुभवी प्राध्यापकांनी नुस्ते नंबर लिहून ऑफिसात द्यायचं सुरु केलं. पुन्हा बैठकीचा वृत्तान्तही चांगदेवकडे द्यावा लागायचा. हे एक नवं कारकुनी काम सगळ्यांच्या पाठीमागे लागलं. जवाहर वगैरे वस्ताद प्राध्यापक तर मुलांना फक्त हाकलून लावायचे आणि मुलींना उशिरापर्यंत घेऊन गप्पा मारत बसायचे. वर्गांत लाइट फिटिंग कुठेच नसल्यानं अंधार पडायचा. एकदा देसाई जवाहरच्या अंधेऱ्या वर्गात डोकावून म्हणाला, काय जवाहरलाल, मनं चाचपून पहायले काय व्हो? ह्यावर मुलीसुद्धा खी खी खी खी करून हसल्या.

फरुकी, पांडेय, पुरोहित वगैरे हुशार लोकांनी मुलांना संध्याकाळच्याला अभ्यास असतो ह्या सबबीवर चांगदेवला विनंती करून सकाळची वेळ करून घेतली. कारण सकाळी मुलं येणार नाहीत हे त्यांना पक्कं माहित होतं. इंग्रजी वर्तमानपत्र वाचणाऱ्या व स्वतःची बायको इंग्रजीला लावून घेणाऱ्या कुळकर्ण्यांनी तर सर्व मुले गैरहजर होती-असा रिपोर्ट दरवेळी घरबसल्या लिहून ह्या बैठकींचा त्रास वाचवला. चिपळूणकर तर आपल्या गटावर जाऊन विद्यार्थांकडे वैतागून पहात म्हणायचा, कशाला येता बे फुकट? बाकीचे अर्धे जण पहा कसे आले नाहीत! काही अभ्यासबिभ्यास असतो की नाही तुम्हाला? जा ना घरी त्याच्या आयला.

चांगला देशपांडे आपल्या गटात राजकारणावर चर्चा करायचा, त्याचा गट बरा चालला होता. चांगदेव पोरांची घरची माहिती विचारीत रहायचा, त्याच्या गटातही

दहाबारा विद्यार्थी टिकून राहिले.
लायब्रीत कधीही न जाणाऱ्या चमचमत्या केसांच्या कुळकर्ण्यांनं आणि वर्षभर टाय व कोट घालून येणाऱ्या शिंगरूनं तर ठराविक मुलींना आपल्याच गटात सामील करून घ्यावं म्हणून कारकुनांकडल्या याद्यांमधे अशी खाडाखोड केली की त्या पुन्हा कोणालाच वाचता येईनात. शिवाय नको त्या गुंड मुलांना परभारे ह्या गटातून त्या गटात ढकलायचं सत्र बऱ्याच प्राध्यापकांनी सुरू केल्यानं काही मुलांची नावं दोनदोन तीनतीन गटांच्या याद्यांत आली तर काही संपूर्ण सुटले. ह्यामुळे गैरहजेरीचे रिपोर्ट आल्यावर प्रत्येक दिवसाचे दहा पैशे दंड भरावा अशा नोटिसा लागल्या. मग हे विद्यार्थी तक्रारी घेऊन ऑफिसमधे गोंधळ करायला लागले. त्यामुळे सगळे कारकून वैतागले. ह्याच कामात दिवसचे दिवस जायला लागल्यानं कॅशिअरनं त्या महिन्याचा पगार दहा दिवस लांबवला. सगळे वैतागले.
काही मुलांनी चांगदेवकडे अशा तक्रारी केल्या की काही प्राध्यापकच गैरहजर असतात त्यांचं काय? चांगदेवनं ह्या तक्रारी सरळ माठूरामकडे पाठवून दिल्या. शिकायत मेरे थ्रू करते जाव. भल्लाला आता तीन वाजेशी घरी निघून जाणं जमेना. त्यामुळे तो संध्याकाळी चिडून राउंड मारायचा आणि जे प्राध्यापक आले नाहीत त्यांना मेमो द्यायचा. ह्या मेमोच्या ज्यादा कामामुळे टायपिस्टही वैतागून गेला. अर्थात जेव्हा मिसेस भल्ला न येणारांच्या यादीत सापडायची त्या दिवशी भल्ला मेमो द्यायचा नाही. पुढे भल्लालाच याचा वैताग आल्यानं त्यानं माठूरामला पटवून दिलं की आपकी योजना जितनी होना चाहिये उतनी कामयाब नही हो रही है! अपने पाटीलसाब कोई खास एफिशिअन्ट आदमी नहीं मालूम होते!
मग माठूराम पुन्हा स्टाफ मीटिंगा बोलावून इतकी विधायक योजनाही का यशस्वी होऊ नये याच्यावर चारचार तास चर्चा करायला लागले.

लवकरच नव्या श्रेणी लागू होणार अशी सर्क्युलरं कॉलेजला यायला लागली. त्याबरोबर माठूराम-ठोसर यांनी त्या दिशेनं सखोल विचार सुरू केला. सर्व सरकारी सूचनांचा नीट अभ्यास करून जवळजवळ रोजच मुरलीमोहन-ठोसर-ऋग्वेदी-देशपांडे यांच्यासमवेत माठूराम गुप्त मीटिंगा घ्यायला लागले. भल्लालाही नियम, शैक्षणिक पात्रता, अनुभव वगैरे भानगडी कधी समजल्या नसत्या, त्यामुळे संस्थेचे लोक ठरवतील त्यावर सह्या करून विद्यापीठाकडे पसंतीसाठी पाठवून नेहमीप्रमाणे आराम करावा हे त्याचं धोरण होतं.
कोणाला प्रमोशनं द्यायची, सगळ्यात वरची ग्रेड कोणाकोणाला, मधली कोणाला, कोणाला द्यायचीच नाही अशा गोष्टींचा कीस काढणं माठूरामच्या रक्तातच होतं. शिवाय बौद्धिक निकष असेच करायचे की नको असलेले लोक खाली रहातील, नमून न वागणाऱ्याना फटका बसेल, आणि स्टाफसमोर प्रत्येक गोष्टीचं नियमबद्ध स्पष्टीकरण देता येईल वगैरे गोष्टी फार महत्त्वाच्या होऊन बसल्या. विशेषतः नको असलेल्या

प्राध्यापकांना काढून टाकणं शक्य नसल्यामुळे त्यांचा पगार कमी करून ठेवणं आणि त्याला रस्ता धरायची सूचना देणं याला ही नव्या श्रेणीची अंमल-बजावणी म्हणजे उत्तम संधी होती. दर मीटिंगमधे आपल्या सहकाऱ्यांना माठूराम असं वारंवार सांगायचा की एकदा नव्या श्रेणी लागल्या की वीसपंचवीस वर्षं त्यात बदल होत नाही, आणि एकदा वर घुसलेले लोक संस्था सोडत नाहीत, शिवाय एकदम वरची ग्रेड ज्यांनी मिळाली ते पुढे आणखी वाढ नसल्यामुळे उद्धट होतात आणि काही कोणाला जुमानीत नाहीत म्हणून अगदीच सज्जन मूर्ख प्राध्यापकालाच सगळ्यात वरची ग्रेड द्यावी. एकूण सर्व बाबतीत प्रत्येक प्राध्यापकाची कसून तपासणी करूनच वरच्या श्रेणीवर माणसं निवडायचं ठरलं. मुरलीमोहन आणि माठूराम दोघांचं असं बौद्धिक निकष तयार करण्याबद्दल एकमत झालं.

पण ठोसर-ऋग्वेदी-देशपांडे-सहस्रभोजने हे आपसात म्हणाले, मूर्खच आहेत माठूराम आणि मुरलीमोहन. आपण आपल्याआपल्या लोकांची यादी करून त्यांना देऊ. त्यांच्या नियमात आपले सगळे लोक बसले तर बरंच. नाही बसले कोणी तर नियम बदलायला लावू. गोएंकाशेट बहुतेक जवाहरलालसाठी सातशेची ग्रेड मागणार. तेव्हा आपल्या यादीत जवाहरचंही नाव सुचवून ठेवू शेवटचं. आपलेही दोघेतिघे गाळून टाकता येण्यासारखे घालू. म्हणजे मोकळे! आपली खास माणसं वर घालण्यासाठी अडून राहू आणि भांडू असं धोरण त्यांनी स्वीकारलं. त्यामुळे सप्टेंबरपासून सुरू झालेल्या ह्या कमिटीच्या बैठका पुढे मार्चपर्यंत चालल्या. पण सगळ्या नावांवर सगळ्यांचं एकमत होत नव्हतं. भल्लालाही काय चाललं आहे हे पुढे कळेनासं झालं. मग जेव्हा माठूराम अमक्या अमक्याचे काही वाईट रिपोर्ट असले तर आणा असं म्हणायचा तेव्हा भल्ला तत्परतेनं असे रिपोर्ट लगेच तयार करून द्यायचा. ह्या महत्त्वाच्या प्रकरणामुळे भल्ला हल्ली त्याच नादात असायचा आणि कॉलेजकडे संपूर्ण दुर्लक्ष करायचा. बॉडीवरचे दोन्ही पक्ष त्याच्याकडून आपल्या धोरणांना सोईस्कर अशा माहितीची अपेक्षा करायचे आणि भल्ला ही माहिती आनंदाने पुरवायचा.

एकदा माठूराम, ठोसर, ऋग्वेदी आणि संस्थेचे तीन-चार पदाधिकारी स्टाफरूममधे येऊन बसले. विद्यापीठात एक फार मोठं राजकारण शिजतं आहे, आपले महाराष्ट्रात सर्वत्र पूजनीय असलेले प्रोफेसर चुळबुळे यांना साठ वर्षं पूर्ण झाल्याबरोबर विद्यापीठातून काढून टाकण्याचा कट शिजला आहे. त्यांना मुदतवाढ मिळू नये म्हणून ब्राह्मणेतर मंडळी फार प्रयत्न करताहेत. ह्यात सबंध विद्यापीठाचं नुकसान आहे. आपण पुराणिकच्या प्राध्यापकांनी काहीतरी केलं पाहिजे. वगैरे तास-दीडतास सगळे म्हातारे पटवून देत होते. काही आज्ञाधारक प्राध्यापक- अरेरे, असं? किती नीच लोक आहेत, व्हाइस-चॅन्सलरही त्यांचाच-वगैरे वाक्यांश उच्चारत बसले. भोळे, चांगदेव गप्प होते.

त्यातला लहान मेंदू मोठा व मोठा मेंदू लहान दिसणाऱ्या डोक्याचा देशपांडे नावाचा

एक म्हातारा भोळेला म्हणाला, काय भोळेसाहेब, तुमच्यासारखा विद्वान माणूस... साठ वर्षं झाली म्हणून काय त्याची विद्वत्ता संपते का?

भोळे हसून म्हणाला, मला साठ वर्षं झाल्यावर तुम्ही मला इथे ठेवणार की नाही हे आधी सांगा म्हणजे मी तुमच्या प्रश्नाचं उत्तर देईन.

माठूराम भोळेकडे संशयाने पहात म्हणाले, भोळेसाहेब हा तत्त्वाचा प्रश्न आहे. व्यक्तीचा नाही.

मी कुठे म्हणालो व्यक्तीचा आहे? मी ब्राह्मण नाही म्हटल्यावर तुम्ही मला साठीनंतर काढणार आणि चुळबुळे तुमचा माणूस म्हणून त्याच्यासाठी तुम्ही कंबर बांधायला निघाले असा तुमच्यावर कोणी आरोप करू नये म्हणून मी माझ्याबद्दल विचारलं.

तिकडे एक जहागिरदार नावाचा म्हातारा चांगल्या देशपांडेशी भिडला होता. तो म्हणत होता, दैनिक समाजवाद सारख्या झुंजार विरोधी पक्षाच्या वृत्तपत्रावर तुम्ही जातीयतेचा आरोप करता हे तुमच्या पोरबुद्धीचं लक्षण आहे.

चांगला देशपांडे म्हणाला, तुमच्यापेक्षा तर आम्ही सगळे पोरंच असल्यानं तुम्ही म्हणता ते बरोबरच आहे. पण हल्ली दर अंकात विद्यापीठाबद्दल कायम निंदानालस्ती चाललेली आहे. तेव्हाच मला वाटलं काहीतरी ठोसरांच्या मित्राचं प्रकरण लवकरच येणार. ते आलंच! चीन आणि रशियाच्या बातम्या एवढ्याएवढ्या कुठे कोपऱ्यात तर चुळबुळेंना एक्स्टेन्शन मिळावं याच्या बातम्या मोठमोठ्या हेडलायनींमधे! मी तर म्हणतो की साठी आली की प्रत्यक्ष बृहस्पतीनंसुद्धा रिटायर व्हावं. मग हा तर चुळबुळे आहे! निव्वळ तो ब्राह्मण म्हणून तुम्ही हे राजकारण खेळताय. व्हाइस-चॅन्सलर मराठा असला तरी फार लिबरल आहे हे मला अनुभवानं माहीत आहे. सगळे ब्राम्हण प्राध्यापक त्यानं मेरीट म्हणून घेतले आहेत. खरं तर पूर्वी ब्राम्हण व्हाइस चॅन्सलर असतांना घेतलेले चुळबुळ्यासारखे प्राध्यापकच जातीच्या आधारानं घेतले गेलेत.

एक म्हातारा जोशी आश्चर्यानं म्हणाला, सगळीकडे मुंबईपुण्याच्या वर्तमानपत्रांतून बातम्या, पत्रं, लेख येताहेत चुळबुळेसारख्यांना मुदतवाढ द्यावी म्हणून—

चांगला देशपांडे हसून म्हणाला, जोशीबुवा, ह्या बहुतेक वर्तमानपत्रांचे रिपोर्टर दैनिक समाजवाद च्या स्टाफचेच लोक आहेत, ते अशाच बातम्या पाठवणार. आणि वर्तमानपत्रं सगळीच्या सगळी पेशवाईचे अवशेष आहेत अजून महाराष्ट्रातले. ते चुळबुळेच्या बाजूनंच लिहिणार. आमच्यासारख्या चांगल्या ब्राम्हणांना लाज येईल असं करू नका तुम्ही म्हातारे लोक.

भोळे म्हणाला, खरं तर वाचकांच्या पत्रव्यवहारातली ही सगळी पत्रं नवसमाज कॉलनीमधेच लिहून वेगवेगळ्या नावांनी पाठवली जातात! लोकमत आपल्या देशात असं खोटंच तयार केलं जातं. म्हणून मी वृत्तपत्रविरहित लोकशाही असावी ह्या देशात अशा मताचा आहे.

चांगदेव म्हणाला, आणि चुळबुळ्याचं एक तरी पुस्तक तुमच्यापैकी कोणी वाचलं आहे का? वर्तमानपत्र-मासिकं ह्यातली प्रसिद्धी वेगळी, गुणवत्ता वेगळी.

चिपळूणकर माठूरामला सांगत होता, समजा असलेच चुळबुळे थोर विद्वांन तर त्यांनी कायद्याला मान देऊन साठाव्या वर्षी रिटायर का होऊ नये? आणि तुम्ही म्हणता

तसा त्यांच्या पक्क विचारांचा फायदा विद्यापीठाला करून द्यायचा तर त्यांनी निवृत्त होऊन फुकट शिकवावं आनररी! निव्वळ पगारासाठी हे चाललं आहे असंच माझ्यासारखा म्हणेल. इकडे तरुण बुद्धिमान पोरांना नोकऱ्या नाहीत आणि हे म्हाताऱ्यांना एक्स्टेन्शन द्या म्हणणं काही बरोबर नाही.

लहान मेंदू मोठा व मोठा मेंदू लहान असलेला देशपांडे चांगदेवला म्हणाला, आजचा अग्रलेख वाचला का? चुळबुळ्यांचा फोटोही आहे आणि त्यांच्यावर एक कविताही आहे? मोठा माणूस आहे हो—

मी वर्तमानपत्र वाचत नाही.

कमाल आहे! आज विद्यार्थ्यांचा मोर्चा आहे विद्यापीठावर-चुळबुळ्यांना मुदतवाढ मिळाली पाहिजे म्हणून.

आज तीननंतर लेक्चर्स होणार नाहीत असं आमच्या विद्यार्थ्यांना सांगायला लावलं तेव्हाच लक्षात आलं आमच्या, की काहीतरी भानगड असणार! पोरांची नावं आणि फोटो छापली की पोरं खूष. पण विद्यार्थ्यांचा असा वापर करणं बरोबर नाही. ह्यातून क्षुद्र विद्यार्थी पुढारी तयार होतात, गुंडगिरी वाढते आणि सगळ्या पिढीचं नुकसान होईल.

अशी हुज्जत घालून झाल्यावर हे लोक आपल्याला दाद देत नाहीत हे लक्षात आल्यावर माठूराम आणि त्यांचे राजकारणी ब्राम्हण सहकारी संतप्त-निराश होत निघून गेले.

हे मित्रही शोभामधे जाऊन चहा पीत बसले. तिथे जरा वेळानं बिल न देणारा यजुर्वेदी त्यांच्यात येऊन बसला. चांगला देशपांडे चांगदेवच्या कानात म्हणाला, हा ठोसराकडे बातम्या पुरवायला म्हणून येऊन बसलाय आता आपल्यात. बघ आता कसा उठीवतो ह्याला तर—

मग तो बिल न देणाऱ्या यंजुर्वेद्याला म्हणाला, का रे, ते वासंती गोगटेचं प्रकरणही येऊ द्या की म्हणावं आता दैनिक समाजवाद मधे. एम्.ए. झाल्या झाल्या सहा महिन्यांत तिला आपल्या डिपार्टमेंटमधे लावून घेतलं लेक्चरर म्हणून. रांड ठेवल्यासारखी. साठीला आल्यावरही बाई लागते का रे ह्या विद्वान संतकाव्याच्या समीक्षकाला? आँ?

बिल न देणारा यजुर्वेदी गुपचूप चहा पिऊन जायला निघाला. देसाई त्याला म्हणाला, तुझं स्वतःचं बिल देऊनच बाहेर जा. नाहीतर विसरशील.

चांगदेव म्हणाला, ते वासंती आणि चुळबुळे प्रकरण खरं आहे की अफवा राव? तसं थोडंफार म्हाताऱ्यांना मानसिक दृष्ट्या बाईचं सान्निध्य लागतंच. आपले लोक आधीच कामपिपासू असल्यानं जरा बाई न् बुवा कुठे दिसले की स्वतःच्याच कल्पना लढवून अफवा पसरवत असतात.

चांगला देशपांडे म्हणाला, आम्ही त्यातले नाही बाबा. विद्यापीठात हेड होऊन बसलं की सत्तेचा गैरवापर असा होतो हे फार वाईट आहे. हेड म्हटला की पोरंपोरी

घाबरतात-कमी मार्क दिले न् थर्ड क्लास आणून ठेवला तर जन्माचे कष्ट वाया जातात.

पण वासंतीबाई हीस फर्स्ट क्लास मिळवायचा फारच जवळचा मार्ग सापडला-खालचा मार्ग म्हणा की.

हॅ हॅ ही ही हू हू हू-फर्स्ट क्लास मिळवण्याचा खालचा मार्ग! हॅ हॅ हॅ हॅ हॅ हॅ-हो ही होऽहोऽ चहा आण रे पोरा आणखी! हू हू हू हू ऽ

मग चांगला देशपांडे गंभीरपणे गोष्ट सांगू लागला, आता मराठीचे प्राध्यापक मालपाणी-तो मुल्ला फिदाअलीमध्ये लेक्चरर आहे आता-आमचे दोस्त होते ते फार-एम्.ए.च्या वेळी. फार वस्ताद साला मालपाणी. मारवाडीच ते. भयंकर मवाली. ते गोकुळ कॉलनीत चुळबुळ्यांच्या मागेच रहायचं त्यावेळी खोली घेऊन. तर ही वासंती त्या वेळी रोज चुळबुळ्यांच्या घरी यायला लागली. डिफिकल्टीज घेऊन... हॉ हॉ हॉ...डिफिकल्टीज! ही आत तर जायची आणि बाहेरून पाहावं तर चुळबुळ्याच्या दाराला कुलूप! बायको पोरं गावी गेलेली न् समोरून कुलूप न् वासंती मग जाते कुठे? मालपाणीला वाटलं, हाँऽ! मग पाळत ठेवली काही दिवस साल्यानं. चुळबुळ्यांची लायब्रीची खोली-म्हणजे फुकट रिव्हूयसाठी न् टेक्स्टबुकं लावण्यासाठी मोफत आलेल्या पुस्तकांची खोली बंगल्याच्या मागच्या बाजूनं आहे. तर मालपाणीनं एकदोनदा मागच्या दाराला कान लावून आवाजही ऐकले.

चिपळूणकर अचानक म्हणाला, मला अशीच खोली पाह्यजे आहे राव, पण दोन दरवाजांची खोलीच मिळत नाही कुठे-बरं मग काय झालं गोगटेबाईचं—

तर एकदोनदा हे आवाज वगैरे ऐकून मालपाणीनं खास मारवाडी विचार केला की सालं अभ्यास करून फर्स्ट क्लास मिळायची तर काही गॅरेंटी नाही, मग एक खास आयडिया केली त्यानं! दुपारी ही गोगटे मागच्या बाजूनं आत शिरली आणि दाहेक मिनट हळूच दरवाजाला कान देऊन मालपाणीनं दारावर थापा द्यायला सुरुवात केली! मग दरवेळी चुळबुळे आतून म्हणायचे, कोण आहे? तर दरवेळी मालपाणी कायम म्हणायचा, मी आहे! असं चाललं! मग चुळबुळ्यांनी दरवाजा उघडला आणि मालपाणीला पाहून विचित्र काहीतरी बोलत ते दारात घुटमळले. तेवढ्यात मालपाणी थेट आतच घुसला! आणि एक अत्यंत अर्जंट काम आहे असं म्हणत म्हणत एकदमच आतमधे डोकावला! तर आत संपूर्ण नागडी वासंती गोगटे पलंगावर! अगदी नखशिखान्त नागडी!

चिपळूणकर आणि चांगदेव खो खो हसत राह्यले. चिपळूणकरच्या तर नाकातून चहा आला.

चांगला देशपांडे म्हणाला, आणि मजा तर ऐका, मालपाणी आतसुद्धा डोकावतोय् म्हटल्याबरोबर वासंती गोगटेनं धडपडून कपडे घालायच्या ऐवजी पहिल्यांदा काय उचललं तर चष्मा! मग फक्त चष्मा घातलेली नागडी वासंती! डिट्टो नागडी!

चांगदेव आणि चिपळूणकर प्रचंड हसत असतांनाच गंगातीरकर आणि आणखी कुणीतरी नवे दोघेजण त्यांना धुंडत शोभामधे आले. हे दोघेजण विद्यापीठात एम्. ए. करत होते. गंगातीरकरनं त्यांची ओळख करून दिली-हा खरवंडीकर, हा फ्रँकलिन-आपल्या कॉलेजचे विद्यार्थी होते हे गेल्या वर्षी बी.ए. ला इंग्रजीला. हे पाटील सर.

खरवंडीकर चांगदेवला म्हणाला, आमचे प्रोफेसर वेणूगोपालन् तुम्हाला भेटू इच्छितात. दोनतीनदा सांगितलं आम्हाला त्यांनी तुम्हाला घेऊन या म्हणून. तुमचे एकदोन लेख कुठेतरी आलेत छापून म्हणाले.

चांगदेव म्हणाला, खरं? एकदा यायला पाह्यजे मग विद्यापीठात. वेणुगोपालही चांगला विनोदी म्हातारा आहे. इंटरव्ह्यू छान घेतो. माझ्या मागच्या पत्त्यावर गेली असणार ती मासिकं...

चांगला देशपांडे म्हणाला, आजच जाऊ या की विद्यापीठावर तुझे लेख पाहायला- काँग्रेच्युलेशन्स पाटला. चहा मागव तूर्त. मग पार्टी—

गंगातीरकर म्हणाला, आज कुठे बे जाता साल्यांनो विद्यापीठावर. कसला गोंधळ चाललाय् तिकडे! पोरांनी कॉलेज बंद पाडलीत. मोर्चा गेलाय् विद्यापीठावर. आपले जोशी वगैरे प्राध्यापकही गेलेत पोरांना घेऊन मोर्चात. ठोसर साहेबांचा आदेश होता!

चांगला देशपांडे म्हणाला, चुळबुळ्यांना एक्स्टेंशन द्या म्हणून मोर्चा! कोणाला इंटरेस्ट आहे चुळबुळ्यात, माठूराम आणि ठोसर सोडून? पुराणिक कॉलेजचे प्राध्यापक जुंपले की मोर्चा न् संप! निव्वळ भाड्याचे बैल झाले आहेत आपले लोक.

चिपळूणकर म्हणाला, तर चांगदेवराव ह्या खरवंडीकराला विचारा चुळबुळ्याची मजा. आमच्यावर विश्वास नाही ना तुमचा? ह्यानं प्रत्यक्षच पाह्यलीय् चुळबुळे-गोगटे कुस्ती!

खरवंडीकर म्हणाला, तेऽ चाललं होतं काय तुमचं! तरीच म्हटलं हसताय् काय एवढ्यानं! त्याला म्हाताऱ्याला एक्स्टेन्शन द्या म्हणजे-हद्द झाली तुमच्या ठोसराची आणि माठूराम दीक्षिताची.

मालपाणीची गोष्ट सांगत होतो मी. गोगटेबाई नागड्यानं चष्मा लावून बसली त्याची...तर त्या वर्षी दोन फर्स्टक्लास निघाले! एक गोगटे आणि एक मालपणी. मालपाणीनं बेट्यानं रिझल्ट बाहेर आल्यानंतर लेक्चररशिप मिळाल्यानंतर ही गोष्ट आम्हाला सांगितली! कारण गोगटेला विद्यापीठात लावून घ्यायचं चाललं होतं ते मालपाणीला बरं वाटलं नाही. मालपाणी म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि न्याय यांचा प्रेमी आहे! मलाही घ्या म्हणाला.

खरवंडीकर म्हणाला, आम्हीसुद्धा मराठी डिपार्टमेंटच्या प्यूनला आठ आणे देऊन पाह्यला बुवा एकदा सिनेमा तो काय निर्लज्ज!

फ्रँकलिन म्हणाला, माझंच चुकलं ते पहाणं. केला एकदा प्रयत्न, पण उंची कमी पडली माझी.

खरवंडीकर म्हणाला, तिथे पहणारांची गर्दी इतकी व्हायला लागली, प्यूननं धंदाच सुरू केला, आठ आणे घेऊन स्टुलावर एकेकाला उभं करून वरच्या फटीतून हे गुपचूप दाखवायचा! हे लक्षात येऊन चुळबुळ्यांनी रजिस्ट्रारला सांगून बंद करून टाकली ती दाराची फटसुद्धा!

चिपळूणकर प्रचंड हसत म्हणाला, दाराची फटसुद्धा बंद करून टाकली! हू हू हू हूऽ आतली एक बंद करायचाच नेहमी! हॅ हॅ हॅ हो हो हो हूऽ अरे बापरे बाप, हू हू हू, हॉ हॉ. काय साले संतवाम्ङ्याचे गाढ विद्वान! निव्वळ वशिल्यानं घुसलेली पिढी आहे ही.

खरवंडीकरही प्रचंड हसत म्हणाला, लायकी नसलेले लोक वर घातले की काय होतं पहा. हा साला तिला अजून कायम आत घेऊन बसलेला असतो. त्यामुळे कधी तास वेळेवर घेत नाही, नेहमी तास चुकवतो—

चांगला देशपांडे म्हणाला, कामचुकार हा शब्द चुळबुळेपासूनच तर तयार झाला नाही? हु हु हु हू!

हॅ हॅ हॅ ही ही ही.

मग फ्रँकलिन आणि खरवंडीकर चांगदेवशी बोलत बसले. चिपळूणकरला चांगला देशपांडे म्हणाला, पण आपला ग्रूप मोर्चात नाही हे कळणार बरोबर ठोसरला आणि माठूरामला. देसाई दिसत नाही. तो गेला काय मोर्च्यात?

गंगातीरकर म्हणाला, देसाई गेला की. वा! फार गंमती करत करत गेलं ते पोरांबरोबर. त्याला मी म्हटलं, एवढ्याशानं काही तू कन्फर्म होणार नाहीस.

चिपळूणकर म्हणाला, देसायाला गंमत पहायची असते कुठेही. त्याला बाकी काही इंटरेस्ट नसतो. आता पहा आल्यावर कशा गमती सांगतो तो मोर्चाच्या.

चांगला देशपांडे म्हणाला, तुझ्याकडे तो आला की माझ्याकडे घेऊन ये त्याला. तळवलकराकडेच जेवू आज सगळेजण. सिनेमाफिनेमा टाकायचा का एखादा?

चांगदेव म्हणाला, काही चांगला सिनेमा नाही राव कुठे.

चांगला देशपांडे म्हणाला, फार दरिद्री शहर आहे हे. इथे निव्वळ चर्चा आणि जातीय राजकारण. आणि ते रिटायर म्हातारे आणि आपल्या कुळकर्णी-पुर्शा देशपांड्यासारखे डझनवारी प्राध्यापक त्याच्या आयला. ते सत्यजित राय अन् चार्ली चॅप्लिन तर मी अजून एक सिनेमा पाह्यला नाही. अशानं काय आमची दृष्टी वाढेल?

चिपळूणकर म्हणाला, आमच्या पुण्याला तुम्ही कितीही शिव्याफिव्या द्या, पण पुण्यात सिनेमाफिनेमांची चंगळ! चार्ली चॅप्लिनचे एकूणएक सिनेमे पाह्यलेन् मी. त्यामुळेच मला थोडीफार अक्कल आली. सत्यजितचेही सगळे पाह्यले. ह्या दोनतीन वर्षांतच इकडे आल्यापासून वाढ खुंटलीय् माझी.

चांगदेव म्हणाला, सिनेमाचं सोड, पण पुस्तकं तरी कुठे येतात रे इथे?

चिपळूणकर म्हणाला, काफ्कासुद्धा ह्या एम्.ए. च्या पोरांनी अजून वाचलेला नाही म्हणजे मला काहीतरीच वाटतं. तशी ही फारच हुशार पोरं आहेत बरं. पण आपल्या भारतीय पोरांना पुरेशी प्रोटीन्सफिटीन्स मिळत नाहीत आणि मेंदूफिंदूची वाढ खुंटते, तसं बौद्धिक बाबतीत निश्चितच होत असणार. ह्या देशपांड्यानं सुद्धा फक्त कामुफिमू आणि सार्त्रफार्त्र वाचून तेवढीच मॉडर्न लिटरेचरची कल्पना करून घेतली आहे!

चांगदेव म्हणाला, पण आपण वाचलेली आहेत दुसरी चांगली पुस्तकं तरी आपल्यात आणि ह्याच्यात तसा काहीच फरक पडत नाही. एकदाची ती पातळी गाठली की एक पुस्तक काय, पंधरा पुस्तकं काय एकच की. एकदाची ती उंची गाठली की बाकी सगळं इन्फर्मेशनच असतं. बेसिक काही फरक पडत नाही. तसं आपल्या मुंबई-पुण्यात शिकलेल्या पोरांपेक्षाही ऑक्सफोर्डची पोरं सुपेरिअर रहाणारच. जगभर एकच स्टॅण्डर्ड असणं शक्यच नाही. आहे त्या हवामानात आपण वाढत रहावं. कोणी वडापिंपळासारखे वाढणार, कोणी ताडामाडासारखे वाढणार, कोणी खजुरासारखे.

पण वाढ सगळ्यांची होतेच.

फ्रँकलिन म्हणाला, आपण बहुधा बोरीबाभळीसारखेच! पन्नासदा नंबर लावून सुद्धा हवं ते पुस्तक लायब्रीत मिळत नाही. आणि पुस्तक विकत घेणं तर माहीतच नाही आमच्या वर्गातल्या पोरांना!

चांगला देशपांडे म्हणाला, ह्या दोघांना बी.ए.ला भल्ला लिटररी हिस्ट्रीचा पेपर शिकवायचा! म्हणजे यांना काय कळत असेल लिटरेचर ते बघ! आणि लायब्रीतली पुस्तकं जे भल्ला दाबून ठेवायचा ते परीक्षेपर्यंत. पोरांचे हाल आहेत आपल्याकडे.

फ्रँकलिन म्हणाला, च्युत्या आहे भल्ला. प्रिन्सिपल होता म्हणून मुकाट्यानं हजर रहायचो आम्ही. त्यातून आम्हाला काहीही कामं सांगायचं ते. एकदा तर विटा मोजून ट्रक भरायची तिथेच उभं केलं आम्हाला! एकदा मला औषधच घेऊन जा म्हणाला घरी त्याच्या बायकोसाठी!

चिपळूणकर म्हणाला, आणि त्या देसरडा पोरीकडनं काय लोणच्याच्या बरण्या करून घ्यायची रे भल्लाची बायको! ह्या लोकांना हे स्किल असतं बुवा पण! आपली मानलेली बेटी, मानलेली बेटी म्हणत लोणची पापड सगळं फुकटात करून घेतात बेटे. म्हणून ती पोरगी आमच्या वर्गात सुद्धा बसत नाही. कुणाला मानायलाच तयार नाही ती. निव्वळ पोरांना घेऊन उंडारते.

तुम्हाला घरी बोलावून कसं शिकवायचा भल्ला ते सांगा की पाटलांना.

मग ते दोघे हसत सुटले. फ्रँकलिन खरवंडीकरला म्हणायचा, तू बोल आणि खरवंडीकर त्याला म्हणायचा, नाही यार, तूच बोल, ख्यॅ ख्यॅ हि हि हि हि!

मग खरवंडीकर म्हणाला, घरी बोलावूनसुद्धा साल्याचं वाचून झालेलंचं नसायचं. आम्ही धापा टाकत तिघेचौघे जायचो. हा साला बनियन, पट्ट्यांचा मळका पायजमा घालून पुस्तक हातात घेऊनच दार उघडायचा. वाचून झालेलं तिथपर्यंत बंडलं मारायचा. मिल्टन वॉज अ ग्रेट पर्सनॅलिटी असं म्हणून दोन्ही हात असे गोल करून छाती पुढे करून डोळे मोठे करून दाखवायचा आणि पोप वॉज अ प्यूनी क्रीचर म्हणून मान वाकवून डोळे बारीक करून कुबड काढायचा! हे एवढंच मिल्टन आणि पोपवर! असंच कायम.

आणि साला पुस्तकं स्वतः अडकवून ठेवायचा महिने न् महिने. धड आम्हालाही वाचू द्यायचा नाही न् स्वतःही वाचायचा नाही.

गंगातीरकर म्हणाला, जीएएन्डीवर एल्एटीएच् मारली पाह्यजे साल्याच्या.

खरवंडीकर खुषीत येऊन सांगायला लागला, एकदा टॉमस ब्राऊनचा नुसता उल्लेख करून हा म्हणाला हा महत्त्वाचा प्रोज लेखक आहे तर पुढल्या आठवड्यातच घेऊ! मग काय झालं की याला ब्राऊनची कुठेच काही माहिती मिळाली नाही, तेवढी लिग्वाकझामिअनमधील किरकोळ! आणि याला साल्याला एकूणच काही इंग्रजी माहीत नाही. थॉमस ब्राउनी म्हणायचा कायम! तर मग पुढच्या तासाला पुन्हा म्हणाला रविवारी घरीच या. रविवारी आम्ही दोघेजणच हजर झालो. तेव्हा आता ही कटकट आटपूनच टाकावी म्हणून हा पायजम्याची नाडी हातानं चाळवत टॉमस ब्राऊनला सतत ब्राउनी ब्राउनी म्हणत शिकवायला लागला. पण शिकवणार काय काही माहीतच

नाही तर! आम्हाला त्याच्यापेक्षा जास्त माहितो! कायम अॅ अॅ करत बंडल मारत हौ वॉज अ...अ...अॅ...अॅ...ग्रेट रायटर असं म्हणत शेवटी भल्ला चक्क पायजम्यात हात घालून मांड्यामधे झाट खाजवत बंडलं आठवत राह्यला! त्याचं लक्ष नव्हतं तिकडे पण आमच्या डोळ्यांसमोरच ते खाजवणं चाललेलं! वरती अॅ अॅ करून बंडल मारायला हा मुद्दे शोधत खाली पायजम्यात खाजवत!

हू हू हू हू हॉ हॉ हॉ करत सगळे हसत राह्यले. मग ऑमलेटं मागवली. मस्त वेळ जात होता.

चांगला देशपांडे म्हणाला, ह्याला निश्चित इंग्रजीची डिग्री नसावी. परवा सी मी बिफोर आफ्टरनून अशीच मला चिठ्ठी पाठवली! बिफोर आफ्टरनून म्हणजे काय? इंग्रजीचा हेड हा. कमाल झाली. बाराशे रुपये पगार घेतो भडवा फुकट.

खरवंडीकर म्हणाला, मोनोलॉग शिकवतांना हा काय म्हणाला, ए मोनोलॉग इज अ डायलॉग बिटवीन वन पर्सन ओन्ली! हि हि हि हि हि!

चांगदेव म्हणाला, मला वाटलं भल्ला आधी तिकडे पाकिस्तानात ड्रायव्हर असावा. वाटतं ना तसं?....शरीर वगैरे ड्रायव्हरसारखंच आहे, पण त्याच्या तोंडात गिअरमें ले लिया, बॅटरी चार्ज करके आव, अॅक्सिलेटर मत दबाव असं येतं नेहमी.

फ्रँकलिन टाळी देत म्हणाला, खरंच आहे! आम्हालाही हा असंच शिकवायचा. तेरे को याद है क्या खरवंडीकर?....हा म्हणाला एकदा क्रिटिसिझम इज द कार्ब्युरेटर ऑफ लिटरेचर! आपण फार हसली होतो नंतर!

खरवंडीकर म्हणाला, आणि नॉव्हेल शिकवतांना?....फॅक्ट्स आर द पेट्रोल ऑफ फिक्शन रायटिंग! हि हि हि हि हि.

चांगला देशपांडे म्हणाला, असे प्रिन्सिपल चालतात ह्या भटांना. आणि तिकडे मोर्चे लावून देतात साले वर्तमानपत्रात खोट्या बातम्या देऊन देऊन. ही वर्तमानपत्रंच कायद्यानं बंद करायला पाह्यजेत.

गंगातीरकर म्हणाला, आपण काहीही स्टाफरूममधे बोललं की कुळकर्ण्याडून आणि पुशांकडून लगेच संध्याकाळी नवसमाज कॉलनीत ठोसरांकडे चर्चेला असतं. गावातले सगळे ब्राह्मण बरोबर जमलेलेच असतात तिथे कुटाळक्या करायला. विद्यापीठातले, इतर कॉलेजांतले, गावातल्या निरनिराळ्या क्षेत्रांतले सगळे भट कुटाळक्या करत बसलेले साले. एम्‌एडीएआर सीएचओडी आहेत साले.

चांगला देशपांडे म्हणाला, हे साले एकनाथाच्या वेळी पैठणला पारावर बसून सुधारणावादी एकनाथांना ताप द्यायचे तसेच पारावरचे ब्राह्मण आहेत हे. निव्वळ कामं नाहीत साल्यांना कुटळक्यांशिवाय. गावातल्या अर्ध्या कटकटी हेच सुरू करतात. ह्यांच्यामुळेच विद्यापीठाची, आपल्या विभागाचीही सगळीकडे बदनामी झालीय.

भोळे म्हणाला, ह्यांना जोतिबा फुल्यांसारखा धरून वाजवणाराच पाह्यजे. किती सिस्टिमॅटिक जातीय राजकारण खेळतात हे या चुळबुळे प्रकरणावरून दिसेलच. आता व्हाइस-चॅन्सलरचं हे शेवटचं वर्ष म्हटल्यावर पहा किती भानगडी रचतात हे. आता माठूरामला व्हाइस-चॅन्सलर करावं असे डावपेचही सुरू होतील पहा.

त्यानंतर रोज चुळबुळे प्रकरणावर मोर्चे, बहिष्कार असं सुरू झालं. त्यामुळे पुराणिक कॉलेज नेहमीच बंद व्हायला लागलं आणि विद्यार्थी माजले. वर्ग नसल्यामुळे बहुतेकजण शोभामधे मागच्या बाजूला चहा पीत गप्पा मारत बसलेले दिसायचे. इतर कॉलेजांतले वर्गही अधूनमधून ह्या गोंधळामुळे बंद व्हायला लागले. **व्हाइसचँसलर हटवा** असे लेख दैनिक समाजवाद मधे यायला लागले. तिकडे महार संस्थांनीही पुढचा व्हाइस-चॅन्सेलर आमचा पाहिजे अशी पत्रकं सुरू केली. तर मुसलमानांना वाटलं की ह्या मराठा-मराठेतर वादात आपलं घोडं पुढे दामटणं आवश्यक आहे. लवकरच राज्यातल्या निवडणुकाही येणार असल्यानं गावात एकच गोंधळ उडवून माठूराम-ठोसर खूष झाले.

ह्यानिमित्तानं विचारवंतांमध्येही जातीयवादावर घुसळण सुरु झाली. सगळ्या भानगडी करूनही वरतून माठूराम ह्या गावातले एक विचारवंत म्हणूनही पूर्वीपासून नावाजले होते. त्यांनी पूर्वी एक रेनेसान्स क्लबही चालवला होता. आता माठूरामनी पुन्हा ह्या क्लबात परिसंवाद सुरू केले. विविध जातींच्या पुढाऱ्यांना बोलावून चर्चा सुरू केल्या. पुराणिक कॉलेजच्या गच्चीवर ह्या चर्चांची खडाजंगी व्हायची. रिकामटेकड्या लोकांना ही एक पर्वणीच झाली.

त्यात पुन्हा विद्यापीठात एक नवीन भानगड झाली. एका अवचट नावाच्या कम्युनिस्ट प्राध्यापकाला रशियात चार वर्षांकरता जायचं होतं. त्याला रजा वगैरे मिळाली आणि निरोपसमारंभही झाले. सगळी तयारी झाल्यावर अचानक चॅन्सलरकडून गुप्त पत्र आलं की प्राध्यापकाला रशियाला जाऊ देऊ नये. त्याबरोबर कम्युनिस्टांनी चॅन्सलरचा जाहीर निषेध केला. चॅन्सलर अमेरिकन साम्राज्यवाद्यांचा हस्तक आहे, चॅन्सलरची मुलगी हार्वर्डला शिकते वगैरे गोष्टीही पुढे आल्या. हा व्यक्तीस्वातंत्र्याचा आणि लोकशाही मुल्यांचा खून आहे असं कम्युनिस्टांनी पत्रक काढलं. शिवाय प्राध्यापक अवचट यांनी खूप कष्ट घेऊन विद्यापीठातल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संघटना उभी करून त्यांचा महागाई भत्ता पन्नास साठ रुपयांनी वाढवून दिला होता. ते लोकही बेमुदत संपावर गेले. ऑक्टोबर परीक्षा बंद पाडू अशा त्यांनी धमक्या दिल्या. प्राध्यापक अवचट शिकवण्यात फार वैताग असल्यामुळे विद्यार्थ्यांना ते जातात याचा आनंद झाला होता. पण ते जाणार नाहीत म्हटल्यावर वर्गातले क्लेश चालू रहाणार या धास्तीनं त्यांनीही अवचटांना पाठवलंच पाहिजे ह्या काही कम्युनिस्ट विद्यार्थ्यांनी काढलेल्या पत्रकाला भरघोस पाठिंबा दिला. हे प्रकरण व्हाइस-चॅन्सलरला खोड्यात घालायला उत्तम आहे हे लक्षात आल्यावर माठूराम-ठोसर यांनीही त्यात लक्ष घातलं. दैनिक समाजवाद मधे ह्या विषयावर वाचकांची पत्रं लगेच यायला लागली. चॅन्सलरचा हुकूम विद्यापीठ कार्यकारिणीनं मानू नये, अन्यथा राजीनामे द्यावे असा अग्रलेखही आला, गोंधळ वाढत गेला.

मग भोळे वगैरे तटस्थ विचारवंतांनी यातून मार्ग काढावा म्हणून गावातल्या प्रतिष्ठित

पुढाऱ्यांची एक बैठक घेतली. सगळ्या थरांतले लोक जमले, पण प्राध्यापक मेघे मात्र मुद्दाम गैरहजर राहिले. भोळेनं चॅन्सलरला पाठवायचं एक पत्र तयार केलं होतं, त्यात अवचटांना न पाठवण्याच्या निर्णयाचा फेरविचार व्हावा असा मजकूर होता. सगळ्यांनी त्याच्यावर सह्या केल्या. प्राध्यापक मेघेची सही आवश्यक आहे असं चांगदेव वगैरे म्हणाले. कोणी म्हणाले, मेघे भयंकर कम्युनिस्ट-द्वेष्टा आहे, तो सही करणार नाही. भोळे म्हणाला, मेघेची सही मिळवूच.

नंतर भोळे आणि सगळे मित्र मेघेंना शोधत शोधत भाजीबाजारात आले. एकदोन विद्यार्थ्यांबरोबर मेघे तिथेच सापडले. त्यांना घेऊन ते सगळे शोभामधे आले.

भोळेनं ते पत्र त्यांना दाखवलं. तो म्हणाला, कम्युनिस्ट असला तरी त्याला आपण दुजाभाव दाखवू नये. त्यालाही स्वातंत्र्य दिलंच पाहिजे. स्वातंत्र्याच्या वैऱ्यांनाही स्वातंत्र्य भोगू देण्यात लोकशाहीचा मोठेपणा दिसतो. लोकशाही जास्त सशक्त होते. व्यक्तिस्वातंत्र्य वगैरे.

मेघे म्हणाले, व्यक्तिस्वातंत्र्य! आमच्या हजारो बांधवांना अजून अस्पृश्य म्हणून वागवलं जातं, विनाचौकशी पोलिसकोठडीत डांबून मारपीट केली जाते, जिवंत जाळलं जातं, डोळे काढले जातात-तेव्हा कुटं जातं तुमचं व्यक्तिस्वातंत्र्य न् लोकशाही मूल्यं? आँ? आमच्या बायकांची अब्रू घेतली जाते तेव्हा कुटं जाती तुमची समता न् न्याय आँ? तेव्हा तुम्ही का नाही काढत पत्रकं? मी सही करनार नाही. आताच एका ब्राह्मनाला रशियाला पाठवावं मनून तुमी सगळे हट्टाला पेटल्यात! बराबर आहे! तुमाला सगळ्यान्ला लग्न लावायला ब्राह्मन लागतो. वेद लागतात-आमचा ह्या भानगडींशी काही संबंध लागत नाही.

भोळे रागावून म्हणाला, मेघे, मी तुमच्याकडे निव्वळ एक दलित पुढारी म्हणून पहात नाही. आपण सगळ्या जातीतले नीट विचार करणारे लोक हीही एक नवी दलित जात आता तयार होते आहे. आपण सगळ्यांनी जोर लावून आपली जात वाढवली पाहिजे. कारण ह्यामुळेच सगळ्या जातींच्या भिंती पडतील. तुम्ही तुमच्या स्वतःच्या जातीपलीकडे पहायलाच तयार नाही. मला स्वतःला धनगर म्हणून किती अपमान सहन करावे लागले हे तुम्हाला सांगू काय? म्हणून मी फक्त माझ्याच जातीसाठी झगडावं याच्यासारखी आणखी कोणती जातीयता आहे? आपण सगळेच मुक्त होत आहोत. इतरांना मुक्त करत आहोत. दलितांना मुक्त करण आवश्यक आहे असं तुम्हाला वाटत नाही? ही प्रक्रिया आपल्या पिढीतच सुरू झाली आहे. शहरातून ते होतंच आहे थोडंफार. हळूहळू होतं आहे. खेड्यातून काहीतरी जोरात केलं पाहिजे.

मेघे म्हणाले, खेड्यात काही करायची गरजच नाही. त्या नरकात काय सुधारना होनार? खेडी तर आम्हाला नकोच आहेत. आमचा सगळा दलितवर्ग शहरात आल्याबगर आमची शक्ती एकवटनार नाही. इथली एक टिनपाट नोकरी गावातल्या त्या नरकापेक्षा आमच्या लोकांना बरी वाटते. तिथल्या पन्नास एकर जमिनीपेक्षा इथे जोपडपट्टीत बरं.

भोळे म्हणाले, याचा अर्थ पुढे शहरात ब्राम्हण आणि महार यांचं आधिक्य होईल. ब्राह्मण ऐतखाऊ आळशी असल्यानं शेती जमेना त्यांना, ते पळालेच आहेत एकजात

शहरात. आता तुम्ही येताहात. पण तुमच्या हे लक्षात येत नाही की तुमचं इथेही निव्वळ शोषण होईल. तुमचेच गुंड पुढारी तुम्हाला इथे आणून तुमचा वापर करून घेताहेत, तुमच्या झोपडपट्ट्यांतून वेश्याबाजी चालते, उपासमार थांबत नाही. शहरात तुमच्या हाती वरच्या जागा कधी येणार नाहीत, मालमत्ता दुसऱ्याच्या ताब्यातच रहाणार—

चांगदेव म्हणाला, ही तात्पुरती स्थिती आहे हो. पुढे हे झोपड्यांतले दलित शहरात अशांतता निर्माण करतील, स्वाभिमानानं रहायला शिकतील, सत्तेवरच्या लोकांना मतांसाठी झक मारून यांच्यासाठी नवी घरं बांधून द्यावी लागतील. ह्यांनी खेडी सोडावीतच.

मेघे म्हणाले, बरोबर मन्लेत पाटील. परवा आम्ही तिकडे इंटरनॅशनल हाटेलपुढे मोठा गार्डनचा प्लॅन आहे त्या जागेवरच वसीवल्या शंभर झोपड्या. मन्लो -हा हितंच आता कायम. वकील ठेवला खास त्यांच्यासाठी. कुटं गार्डन न् फिर्डन करता भडव्यो, वरच्या लोकांच्या गांडींना हवा लागाया! आता आमच्या लोकांना गलिच्छ वस्त्यात ऱ्हावं लागतं हे बराबर आहे. पन खेडयातल्या जनावरासारक्या ऱ्हानीपेक्षा बरंच की हो तरी.

भोळे म्हणाला, मला तुमच्या लोकांची दुःखं समजतात मेघेसाहेब, तुम्ही नाही केलं तरी हे आपोआप होतच राहील मालक, मला वेगळंच म्हणायचं आहे. आपल्याला हे वरवरचं घरदाराचं काही महत्त्वाचं वाटत नाही. खेडी सोडून शहरात यायचं तर एवढासा फायदा मिळून काय उपयोग? शहरात येऊन सुखी होता आलं पाह्यजे नाहीतर खेडी सोडायची गरजच काय? ब्राम्हणांनी शहरं बळकावली इंग्रजी अमदानीत ते सुखवस्तू होऊन जगायला. निव्वळ शहरी सुखसोयींच्या बळावर ब्राह्मण आज अजिंक्य झाला आहे, ते तुम्ही इथे येणार ते तुमच्या बायकांनी भांडी घासायला का वरच्या वर्गाची? ही सगळ्या प्रकारची विषमता मोडता येणं ह्यामुळे अशक्य आहे.

चांगदेव म्हणाला, आपला शहरी मध्यमवर्ग तसा आकारहीन आहे. दलितवर्ग मध्यमवर्गात सहज घुसून सामावून घेतला जाईल. जातीयता मोडेल—

मेघे म्हणाले, निव्वळ भ्रम आहे पाटील हा तुमचा. डोकी फुटल्याशिवाय जातीयता ह्या देशातली मोडनार नाही. तुमचा नवसमाज कॉलनीतला तो प्राध्यापक कुळकर्नी मला मनला-माझी जागा तुम्हाला द्यायला हरकत नाही हो-मी तसा मार्क्सिस्ट नव्या विचारांचा आहे, पण बायकोचं मत जरा...! ह्यात् तुमच्या आयचे नव्या विचारवाले! आमचे प्रिन्सिपल मंतातच की नेहमी की ब्राह्मन स्वतःची हातपायं आखडवून पुन्हा वेळ आल्यावर डोक्यावर बसत्यात हे मत्स्यावतारापासून प्रसिद्ध आहे. काही प्रलय झाला तरी ब्राम्हनं वेद जिवंत ठेवनारच! त्याच्यामुळे तर हिंदुधर्म जिवंत आहे. बौद्धकाळात पुरा गाडला गेलेला हा हिंदूधर्म पुन्हा वर आला कसा सांगा! पुरानात अस्तं ना की अमुक राजा फार माजला, धर्म नष्ट होत चालला, मग विस्नूनं काहीतरी लुगडं नेसून त्याला मारलं वगैरे तर ते निव्वळ हेच. आता भौजनसमाजाचं राज्य येनार तर पहा ब्राह्मन कसे विरोधी पक्सात आपोआप घुसले. कसे खाजगी धंदे, डॉक्टरक्या-इंजिनीरक्या करत बाजूला झाले? आता दोनेकशे वर्षं हे असेच ऱ्हात्याल न् मग कोनीतरी विस्नू शंकराचार्यासारखा चाऱ्ही कोपऱ्यांत मठं स्थापून वेद उचलनार वरती. मग पुन्हा सामाजिक क्सेत्रं हे काबीज करनार. वेळ आली तर परशुराम, कधी

वामनराव होऊन हानामारी करायला कचरत नाही ब्राह्मन. असे हे ब्राह्मन अन् मराठे आमच्या दलित महारांना आपल्यात सामावून नवा समज करतील, ह्यासारखं विनोदी स्वप्न दुसरं नाही.

भोळे म्हणाला, एक वेळ मराठे सुधारले तरच हे शक्य होईल. मराठा जमात निदान बहुविध उपजातींची आहे. इतर जातींप्रमाणे बंदिस्त नाही. खुली आहे. विस्तृत आहे. तो एक श्रमिकांचा, शेतकरी कामकऱ्यांचा वर्गच आहे म्हटलं तरी चालेल. कोणालाही मराठा म्हणवून घेता येतं पण कितीही विद्वान महार झाला त्याला ब्राह्मण म्हणवून घेणं अशक्य आहे. मराठे सुधारले की जाती गेल्याच समजा. ब्राह्मण आणि महार सुधारून काही विशेष फरक पडणार नाही.

एक विद्यार्थी म्हणाला, ब्राम्हणच काय पण सबंध हिंदूधर्मच बंदिस्त आहे. मोठमोठे लोकसमूह हिंदू होऊ शकले पण एकटादुकटा परका माणूस हिंदू होऊच शकत नव्हता पूर्वीसुद्धा. आता तर हिंदूधर्म संपूर्ण मेला आहे. कोणालाच हिंदू होता येत नाही. उलट शीख आणि जैन आणि लिंगायत हे स्वतःला हिंदू म्हणायला तयार नाहीत. जे दुरावले त्यांनाही परत आत घेता आलं नाही असा हिंदुधर्म आहे. निव्वळ प्रेत म्हणून त्याची व्यवस्था पहावी लागते आहे. हिंदुधर्म गाडून टाकल्याशिवाय ह्या देशात नवा समाज निर्माण होणार नाही.

भोळे म्हणाला, तुम्ही ब्राम्हनिझम बोलताय. हिंदूधर्म ब्राम्हनिझमच्या आधीही होता आणि ब्राह्मणांनी हिंदुधर्म बळकावला तरी तो वेगळाच आहे.

तो विद्यार्थी म्हणाला, ब्राह्मण्याशिवाय हिंदुधर्म असूच शकत नाही—

भोळे म्हणाला, तामिळनाडूतला द्रवीड मुन्नत्र कळहगम किंवा आपल्याकडचा सत्यशोधक समाज हे ब्राह्मण वगळून हिंदुधर्मी समाज आहेतच. ते बरे आहेत तसे. शाहू महाराज महाराष्ट्रभर विशेष काही का करू शकले नाही हेही पाह्यलं पाह्यजे. प्रार्थनासमाज, आर्यसमाज, ब्राह्मोसमाज हे अयशस्वी का ठरले हेही पाह्यलं पाह्यजे. मला वाटतं पारतंत्र्यात काही महत्त्वाची चळवळ होणं अशक्य होतं. विशेषतः जगभर जो महत्त्वाचा काळ समजला जातो त्या काळात आपण नेमके गुलाम झालो.

मेघे म्हणाले, असं मुसलमानांवर, इंग्रजांवर खापर फोडून ह्या बदमाशीचं समर्थन करू नका. मुसलमान आणि इंग्रज यायच्या आधीसुद्धा आपल्याकडे काही समतेचं तत्त्व कुठेच आढळत नाही. ब्राम्हन जिथे जिथे आहे तिथे समता असणं शक्यच नव्हतं. फार तर समतेच्या गप्पा असायच्या. गीता काय, पुरानं, मनुस्मृती, ज्ञानेश्वरी, भागवत- सगळा एकच उकिरडा होता चातुर्वन्याचा. ब्राम्हन भंग्याचं काम करेपर्यंत ही आमची आग कमी होनार नाही.

भोळे म्हणाला, कामाकडे पहायची आपली सगळ्यांची कल्पनाच अजून बदलत नाही. ब्राम्हणांचे भंगी करण्यापेक्षा कुठलंच काम वाईट नाही अशी दृष्टी बदलेपर्यंत आपल्या सगळ्या समतेच्या कल्पना गप्पाच रहाणार. श्रमाला महत्त्व येईल असे मार्ग शोधले पाह्यजेत. उदाहरणार्थ, आता शेतीला चांगलं महत्त्व मिळालं आहे.

चांगदेव म्हणाला, सगळ्या दलित वर्गानं पांढरपेशी होऊन जावं म्हणजे स्वस्तात ही कामंच होऊ नयेत. तुमच्यातल्या सुशिक्षित लोकांनी खेड्यातली ही प्रजा ओढून घ्यावी

शहरात आणि ह्या कामांचं महत्त्व वाढवावं.

शेंडे म्हणाला, ते काही सांगू नका राव. महारांची पोरं सुरुवातीला नवबौद्ध म्हणून अभिमानानं आपण हिंदू नाही म्हणून सांगतात, नंतर सरकारी मदत मिळवायच्या वेळी कंसात महार लिहितात. नंतर शिकलेली पोरं साहेब झाली की आर्थिक फायदे संपले म्हणून पुन्हा जातीचं हित विसरायला लागतात.

मेघे म्हणाले, शेंडे मनतो तसं थोडंफार घडतं खरं पुन्यामुंबईत. आमच्यातलं बाबासाहेबांच्या वेळी होतं ते स्पिरिट कमी होत चाललं आहे.

भोळे म्हणाला, याच्यात काय वाईट आहे मला कळत नाही. म्हणजे तुम्हाला तुमची जात फक्त टिकवायची आहे आणि तरी जातीयता मोडायची आहे!

शेंडे म्हणाला, खरं तर असा कायदाच केला पाह्यजे की प्रत्येक तरुणानं दुसऱ्या जातीच्या पोरीशीच लग्न केलं पाह्यजे. विशेषतः सवर्णानं महार, चांभार, मांग पोरीशीच लग्न केलं पाह्यजे.

एक दलित विद्यार्थी म्हणाला, म्हणजे महारामांगांच्या पोरांनी ब्राम्हण पोरीशीच लग्न करावं असंसुद्धा का?

भोळे म्हणाला, तसंच. पण ह्यामुळे तुम्हा महारामांगांनाच वैताग होईल मालक. विशेषतः तुमच्या तसल्या घट्ट पोरींना शेंड्यासारखे पुचाट नवरे म्हणजे वैताग होईल की हो. हू हू हू ऽऽ

ह्यावर मेघेसकट सगळे दिलखुलास हसले.

कुणीतरी म्हणालं की मेघेंच्या कॉलेजात महार विद्यार्थ्यांचा निव्वळ राजकारणासाठी त्यांचे पुढारी उपयोग करून घेतात.

मेघे म्हणाले, त्याच्या तर मीसुद्धा विरोधात आहे. आमची पोरं झोपड्यांतनं आलेली, त्यांना टेक्स्टबुकं घ्यायला पैसं नसतात, त्यांना अभ्यासाची सवय नसते तुमच्या पोरांसारखी. सरकारनं निव्वळ दक्सिना वाटल्यासारखं पैसं पुरवायचं तेवढं बघावं अन् बाकी ह्या पुढाऱ्यांनी ह्या संस्थांचं मातेरं करावं असं झालं आहे. पोरांना कामंच नाहिती काही तर मोर्चे न् आंदोलनं ह्याशिवाय दुसरं काय करनार? अन् गांधीपासून ही विद्यार्थी वापरून घ्यायची परंपरा आहे आपल्या देशात.

शेंडे म्हणाला, गांधींसारख्या अफाट लोकप्रियता असलेल्या नेत्याला अस्पृश्यता मिटवता आली नाही, ती डॉक्टर आंबेडकरांसारख्या मूठभर समाजाच्या नेत्याला कशी मिटवता आली असती?

एक दलित विद्यार्थी म्हणाला, अस्पृश्यता मिटवणं ही तुमच्या सवर्णांची समस्या आहे. आमचा आम्ही मार्ग शोधला आहे.

भोळे म्हणाला, पण मुसलमानांपेक्षा अस्पृश्य समाज केव्हाही लवकर वर येईल. महारमांग काही झालं तरी सेक्युलर, मॉडर्न, उत्साही आहेत. डायनॅमिक आहेत. मोकळ्या समाजात सहज मिसळतील असे आहेत. थोडंफार यश मिळालं की त्यांचे दोष कमी होतील. ह्या एका पिढीतच पहाल तुम्ही. बऱ्याचशा अस्पृश्य जातींमधे स्वतंत्र विचार करणारा वर्ग तयार होऊन जाईल. मुसलमानांचं मात्र काही खरं नाही. तसा फार नेकीचा आणि कष्टाळू समाज आहे आपल्या मुसलमानांचा पण धर्माच्या अफूतून साले

कधी बाहेर पडायलाच तयार नाहीत.

चांगला देशपांडे म्हणाला, आपल्या मुसलमान मित्रांची घरंसुद्धा आपल्याला माहीत नाहीत. आपल्या घरी ते बेलाशक येतात, पण त्यांच्या घरी कधी नेल्याचं कुणाला माहीत आहे?

भोळे म्हणाला, गेल्या वर्षी आमच्या माठूरामनं एक **हिंदू-मुस्लिम ऐक्यवर्धक सोसायटी** स्थापन केली होती म्युनिसिपालिटीचं राजकारण म्हणून. आमच्या प्राध्यापक मुसाला सेक्रेटरी केलं आणि आपण स्वतः अध्यक्ष! दर शनिवारी हिंदूमुसलमान ऐक्यावर घरगुती चर्चा एकेकाच्या घरीच पाळीपाळीनं सुरू करायचा आदेश आम्हा काही लोकांना माठूरामनं दिला. ह्यात पुन्हा पुराणिकचे नेहमीचे यशस्वी कलाकार जोशी-देशपांडे वगैरे. तर बरेच मुसलमान लेखक-कवी ह्यांच्या घरी रेग्युलर यायचे पण त्यांच्या घरी मात्र कधीच बैठक भरवायचे नाहीत! त्यामुळे आमची देशपांडे-जोशी मंडळी वैतागली. आणि एकदा आपल्या तिकडंबाजनं सांगितलं की पुढची बैठक याकूबखानाकडे घेऊ तर लगेच **हिंदू-मुस्लिम ऐक्यवर्धक सोसायटी** कायमची बंद! आता फक्त भाषणं वगैरे चालतात ह्या सोसायटीची.

मेघे म्हणाले, मुसलमानांचं एकून कठीनच आहे. त्यांच्या मुल्ला फिदाअल्ली कॉलेजनं पडदा क्लासेस सुरू केले आहेत! गोशात बी.ए. चे क्लास मनजे विनोदच आहे की नाही? ह्या वर्षी ह्या फिदाअल्लीवाल्यांनी वेगळीच भानगड सुरू केली आहे. त्यांच्या पडदा क्लासेसमधल्या विद्यार्थिनींना यंदा परीक्साही पडद्यातच देण्याची व्यवस्था करा म्हणताहेत साले. बरं ह्या सगळ्या चाळिसेक मुसलमान पोरींचे नंबरही आमच्याच कॉलेजच्या सेंटरवर आलेयती त्याच्या आयला! ते फिदाअल्लीवाल्यांचं पत्र विद्यापीठानं आमच्या प्रिन्सिपलकडे पाठवून दिलं. विद्यापीठाला कसलीच रिस्क घेयाची नाहीय. आमचा प्रिन्सिपल घाबरला, म्हणाला ह्या पोरींची पडद्यात परीक्सा घ्या म्हणजे का प्रत्येक बाकाभोवती पडदे टांगायचे की वर्गाभौती? मी मनलं कळवा त्यांना की असल्या जुनाट वृत्तीचे लाड आम्ही आमच्या कॉलेजात पुरवनार नाही. आमच्याकडे बाकीच्या मुलींसारखेच नंबर येतील तिथे पेपर लिहावे लागतील. नाहीतर दुसरीकडे न्या तुमच्या मुली.

शेंडे म्हणाला, स्वतःच्या पोरींना साले पडद्यात ठेवणार आणि यांची गुंड पोरं आमच्या पुराणिक कॉलेजात पोरींवर लाइन टाकायला दिवसभर हिंडत असतात.

चांगला देशपांडे म्हणाला, पुन्हा दर होळीच्या वेळी आणि गणेशोत्सवात मारामाऱ्या. मशिदीत गुप्त मीटिंगा, कठीण आहे साली मुसलमान जात. काय काय लोक जमा झालेयत ह्या देशात च्यायला. दुसऱ्या कुठल्याही देशात इतका गुंता नसेल च्यायला.

मेघे म्हणाले, मसुलमानच काय, सगळेच तसे आहेत राव. उदारमतवादी समाजच नाह्यती आपल्या देशात. विचारात फरकच होत नाही कुनाच्या. लिहिनारेही जुनाट काहीतरी लिहीत असतात. व्हॉल्तेर आणि शॉसारखा कुनी एक लेखक झाला नाही सबंध देशात.

भोळे म्हणाला, किती लिहिणारे लिहून गेले मालक, पण काही झालं नाही तीन हजार वर्षांत. बौद्धधर्मसुद्धा नाहीसा झाला इथे. चांगलं लिहूनही काही परिणाम होईल

असं वाटत नाही. वाचणारे लोळत लोळत वाचून पुस्तक फेकून देतात. परिणाम तात्पुरता झाला तरी निगरगट्ट होतात. आता दुसरेच मार्ग काढले पाह्यजेत.

चांगदेव म्हणाला, पण याचा अर्थ आपल्या देशांत कायम समाजसुधारक जन्मत रहाणार आणि आपण कायम असेच राहून त्यांच्या जयंत्या साजऱ्या करत रहाणार! ज्या देशात जास्त संत आणि समाजसुधारक तो देश मूर्ख लोकांचा असं म्हणायला हरकत नाही.

शेंडे म्हणाला, आपल्याकडे होतात समाजसुधारक चिकार, पण त्या त्या जातीपुरतेच सुधारक होतात. सगळ्या जनतेचे समाजसुधारक नाहीतच. रानडे-टिळक ब्राम्हणांचे, आंबेडकर महारांचे, फुले-शिंदे यांना ब्राम्हण मानत नाहीत. गांधींना महार मनात नाहीत...

भोळे म्हणाला, ब्राम्हणांचं सालं कठीणच आहे. कुठलीही किरकोळ माणसं पुढारी होऊन गेली ब्राम्हणांची, पूर्वी जसं किरकोळ पद्य लिहिलं की संत व्हायचे तसं आता वर्तमानपत्रात ब्राम्हणांची भाषणं आली की झाले पुढारी आणि पुन्हा वर्तमानपत्रंही ब्राम्हणांचीच.

मेघे म्हणाले, आमच्या दलितांमधे चांगले लेखक झाले तरी त्यांना ब्राम्हनांच्या मानानं काहीच किंमत मिळत नाही. आमच्यातल्या पहिल्या दर्जाच्या बागूल-सारंग सारख्यांचं कोनी नावबी घेत नाही, पन यांच्या भटातल्या क्सुल्लक लेखकांचं कोन कौतुक वर्तमानपत्रापासून रेडिओपर्यंत सर्वत्र! एकूनच भौजन-समाजातल्या लेखकाची अक्सम्य उपेक्सा होते ती का?

चांगदेव म्हणाला, याचा अर्थ बागूल काही कमी महत्त्वाचा लेखक आहे असा होत नाही. याचा अर्थ एवढाच होतो की आपल्या समाजात ठराविक भावनांचीच कदर होते, बाकीच्यांची होत नाही. मध्यमवर्गी पांढरपेशा ब्राम्हणांच्या भावना गाजणारच. त्यात कोणी मुद्दाम काही भेदभाव करतं असंही आपण म्हणू नये. एका ठराविक गोड्या पाण्यात ठराविक प्रकारचे मासे नीट जोपासले जातात. दुसरे खाऱ्या पाण्यातले मासे त्याच पाण्यात नीट वाढू शकणार नाहीत.

भोळे म्हणाला, एवढंच काय पण काही खारे मासेसुद्धा अशा ब्राम्हणी गोड्या पाण्यात आपलं कौतुक व्हावं म्हणून शिरू पाहतात आणि खलास होतात.

मेघे म्हणाले, मनजे पाटील म्हंतात त्याप्रमानं आमच्या भावनांना वेगळं वातावरन मिळेपर्यंत आमची कुचंबनाच होत रहानार. ह्या दोनतीन टक्के ब्राम्हनांची अभिरुची आमच्यावर हुकमत गाजवनार!

चांगदेव म्हणाला, अर्थात. ब्राम्हणांना ऊठसूठ कशालाही जबाबदार धरणं बरोबर नाही. तुमचे स्वतःचे प्रकाशक होऊ द्या. तुमचे वाचक तयार करा, तुमचे टीकाकार काढा, तुमच्या साहित्य परिषदा उघडा, स्वतः तुम्हीच मराठी वाम्ङ्याचे इतिहास लिहायचे कष्ट घ्या, मुख्य म्हणजे तुमची स्वतःची वर्तमानपत्रं, साप्ताहिकं न् मासिकं काढा-की तुमच्यातही मोठमोठे साहित्यिक पंधरा दिवसांत होतील!

भोळे म्हणाला, सोपं आहे का इतकं सगळं करणं मालक! कारकुनांनाच जमेल हे सगळं. मराठ्यांनाही अजून वर्तमानपत्रं काढता येईनात ते ह्या गरीब महारांना काय

जमणार?

मेघे म्हणाले, आमची त्याच दृष्टीनं तयारी चालली आहे. लेखक, वाचक तयार होताहेत. मासिकंही निघताहेत. संमेलनं सुरु झाली आहेत. आमची स्वतंत्र युनिव्हर्सिटीसुद्धा त्यासाठीच आम्ही आंदोलन करून मिळवनार! मराठ्यांचं सोडून द्या हो, त्यांना डोकंच नाही, त्यांना ब्राम्हनांशिवाय काही जमत नाही. त्यांनाही चातुर्ववर्न्य मान्यच आहे. खरं तर मराठीत अशी वेळ यायला पाह्यजे की पुढे कोनीतरी म्हनेल की ब्राह्मनांचंबी साहित्य अभ्यासाला थोडंफार लावा हो.

चांगदेव म्हणाला, मेघेसाहेब अशी ज्या त्या जातीची डबकी बांधण्यापेक्षा सगळ्या मराठी समाजानं एक मोठा समुद्रच का उभारू नये, ज्यात सगळ्यांना आपापलं स्वातंत्र्य उपभोगता येईल? ब्राम्हणी साहित्याचे निकष धुडकावून दलित साहित्याचे निकष पुढे आणण्यात मला काहीच कर्तबगारी वाटत नाही. शेवटी ज्ञानेश्वरी न् दासबोध कुठल्याही मराठी माणसाला टाळता येणार नाही.

मेघे म्हणाले, हेच तुमचं सर्वांचं ब्राम्हनधार्जिन्य! मंजे ज्ञानेश्वरी तले चातुर्ववर्न्यावरचे उतारे मान्य करून पुन्हा समतेवर विश्वास ठेवता येईल असं म्हंताव का पाटील? ज्ञानेश्वरी वगैरे मंजे गायडं आहेत वैदिक ब्राम्हण धर्माची! ज्ञानेश्वर न् रामदास मंजे हिंदूंचे सत्यगिरीच आहेती साले. जुनीच वैदिक टेक्स्टबुकं निर्बुद्ध हिंदू विद्यार्थीवर्गाला समजावी म्हून सोप्या सुंदर भाषेत लिहून लोकप्रिय झालेले ब्राम्हन संत!

चांगदेव म्हणाला, अशा शिव्या द्या, विरोध करा, तरी परंपरा तीच रहाणार. ब्राम्हण टाळता येणार नाही!

शेंडे म्हणाला, मेघे, आत्ताचे ब्राम्हण क्षुद्र निपजले हे आम्हीही कबूल करतो. पण पूर्वी चांगले होते. पूर्वी देशस्थांमधे किती मोठमोठे संत झाले? नंतर चित्पावनांमधे किती मोठमोठे समाजसुधारक झाले?

मेघे म्हणाले, त्यात काय विशेष झालं? थोडीफार राजकीय-सामाजिक चढती मिळाली की आसे संत न् सुधारक पोत्यानी निघतात. आता तुम्हीच मनले की पूर्वी देशस्थ संत होयाचे, तेव्हा चित्पावन संत का नाही झाले? आनि आता का देशस्थांमधे समाजसुधारक झाले नाहीत? हॅ हॅ हॅऽ चित्पावनांमधेसुद्धा साने गुरुजी न् विनोबा आता होतात मंजे कमालच झाली.

भोळे म्हणाला. आधी सुखवादी-भोगवादी समाज तयार होतो, मग त्यातून ध्येयवादी त्यागी माणसं निर्माण होतात.

मेघे म्हणाले, अहो, झोपडीत रहानारे खायाचे वांधे असनारे आमचे लोक कुठून त्यागी संत होनार? पन मी मनतो पुढे की ह्या तुमच्या संतांनी तुकाराम-एकनाथासकट असं काय विशेष केलं? चंद्रभागेच्या वाळवंटापुरती अस्पृश्यता थोडी कमी, बाकी बाहेर हा जातिभेद मोडायची हिंमत कोनाच्या बापात होती? जातिभेद हे कायमचं नष्टचर्य आपल्या समाजात आहे.

चांगदेव म्हणाला, संस्कृती म्हटली की ह्या सगळ्या भानगडी आल्याच. म्हणून बुद्धानं समाजाच्या बाहेरचा संन्यासाचाच तोडगा काढला असावा. ही संस्कृतीच पुसून नव्यानं दुसरं काही सुरु करणं आता शक्य नाही. आणि संस्कृती म्हटली की तफावत

करणं, भेदाभेद करणं हे आपण होऊन येतं. डाव्या हाताचा न् उजव्या हाताचा फरक करणं इथपासून मुलं हे शिकत रहातात बाबा!

मेघे म्हणाले, पुरातन काळापासून उच्चनीचतेचा स्पर्श नसलेल्या टोळीत एक जरी ब्राम्हन सोडला की तो एका वर्षात त्या टोळीत पावित्र्याच्या आनि जन्मजात श्रेष्ठत्वाच्या मोहक कल्पना घुसवून चातुर्वर्न्यावर आधारित समाज तिथेसुद्धा निर्मान करील! कारन ही जातींची कल्पनाच इतकी अमोघ आहे की ज्याला पहिल्यांदा ती सुचली तो मोप बुद्धिमत्तेचा मानूस असावा. सगळा समाजस्थैर्याचा प्रश्नच त्यानं फटक्यासरशी बसल्या बसल्या सोडवून टाकला. मग शतकानुशतकं हिंदू लोक ह्याचं समाजशास्त्र लोकांना लावत राह्यले. आता अर्थकारन आनि हिंसात्मक मार्ग वापरल्याशिवाय हे प्रश्न सुटनार नाहीत.

शेंडे म्हणाला, हे पटलं आपल्याला. पोट भरायचे सोपे धंदे म्हणून तीर्थं, व्रतवैकल्य, पूजाअर्चा, पावित्र्य सगळं गवतासारखं देशभर पसरवलं. ह्यामागची बुद्धिमत्ता, हातोटी असामान्य आहे. स्वतःच्या फायद्याकरता का होईना पण ही व्यवस्था इतकी टिकली म्हणजे हिच्यात काही चिरंतन गुण असतीलच. त्यामुळेच ही टिकते आहे.

भोळे म्हणाला, आणि काहींना हिचा फायदा आहे तोपर्यंत ही टिकेलच. रांडेसारखी आहे जातिव्यवस्था, ती नष्ट करायला काही उपाय सापडत नाही. आपल्यासारख्या ब्राम्हण-मराठा-महार लोकांना वाटतं तरी की ही मोडावी. पण मारवाड्यांना न् पारश्यांना ती टिकवावीशीच वाटणार. निव्वळ जातीवर हे भांडवलदार फोफावताहेत, सगळ्यांचं रक्त पिताहेत.

चांगदेव म्हणाला, जात जर मोडणारच नसेल तर ती स्वीकारून दुसऱ्या मार्गांनी तिच्यातले दोष काढता येतील. सगळ्या जातींना एका पातळीवर आणून हे करता येईल. वरच्या जातींना खाली ओढून खालच्या जातींना वर नेऊन सोडून द्यावं म्हणजे कॅलिडोस्कोपसारखा समाजही काही वाईट दिसणार नाही. अनेक जातींना अलीकडे आपला दर्जा वाढवून हे सुरूच केलं आहे. चिरंतन चांगल्या गोष्टी हळूहळूच होतात हे माझं ठाम मत आहे.

मेघे म्हणाले, वरतून असं सगळं नीट आखून मंग रट्टे देत देतच हे सगळं घुसळून टाकनं शक्य आहे. तुमच्यासारख्यांना हे हळूहळूचं परवडेल हो, आमी किती दिवस ह्या हळूहळूची वाट पहावी? हळूहळूनं काही हुनार नाही. ज्या अनिर्बंध बेताल स्वातंत्र्यामुळे ही जातीयता फोफावती आहे ते स्वातंत्र्य खच्ची करताना लोकशाही थोडी वाकवली तर काय असं आभाळ कोसळनार मला समजत नाही!

भोळे पुन्हा मघाचं पत्रक मेघेमुळे करून म्हणाला, बाबारे, लोकशाहीचं नुस्तं देऊळ न् स्वातंत्र्याचा दगडी देव आम्हालाही नको आहे. स्पिरिट महत्त्वाचं आहे, फॉर्म नाही. आपलं ध्येय एकच आहे. कर सही.

मेघेंनी हसत हसत म्हटलं, करत नाही. मायला तिकडे आमचे लोक मारतील बाबांनो मला. समजवावं लागेल त्यांना. तुमचं ठीक आहे. उचलला पेन केली सही. आम्हा पुढाऱ्यांना स्वतःचं मत तरी असतं का? पुन्हा असलं लफडं आनू नका बाबा माझ्याकडं त्याच्या आयला..

ही अपेशी चर्चा झाल्यावर उशीर झाला म्हणून चांगला देशपांडे सगळ्या मित्रांना तळवलकरमामाकडे जेवायला चला म्हणून आग्रहांन घेऊन गेला. भोळे म्हणाला, तिथे इतके सगळे कारे लोग एकत्र जमून ओळींनं गुरांसारखे जेवताहेत हे दृश्यच मला किळसवाणं वाटतं. एकानं स्वैंपाक करावा आणि पन्नास लोकांनी पैसे देऊन असं जेवावं हे फार घाणेरडं कल्चर आहे.

तळवलकराची खाणावळ गावात मध्यमागी असूनही तिथे ठराविकच कारे लोक जेवायचे. भिंतीवर शिस्तीत सगळीकडे कागदावर शाईनं लिहिलेल्या पाट्या : दार हाळू लावा. ह्या बाजूचे बसून घ्या. जेवायचा रूम. उदरभरण नोहे जाणीजे यज्ञकर्म.

शिवाय भिंतीवर शिवाजी महाराज, सावरकर, हेडगेवार, सुभाषचंद्र आणि कॅप्टन लक्ष्मीचा एकत्र असे मोठमोठे फोटो पाहून भोळे चांगदेवला म्हणाले, तळवलकर संघवाले आहेत!

ते हात धुवायला आतल्या चौकात गेले तेवढ्यात वरतून काही पाणी त्या दोघातिघांच्या अंगावर पडलं. शेंडे वर पहात ओरडला, काय हे? कोण आहे?

चांगला देशपांडे म्हणाला, वरती बिऱ्हाडं आहेत. पाणी असेल.

भोळे म्हणाला, पाणीच असलं तर चांगलं, नाहीतर असायची गंगा.

मग मालक तळवलकर नेहमीप्रमाणे घाम निथळवत बाहेर आले. त्यांनी

नेहमीप्रमाणे फक्त लंगोट घातलेला आणि वर भलं लांब बाह्यांचं बनियन. बरेच पाहुणे, पाहून तळवलकर खूष होऊन जानवं ताणत कोण कुठले वगैरे चर्चा करत उभे राह्यले. तळवलकर असे जास्त वेळ लंगोट दाखवत उभे राह्यले की जेवणारे लोक वैतागून समोर आडवा हात करून त्यांच्या वरच्या भागाकडे फक्त पहात त्यांना आत जायला सांगायचे, कोणीतरी काहीतरी आणायला सांगून तळवलकरांना आत पिटाळायचे. कारण त्यांच्या लंगोटाकडे पहाणं जेवणाऱ्यांना असह्य व्हायचं. हे नेहमीचचं होतं.

आता तळवलकर बोलत असे लंगोटावर उभे राह्यलेले पाहून चांगला देशपांडे लगोलग ओरडला, चर्चा नका करू हो तळवलकरमामा. चपाती आणा. लवकर!

सगळी खाणावळ, जुनाट टेबलं, फरशी-अन्नाच्या विचित्र वासानं कुबट वास करत होती. कोणीतरी एक विद्यार्थी वर्तमानपत्र वाचत ताटातल्या पोळीचे काठकाठ फेकून देत मधली पोळी खात होता. तळवलकर लंगोट ताणत त्याच्यावर चिडून म्हणाला, फेकू नका हो पोळी अशी! धान्याचं किती कठीण होऊन बसलं आहे, माहीत नाही? अर्ज करून सहा महिने झालेत पण कोटा वाढवून देत नाहीत. कलेक्टर हापिसातले लोक कारकुनापासून खाद मागतात. वर कंपलेन केली तर त्यांचे तेच पुन्हा! काही उत्तर नाही. वेळात वेळ काढून जावं तर कुणी जाग्यावर नसतो. च्यायला. कुणाला गाठलं तर विचारतात, केव्हा अर्ज केला होता? नंबर काय? म्हंजे ते शुक्लकाष्ठ आपणच लक्षात ठेवा! नंतर म्हंतात, हाँ, तुमची कंपलेन होती नाही का? तुमचा अर्ज कंपलेनबरोबर फायलीला लावून ठेवला आहे! त्यावर विचार चालू आहे! असं म्हंतात! हिहिहिहि!

डोळ्यांसमोर हात करून एकजण म्हणाला, इथेच बोलत बसू नका हो मामा. आत बघा स्वैंपाकाचं. हॅ हॅ हॅ.

आत जाऊन पुन्हा तळवलकर बाहेर आले आणि कोशिंबीर वगैरे वाढत गप्पा मारायला लागले. चांगला देशपांडे वर पहात म्हणाला, आम्ही वाढून घेऊ, भांडं ठेवून जा तुम्ही, पोळ्या आणा.

मग तळवलकर पुन्हा आत गेले. चांगदेव म्हणाला, ह्या गावात खाण्यापिण्याची मारामारच. इथे हाटेलं निव्वळ चोथा देतात. कधी हे, कधी ते असं मी बदलत असतो. ह्या महिन्यात तळवलकर धरला आहे. पुन्हा स्टेशनवरचा उडपी सुरू करायचा, पुन्हा तिथला कंटाळा आला की गावात एक सिंध्याचं महागडं बऱ्यापैकी हाटेल आहे तिथे. असं चाललं आहे.

शेंडे म्हणाला, अशी गलिच्छ खाणावळ जगात शोधूनही सापडणार नाही. आणि वर पाटी : **ब्राम्हणाची खाणावळ.** आपली बदनामी आहे ही.

तरी ब्राम्हणाची म्हणून इथे स्वच्छता वगैरे असते असं सगळे जेवणारे समजून चालतात! बहुतेक संघवाले इथे खास वर्षभर चिकटून रहातात.

बाजूला दोघेजण जेवायचीच चर्चा करत होते. एकजण म्हणत होता, साला तो सिंधी तर उन्हाळ्यात रोज संध्याकाळी टरबुजाची भाजी करतो, दुपारी घरी टरबुजं खाऊन उरलेल्या पांढऱ्या भागाची सालांसकट भाजी. असं रोज. उन्हाळाभर!

चांगला देशपांडे त्यांना म्हणाला, पण उष्ट्याच फोडी शिजवत नसला म्हणजे

मिळवली! भाजीत सरळ सरीनं कापलेले तुकडे तरी दिसतात का? का दातांचे वण दिसतात?

पहिला म्हणाला, शिजलेल्या भाजीवरून ते कसं समजणार? पण सिंधी साले काहीही करू शकतात. आपणच ह्या खुणा दातांच्या नसतील असं समाधान करून भाजी खात रहायची. म्हणून आता तळवलकर सोडायचा नाही असं ठरवलं आहे. उगा मटण म्हणून मेलेल्या गाढवाचं मास खाऊन पुन्हा पैसे खर्चायचे धंदे बंद केले आपण.

पुन्हा तळवलकर दिगंबर स्वरुपात एका हातात चपात्या, एका हातात आमटीचं वाडगं घेऊन आले आणि एक दोघांनी डोळ्यांसमोर हात केले. तळवलकरांनी कलेक्टरविरुद्ध गाऱ्हाणं सुरु केलं : कलेक्टरच्या ऑफिसात सगळे लुच्चे लोक भरले आहेत. आपण अर्ज करून फेऱ्या माराव्या पण आटा कधी सँक्शन करत नाहीत. तुमचा अर्ज पाठवला आहे, त्यावर विचार केला आहे! असं म्हंतात! हे हे हे हे हे !

एक जण ओरडला, तळवलकर, कांदा घेऊन या हो!

तळवलकर आत गेल्या गेल्या दुसरा हसून म्हणाला, तळवलकर, तुम्ही कामापुरतेच बाहेर येत चला!

मग सगळे हसले. तेवढ्यात तळवलकर वळून मागे येत म्हणाले, काय पाह्यजे? एकजण म्हणाला, काही नाही, काही नाही. तुम्ही जावा आतमधे. मग पुन्हा सगळे हसले.

जेवणारा एक विद्यार्थी चांगल्या देशपांडेला सांगत होता, आमच्या कॉलेजात काल कोणीतरी एका माणसानं धनुर्विद्येचा चांगला छान कार्यक्रम केला. पूर्वी धनुष्यबाण किती अचूक वापरत असतील हे लक्षात आलं. रामायण-महाभारतात ज्या धनुष्यबाणांच्या लढाया आहेत या खऱ्याच असाव्यात.

दुसरा विद्यार्थी म्हणाला, खऱ्या म्हणजे? निश्चितच खऱ्या असाव्यात. हा माणूस एका वस्तूआड दुसरी ठेवून तिलासुद्धा बरोबर बाण मारून दाखवायचा. पूर्वीची अस्त्रं वगैरेसुद्धा आपण विसरलो. पर्जन्यास्त्र वगैरे खरीच असावीत. हल्ली पाऊसही पडत नाही तर त्याचा उपयोग झाला असता.

पहिला विद्यार्थी म्हणाला, नंतर त्या माणसानं सांगितलं की हल्ली नवीन नवीन शोधांमुळे धनुर्विद्येला वाईट दिवस आले आहेत.

चांगला देशपांडे म्हणाला, हे मात्र खरं आहे!

मग सगळे हसले. तळवलकर चपात्या, कांदा घेऊन आले आणि धनुर्विद्येवर आवेशानं बोलायला लागले, अहो! गरगरत्या माशाचा डोळा फोडणं काय सोपं आहे? आपल्या ह्या विद्या चोरीला गेल्या!....समोरच्या त्या विद्यार्थ्यानं आडवा हात करून तळवलकरांना कालच्या माणसानं इलेक्ट्रिकच्या पंख्यातून कसा बरोबर बाण मारून दाखवला हे सांगितलं. इतक्यात बाजूचा गृहस्थ पुढे आडवा हात करून म्हणाला, भाजी आणा हो तळवलकर... काय गप्पा मारता तुम्ही पोरांनो.

मघाचा विद्यार्थी दुसऱ्याला सांगत होता, मी आता ड्रायव्हिंग शिकतो आहे. बी.ए. नंतर निदान कुठे ट्रकवर आपापला धंदा करता येईल.

दुसरा विद्यार्थी म्हणाला, ट्रक चालवायला काय शिकता राव? त्यापेक्षा उंट

चालवायला शिका. सगळा हिंदुस्थान सहारासारखा कोरडा होतो आहे. लवकरच आपल्याला वाळवंटात रहावं लागेल.

बाजूचा गृहस्थ म्हणाला, चांगलं होईल त्याच्या मायला. खजूर तरी शुध्द झाडाचे खायला मिळतील. हा अमेरिकन गहू आणि वास मारणारा डाल्डा आणि ही गाजराची भाजी याच्यापेक्षा ते काय वाईट?

तेवढ्यात तळवलकर भाजी घेऊन आले.

तिकडे एक वयस्क गृहस्थ जेवता-जेवता एकदम म्हणाले, अमेरिकेत घोडे खातात गाजरं. आणि हा गहू डुकरांना देतात. आपण घोडी अन् डुकरं व्हायच्या काबिल आहोत झालं.

तळवलकर म्हणाले, द्या निवडून काँग्रेसला! इंदिरा गांधीला!—

ते वयस्क गृहस्थही समोर आडवा हात करून म्हणाले, आमटी आणा गाजराची लवकर... तर बरं का जहागिरदार, रशियासारखं फटके मारून कामं करून घेतली पाह्यजेत. तेव्हा सुधारेल हा देश. शेतकरी साले निव्वळ आराम करतात, पेरून मोकळे होतात कापणीपर्यंत!

जहागिरदार गृहस्थ म्हणाले, चाबकानंच कामं करून घ्यायची तर रशियासारखं सरकारच पाह्यजे असं कुठं आहे? कुठलंही सरकार चाबकानं यशस्वीच होणार. नुसत्या चाबकासाठी कम्युनिस्ट सरकार कशाला हो!

एक नवा त्रस्त मुद्रेचा पोरगा आत आला आणि जेवणाऱ्या नेहमीच्या सगळ्यांकडे तुच्छतेनं पहात एका घाण टेबलावर बसला. आणि ओरडला, मामा तळवलकर, साफ करा बरं हे ताबडतोब. काय ही घाण. माशा किती? शी:ऽ

एक विद्यार्थी त्याला म्हणाला, काय पोंक्षे, काय करतोस हल्ली?

पोंक्षे गंभीरपणे म्हणाला, काय करणार! नुस्ता रहातो.

तो विद्यार्थी म्हणाला, नाही म्हणजे तुझा डिप्लोमा आटपला की नाही?

पोंक्षे म्हणाला, डिप्लोमा पास करून काय फरक पडणार होता? गेल्या वर्षीची एम्.एस्सी. केमिस्ट्रीची सगळी बॅच बेकार आहे. तू तरी एम्.ए. होऊन काय करणार दुसरं? कॉलेजात तू निव्वळ मोर्चे न् संप न् मारामाऱ्या याच्यापलीकडे काही केलं नाही चाऱ्ही वर्षभर! तरी एम्. ए. ला आलास. मला कोण विचारणार तू काय करतोस म्हणून. मामाऽऽ ओ ऽ मामा, च्यायला हे कोण साफ करणार? पहा वाटीला डाळ लागलीय. धुता की नाही हो खरकटी भांडी? हॅ ऽ च्यायला, एक पोळी खायची साली. पण किरकिर किती करावी लागते—

असं म्हणून त्यानं ती वाटी खिडकीतून चौकात भिरकावली. तळवलकर धावत आले. बाकीच्या जेवणारांनी दोघांना शांत केलं. नंतर एक पोळी आमटीत बुडवत निर्विकार चावत कायम दुसऱ्या हातानं पाणी पीत सगळ्या जगाकडे संतप्त पहात पोंक्षेनं जेवण आटपलं. तिथेच सिग्रेट पेटवून कोणाकडे न पाहता तो निघून गेला.

तिकडे दोन विद्यार्थी तावातावानं चर्चा करत होते : सत्त्याहत्तर टक्के मार्क आहेत भडव्या मला एफ्.वाय्.बी. एस्सी. तरी पण मेडिकलला नंबर लागला नाही तर आता काय झाट अभ्यास करू आयुष्यभर? शेड्यूल्ड कास्टचा बॅक लॉग सुरू झालाय,

शेवटचा महार पोरगा पंचेचाळीस टक्क्यांचा शिरला मेडिकलमध्ये. आमचं जानवं आडवं आलं सत्त्याहत्तर टक्के असून.

दुसरा म्हणत होता, हे बाहेरचे लोक फार घुसलेत आपल्या भागात. साल्यांना हाकललं पाह्यजे मादरचोदांना.

त्या वेळी ठोसरांच्या मुलीचं लग्न ठरलं होतं. त्यांनी आपली स्वामिनिष्ठा दाखवावी म्हणून तिकडंबाज देशपांडे, बुटका कुलकर्णी, ऋषिपाठक वगैरे लोकांनी ठोसरांच्या नकळत त्यांच्या मुलीला भेट द्यायला म्हणून एक प्रचंड सोफा सेट घ्यायचं ठरवलं. त्याची वर्गणी म्हणून त्यांनी प्रत्येक प्राध्यापकाकडून पंधरा रुपये वसूल करणं चालवलं. आधी कागदावर नावापुढे सही करून पैसे दिले असं लिहायचं असल्यामुळे जो तो ऊं, ऊं करत भीड म्हणून शेवटी पैसे द्यायचाच. तिकडंबाज देशपांडे, लठ्ठया देशपांडे वगैरे पित्ते ही गंमत पहात सिग्रेट पीत उभे असायचे. क्षीरसागर, याज्ञिक यांनी सॉरी लिहून सह्या केल्या होत्या. चांगल्या देशपांडेला लग्नातली बुंदी खूप आवडते म्हणून लगेच पैशे देऊन सही केली. बहुतेक जण सही केल्यावर पैशे गेले म्हणून तोंडात मारल्यासारखे दिसायचे.

नंतर हे लग्न लागलं तेव्हा पैशे देणारे सगळे आपल्याला जेवायला मिळेलच म्हणून तयारीनं आले होते. पण खास जेवणाच्या आमंत्रणाच्या छोट्या पत्रिका ठोसरग्रुपच्या ठराविक प्राध्यापकांनाच फक्त देण्यात आल्या. सगळी कारी प्राध्यापक मंडळी हॉटेलच्या जेवणात तेवढाच बदल म्हणून लग्नाला हजर राहिली होती. पण त्या सर्वांची घोर निराशा झाली. चांगला देशपांडे म्हणाला, म्हणजे पंधरा रुपये गेले! हे आधी माहीत असतं तर दिडकी दिली नसती. गंगातीरकर म्हणाला, मी तर घुसतोच गर्दीत आणि घेतो जेवून! कोणाचं लक्ष असतं बे?

मग त्याला मंडपातच सोडून ते सगळे शोभामधे आले आणि चिकार काही काही पदार्थ खाऊन ठोसराला शिव्या देत बसले. चिपळूणकर हळूच म्हणाला, मी यादीवर नुस्ती सही केली होती. नंतर उद्या पैशे देतो म्हणालो होतो. नंतर चुकवलंच. आता आले मागायला तर देत नाही भडव्यांना! यादीत ठोसराला नावही दिसलं, पैशेही वाचले!

देसाईही मग हळूच म्हणाला, मी तिकडंबाज देशपांड्याकडूनच उसने घेऊन दिले होते पंधरा रुपये! आता कोन परत करतंय त्येला!

चांगदेवचं खूप डोकं दुखत होतं.

तो शोभामध्ये थोडंसं खाऊन नंतर टूरिस्ट इंटरनॅशनलकडे गेला. राजेश्वरी ऑफिसला गेली होती. तो तिची वाट पहात संध्याकाळपर्यंत बसला. नंतर कंटाळा आल्यावर तो पुन्हा काहीतरी खाऊन खोलीवर परत आला. मॅनेजर म्हणाला, काय निरोप सांगायचा? तो म्हणाला, काही नाही.

माठूरामनं आता रोज स्टाफ मीटिंगा घेऊन आपली **विद्यार्थी-प्राध्यापक आपुलकी योजना** का यशस्वी होऊ नये याच्यावरच चर्चा सुरू केली. आता मात्र पांडेय, भोगीशयनम्, याज्ञिक, विद्यासागर, पुरोहित, बॉटनीचे वृद्ध देशपांडे वगैरे गंभीर प्रकृतीचे लोकही उघड ह्या योजनेला विरोध करायला लागले. शास्त्रीसुद्धा म्हणाले की हे असलं अमेरिकेत ठीक असतं हो. आधीच आपल्याला वीसवीस तास ओरडायचे मोठमोठ्या वर्गांवर. त्यात इतर काम, सहामाहीचे सातसातशे पेपर तपासणं, ट्युटोरियल्सचे गट्टे न् इतर हजार कारकुनी कामं! त्यात पुन्हा ही काय डोकेदुखी लावली. बॉटनीचे वृद्ध देशपांडे म्हणाले, मुलं काहीच बोलत नाहीत हो. हे निव्वळ एकपात्री नाटक होऊन राह्यलं. चांगदेव म्हणाला, तीनतीन हजार मुलांना एवढ्याशा इमारतीत ॲडमिशन् दिल्यावर कशाची आपुलकी निर्माण करणार? मुसा म्हणाला की दर बैठकीत चहा वगैरेचा इन्तजाम केला तर मुलं हजर रहात जातील. निव्वळ बौद्धिक काहीतरी तासभर बरं वाटत नाही.

तेव्हा माठूराम खरोखरच किती साखर लागेल, किती कप चहा, किती दूध असा हिशेब करायला लागले. पण नंतर ते म्हणाले, पण कपबशा कुठून आणणार? आणि कोण चहा करणार? हे व्यवहार्य नाही.

मग माठूरामनं नेहमीचे प्रचलित शिक्षणपद्धतीवरचे आपले विचार प्रकट करायला सुरुवात केली आणि सगळे प्राध्यापक माना टाकून ऐकत बसले. तिकडे देसाई कशाला तरी खदखदून हसत होताच. जरा वेळानं चिपळूणकरनं बुटातून पाय बाहेर काढले आणि आसपासचे लोक नाक लहानमोठं करून हुंगू लागले. चांगला देशपांडे बोअर होऊन मोठमोठ्यानं गाणं गुणगुणत राहिला : गहरे ताल मिले नदीके जलमें, नदी मिले सागरमेंऽऽ, सागर मिले कौनसे जलमें, कोई जाने नाऽऽहो गहरे ताल मिले...

इकडे माठूराम जोरजोरात सांगत होते, प्रचलित शिक्षणपद्धतीचे आदर्श कोणते? कशामुळे? का? हे शोधून काढू या...

चांगल्या देशपांडेनं आता तिकडे फारच जोरात सुरू केलं होतं: कोई जाने नाऽऽ कोई जाने नाऽऽ होऽऽ!

ह्यालाच तिकडच्या कोपऱ्यातले सगळे हसत होते. माठूरामला वाटलं हे आपल्याला हसत आहेत. त्यामुळे आपलं भाषण चालूच ठेवून ते म्हणाले, प्राध्यापकांमुळे ह्या शिक्षणपद्धतीला प्रचलित कीड लागली. प्राध्यापक पोटभरू, नादान निघाले आहेत. काम करायला नको. निव्वळ आत्मकेंद्रित बाजारी झाले आहेत.

हे अचानक माठूरामनं का सुरू केलं हे न कळल्यानं भोळे, भोपटकर वगैरे प्राध्यापक चिडले. ते माठूमरामला थांबवून म्हणाले, आम्ही इथे शिव्या खायला आलेलो नाही. मग भल्लानं इंग्रजीतून गोलमाल काहीतरी न समजणारं भाषण करून विषय बदलला. उद्यापरवा पुन्हा ही चर्चा चालू ठेवू असं म्हणून मीटिंग संपवली.

मीटिंगनंतर बाहेर हिंदुत्ववादी भोपटकर संतापून म्हणत होते, हे काय डोकं फिरल्यासारखं चालवलंय चेअरमननी? पुन्हा असं ऐकून घेता कामा नये आपण. पुन्हा ह्या मीटिंगा संपायचं लक्षण नाहीच. रोज मीटिंगा. रात्री दहादहा अकराअकरापर्यंत? घरी आम्हाला काही अभ्यास, वाचन, लेखन आहे की नाही? बायकापोरं, संसार आहे

की नाही?

देसाई म्हणाला, ह्या भल्याची अन् माठूरामचीबी बायका म्हाताऱ्या जाल्या हैतं. घरी कसं बसनारं हे ह्या वयात?

हिंदुत्ववादी भोपटकर म्हणाले, ह्यांचं ठीक आहे, ह्यांना कॉलेजचे प्यून मिळतात घरचं दळण दळून आणायला सुद्धा. एकदा विजेचं बिल भरून पहा म्हणावं रांगेत उभं राहून. मग चर्चा बंद होतील.

चिपळूणकर म्हणाला, हे प्यून वापरतात हे एकदा मीटिंगमधे काढलं पाह्यजे.

क्षीरसागर म्हणाले, कोण काढणार? चांगले मेरिटचे स्पष्ट बोलणारे लोक पळवून लावले ह्यांनी. आता सगळे नात्यागोत्यातले, वशिल्याचे हिजडे उरलेयत फक्त.

तिकडंबाज देशपांडे, ठोसरांच्या कचेरीत रोज संध्याकाळी जाऊन नुस्ता बसणारा लठ्ठ्या देशपांडे वगैरे चारपाच जण बाजूला उभे राहून सिग्रेटी पीत हे सगळं ऐकून घेत होते. तेव्हा भोळे तिकडंबाज देशपांडेला सरळ म्हणाला, का हो पुर्शोत्तमराव, तुम्ही रोज ठोसरांकडे जाता येता, तर ह्याबद्दल बोला की एकदा त्यांच्याशी.

तिकडंबाज देशपांडे संताप गिळून शांतपणे झुरका घेऊन धूर आणि शब्द बरोबरच तोंडातून काढत म्हणाला, आम्ही काय, वशिल्याचे हिजडे लोक! तुम्हाला ज्यांना मेरिट आहे आणि धैर्य आहे-त्यांनी बोला की!

ह्यावर सगळे कुलकर्णी, जोशी आणि देशपांडे कशी जिरवली ह्या ग्रुपची म्हणून दिलखुलास हसत राहिले.

ह्या **आपुलकी गटांबद्दल** रोज अशा चर्चा सुरू झाल्यामुळे सगळे प्राध्यापक वैतागून गेले. मग चांगला देशपांडे म्हणाला, हे मी आत्ता बंद करतो, बघा.

चांगला देशपांडे मुलांमधे अतिशय लोकप्रिय होता. मुलं त्याचं नेहमी ऐकायची. त्यानं काही खास पुढारी मुलांना लावून दिलं की हे **आपुलकी गट** म्हणजे फालतूपणा आहे. बंद करा. मग विद्यार्थीसंसदेचे पन्नाससाठ दांडगे विद्यार्थी एक सह्यांचा खलिता घेऊन भल्लाच्या ऑफिसात शिरले आणि हे **आपुलकी गट** बंद करा, आम्हाला संध्याकाळी पुन्हा कॉलेजात यायचा त्रास होतो, अभ्यासात व्यत्यय होतो वगैरे.

त्यामुळे हे **विद्यार्थी-प्राध्यापक आपुलकी गटाचं** प्रकरण पुढल्या टर्मपर्यंत स्थगित करावं, नंतर पुन्हा सविस्तर चर्चा करून ह्या योजनेचं स्वरूप नव्यानं ठरवण्यात येईल असा माठूरामचा आदेश नोटिशीनं सगळ्यांना कळवून भल्ला मोकळा झाला. नंतर ह्या योजनेची कोणीच कोणाला आठवण करून दिली नाही. असा तिचा शेवट झाला. मात्र पोरांना भडकवणारे कोण प्राध्यापक होते ते शोधून काढण्याचं काम माठूरामनं तिकडंबाज देशपांडे वगैरेंवर सोपवलं.

शिवाय ठोसरांनी आपल्या पित्त्या प्राध्यापकांना रात्रंदिवस कष्ट करून एका मोठ्या योजनेसाठी जुंपायचं ठरवलं होतं. येत्या इलेक्शनच्या आत दैनिक समाजवादला मोठं रोटरी मशीन घ्यायचं होतं, प्रत्येकानं सर्वत्र हिंडून कमीत कमी दहा हजार रुपये देणग्या

जमा कराव्या असं ठरवलं होतं, बरेच देशपांडे, कुलकर्णी आणि जोशी आपापल्या गावाकडे जाऊन देणग्या घेऊन येऊ लागले. तासांना दांड्या मारू लागले. कोण जास्त देगण्या आणतो याच्यात चुरस सुरु झाली. ऋषिपाठकचा सासरा पुण्याला मोठा कारखानदार होता. त्यानं एका फेरीतच सासऱ्याकडून दहा हजार रुपये आणल्यामुळे इतरांची तोंडें वाकडी झाली. आता ऋषिपाठकच पुढचा प्रिन्सिपल होणार या भीतीने सगळे अस्वस्थ झाले.

ह्याच मोहिमेवरचा तिकडंबाज देशपांडे एकदा चांगल्या देशपांडेला म्हणाला, तुझ्याकडून पाचशेचा तरी शेअर यावा अशी अपेक्षा आहे. हणमंतरावांचाही तुला खास निरोप आहे-काही झालं तरी हा आपला पेपर आहे. महाराष्ट्रात ब्राम्हणांचे हाल चालवलेत. आपल्या जातीचं म्हणणं मांडायला एक प्लॅटफॉर्म पाह्यजेच.

चांगला देशपांडे संताप दाबून शांतपणे म्हणाला, तसा जातीयवाद वाईट नसतो, आपल्या जातीतल्या लोकांची ती सेवाच असते एका परीनं.

तिकडंबाज आनंदानं म्हणाला, बरोबर. मी म्हणालोय हणमंतरावांना की गोपाळ एकशेएक रुपये तरी देईलच. काही झालं तरी आपला माणूस आहे—

चांगला देशपांडे म्हणाला, पण गड्या, एक मला आवडत नाही. हणमंतरावांनी आपल्या असिस्टंट एडिटरला कायमची सूचना देऊन ठेवलीय की दर आठ दिवसांतून एकदा विख्यात विचारवंत किंवा थोर समीक्षक म्हणून जाड मथळ्यात आपल्या एकदोन ब्राम्हणांची नावं टाकत जा. आणि अधूनमधून त्यांनी कुठेही भाषणं दिली की त्याची अशा मथळ्याखाली बातमी देत जा. किंवा अधूनमधून थोर समाजसेवक माठूराम दीक्षित म्हणाले-असंही येऊ देत जा...हे बरोबर नाही.

तिकडंबाज देशपांडे म्हणाला, अरे, त्याशिवाय आपली माणसं वर जाणार नाहीत. पब्लिसिटीचेही उपयोग असतातच-साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद, व्हाइस-चॅन्सलरशिप-उपयोग असतो!

चांगला देशपांडे म्हणाला, पण शेळपट ब्राम्हणांची प्रतिमा उभी करत रहायची पद्धतशीर, आणि ब्राम्हणेतरांपैकी कुणी वाघ मारला तरी त्याची दाखल घ्यायची नाही ही आपली मराठी वृत्तपत्रांची परंपरा चिपळूणकर टिळक यांच्यापासूनची! आता पुन्हा आपल्या जातीचं म्हणणं मांडायला प्लॅटफॉर्म कशाला? ह्यामुळेच महाराष्ट्रात ब्राम्हण एकाकी पडायला लागलेत. हे बंद करा.

तिकडंबाज आवरतं घेत म्हणाला, ते जाऊ दे. तू एकशेएक तर देऊन टाक.

एकशे एक! आणि इतर जातींना कुठे प्लॅटफॉर्म आहेत बे? माळ्यांना कुठे पेपर आहे? महारांना? मांगांना? भटक्या जमातींना? ब्राम्हणांचे इंटरेस्ट प्रोटेक्ट करायला वीस दैनिकं आहेत सगळी! पुन्हा एक कशाला?

ते जाऊ दे. लिहू का एकशेएक? मी माझा एक हजाराचा आणि बायकोचाही पाचशेचा असे दोन शेअर घेतलेत.

तुझी बायको आता बी.ए. झाली की संस्थेच्या शाळेत लागणार आणि तुला आता वरची ग्रेडही ठोसर मिळवून देणारच. म्हणजे एकाच वर्षात तू हे दिलेले सगळे पैशे वसूल करून घेणार! आमचे मात्र कायमचे जातील! देत नाही मी.

तिकडंबाज देशपांडे संतापून पावतीपुस्तक पिशवीत ठेवत म्हणाला, आधीच सांगायचं की, देत नाही म्हणून. पुन्हा संस्थाचालकांच्या शीलावर शिंतोडे उडवायचे हे चांगलं नाही. तू स्वभाव बदलला पाहिजे. हे तुला नडेल.

अरे जा, काय झाट वाकडं करणार कोण माझं! च्यायचे, आपल्या जातीचा प्लॅटफॉर्म! तुम्ही लोकशाही, वृत्तस्वातंत्र्य असेल शब्द वापरून निव्वळ पेशवाई चालवताय अजून साल्यांनो.

असं सगळं चालत राह्यलं.

शिकवणं हा भाग ह्या धंद्यात इतका गौण आहे हे हळूहळू लक्षात आल्यानं चांगदेवला एकदम सगळं मोकळं वाटायला लागलं. नेहमीचे चार तास घेऊन प्राध्यापकांना सहन करत चहा गप्पा चर्चा करत तो जगायला लागला. कॉलेजातली फालतू कामं मन लावून करायला लागला. त्याच्याकडे दिलेल्या कामात मुळापासून सगळं बदलून नवीन पद्धतीनं कार्यक्रम आखून प्रिन्सिपलची मवाली स्तुती ऐकत कॉलेजात वेळ काढायला लागला. तिघेचौघे कारे मित्र एवढंच कॉलेजमधलं मनोरंजन होतं. कॉलेजमधे नुस्तं बसूनसुद्धा संध्याकाळी प्रचंड मानसिक थकवा यायचा. त्या जातीय चर्चांची, वांझोट्या मीटिंगांचीही आता सवय झाली. मीटिंगमधेही खऱ्या गोष्टी बोलायची जबाबदारी ह्या दोनचार लोकांवरच परंपरेनं येऊन पडली. जणू काही बरंवाईट व्हायचं ते त्यांचंच होऊ द्यावं असं इतर प्राध्यापकांना आणि मुरलीमोहनसकट सगळ्या बॉडीच्या लोकांनाही वाटायला लागलं. तिकडे ठोसर-ऋग्वेदी सुद्धा कुठल्याही प्रकरणावर माहिती मिळवतांना विचारून घ्यायचे, पाटलाचं काय मत पडलं? मग तिकडंबाज देशपांडे, बिल न देणारा यजुर्वेदी वगैरे मंडळी आपल्याला स्वतःला कळवावंसं वाटणारं अप्रिय काहीही चांगदेवच्या नावावर खपवायला लागले! हे सगळं ओझं फुकटचं डोक्यावर बसल्यानं कॉलेजातून केव्हा मोकळं होऊन बाहेर पडतो असं चांगदेवाला व्हायचं. एकदाची सायकल गावाबाहेरच्या रस्त्याला लागली की त्याला माणसांत आल्यासारखं वाटायचं. गावाबाहेरच्या टेकड्या, मोकळी शेते, हिरवे पट्टे हे ह्या गलिच्छ नोकरीतलं लोभसपण होतं.

पूर्वी पहिल्याच वर्षी सराईत प्राध्यापक म्हणायचे की उदरनिर्वाहापुरतं नोकरीचं नीट चालू द्यावं मग आपल्या आपण मोकळे होतो. तसं हुबेहूब आता झालं. घरी आल्यावर चहा पिऊन रेडिओ सुरू करून उंच उशीवर मान ठेवून पडून राह्यल्यावर त्याला ह्या अनिर्बंध मुक्त जीवनाचा स्पर्श व्हायचा. असं पूर्वी कधीच नव्हतं. हाही बदलच होता.

पण ह्या स्वातंत्र्याच्या अवकाशाची त्याला अस्वस्थ करणारी जाणीव व्हायची. इतकं सगळं जमल्यावर पुढे काय? चालतांना हवा चिरत जाणं जितकं सोपं तितकं हे जगणं सोपं झालं. आणि तो जास्त जास्त अस्वस्थ होऊन उलटसुलटा होत रहायचा आणि तो मोठ्यानं ओरडायचा, याच्यातून मार्ग काढला पाह्यजे.

रोज जातायेता गावाबाहेरचे ते लांबपर्यंतचे कुठल्याकुठे जाणारे प्रचंड अजगरी रस्ते आता त्याला भयावह वाटू लागले. रस्ते नेऊन नेऊन ह्या अशा नवख्या गावी आणून टाकतात. हे रस्ते जगभर पसरतात आणि माणसाचचं स्थिरपण शोषत रहातात. क्षितिजाचं लहानपणी वाटणारं आकर्षण ह्या रस्त्यांनी संपवून टाकलं. समुद्रमार्ग, आकाशमार्ग, भूमार्ग-सगळे तयारच असतात. ह्या डांबरी रस्त्यांवरून नेणतेपणीही कुठे वळायचं तिथे वळत वळत आपण पुन्हा रहायच्या ठिकाणीच येऊन पोहोचतो हे भयंकर. तो म्हणाला, माझ्या मनात जायला म्हणून. एक जागा नेहमीच असते.

कॉलेजात आल्या आल्या इंग्रजी पेपर बळकावून दिवसभर वाचत बसणाऱ्या इतिहासाच्या कुलकर्ण्यांनी वारंवार दिवाळीच्या फराळाला या म्हणून म्हटल्यानं भोळे आणि चांगदेव एका संध्याकाळी त्यांच्याकडे गेले. त्यांनी दिवाणाखान्यात सतरंजीवर बैठक मारली होती आणि चाऱ्ही बाजूंना युनिव्हर्सिटीच्या पेपरांचे ढीग रचलेले होते. कुलकर्णी अधूनमधून पेपरावर बरोबरच्या खुणा सपासप करत वरतून चांगदेवाशी बोलत पेपरामागून पेपर उचलत संपवून फेकत होते. लगेच कुलकर्णीबाई चष्मा वारंवार वर करत नवऱ्यानं खास तिच्यासाठी कोरा ठेवलेला एक प्रश्न तपासून बेरजा करून पेपर संपवून गठ्ठयावर नीट ठेवून देत होत्या. मागे एका लाकडी रॅकवर खणाखणावर तीनचार युनिव्हर्सिट्यांची नावं खडूनं लिहिलेली होती. त्या त्या खणात त्या त्या युनिव्हर्सिट्यांचे गठ्ठे, पार्सली, पत्रव्यवहार वगैरे अस्ताव्यस्त ठेवलेलं होतं. सतरंजीवर एका मोठया ट्रेमध्ये लाख, मेणबत्ती, आगपेटी, शिक्का, डिंक, चाकू, कात्री, लाल पेन्सिली, टोक काढायचं यंत्र, दौत, टाचण्या, पेनं, खोडरबर, पट्टी, दोरा-अशा नित्योपयोगी वस्तू जय्यत होत्या. पण वैतागजन्य गोष्ट म्हणजे मांडी घालून योगासनात कुलकर्णी हे एकाही पेपरावरचं नीट न वाचता पुन्हा युनिव्हर्सिटीच्या कारभारावर सिनिकबाजी करत शिव्या देत खाली पेपरांवर नुस्त्या खुणा करत मजकुराच्या लांबीनुसार ठराविक मार्क देत एकेक पेपर बायकोकडे फेकत होते. कुलकर्णी आपल्या भावाबद्दल भोळेंशी बोलत होते : त्याला इतके कमी मार्क पडणं शक्यच नाही! फर्स्ट क्लास करिअरचा मुलगा साधा पास होईलच कसा? काय भ्रष्टाचार आहे ह्या विद्यापीठात?

तर कुलकर्णीबाई चांगदेवला म्हणत होत्या, एवढे पेपर झाले की संपलं बरं पाटीलसर. असं ठरवल्याशिवाय हे रटाळ काम उरकत नाही. तुम्ही घेत नाही का परीक्षेचं काम? घेत जा हो. तेवढेच पैशे खर्च करता येतात. आम्ही हे घर परीक्षेवरच बांधलं. मी पूर्वी शाळेत असतांना तरी यांना खूपच मदत करू लागायचे. आता कॉलेजात अभ्यास खूप करावा लागतो शिकवायचा... आपल्या भल्लाबाईंचं नाव कसं घातलं बरोबर ह्या वर्षीच्या परीक्षेच्या पॅनेलमध्ये...! वशिले असतात यांचे.फर्स्ट क्लासही असाच मिळवला तिनं. आता नवरा-बायको मिळून पहा किती पेपर तपासतात! त्यांच्या दोन्ही मुलीही तपासू लागतात त्यांना. भल्ला हजार हजार घ्यायचा इतके दिवस, आता

तर बायकोचे मिळून किती घेतो कुणास ठाऊक!... अहोऽ काय हे! ...हा प्रश्न तपासलाच नाही तुम्ही-बरं झालं माझं लक्ष गेलं! तेच म्हटलं, इतका लांब कसा काय एकच प्रश्न? बघा—

कुलकर्णी आपल्या तपासण्याच्या वेगात व्यत्यय आला म्हणून वैतागत तो पेपर पहात म्हणाले, दोन्ही प्रश्नांना मिळून एकाच प्रश्नाचे मार्क पडले? असं कसं झालं? हां, त्या येड्यानं प्रश्नाचा नंबरच नीट दिसेल असा घातला नाहीय. मग? मग- त्याची चूक आहे ती. दॅट वाज द प्रॉपर पनिशमेंट फॉर हिम—

कुलकर्णीबाई म्हणत होत्या, अहो पण इकडे अकबराचं दोन पानं झाल्यावर इथे अचानक पानिपतचा विषय बदलला हे सुद्धा लक्षात आलं नाही तुमच्या?... थकलात तुम्ही फार. नीट कॉन्सेन्ट्रेशन होत नाहीय् तुमचं. थांबू या. वाटल्यास रात्री मारू बैठक. थांबा बरं. वॉटरबरीज घ्या आधी.

कुलकर्ण्यांनी वादात वेळ जातो म्हणून वाकून झटपट त्या पेपराच्या मधल्या पानावर नऊ मार्क मांडले, मग खोडून त्याचेच सहा केले आणि बायकोला म्हणाले, आटप. टोटल कर.

बायकोनं स्वत:च्या वाट्याचा एक प्रश्न तपासून बेरीज केली आणि म्हणाली, पहा तेवढ्या सहा मार्कांनी पास झालं हे पोरगं! बरं झालं मी नीट तपासलं.

चांगदेव बाईंना म्हणाला, तुम्ही इतिहासाचेही पेपर तपासता म्हणजे इतिहास चांगला दिसतोय् तुमचा.

कुळकर्णी हसत खाली झपाटयानं खुणा करताच म्हणाले, इंग्रजीपेक्षा इतिहासच बरा आहे हिचा. हॅ हॅ हॅ. कशी एम्. ए. झाली ही-निव्वळ बुद्धीवर! काही अभ्यास करत नव्हती ही.

बाई म्हणाल्या, पण अय्यरबाईपेक्षा तरी निश्चित चांगलं शिकवते मी! का हो पाटील? तिच्या वर्गात अजून गोंधळ चालतो. पण आपल्याला त्रास होईल पाटील तिचा... त्या रजेवर जाणार आहेत जानेवारीत ऐन!-हिहिहिहिहि ऽ

मग लाजून त्या म्हणाल्या, फॉर मॅटर्नल लीव्ह—

कुळकर्णी झपाटयानं लाल खुणा मारत म्हणाले, ऑन मॅटर्निटी लीव म्हण. मॅटर्नल काय?

बाई म्हणाल्या, तिच्या नवऱ्यानं आतापासूनच मुरलीमोहन जेवायला बोलावून भरपगारी दोन महिने मॅटर्निटी लीव्ह करून घेतली हो. आजच सांगत होती अय्यरबाई. माझ्याच वेळी मेल्यांनी पगार कापला. त्या वेळी हणमंतरावांची फारशी ओळख नव्हती. नाहीतर हणमंतरावांनी केलं असतं. तेवढा एकच चांगला माणूस आहे संस्थेत. अय्यरबाई शेफारलीय्—

कुळकर्णी अव्याहत लाल खुणा करत, मार्क देत, पानं उलटवत म्हणाले, तिला मॅटर्निटी लिवच काय-मॅटर्निटीसुद्धा देतील आपले मुरलीमोहन! हॅ हॅ हॅ ऽ परवा सिनेटमधे माठूरामच्या प्रपोजला फार सपोर्ट केला तिच्या नवऱ्यानं! ओलीस आहे ना ही बाई आपल्याकडे त्याची!

चांगदेव म्हणाला, पुढल्या वेळी तुम्हीही मॅटर्निटी लीव मागा!

तेवढ्यात मोलकरणीकडून रडत ओरडत त्यांचा तीनचार वर्षांचा मुलगा धावतच पेपरांच्या गर्दीतून आईकडे आला आणि कुळकर्णीबाई एकदम किंचाळल्या, तुळसा, अग काय करतेस तू? घे लवकर ह्याला. सगळे पेपर फेकले ह्यानं. लवकऽर ने.

मग मोलकरीण धावत आली. पण पोरगं आईला जे चिकटलं ते सोडेना. कुलकर्णीच मग म्हणाले, किती वेळ पोरगं एकटं बाहेर रहाणार ग? घे त्याला. झालाय हा गठ्ठाही. जा तू मी करून घेतो बेरजाही. ड्रॉप्स दिलेस का ह्याला? दे. उठ तू. आज हणमंतरावांनाही बोलावलंय.

मग पोराला घेत तुळसाला चिंच आणि गूळ कुटायला सांगून कुलकर्णीबाई चांगदेवला म्हणाल्या, छान तब्येत आहे ना याची? लग्नानंतर सहा वर्षांनी झाला! फार बदमाश आहे. दूध पीत नाही तरी वजन पाच पौंड वाढलं एका महिन्यात. जा काकाजवळ, संजू. तुम्ही कधी आला नाही ना हो आधी? म्हणून येत नाही. काय? छेऽ दोन नाहीत हो आम्हाला. हा एकच! ही इज माय ओन्ली सन!

कुलकर्णी भरभर खुणा करत वर न पहाताच म्हणाले, ओन्ली चाइल्ड म्हण! आणि अवर ओनली चाईल्ड म्हण, माय ओन्ली चाइल्ड काय ? अँ?

मग घरातल्या सगळ्या अस्ताव्यस्त खोल्या दाखवून वरती एक मजला बांधायचा लवकरच विचार आहे असं सांगून बाहेरच्या झोपड्यांकडे बोट दाखवून नाक कसंतरी करत कुलकार्णीबाई, म्हणाल्या, तेवढं सोडलं तर चाऱ्ही बाजूनं छान बॅग्राउंड आहे! बॅग्राउंडच म्हणायचं ना की—

चांगदेव म्हणाला, अर्थ समजला की झालं हो. बॅग्राउंड म्हणा, साइट म्हणा.

बाई म्हणाल्या, हाँ साइट! साइटच योग्य शब्द आहे.

मग कुलकर्णी तिकडचं काम आटपून आत आले आणि डायनिंग टेबलाजवळ हातपाय पसरून म्हणाले, नागपूर युनिव्हर्सिटी आज नक्की आटपेल! उद्या जरा आराम करू, कोल्हापूरचे सगळे पेपरही सील करूनच पोस्टात टाकून येतो, मग इंदूरची सुरुवात करू ते झाले की मोकळे!

बाई म्हणाल्या, मोकळे कसले? आपल्या युनिव्हर्सिटीचे किती आहेत! त्यालाच पंधरावीस दिवस लागतील. शेवटची तारीख कधीच गेली साहेब? जोर कमी झालाय तुमचा ह्या आठवड्यात. टॉनिक घेत जा म्हणते तर—

आपल्या युनिव्हर्सिटीचं होत रहातं ग. दुसरीकडंचच वेळेवर केलं तर बरं असतं. इथलं होत राहतं. धर्माधिकारींना भेटलो मी. करा म्हणाले सावकाश. आपलाच माणूस आहे. गेल्या वर्षी तर एक महिना उशीर झाला होता!

चांगदेव म्हणाला, धर्माधिकारी कोण?

ते म्हणाले, हेड आहेत हिस्ट्रीचे युनिव्हर्सिटीत! माहीत नाही? चांगला माणूस आहे. तेवढा एकच माणूस चांगला आहे युनिव्हर्सिटीत.

कुलकर्णीबाईंनी केलेला काहीतरी नवा पदार्थ तोंडात टाकत एकदम तोंड वाकडं करत कुलकर्णी म्हणाले, किती चिंच घातलीस ग? अगदी दात आंबतील इतकी? हॅ ऽ

कुलकर्णीबाईही कसंबसं चावत म्हणाल्या, अहो तुळसाला सांगितलं होतं तरी, की मी सगळं टाकीन-पण तिला फार उत्साह, मी मीठ टाकते तोपर्यंत तिनं सगळी चिंच

टाकून दिली.

भोळे म्हणाला, तेही बरंच झालं की! नाहीतर तुम्ही चिंच टाकायला लागला असता तर तोपर्यंत तिनं सगळं मीठ टाकलं असतं!

हॉ हॉ हॉऽ फॉऽऽ-तोंडातून नव्या पदार्थाचे फवारे इतस्ततः उडवत कुलकर्णी प्रचंड हसले.

मग कुलकर्णीबाईंनी मोलकरणीकडून चहाचंही जवळजवळ सगळंच करून घेतल्यावर तिला हुकूम केला, आता जा तू, मी करते चहा. आणि अर्ध्या तासात परत यायचं बरं. मोठे पाहुणे येणार आहेत बरं. बघ नाही तर—

मोलकरीण पदराशी चाळा करत, नाही कसं म्हणायचं असा चेहरा करून म्हणाली, बरंऽ, रांधून आलेच.

नंतर चांगदेव म्हणाला, म्हणजे अर्ध्या तासात कशी काय येणार ही बाई? पुन्हा रांधून परत? कुठे राहते?

कुलकर्णीबाई म्हणाल्या, इथेच रहाते ती मागच्या झोपडपट्टीत. चांगलं आहे जवळच्याजवळ. नाहीतर संजूला सांभाळून धुणीभांडी, दळण सगळं एका बाईला जमलं नसतं. दोनदोन बायका नको घरात. ह्या एकीलाच शिकवून शिकवून कपाळ फुटायची पाळी येते.

कुलकर्णी आणि बाई दोघेही वारंवार बाहेर चाहूल घेत होते. त्यामुळे भोळे आणि चांगदेव दोघेही जरा वैतागले.

मग बाहेरून आहात काय प्रोफेसर अशी हाक ऐकल्याबरोबर कुलकर्णी तडकाफडकी उठले आणि म्हणाले, ते आलेऽत. पण उठायच्या गडबडीत त्यांच्या गुडघ्याला टेबलाचा प्रचंड मार बसून ते कळवळलेच. त्याच्याकडे दुर्लक्ष करून बाई बाहेर गेल्या आणि या, या, अलभ्य लाभ, अलभ्य लाभ असं कृत्रिम म्हणाल्या.

हणमंतराव ठोसर आणि त्यांच्याभोवती नेहमीचे पुराणिकचे आठेक प्राध्यापक आले. त्यात तिकडंबाज देशपांडे, बिल न देणारा यजुर्वेदी, न वाचता शिकवणारा कुळकर्णी, आतापर्यंत कधीही कोणालाही स्वतःच्या घरी जेवायला एकदाही न बोलावलेला जोशी, आडनावांची चौकशी करून बरोबर जात ओळखणारा बुटका कुलकर्णी, ठोसरांच्या कचेरीत रोज संध्याकाळी जाऊन नुस्ता बसणारा लठ्ठ्या देशपांडे, लायब्रीत कधीही न जाणारा व चमचमत्या केसांचा कुळकर्णी, तुलाच नंतर प्रिन्सिपल करू असं ठोसर व ऋग्वेदींनी वचन दिलेला ऋषिपाठक-असे सगळे खुषमस्करे प्राध्यापक होते. शिवाय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांपैकी नेहमी जाकीट घालणारा सहस्रभोजने, ज्यांचा लहान मेंदू मोठा व मोठा मेंदू लहान होता ते देशपांडे हेही होते. शिवाय त्यांना रस्त्यात हिंदुत्ववादी भोपटकर दिसले त्यांनाही बरोबर आणलं होतं, चांगदेव व भोळे स्वैंपाकघरात आहेत हे कळल्यावर ते सगळे थेट आतच आले. कुळकर्णीही गुडघा चोळायचा टाकून देऊन सस्मित या या म्हणाले. मग ठोसरांनी

थट्टाविनोद करायचा आणि आठदहा प्राध्यापकांनी हसायचं असं कायम सुरु झालं.

कुलकर्णी आणि बाईंना प्रत्यक्ष परब्रम्ह आल्यासारखं वाटलं हे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसायला लागलं. बाई मागच्या झोपड्यांकडे पाहात पोह्यांची तयारी करायला लागल्या.

ठोसर गृहस्थ बोलाचालायला चांगला मोकळा होता. चांगदेवाच्या खांद्यावर हात ठेवून ते म्हणाले, काय पाटीलसाहेब, आमच्याकडेही येत चला केव्हा केव्हा. तुमच्याबद्दल फार ऐकतो आम्ही.

मग पोहे खात ते सगळे गप्पा मारत बसले. ठोसर काही बोलले तरी सगळे खुषमस्करे प्राध्यापक हमरीतुमरीनं हसायला लागले. अर्थात बिल न देणारा यजुर्वेदी फार वरच्या पट्टीत हसणारा असल्यानं त्याचं हसणं लक्षवेधी असायचं. असं आपल्याला हसता येत नाही याचं बाकीच्या प्राध्यापकांना दरवेळी वैषम्य वाटायचं. पोहे संपल्यावर त्यांनी गावातल्या शाहू कॉलेज वगैरे इतर जातींच्या कॉलेजातल्या भानगडींच्या कुटाळक्या सुरु केल्या. कोणी शाहू कॉलेजचा चेअरमन शिंदे कसं इंग्रजी बोलतो याच प्रात्यक्षिक करून सगळ्यांना हसवलं. कोणी मुल्ला फिदाअलीच्या प्रिन्सिपलनी सभागृहात एकदा गॅदरिंगला गोंधळ झाला तेव्हा एकदम ध्वनिक्षेपकावर स्कर्ट्स अप अ‍ॅण्ड ट्रावझर्स डाऊन अशी घोषणा कशी केली, महात्मा बुद्ध कॉलेजात पैशांची अफरातफर कशी करतात, शिवाजी कॉलेजात एका रात्री नाटक चालू असतांना दिवे गेले तेव्हा पोरींना कसा त्रास झाला याचे मासले सांगितले. मग आडनावांची चौकशी करून बरोबर जात ओळखणाऱ्या बुटक्या कुलकर्ण्यांनी शाहू संस्थेत हजारोंची अफरातफर असल्याचं ऑडिटरचं म्हणणं सांगितलं. ठोसर म्हणाले, एकदा काढा जरा डिटेल्स. टाकू एकदा आपल्या अंकात. देशपांडे तुम्ही सहज चक्कर टाका एकदा शाहूमधल्या आपल्या पुरंदरे वगैरे मंडळींकडे. त्या सिमेंटच्या प्रकरणाचं अर्ध्यावरच सोडलं मागे आपण. यंदा लायब्रीची इमारत बांधायला त्यांना झेड. पी.कडून एक लाख रुपय मिळायचं घाटतं आहे. आम्हाला साध्यासुध्या गोष्टींसाठी त्रास देतात सभापती आणि त्यांचे कुत्रे. आपणही आता त्यांच्याच पद्धतीनं वागलं पाह्यजे. मार्चच्या आताच सुरुंग लावला पाह्यजे. इलेक्शनच्या तारखा अजून जाहीर झाल्या नाहीत. काय उपयोग म्हणा लिहूनसुद्धा-दहा वर्षांपासन्न लिहितोय पण निवडणुकीत पुन्हा येतातच निवडून. कंटाळा आलाय आपल्यालासुद्धा. गप्प बसवत नाही म्हणून चालवायचं झालं.

असं म्हणून ठोसर खिन्नपणे हसले.

मग ते चांगदेवला म्हणाले, तुमचं नावबीव आहे की नाही मतदारांच्या यादीत? नव्यानं आलात तेव्हा घालून टाका एक अर्ज करून. भोळेसाहेब तर कॉंग्रेसचे मतदार आहेत पहिल्यापासून, तुम्ही एक विरोधी पक्षाचे झालात म्हणजे समतोल तरी होईल.

हिंदुत्ववादी भोपटकर म्हणाले, ह्या कॉंग्रेसवाल्यांना लाखो मतं पडतात, मतदान म्हणजे निव्वळ फार्स झाला आहे. पार्लमेंटच्या बैलांच्या गर्दीत आपली शंभर माणसं तरी काय करणार? खरं तर निवडणुका घेता याव्या म्हणून कॉंग्रेसच विरोधी पक्षांना जिवंत ठेवत असावी. काय भोळे? हॅ हॅ हॅ.

भोळे म्हणाला, आता सगळे ब्राम्हणच विरोधी पक्षात शिरल्यावर ते पक्ष फोफावतीलच कसे? ब्राम्हण आणि लोकशाही हे अहिनकुलवत एकत्र येणार कसे?

ठोसर हसून म्हणाले, यांच्यातला जोतिबा फुले जागा होतोय बरं का भोपटकर! सांभाळा!

भोळे म्हणाला, फुल्यांनी खरोखरच लिहून ठेवलं आहे... की भट ज्या शहरात राहतो त्या शहरातल्या सगळ्यांना तो उपदेशक म्हणून ठाऊक असतो, परंतु आपल्या मजल्यातल्या बिऱ्हाडकरूस हा गोमाजी माहीत नसतो!... असे भट सगळे विरोधी पक्षात घुसल्यामुळे आपली लोकशाही एकखांबी झाली आहे. ब्राम्हण नेते असल्यावर कशाचा कम्युनिझम आणि कशाचा सोशालिझम्? सगळे ब्राम्हो-कम्युनिस्ट आणि ब्राम्हो-सोशालिस्ट! ख्यॅ ख्यॅ ख्यॅ. खरं तर तुमचा जनसंघच एक प्रामाणिक पक्ष आहे की जो जातिसंस्थेचं उघड समर्थन तरी करतो.

नेहमी जाकीट घालणारे सहस्रभोजने म्हणाले, त्याच्यात काय वाईट आहे? ह्या भक्कम जातिसंस्थेवरच आपला हिंदुसमाज अनेक संकटातून जिवंत राहिला, राहात आहे आणि राहील—

चांगदेव म्हणाला, मला ह्याविषयी डॉ. आंबेडकरांचा एक विचार आठवतो. आंबेडकर ह्या हिंदूच्या टिकून रहाण्याच्या हुकमी एक्क्यावर म्हणतात की समाज जिवंत रहातो की मरतो हा प्रश्न गौण आहे. खरा प्रश्न कोणत्या पातळीवर, दर्जावर समाज जिवंत रहातो हा आहे. हिंदू कायम हार खात जगात आले, मानानं लढणारे समाज कधीच खतम झाले! कायम जिवंत रहात आलेला व राहील असा हा समाज नाही, तर कायम मरू घातलेला हा समाज आहे! कुठल्याही हिंदूला लाज वाटावी असं हे हिंदू संस्कृतीचं टिकून रहाणं आहे.

ठोसर भोळेकडे पहात म्हणाले, आम्हाला त्याचीसुद्धा लाज वाटत नाही, उलट अभिमान वाटतो!

भोळे म्हणाला, ठोसरसाहेब, मी असं एक पाह्यलं आहे की ब्राम्हणांनाच ह्या जातिनिहित हिंदू संस्कृतीचा अभिमान वाटतो. कारण माझ्या मते ब्राम्हणालाच ही जातिसंस्था ज्यास्त अधिकार देत आली म्हणून ब्राम्हणालाच ती टिकवायची आहे, कारण त्यात ब्राम्हणाचं ऐतखाऊ व्यक्तिमत्त्व अबाधित रहाणार होतं. ह्यापुढे हे टिकणार नाही. चातुर्वर्ण्याच्या पायावरच कुऱ्हाड घातली पाहिजे.

ठोसर म्हणाले, सगळ्याच देशात ब्राम्हणांचा एक वर्ग असतोच. प्रत्येक देशात विद्वान असतातच, आणि प्रत्येक देशात शूद्रही असतातच. असा कोणता मानवी समाज आहे की तिथे चातुर्वर्ण्य नाहीत? सांगा. आमच्या धर्मग्रंथात हे चिरंतन तत्त्व सर्वांआधी ठासून मांडलेलं आहे. श्रेष्ठ कनिष्ठ गुणकर्मशः भेद सर्वत्र सर्वकाळ रहाणारच.

चांगदेव म्हणाला, पूर्वी एका काळी ही रचना ठीक असली तरी ब्राम्हणाच्या मुलानं निव्वळ जन्मानं श्रेष्ठ, विद्वान, हे तुम्हाला बरोबर वाटतं का?

ठोसर म्हणाले, तुम्ही लोक शास्त्रीय विचारच करत नाही आणि त्यामुळे तुमची डोकी फिरतात. समाजात प्रत्येकाची, प्रत्येक समूहाची काही परंपरेनं चालत आलेली मालमत्ता असतेच. बुद्धी, कौशल्य, दर्जा ही सुध्दा एक मालमत्ताच आहे. ब्राम्हणांच्या मुलांनाही वंशपरंपरेनं काही मालमत्ता येणारच की नाही? हे बघा, तुमचा स्वतःचा मुलगा तुम्हाला इतरांच्या मुलांपेक्षा जवळचा वाटणारच की नाही? तुमच्या कुटुंबियांना

तुम्ही कधी अंतर पडू देत नाही. जवळच लोक नेहमी जवळचेच वाटणार... अशीच जात बनते. जे अखिल मानवजातीच्या गप्पा मारतात त्यांना म्हणावं तुमची मालमत्ता तुमच्या पश्चात तुम्ही स्वतःच्या मुलांना देता की इतरांच्या? आणि का द्यावी? प्र.के. अत्रेनं काय केलं? तर आधी स्वत:पासून कुटुंबाकडे मग ज्ञातीकडे आणि हळूहळू सबंध विश्वाकडे उन्नयन करणारी अशी ही चिरंतन हिंदू-कल्पना आहे.

भोळे म्हणाला, हळूहळू सबंध विश्वाकडे तेवढी तुमची संस्कृती जात नाही, ज्ञातीपर्यंतच थांबते ही तर खरी मेख आहे. म्हणून हे उन्नयन विसरून माणसानं माणूस म्हणून जगावं असं तत्त्वज्ञान जास्त उपकारी होईल.

तेव्हा ठोसर म्हणाले, तुम्हाला ब्राम्हणांच्या शाळांमधे मुलं घालावीशी वाटतात, तुम्हाला आमची संस्कृती पाहिजे पण आम्ही नको! ब्राम्हणांचे उच्चार तुम्ही शिकता, ब्राम्हणांचं वळण, ब्राम्हणांची रहाणी तुम्हाला हवी, पण ब्राम्हण मात्र नको!

भोळे म्हणाला, तुम्ही आपण होऊन दुसऱ्यांना हे दिलं असतं इंग्रजांसारखं तर हा ब्राम्हणव्देष जन्मालाही आला नसता. असं इतिहासात-पुराणांत एकही उदाहरण नाही की ब्राम्हणांनी आपली विद्या शुद्रांचा उद्धार व्हावा म्हणून उदार मनानं दिली. उलट तुम्ही ती मतलबीपणानं कुलपात ठेवून सडू दिली आणि देशाला खड्ड्यात घातलं.

चांगदेव म्हणाला, ह्या जातीच्या बळावर फक्त त्या त्या जातीतले निर्बुद्ध लोकच वर जाताहेत आणि प्रत्येक जातीतले उदारमतवादी लोक मागे पडताहेत असं तुम्हाला वाटत नाही?

लहान मेंदू मोठा व मोठा मेंदू लहान असलेला देशपांडे म्हणाला, अहो आमचा भाचा इतका बुद्धिमान आहे, कायम फर्स्ट क्लास. पण त्याला परवा एम्.पी.एस्.सी. मधे इंटरव्ह्यूत गाळलं, कुठे ब्राम्हणांना जागा राहिल्या नाहीत-फार गरिबी आहे घरी, अशांनी कुठे जावं?

भोळे म्हणाला, हेच म्हणत होतो मी. तुम्हाला फक्त ब्राम्हणांचीच गरिबी तेवढी असह्य वाटते. बाकीच्या जातींची गरिबी तर तुम्ही कथाकादंबऱ्यापासून गृहीतच धरलेली आहे. किती गरीब कोळी, माळी, शिंपी, सोनार, महार, कुणबी हुशार असून मागे रहातात, याची तुम्हाला दखलही घेववत नाही. जणू काही प्रत्येक गोष्ट मिळणं हा फक्त ब्राम्हणांचाच अधिकार आहे. सगळ्याच गरीब बुद्धिमान पोरांबद्दल बोलत जा. आणि ह्या संघवाल्यांनी गोवधबंदीचं कसलं आंदोलन सुरू केलं आहे? तुम्हा ब्राम्हण मंडळींना नुसत्या गायी पाळा म्हणायला काय जातं? कोणते ब्राम्हण गायी पाळतात? दाखवा बरं एक तरी? म्हणजे गायी म्हशी पाळणारे कुणबी लोक बिचारे शेणामुताच्या वासात गोठ्यापाशी रहाणार! आणि तुम्ही पांढरपेशे स्वच्छ ब्राम्हण शहरातल्या सुंदर रंग लावलेल्या, पुढे छानसा फुलांचा बगीचा असलेल्या टुमदार वस्तीत रहाणार! आणि समजा की एखाद्याला गोमांस आवडत असलं तर किंवा प्रोटीनसाठी गोमांस आवश्यकच असलं तर का खाऊ नये?

भोपटकर म्हणाले, ह्या देशात ते आम्ही चालू देणार नाही. भारताची संस्कृती ही इतर सगळ्या देशांपेक्षा-जगापेक्षा वेगळी आहे. आज जगातल्या प्रमुख संस्कृती म्हणजे ख्रिश्चन जग-सगळे अमेरिका खंडातले देश, युरोप, ऑस्ट्रेलिया, आणि ख्रिस्ती

संस्कृतीतूनच जन्मलेले रशिया-चीन वगैरे कम्युनिस्ट देश आणि ख्रिस्ती-हिब्रू संस्कृतीशी नातं सांगणारे एकेश्वरवादी मुसलमान देश-या सगळ्यांपासून ज्याअर्थी आपली संस्कृती वेगळी राह्यली, वेगळी जोपासली गेली, आणि टक्कर देऊन टिकली-त्याअर्थी हिंदू संस्कृतीचं एक स्वतंत्र अस्तित्व मान्य करणार की नाही तुम्ही?

भोळे म्हणाला, हे मला मान्य आहे. पण आपल्या श्रद्धा म्हणजे ब्राम्हणी श्रद्धा निव्वळ नकोत. वारकरी, महानुभाव यांच्याही श्रद्धा ब्राम्हणांनी थोड्याशा जवळ घ्याव्या. भेदाभेद नको, स्त्रीपुरुष यांच्यात आर्यसंस्कृतीइतकं अंतर नको-हेही ब्राम्हणी पक्षांनी पुढे मांडावं. निव्वळ गायी आणि वेद हेच नको. ह्या बहुतेक संघवाल्यांची मुलं इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये जातात. स्वभाषा मात्र नको पण देशाभिमानाचं स्तोम दुसरीकडे. विचारा भोपटकरांना, तुमची मुलं कुठल्या शाळेत जातात हो?

कॉन्वेंटमधे-त्याचं कारण—

कारण सांगू नका. तेवढं पुरे आहे!

ठोसर उठून म्हणाले, चला, खूप चर्चा झाली. पहा. सहस्त्रभोजने, आपल्या संस्थेत किती भिन्न विचारांची माणसं आहेत! आणि तरी आपल्यावर लोकांचा आरोप की आम्ही फक्त हिंदुत्ववादी लोक घेतो!

मग ते सगळे निघाले. बाहेर चांगदेव भोळेला म्हणाला, चांगला वाटतो ठोसर गृहस्थ. ढोंगीपणा नाही अजिबात.

भोळे म्हणाला,स्वतंत्रपणे ही सगळीच माणसं चांगली आहेत हो. पण साले एकत्र आले की निव्वळ जातीय राजकारण खेळतात.

शिवाय इतकं स्पष्ट तुम्ही बोलता पण तुमच्यावर राग दिसत नाही.

भोळे म्हणाला, नाही. तसं आमचं पहिल्यापासून चांगलं आहे. पण राग नाही तरी तिकडंबाज देशपांडे किंवा बिल न देणारा यजुर्वेदी त्यांना जितका आपला वाटेल तितका मी वाटणार नाहीच. वेळेवर ते त्यांनाच मर्जी दाखवणार.

तुमचे विचार वेगळे असल्यावर तुम्ही एवढं सोसलंच पाहिजे की.

अर्थात. माझी त्याचीही तयारी आहेच. प्रमोशन वगैरे देतांना तुम्ही म्हणता तो राग बाहेर येतो. आता ज्यांना वरच्या ग्रेड मिळतील त्यात मी नसणार हे नक्की. पण आपण आपले विचार झाकून ठेवणार नाही. तेवढी तरी ह्या कट्टर लोकांना तडा जाते.

चांगदेव म्हणाला, हे अशा लोकांच्यात दिवस कायम काढणं फारच कठीण आहे. आपला आपला काही वेगळाच मार्ग काढला पाहिजे. दररोज आजचा दिवस छान जाईल असा तरी निदान.

एकदा दुपारी जेवायला कुठे जावं याच्या विचारात असतांना आज टूरिस्ट हाटेलवर जाऊन सबंध दिवस तिकडेच राजेश्वरीकडे काढावा असं त्याला वाटलं. तेवढ्यात दारावर टकटक वाजलं आणि राजेश्वरीच दारात उभी. ती आल्याआल्याच म्हणाली, उद्यापरवा मी निघते आहे. आजच पत्र आलं. म्हटलं, तुला उद्याची रजा काढायला

सांगावी आणि हिंडावं.

आताच दिवाळीची सुटी संपून कॉलेज सुरू झालं आहे. पण कॅज्युअल लीव काढता येईल. एनीवे, तू जाणार हे काही बरं नाही.

ती गोड हसून म्हणाली, सर, यू अँड आय मस्ट पार्ट, बट दॅट्स् नॉट इट...

कुठलं नाटक वाचलं आज? शेक्सपिअरची ओळ दिसतेय. कुठलं?

ती खिडकी उघडत म्हणाली, ओळख!... घर बाकी छान आहे, एवढ्या घराचं काय करतोस तू?

रहातो! ऐसपैस रहातो!

ऐसपैस राहाणं! ग्रेट. माझी मुंबईची खोली म्हणजे ह्या खाटेच्या सुमारे चारपट जागा असेल... इकडे मागेही कुणी रहातं? शेजारी कसे आहेत?

सगळे गृहस्थी लोक आहेत. ह्या लग्न झालेल्या लोकांचं सगळं मजेदारच असतं. आमच्या मागचे वैद्य तर भाजीला गावात निघाले तर पोरांना सांगत जातात, येतो हंऽ! आलोच हंऽ! त्यांना थोडा उशीर झाला की मुलं न् बायको बाबा बाबा करत माझ्या ह्या खिडकीखाली गोंधळ करत बसतात. दरवेश्याच्या अस्वलासारखंच वाटत असेल ह्या लोकांना; नाही? जणू काही एक अदृश्य दोरीच घराला बांधलेली-दोरी ताणली गेली की कुठूनही घराकडे परत यायचं.

छान वाटत असेल तसंच. आपल्यासारख्यांना रानटी पशुंसारखं निवारा कुठेही मिळेल तिथे कसंही रस्ते काढत परत यायचं. काही कुणाशी बांधल्याची भावनाच नसते.

त्यात काय चांगलं आहे? ह्या वैद्य कुटुंबाचा वैताग मी तुला सांगितला नाही अजून. चोवीस तास काहीतरी आवाज येत असतात त्यांच्याकडून. घरात ढेकूण, डास, झुरळं. आणि पाहुणे तरी किती येतात त्यांच्याकडे बाप रे बाप. रात्रीसुद्धा मुलांची किरकिर कायम चालू असते. म्हातारा रात्री केव्हाही दिवे लावून भिंतीवर ढेकुण शोधत असतो. रात्री मधेच एखादं पोरगं किंचाळून उठतं. आणि घरातली वीसेक माणसं त्याला गप्प करत असतात विनाकारण. लहान पोरांनासुद्धा मच्छरदाणी नाही. पोरांना चावत असणार डास रात्रभर. त्यांची पोरं माझ्याकडे आली की माझी सगळी बिस्किटं खाऊन टाकतात. पोरांना खाऊ आणायची कल्पनाच नाही ह्या लोकांना. आणि माझ्याएवढ्याच तीन खोल्यांच्या घरात माणसं तरी किती! एक वैद्यांची आजी, आजोबा-सत्तरीतले म्हातारे, वैद्यांचे आईवडीलही पन्नाशीचे, दोन धाकटे भाऊ आहेत वात्रट, पुन्हा वैद्यांचाच एक तरुण भाऊ आणि त्याची बायको हे दोघं एक खोली अडवून बसतात पलीकडची, त्यामुळे म्हाताऱ्यांचा आणि वैद्यांच्या सगळ्या कुटुंबाचा गोंधळ इकडच्या माझ्याकडच्या खोलीत कायम. निव्वळ जत्राच. काय सगळे मोठमोठ्यानं बोलत असतात. खेकसतच असतात सगळे एकमेकांवर. वैद्याची बायको फारच साधी बाई आहे बिचारी. सगळ्यांचं मुकाट्यानं करून पुन्हा पोरांचंही प्रेमानं करत असते. आणि रात्री केव्हाही वैद्यांचा म्हातारा भजन केल्यासारखा नुस्ता टाळ्या वाजवतो मोठमोठ्यानं उगाच.

तो हे सांगत असतांना ती मधेमधे कशालाही हसत, खिदळत होती. ती म्हणाली, फार इंटरेस्टिंग आहे असं कुटुंब. चांगलं असतं उलट अशा एकत्र कुटुंबात. म्हाताऱ्या

स्वैंपाक करत असणार, मग पोरांचं आणि पुरुषांचं राहतंच काय करायचं त्या बाईला? बरं असतं माणसं भोवती बोलतचालत हसतखिदळत असली म्हणजे. नवराबायकोच्या विभक्त कुटुंबात काय ओढाताण असते! पुन्हा बायकोही नोकरी करणारी असली की विचारू नका. मुलं सांभाळायला एक बाई, स्वैंपाकपाण्याला दुसरी, पुन्हा भांडी-कपडे ह्यांना तिसरीच. पैशे देऊन भाड्यानं अशा परक्या बाया ठेवल्यापेक्षा आपलीच माणसं बरी घरात.

अशा पोरांना सांभाळायला बाई ठेवून आपण नोकरी करणाऱ्या बायका मला मूर्खच वाटतात. आपण पैशांसाठी दुसरे उद्योग करायचे, शाळाकॉलेजात दुसऱ्यांच्या मुलांना शिकवायचं आणि इकडे आपली पोरं अडाणी बायकांच्या हातात द्यायची. अशांची पोरं हटकून बुद्दूद होत असणार.

तेही बरोबर आहे... पण इतकं शिकल्यावर पुरुषाइतकीच नोकरीची पात्रता असतांना अडाण्यासारखं बसून रहाणं काही चांगलं नाही. कुटुंबाचं पोट भरण्याचं समाधान आता बायकांनाही मिळू द्या की. नोकरीमुळे स्वतंत्र असल्याची स्वाभिमानाची जाणीव बायकांना होते. खरं म्हणजे नवऱ्यांनीच बाहेर ढोरकाम करून थकून यावं आणि बायकांनी घरात आराम करावा हा मध्यमवर्गी पॅटर्न पुरुषांनीच मोडला पाह्यजे! ह्या आळशी बायकांनी नवऱ्यांना मोठेपणा देऊन बैल केलं आहे इतके दिवस. बायकांची ही लबाडी टिकू देऊ नये. त्यांना नोकऱ्या करू द्यावा.

निव्वळ पैशांचा मोह आहे ह्याच्यामागे-बाहेर पाचसहाशे रुपये कमवायचे आणि घरात तीस रुपयांत तीन बाया ठेवून उरलेले शिल्लक टाकायचे असा धंदा आहे हा!

काय हरकत आहे समजा पैशांसाठीही नवराबायकोंनी नोकरी केली तर? बायकांना स्वतंत्र जगण्याची पद्धत तरी ह्या पैशापायी कळते.

मला तर वाटतं नोकरीमुळे बाहेरच्या जगाशी व्यापारी पद्धतीनं जुळतं घ्यायची सवय लागते, उलट गुलामगिरीच वाढते.

तू बेकार लोकांचे हाल पाह्यलेले दिसत नाही. माझा एक भाचा पहा-निरर्थक शून्यवादी गप्पा मारतो, निराशावाद लावत असतो कशालाही. आपल्यासारख्यांना किती झालं तरी कामामुळे निरोगी, दणकट मानसिक आरोग्य येतं. मला तर वाटतं प्रत्येक कामाचा मोबदला मिळालाच पाह्यजे. बायकोनं स्वैंपाक केला त्याचाही पगार दिला गेला पाह्यजे. फुकट बायकांकडून कामं करून घेणं हा जुन्या सरंजामशाहीचा अवशेष आहे. म्हणून आपल्या बायकांचा स्वाभिमान गेला. प्रजाही त्यामुळे दुबळी निपजत राह्यली. बायकांनी कमावलचं पाह्यजे, समाधानासाठी तरी. गुजराथेत तर कितीतरी बायका दररोज आत्महत्या करून घेत असतात. जगणंच ओझ्यासारखं वाटल्यावर दुसरं काय करणार?

पण त्यामुळे व्यापारी वृत्तीच्या नवऱ्यांकडून बायकांचं निव्वळ पैशांसाठी शोषण व्हायची जास्त शक्यता असते. घरात प्रेम, भावनांचा ओलावा हाच जास्त महत्त्वाचा असतो. विशेषतः घर मुलांसाठीच असतं, तेव्हा बायकांनी नोकऱ्या करणं मुलांसाठी तरी बरं नाही. खाद्यापेक्षाही आईचं प्रेम पाह्यजे.

हे मला पटतं. आमच्या शेजारी मुंबईला असंच नवराबायको प्राध्यापक असलेलं

एक कुटुंब आहे. ते मुलांना काय काय खायला आणून टाकतात-दुधाचे डबे, दुधाच्या बाटल्या, व्हिटॅमिनचे ड्राप न् सायरपं, टॉनिकं, मोसंबी, प्रोटीनचे डबे काय काय, अंडी-निव्वळ खायचेच उद्योग मुलांना दिवसभर. शिसारी येते ते पाहून.

आणि ह्या आमच्या वैद्यांकडे तर तीन पोरं इतके लोक, पाव्हणे वगैरे असून फक्त एक लिटर दूध घेतात. फळं नाहीच.

पण मला वाटतं फार स्टॅण्डर्ड वगैरेच्या हव्यासापेक्षाही माणुसकी जास्त महत्त्वाची असते. इतके पाहुणे येतात म्हणजे किती लोकांवर उपकार असतील त्यांचे. कुणी हॉस्पिटलमध्ये, कुणी कशासाठी असे खेड्यावारचे लोक येतात. त्यांना उतरू देणं म्हणजे परोपकार करणं चांगलंच नाही का? मला वाटत साधं रहावं पण गृहस्थी व्हावं. शिवाय असं राह्यल्याशिवाय माणुसकी वाढत नाही. स्वच्छ, टिपटाप, ज्यादा शिस्त पाळणारे लोक क्षुद्र मनाचेच असतात.

तिची पोक्त सर्वज्ञ बुद्धिमत्ता पाहून तो चकित झाला. आणि म्हणाला, हे मात्र बरोबर आहे. वैद्य कुटुंब अतिशय मोठ्या मनाचं आहे. माझे निरोप घेऊन ठेवणं, दूध घेऊन तापवून ठेवणं आणि मी आल्याबरोबर मुलांना पाठवून ते कळवणं. अधूनमधून चांगलं काही केलं तर ताटात वाढूनही पाठवतात. गर्दी असते तिथे आपोआपच मनं मोठी होत असतील. एकमेकांना सहन करण्याची शिस्तही मोठीच म्हटली पाहिजे. मी सुद्धा मोठ्या कुटुंबात राह्यल्यानं लहानपणी मोठ्या मनाचा होतो. पण आता एकटं एकटं राहून क्षुद्र झालो आहे. माझ्याकडे तर एक पाहुणा उतरला तर मला ते सहन होणार नाही.

मग ती म्हणाली, मला गृहस्थी लाइफ आवडतं. पण दुसऱ्यांचंच! मुलंही आवडतात, पण दुसऱ्यांचीच!

तो म्हणाला, स्वतःचं का नाही आवडत?

ती म्हणाली, त्याला काही अर्थ नसतो. प्रेमं, लग्न ह्या सगळ्या कल्पना असतात. आपल्या विकारांचे ते सुंदर पोषाख असतात. निव्वळ मेक अप, कॉस्मेटिक्स!

मग आपण प्रेम तरी का करावं?

ती म्हणाली, करूच नये! नुस्तं मानसिक प्रेम म्हणजे मूर्खपणाच असतो. पण लग्न न् नवरा ह्या गोष्टीही मला विचित्र वाटतात. स्वयंपाक करा, कायम बरोबर रहा, हे असंस्कृत मध्ययुगीन अवशेष मला विचित्र वाटतात. तुला नाही वाटत?

तो हसून म्हणाला, मला अगदी तसं नाही वाटत. तुझ्यासारख्या प्रगत बायका झाल्यावर मध्ययुगीन काहीच टिकणार नाही.

मग तो चहा करू म्हणाला. तेव्हा ती म्हणाली, मी करते. मला दाखव कुठे काय आहे ते.

तो म्हणाला, तू चहा करणं म्हणजे मध्ययुगीन होईल! मीच करतो. पुन्हा सगळ्या वस्तू दाखवायचा ताप चुकेल.

ती मधुर हसली. तो चहा करत असताना बिस्किटांचा डबा तिच्यासमोर ठेवत म्हणाला, तू फार क्रूर आहेस. पण मला क्रूरपणा आवडतो ते वेगळं.

खरंच? फारच थोड्या पुरुषांना मी आवडते. पण मला जे पाहिजे तेच करण्याचा,

तसंच असण्याचा मला हक्क पाहिजेच.

चहा झाल्यावर ती म्हणाली, चला! आपण आज तिकडेच जेवू. आणि उद्या आपल्याला एका नबाबाकडे जायचं आहे दुपारी. मला इथून निघायच्या आधी डिपार्टमेंटला त्याच्या कलेक्शनबद्दल रिपोर्ट करायचा आहे. म्हणजे परवा मला निघता येईल.

मग ते बाहेर पडले.

दुसऱ्या दिवशी वर्गात शिकवतांना तो एकसारखा अडखळत होता. चुका करत होता. एकसारखी राजेश्वरी समोर होती. वर्गातल्या पदर लपेटून बसलेल्या एका बाजूची मुलींची रांग आणि दुसऱ्या बाजूच्या मुलांच्या रांगा, एकमेकांकडे कायम चोरून पहाणारी मुलंमुली त्याला भयंकर घाणेरडं वाटत होतं. ह्या मुलींना राजेश्वरीसारखं स्त्रीत्व ओलांडून गेल्याशिवाय मुक्ती नाही. पण तसं वातावरण, तसं शिक्षण द्यायला आपण असमर्थ आहोत. आपली शाळाकॉलेजं, शिक्षणपद्धती असमर्थ आहे. काल रात्री जेवण झाल्यावर ती दोघं बागेच्या काठाकाठानं खूप लांबपर्यंत फिरायला गेली. परत आल्यावर तिला हाटेलच्या पोर्चमधे सोडून तो परत आला.

आज पुन्हा ती वाट पाहात असणार.

तास झाल्यावर मित्रांना टाळून तो रिक्षा करून हाटेलवर आला. ती खाली आल्यावर चहा घेऊन लगेच ते त्याच रिक्षानं गावाबाहेर कुठेतरी एका लांबच्या जुन्या काळच्या वस्तीकडे शेतं मागे टाकत चालले. रिक्षावाल्याला नक्की रस्ता माहीत नव्हता, आणि वेड्यावाकड्या गाडीरस्त्यावर खड्डे चुकवत तो रिक्षा जोरात हाणत होता. खड्ड्यात रिक्षा सापडली की ती दोघं एकमेकांवर आपटायची. शिकस्त करूनही अंगाला अंग लागणं टाळता येत नव्हतं. त्यातून तिचे भुरभूर उडणारे सुगंधी केस चांगदेवच्या चेहऱ्यावर कायम आपटत होते. ती अधूनमधून केस धरून ठेवायची. पण खड्डा आला की ती कोसळायची आणि हात सुटायचा. पुन्हा त्याच्या तोंडावर भुरभूर आपटणारे मऊ रेशमी केस. त्याला हे मजेदार वाटलं. त्यानं हसून तिच्याकडे पाह्यलं. तीही मधुर हसली.

दुरून नबाबाची गढी दिसायला लागली तेव्हा रिक्षावाला स्वत:शी बडबडत म्हणायला लागला, इसमे एक फिल्मकी शूटिंग हुई थी भूतबंगला करके. मुष्किल है, ऐसेमे नबाब लोग रहा करते थे!

गढीपुढे रिक्षा थांबली. तिनं चांगदेवला पैसे देऊ दिले नाही. पण रिक्षावाला तिच्याजवळून पैसे घेईना, त्यानं चांगदेवकडूनच घेतले. ती म्हणाली, नंतर तुला घ्यावेच लागतील. रिक्षावाला गेला तेव्हा गढीचं दार उघडून एक म्हातारा नोकर अत्यंत अदबीने सलाम करून त्यांना आत घेऊन गेला. आतलं सुंदर वास्तुशास्त्र, लाकडी सज्जे, घोड्यांच्या पागेच्या जागेनंतरचा तलाव, हौद, मोडकी कारंजी, जुनी प्रचंड झाडं, सुकलेला बगीचा, जुनं सुंदर लाकडी काम पाहून राजेश्वरी हरखून गेली. बैठकीत

लोडाजवळ बसले असतांना थकलेला, निजामी टोपी घातलेला नबाबाचा म्हातारा दिवाण आला. राजेश्वरीला इंग्रजीशिवाय कोणतीच भाषा येत नसल्यानं सगळं बोलणं चांगदेवलाच मोडक्या उर्दूतून करावं लागलं. दिवाणाला कशात रस उरला नव्हता. अत्यंत अदबीनं त्यानं त्या दोघांना लवून सलाम केला. त्याला उत्तर म्हणून राजेश्वरीनं एक हात वर केला. आणि चांगदेवनं दोन्ही हात जोडून नमस्कार केला. चांगदेव म्हणाला, आपली दोघांचीही संस्कृती मुसलमानांपेक्षा हलकी आहे हे एवढ्यावरून सिद्ध झालं!

मग चहा वगैरे होताहोता दिवाणानं नबाबाचं हैद्राबादहून आलेलं उर्दू पत्र त्यांना दाखवलं. त्याचा पत्ता राजेश्वरीनं लिहून घेतला. अटी वगैरेंची नोंद केली. सगळ्या वस्तू एकदम घेतल्या तरच देऊ असं नबाबसाहेब म्हणतात असं दिवाण म्हणाला. मग एका नोकराला किल्ल्यांचा जुडगा देऊन वरचे तिन्ही हॉल दाखवायला सांगून दिवाण तिथेच बसला. ते वरती अंधाऱ्या जिन्यातून एकमेकांना आधार देत वर आले.

वरती राजेश्वरीनं एकेक पेंटिंग कसोशीनं पाहून, चित्रकाराची सही नीट निरखत, धूळ झटकून पुसून लांबून पहात एकेका चित्राची यादी करत मन लावून काम सुरु केलं. अधूनमधून चांगदेव मदत करत होता. काही ब्रिटीश ऑफिसरांची चित्रं होती. काही एकोणिसाव्या शतकातल्या युरोपियन प्रवाशांची, काही रविवर्म्याची. एक टिपू सुलतानाचं सुंदर पोर्ट्रेट होत. एक रविवर्म्याचं नलदमयंतीचं. ती म्हणाली, हे नलदमयंतीचं ओरिजिनल रविवर्म्यांचं चित्र बडोद्याला गायकवाडांकडे आहे असं समजलं जातं. खरं हे इथे आहे म्हणजे आमच्या म्युझियमचं आकर्षण वाढेल.

चांगदेव ते चित्र भिंतीला लावून लांब मागे जाऊन पहात म्हणाला, सुंदर आहे.

ती मागे सरत चित्रावर डोळे लावून म्हणाली, खास काही नाही. झोपलेली दमयंती पहा. आपले लोक नग्नता टाळायच्या सांस्कृतिक आदर्शामुळे चित्रसुद्धा किती बिघडून टाकतात! रोमन लोकांनी हेच चित्र किती छान काढलं असतं. इथेही लिंग, स्तन वगैरे झाकण्याची रविवर्म्याची कोण धडपड. दमयंतीची छातीसुद्धा झाकून टाकलीय.

चांगदेव म्हणाला, भारतीय चित्रकार असंच काढणार. तुझ्यासारख्या बायासुद्धा अमेरिकन केशभूषा, रंग सगळं घेणारं, पण पुन्हा साडीचोळी इंडीयनच. अमेरिकन नग्नता नको.

ती हसून दुसरं चित्र पहात म्हणाली, तसं राह्यलं तर तुझ्यासारखे माझ्याजवळ येणारसुद्धा नाहीत!

तो म्हणाला, खरं तर तुला नाटक लिहायला ही चांगली गोष्ट आहे नलदमयंतीची.

सबंध नाटक होईल ह्या गोष्टीचं? मला पूर्ण माहीत नाही ही गोष्ट कदाचित.

मी सांगतो नंतर सबंध गोष्ट. माझी ही फार आवडती गोष्ट आहे.

नंतर चित्रांची यादी संपवून तिनं बाजूच्या हॉलमधल्या अनेक वस्तूंची भरभर टिपणं केली. जपानी पार्टिशनाचं स्टॅण्ड, जुनं सुंदर शिसवी फर्निचर, चिनी बरण्या, भांडी, शस्त्रं-सगळं नको असल्यासारखं एकेका कोपऱ्यात धूळ खात पडून होतं. नबाबसाहेबांनी कुठल्या देशातून, कोणाकडून, केव्हा, कसं हे सगळं जमा केलं, इथे आणतांना कसकसा त्रास झाला हे कंटाळा येईपर्यंत नोकर सांगत होता. त्या त्या वेळी

आपलं वय काय होतं हेही तो अचूक सांगायचा. दरवेळी शेवटून तो खालच्या सुरात म्हणायचा, गये वो दिन बाईसाब. अब क्या रहा, क्या रहेगा? तिथे एका काचेच्या कपाटात जुने मोठमोठे चांदीचे दागिने होते. ते पाहून राजेश्वरी हरखून गेली. ती चांगदेवला म्हणाली, असे दागिने आता कुठे मिळतील?

चांगदेव म्हणाला, जुन्या मोडीच्या दुकानात मिळतील. अजून खेड्यात असे दागिने क्वचित वापरतात.

ती उत्साहानं म्हणाली, आज शोधायचे आपण? इथून निघाल्यावर?

मग सगळी यादी पूर्ण झाल्यावर जांभया देत ती कागद गुंडाळून चला म्हणाली. पुन्हा जिन्यात एकमेकांचा आधार घेत ते खाली उतरले. दिवाणखान्यात तिनं नबाबाच्या दिवाणाला लवकरच आम्ही पत्रव्यवहार करू म्हणून कळवलं. मग दिवाण त्यांना बाहेरपर्यंत सोडायला आला. रिक्षा गावातून मागवून आणतो असं तो म्हणाला. तेव्हा ती चांगदेवला म्हणाली, नको ना? आपल्याला दागिन्यांची दुकानं पहायची आहेत. पायीच जाऊ.

देवडीवरचा म्हातारा नोकर म्हणाला, किधर जानेका है? ऐसे तल्लेके बाजूबाजूसे सीधे उस पार चले जाना. उधर रिक्षा नही तो टांगा रहताच है. बस भी मिलेगा.

मग तळ्याच्या काठाकाठानं ते चालत निघाले. मधे टेकडीचा लांब चढ लागला. हळूहळू उन्हानं चेहरे तापून निघाले. ती वर येईपर्यंत थकून गेली. चेहऱ्यावरचे रंग घामानं वेडेवाकडे झाले. त्यामुळे ती आणखीच मजेदार दिसायला लागली. तो पुढे जाऊन थांबायचा आणि हळूहळू पाय टाकत येणाऱ्या तिच्याकडे पहात राहायचा. मग जवळ आली की ती सुंदर हसायची आणि ते चालू लागायचे. बाभळींमधून रस्ता काढत ते टेकडीच्या टोकावर आले. खालचं तळ पाहात ते तिथे उभे राहिले. लांब एक तिरप्या पंखांचा पक्षी भिरभिरत होता. ती म्हणाली, बसू या थोडा वेळ. सुंदर गाव आहे हे. यु आर लकी. मला पुन्हा इथे यायला मिळणार नाही.

आजूबाजूच्या विस्तीर्ण कुरणांनी, एकसारख्या लखलखीत उन्हानं आणि अफाट अंतरानं तिला स्वतःचं भान विसरून गेल्यासारखं झालं. अतिशय खिन्न होऊन ती गुडघ्यावर मान टेकवून तळ्याकडे पहात बसून राहिली. ती आध्यात्मिक होत चालली.

चांगदेव तिला उत्साह आणावा म्हणून म्हणाला, इतकी चित्रं पाहूनच आधी थकवा येतो. त्यात रस्ता काहीतरीच आहे. झालं, तो पलीकडे रस्ताच दिसतोय.

तरी ती आध्यात्मिक मुद्रेनं तशीच बसून होती. त्यानं बोलावं असं तिला वाटत होतं. चांगदेव म्हणाला, ती नलदमयंतीची गोष्ट वाटते तितकी उथळ नाही. तुला आवडेल.

तिला थोडाफार उत्साह आला. ती म्हणाली, नल म्हणजे गॅम्बलर होता, ही ना-अशीच सुरुवात ना?

त्याच्याही आधी खूप आहे. चला, आपण चालता चालता बोलू. तुझं ते मोडीचंही दुकान शोधू.

मग चालत चालत मधेच थांबत त्यानं नाटकाच्या दृष्टीनं सगळी गोष्ट सांगितली : नाटकाची सुरुवात नल द्युत खेळायला बसला आहे आणि एकसारखा हरतो आहे अशी केली तरी चालेल. सगळं राज्य जातं. संपत्ती जाते, शेवटी तो बायकोही पणाला लावतो. तिकडे घरात सगळे हादरून गेले आहेत. दमयंती वारंवार येऊन त्याला खेळापासून परावृत्त करते, पण तो खेळतच रहातो. शेवटी तिलाच पणाला लावलेलं पाहून ती सगळ्या अमात्यांना बोलावून त्याला उठवतेच... खरं तर तिनं पूर्वी स्वयंवरात इंद्र, अग्नी, वरुण, यम या लोकपालांना टाळून त्याला माळ घातली होती. ती माळ घेऊन आली तेव्हा नलालाच ती वरणार म्हणून हे चौघेही देव नलाचं रूप घेऊन बसले होते. ते पाहून दमयंती संतापून त्यांच्याकडे पहायला लागली आणि त्यांनी घाबरून मूळ रूप धारण केलं. आणि तिनं नलाला माळ टाकली. असा हा नल तिला पणाला लावतो म्हणजे पहा. ह्या कथेत कली त्याच्या शरीरात शिरल्यामुळे असं झालं असं आहे. कारण कलीही दमयंतीच्या स्वयंवराला निघाला होता पण तो पोहोचायच्या आतच स्वयंवर आटोपलं. म्हणून तो नलावर सूड घेत राहिला. पुढे नलाला नुस्त्या अंगावरच्या वस्त्रानिशी राज्याबाहेर पडावं लागतं. मुलांना दमयंतीच्या बापाकडे पाठवलं जातं. दमयंतीनं बरोबर येऊ नये असं नलाला वाटतं, पण ती त्याला सोडत नाही. तो म्हणतो की मी नवरा म्हणून नालायक निघालो, तू माझ्या त्याग केलेला बरा. पण ती त्याच्याबरोबरच रहाते. हा त्याला तापच होतो. पुढे भुकेनं कावून गेल्यावर नल पक्ष्यांना पकडायचं म्हणून जवळचं एक वस्त्र त्यांच्यावर टाकतो, तेही घेऊन पक्षी उडून जातात. तेव्हा दमयंती स्वतःच्या वस्त्रातच नलालाही गुंडाळून थकून झोपी जाते. तेव्हा तिच्या थकलेल्या निष्पाप चेहऱ्याकडे पाहून, तिची आपल्यासारख्या अधम माणसावरची निष्ठा पाहून तो आणखीच उद्विग्न होऊन तिचं अर्ध वस्त्र कापून एकटा निघून जातो. नंतर जाग आल्यावर दमयंती आक्रोश करत त्याला शोधत एका व्यापारी तांड्यात सापडते. त्या तांड्यातले हत्ती पाहून रानटी हत्तींचा कळप त्यांच्यावर हल्ला करून सगळी माणसं, सगळे तंबू चिरडून टाकतो. दमयंती वाचते. मग ती कशीतरी आपल्या बापाकडे पोहोचते. इकडे नल एका कर्कोटक नागाला वणव्यातून वाचवतो. ह्या उपकाराची फेड म्हणून कर्कोटक त्याला कडकडून चावून विषानं त्याचं सगळं स्वरूप पालटून विद्रूप करून टाकतो. ह्यामुळे तुला कोणी राजा म्हणून ओळखणार नाही, तू हलके धंदे करत सुखानं रहाशील. आणि तुझ्या शरीरातील कली माझ्या विषानं हैराण होऊन तुला सोडून जाईल. तर असा पूर्ण कायापालट झालेला हा नल, बाहुक नावानं एका ऋतुपर्ण. राजाकडे सारथी आणि स्वैंपाकी म्हणून रहातो. मग त्याला शोधावं म्हणून सुकून गेलेली दमयंती आपल्या बापाकडे पुन्हा एकदा स्वयंवर मांडते. तेव्हा ऋतुपर्ण राजाचा सारथी म्हणून नल परत तिकडे सापडतो. मग नलाची ओळख पटल्यावर त्याचं शरीर पूर्ववत करायला कर्कोटक पुन्हा त्याला चावून विष काढून घेतो. अशी गोष्ट आहे.

एवढ्यात ते गावाबाहेरच्या तुरळक वस्तीत चालत आले. तिथे रिक्षा करून ते जुन्या बाजारात आले. मधे एका दुकानावर वंजारी लोक जुन्या पद्धतीची कापडं घेत होती. राजेश्वरीनं खूप वेळ लावून जुन्या डिझायनींचं बरंच कापड घेतलं. मधूनमधून ती आर यू

टायर्ड असं विचारीत होती. चांगदेव स्त्रीदाक्षिण्य दाखवत तिची पुडकी हातात, काखेत सांभाळत तिला गो अहेड म्हणत होता. यु आर नाइस असं म्हणत ती नवी नवी कापडं मोडक्या हिंदीत भाव करत घेत होती.

तिथून ते बाहेर पडले तेव्हा आठ वाजून गेले होते. चांगदेव म्हणाला, मोडीचं दुकान ताबडतोब गाठलं पाह्यजे, रिक्षा करू. मग रिक्षानं जुन्या बाजारात आल्यावर शोधून शोधून एक जुनं सोनाराचं दुकान सापडलं. तिथे गावाकडच्या लोकांनी गहाण ठेवलेले बरेच चांदीचे दागिने होते. सोनार आत वारंवार जाऊन वेगवेगळे जुनेजुने विचित्र दागिने आणून दाखवायचा. गळ्यात ते अवाढव्य दागिने घालून ती म्हणायची, कसा वाटतो हा? तो म्हणायचा, ठीक आहे. हळूहळू त्याला ती देवीसारखी अद्‌भत मूर्तीच वाटायला लागली. तिनं एक मोठमोठ्या निंबोळ्यांसारख्या मण्यांचा हार पसंत केला. नंतर पायावर लठ्ठचे लठ्ठ तोडे घालून पाहिले. ती म्हणाली, कसे दिसतात? चांगदेव म्हणाला, सुंदर. हे घेच. पण किंमत करायच्या आतच फार आनंद दाखवू नकोस. हे घेच.

मग ते सगळं घेतल्यावर जवळपास सगळी पर्स रिकामी करून ती म्हणाली छान झालं. परत जायचं तिकिट घेऊन ठेवलं आहे म्हणून बरं. नाहीतर तुझ्याकडून पैसे घ्यावे लागले असते. अजून पन्नासेक आहेत. आपण कुठेतरी बसून विसरायच्या आत हिशेब केला पाहिजे. तू कपडेवाल्याला दहा रुपये दिले आहेस, इथे सुटे किती दिले? रिक्षावाल्याचेही तूच दिलेस—

तो म्हणाला, फरगेट इट.

ती म्हणाली, छे छे, चल, आपण समोरच्या हाटेलात काही खाऊ. तू भुकेला झाला असशील, डोन्ट यू? चल, खाऊ.

मग समोरच्या पंजाबी हॉटेलमधल्या फॅमिली रूममधे जाऊन तिनं एका पुडक्याच्या कागदावर बारीक बारीक सगळा हिशोब वैताग येईपर्यंत मांडला. तिथल्या बिलाचेही अर्धे पैसे बळजबरीनं चांगदेवच्या खिशात टाकले.

तिथून सगळी पुडकी सांभाळत ते चालत एका बागेसमोर आले. बाहेर फळांचा रस करून देणारी एक गाडी होती. ती म्हणाली, पंजाब्याकडे फार तेलकट पदार्थ होते. आपण टोमॅटोचा रस घेऊ.

चांगदेव म्हणाला, घाणेरडा असेल. तू घे.

गाडीवाला टोमॅटोचा रस काढत होता. अजून तिच्या मनात दमयंतीची गोष्टच घोळत असावी. ती म्हणाली, दमयंती ह्या नावाला काही अर्थ आहे? तुला संस्कृत येतं? आम्हाला इंग्रजीशिवाय शाळेत काही दुसरं शिकवलंच नाही.

तो म्हणाला, दमयंतीला खास प्राचीन आर्यन अर्थ आहे. सेक्सी...दमयंती म्हणजे जी थकवते ती.

ती हसली. तेवढ्यात गाडीवाल्यानं टोमॅटोचा रस काढून त्यात मीठमसाला टाकून दोन पेल्यांनी खूप वेळ वरखाली करून पेला बाहेरून पुसून तिच्या हातात प्रेमानं दिला. बाजूच्या अर्ध्या भिंतीवर बसून तिनं एक घोट घेतला आणि उत्साह आल्यामुळे ती म्हणाली, फार छान आहे. ह्याच्यातला एक घोट घेऊन तर पहा. खरंच पहा.

तो म्हणाला, नको.

ती म्हणाली, का? उष्टा केला म्हणून?

तसं नाही...बरं बघू...

म्हणून तिच्या पेल्यातला एक घोट घेऊन तो म्हणाला, छान आहे. मीही एक घेतो.

तिथून ते रिक्षा करून हॉटेलवर आले. ती म्हणाली, यू लुक टायर्ड. चल वर तोंड धुऊन घे. माझ्याकडे चांगला टावेल तरी मिळेल. खाली फार घाण टावेल असतो.

चांगदेव वर गेला. तिच्या टेबलावर सगळी पुडकी टाकून तो खाटेवर बसला. खोलीत पुस्तकं, कपडेच कपडे, पुस्तकं, ड्रेसिंग टेबलावर बाटल्याच बाटल्या, डबेच डबे होते. खुर्चीवर साड्यांचा, चोळ्यांचा मोठा ढीग. बाकी कुठे काही घाण नाही. डाग नाही. कान्या लोकांसारखं रेखीव कोरडं लखलखीत अस्तित्व. उद्या आणखी दुसऱ्या गावात असंच. कुठेही मोकळं मोकळं अनिर्बंध रहाणं. सबंध शरीर एवढा एकच अवयव असलेल्या जलचर प्राण्यांसारखं सगळं अस्तित्व. तरंगत कुठेही कसंही जायचं.

मग तिथेच फोनवर चहा मागवून ती खूप कपडे घेऊन बाथरूममधे गेली. त्याला आराम कर असं सांगून. तोपर्यंत तो तिची सगळी नाटकांची पुस्तकं पहात त्यांचे आकाराप्रमाणे तीन वेगवेगळे ढीग करत बसला. बाहेर आल्यावर ती हसून म्हणाली, थँक्यू सो मच. तू माझं एक काम तर उरकलंच. रात्री सगळं बांधायचंच आहे. मग आरशासमोर बसून तिनं चेहऱ्यावर रंग करायला खूप वेळ लावला. खोलीत सुंदर सुवास दरवळत राहिले. तो अधूनमधून तिच्या पाठमोऱ्या लहान आकृतीकडे पहात होता. बोटात लाल खड्याची अंगठी. हातात रंगीबेरंगी चिकार किणकिणणाऱ्या बांगड्या. पायांच्या दुसऱ्या बोटांमध्ये चांदीची जोडवी. टाचेवरून लोंबणाऱ्या तोरड्या. हळूहळू तिनं काळे, पिवळे, हिरवे, निळे असे रंग मेळवले. काजळ डोळ्यांत भरलं. कुंकवाची कोर कपाळावर लावली. मग आरशात पाहत स्वतःशी ती म्हणाली, ओ.के.? इट्स ओव्हर!

चांगदेवला वाटलं, कोणासाठी ही इतकी नटते? आपल्याशिवाय आता हिला कोणी भेटणार नाही. कुणासाठी? आपल्यासाठी? की स्वतःसाठीच?

मग चहा घेऊन ती भराभर सगळे कपडे, पुस्तकं ट्रंकेत कोंबत होती. तिचा झपाटा विलक्षण होता. पाच मिनिटांतच एक ट्रंक, सुटकेस आणि एवढंच तिचं सामान खोलीत दिसायला लागलं. मग कमरेवर हात ठेवून खोलीभर पहात ती म्हणाली, फार थोडी गावं सोडतांना मला इतकं वाईट वाटलं.

जरा वेळानं ते जेवायला खाली उतरले. जेवतांना पुन्हा दमयंतीबद्दल ती विचारायला लागली, का म्हणून तुला ही गोष्ट फार आवडते?

तो म्हणाला, कर्कोटक चावल्यानंतर नल कायम बाहुक नावाचा कुरूप सारथी, स्वैंपाकी म्हणून वावरतो हे अत्यंत ग्रेट आहे. असं कर्कोटकानं चावून सबंध कायापालट करून टाकणं ग्रेट आहे. त्यावेळी आपलं विकृत स्वरूप पाहून नलाला फार वाईट वाटलं. तेव्हा कर्कोटक नलाला म्हणतो, तुला लोकांनी ह्या विपन्नावस्थेत ओळखू नये

म्हणून मी असं केलं आहे. ज्या दुष्ट कलीनं तुला अशा घोर संकटात ढकललं आहे तो तुझ्या शरीरात रहातो आहे. माझ्या ह्या भयंकर विषानं त्याला तुझ्या शरीरात असह्य वेदना होतील. हे नला, असले क्लेश भोगायला सर्वथा अयोग्य अशा निरपराध तुला ज्या कलीनं अशा परिस्थितीत ढकललं, त्याच्यापासून मी तुझं रक्षणच केलं आहे. आता तुला कशापासूनही भय नाही, कारण माझ्या विषापेक्षा भयानक काहीच नाही!

ती म्हणाली, गॉड, इजन्ट इट स्यूपर्ब?

जरा वेळानं ती म्हणाली, का म्हणून ती तरीही त्याच्याबरोबरच राहू म्हणते? पुन्हा का म्हणून त्याला शोधून काढते?

म्हणजे अजून ह्या देशात नवऱ्यानं सोडलेल्या बायकोचं जगणं किती कठीण असतं? एकट्या तरुण बाईला कुणाचा आधार नसतो. कुणाची माया नसते. नवरा कसाही असला तरी निदान भक्कम सुरक्षितपणा असतो. आपल्या देशात रामायणापासून हा आकृतिबंध सर्वत्र आहे.

ती वेड्यासारखी ताट फिरवत हे ऐकत राहिली.

चांगदेव म्हणाला, याचाही नलाला उबग आलेला होता. तिच्यासारख्या सुंदरीनं आपल्यालाच निवडल्याचा, सगळं ऐश्वर्य आपल्या अपराधामुळे घालवून तिलाच वाईट दिवस आणल्याचा त्याला भयंकर मनस्ताप होतो आहे. म्हणून त्याला तिचाच तिरस्कार वाटत रहातो. तरीही ती त्याला सोडत नाही तेव्हा स्वतःवरच संतापून तो एकटा निघून जातो. हा वनवास त्याला एकट्यानं सोसायचा आहे. स्वतःच्या करणीचं ओझं स्वतः वहायचं आहे.

ती एकसारखी नखं चावत बसली. मग उठून तो म्हणाला, तिकडे बाहेरच बसू.. पण तू नाटक लिहीच. आपल्या चांगल्या मिथ्स् इंग्रजीतून जगाला कळल्या पाह्यजेत.

बाहेर आल्यावर एका कोपऱ्यातल्या बाकावर बसून खिन्नपणे ती हिरवळीपलीकडे पहात म्हणाली, मी हे नाटक मनापासून लिहीन. खरं तर ही माझीच गोष्ट आहे.

जरा वेळानं हाटेलचे दिवे बंद होत आले. वरती ढग निघून गेल्यामुळे सबंध तारे स्वच्छ चमचमत होते. मग अचानक मागच्या बागेतले वाघ ओरडायला लागले. मग तो न रहावून म्हणाला, तू पुन्हा इकडे येणार नाहीस.

ती म्हणाली, काही शक्यता नाही. पण मी प्रयत्न करीन. किंवा तूच मला भेटत जा.

तो म्हणाला, मुंबईला येणं मी टाळतो...ठीक आहे, एकतर ओळखच होऊ नये, झाली तर-कायम—

ती हसून खट्याळपणे म्हणाली, तर कायम एकत्र रहावं असं वाटतं, हो ना?

आणि ती ओठ दाबून हसता हसता मग एकदम जोरजोरानं हसायला लागली. तेव्हा तिचा खांदा जोरानं घुसळून तो म्हणाला, बंद कर हे. स्टॉप इट.

पण ती आणखी जोरानं हसायला लागली. मग त्याचा हात खाली करत हसू आवरत ती म्हणाली, हे काय सुरू केलंस आता शेवटच्या दिवशी?

तो संतापून म्हणाला, मी मनातलं खरं ते सांगितलं.

ती हळूहळू ढिली होत म्हणाली, मला त्यात काही संशय वाटत नाही...मला वेगळंच वाटलं. आणखी पाचसात वर्षांनी मी अशी दिसेन की हे कायम बरोबर रहाणं तुला संकटच वाटेल! तुझ्या स्पिरिच्युॲलिझमचा आदर ठेवावासा वाटतो. त्यामुळे अतिशय निर्मळ संबंध रहातात...मला कळलं तुला काय म्हणायचं ते.

मग उठून तो म्हणाला, चला, निघू या. गुड बाय.

मग केस मागे करून ती अतिशय जोरात उठली, आणि त्याच्या गालाचा झटकन कडकडून चावा घेऊन म्हणाली, गुडबाय डिअर, गुडबाय.

चिपळूणकर पुण्याहून सुटी संपायच्या आतच परत आला होता. लग्न करायचं म्हणून दर सुट्टीत तो पुण्याला जायचा आणि पाचदहा मुली पाहून रागारागानं परत यायचा. आतापर्यंत तीन वर्षांत त्यानं शंभरेक मुली पाह्यल्या होत्या. सौंदर्य ह्या कल्पनेवरच त्याचं इतकं प्रेम होतं की त्यामुळे प्रत्यक्षात त्याला कोणीच मुलगी सुंदर वाटेना किंवा सुंदर मुलींचे बाप त्याला मास्तर म्हणून नकार द्यायचे आणि तो चरफडत पुण्याहून परत यायचा, आपल्या खोलीत दोन दिवस एकसारखा पडून रहायचा आणि ही मास्तरकीची नोकरी सोडून लवकरच इंडस्ट्रीत वगैरे एक्झिक्यूटिव जॉब घेतला पाह्यजे, असं म्हणत रहायचा. भोळे वगैरे मित्र म्हणायचे, पण चिपळ्या, तुला शिकवणं आवडतं. तू अत्यंत चांगला प्राध्यापक आहेस. पगार वगैरे जास्त काय करणार जॉब सॅटिस्फॅक्शन नसलं तर—

चिपळ्या वैतागून म्हणायचा, सुंदर बायकोसाठी मी काहीही करीन. चांगल्या प्राध्यापकाला किंमत द्या हे तुमच्या समाजाला तुम्ही पटवून देत नाही तोपर्यंत आमच्यासारखे ह्या धंद्याबद्दल कुठवर प्रेम बाळगणार?

असा हा चिपळूणकर दिसायला देखणा होता पण वृत्तीनं भ्याड होता. दर सुटीत तो मित्रांना घेऊन आहे ह्याहून चांगली खोली मिळवायच्या खटपटीत असायचा. खोलीला दोन दरवाजे असले पाहिजेत, बाहेर झाडंही पाहिजेत, पण पुन्हा भाडंही कमी पाहिजे आणि अशी जागा मिळालीच तर पुन्हा तो घरमालकाशी भाड्याच्या बाबतीत पाचपाच रुपयांपासून झिगझिग सुरु करायचा आणि तेवढ्यात अशी जागाही हातची जायची.

त्या सकाळी अशीच चिपळूणकराच्या जागेची एक अयशस्वी मोहीम आटपून लांबच्या उंच टेकड्यांवर फिरायला जावं असा बेत करून देसाई, चांगला देशपांडे, शेंडे आणि चिपळूणकर चांगदेवकडे आले. ते सगळे चांगदेवच्या व्हरांड्याचा दरवाजा ठोठावत जोरजोरानं हाका मारत होते, चांगदेऽव, चांगदेवराऽऽव, ओ ऽ चांगदेव पाटीऽल, पाटीऽल सऽर उठा राव. टेकड्यांवर जायचंय मालक.

पण उंच उशीवर मान व खांदे टेकवून शेषशायी नारायणासारखा सरळ

सकाळपासून झोपलेला तो उठत नव्हता.

तोपर्यंत मधल्या चौकाकडच्या दारानंच भोळेबरोबर शेंडे आणि देसाई आत आले. नंतर चिपळूणकर वगैरेही गोंधळ करत आले. सकाळीसकाळीच इतके मित्रांचे उठवणारे आवाज त्याला सुंदर वाटले.

डोळे चोळत उठत तो म्हणाला, कुठे रे इतक्या सकाळी सकाळी तुम्ही सगळे?

चांगला देशपांडे म्हणाला, ह्या चिपळ्याला जागा पहायची नेहमीची मोहीम! चार घरं पाह्यली पण एक पसंत नाही साल्याला. आहे तोच ब्लॉक चांगला म्हणतोय आता.

चिपळूणकर म्हणाला, ती काय घरं होती का साली? बांधतांना कोणी कसलाच विचार करत नाही.

चांगला देशपांडे म्हणाला, याच्याबरोबर जागा पहायला जाणं म्हणजे वैताग. खोली पहातांना आतून खोली पहायचं सोडून साला बाहेर उभा राहून इकडून तिकडे जातो-येतो, आसपास पहातो, खिडक्यांची उंची तपासतो, बाजूच्या घरांमधलं अंतर तपासतो!...आलं का लक्षात? गुपचूप पोरगी आणली तर तिला कसं लपूनछपून झटकन खोलीत आणता येईल हे तो हुबेहूब कल्पनेनं रंगवून घर तपासून पहात असतो! मला तर वाटतं हा एकटा रात्री स्वतःच लपूनछपून खोलीत शिरायची रंगीत तालीमसुद्धा करत असेल. याच्याबरोबर पन्नास खोल्या पाह्यला मी, पण याला कशी जागा पाह्यजे हेच कळत नाही. पोफळे बंगल्यातल्यासारखी घ्यायची तर भाडं पन्नासच्या वर नको! आणि मिळालीच समजा ह्याला जागा तरी एक पोरगी आणायची हिंमत नाही साल्याची!

शेंडे म्हणाला, ह्यानं ब्लॉक मात्र असा लावून ठेवलाय की फक्त बायकोच तेवढी नाही! अगदी पोळपाट-लाटण्यासकट सगळं तयार! डबल खाट वगैरे जय्यत!

भोळे म्हणाला, चिपळ्या म्हणजे जय्यत नवरा मुलगाच! किंवा जय्यत लग्न झाल्यासारखा गृहस्थच.

शेंडे म्हणाला, आणि कुणाही मित्राचं कुठेही लग्न असो, हा साला जातीनं हजर! लग्नातही मित्राच्या अगदी जवळजवळ रहातो, सगळे विधी जणू काही आपणच करतो आहोत असा! पण एरवी कुणाच्याही बायकोचे दोष काढत असतो.

ही तर ह्याची आवडती करमणूकच आहे. आपले कुलकर्णी नवराबायको स्कुटरवरून नेहमी येतात जातात, अय्यरबाईंचा नवराही विद्यापीठात जाता जाता स्कूटरनं तिला कॉलेजवर सोडून जातो तर चिपळ्याला पुढे नवरा आणि मागे बायको हे स्कूटरवरचं नेहमीचं दृश्य पाहून उगाच संताप येतो! म्हणतो, पहा कसे शंकरपार्वती कायम नंदीवर असतात तसेच दिसताहेत साले! पुराणात विष्णू आणि लक्ष्मी कायम गरुडावर तसे हे स्कूटरवर कायम बरोबर! कदाचित आताच्या व्हेस्पा-लँब्रेटासारख्या नंदी, गरुड वगैरे नावाच्या स्कुटरीच असाव्या त्या काळात! हॅ हॅ हॅ. मी म्हणालो, तू कशाला लक्ष घालतोस त्यांच्यात? तुला काय त्रास होतोय?

साला मोजे मात्र कधी धूत नाही! काय भयंकर वास येतो त्याच्या मोज्यांचा? त्याला सांगा एकदा राव हे.

तो म्हणतो बुटात तर असतात मोजे दिवसभर!

तिकडे चिपळूणकर चांगदेवचे डबे उघडून बिस्किटं, शेंगदाणे खात मधलं दार पूर्ण

उघडून बाहेर बारीक निरीक्षण करत म्हाणाला, तीन परकर वाळताहेत आणि तीन ब्रेसिअर्स-आंघोळी झाल्या पोफळेच्या पोरींच्या—

देसाई म्हणाला, लइ मस्त वाटतं का रे तुला ते सीन?

शेंडे म्हणाला, एकदम खळबळ होतेय त्याच्या छातीत ते स्वच्छ धुतलेले दोरीवरचे परकर-ब्लाऊज पाहून?

चिपळूणकर म्हणाला, तुमच्या प्रतिक्रिया माझ्यावर लादू नका!

मग सगळे खदखदून हसले. मग देसाई म्हणाला, रेडिओ भी बहुत जोरसे बजा रहे है वो लोग. अच्छा गाना लगा है. खोलो यार दरवाजा. सुनने दो.

वरतून मालकाची धाकटी पोरगी इकडून तिकडे येरझारा घालत मोठमोठ्यानं बोलत ह्या नव्या लोकांकडे पहात दृष्टीचा लपंडाव खेळायला लागली. चिपळूणकर एकदम अस्वस्थ झाला. वरतून ऐकायला येणाऱ्या गाण्याबरोबर स्वतःही गुणगुणायला लागला : जहाँ मै जाती हूँ वही ऽ चले आते होऽऽ, चोरी चोरीऽ मेरे दिलमे समाते हो, ये तो बता दे कि तुम, मेरे ऽ कौन होऽऽ... चांगला देशपांडेही खूष होऊन चुटक्या वाजवायला लागला. तो म्हणाला अरे, आपला रेडिओही लावा ना, त्यांच्याचकडे आहे काय रेडिओ? त्या फटाकडीला द्या जबाब. हँ ऽ ?

मग चिपळूणकरनं घाईघाईनं चांगदेवचा रेडिओ लावून दुसऱ्या एका सेंटरवर आणखी कडाक्याचं गाणं शोधून मोठ्यानं व्हॉल्यूम केला. पोफळ्यांचा बंगला ह्या जुगलबंदीनं दुमदुमून गेला. तोपर्यंत वरच्या रेडिओवर तलत महमूदचं वैताग गाणं लागलं आणि इकडून मुझे मिल गया बहाऽना तेरी दीदका, कैसे खुशी लेके आया चाँद... असं ढोलकाच्या ठेक्याचं गाणं! मग चांगला देशपांडे वाकून वाकून दृष्टीचा लपंडाव खेळणाऱ्या धाकटीकडे पहात ओरडला, अॅऽहॅऽऽ! जिरली का नाही?

तोपर्यंत चांगदेव हातपाय तोंड धुऊन बाथरूमबाहेर येऊन ओरडला, ए ऽ साल्या. काय कलगीतुरा सुरू केला बे. पोरींची आई बोंबलेल ना नंतर मलाच.

चांगला देशपांडे रेडिओ लहान करत म्हणाला, मग तू सांग तुझ्याच पोरी काट्यावर आल्यात, त्यांनाच सांभाळ म्हणून. वारेऽवा!

वरतून मधली पोरगी येरझारा घालत मुद्दाम आपली स्टाईल दाखवण्यासाठी हेल काढून काढून आपल्या मंजुळ आवाजाचा आविष्कार करत काहीतरी निरर्थक भांडणाच्या स्वरूपात थोरलीला सांगत होती : मी काहीऽही करणारऽऽर नाही, आई येईपर्यंत भाजीसुद्धा निवडणारऽऽर नाही...तरी मी सांगत होतेऽऽअजिब्बाऽत हवा येत नाही इकडून...आणि थोरली पोरगी या चौघा नव्या तरुणांकडे वेड्यासारखी भिरभिर पहात एकदम थंड, दुखी, मुकी होऊन उभी होती. आपण कसा आत्माविष्कार करावा हे तिला कळेना.

भोळे चिपळूणकरला म्हणाला, ह्या थोरलीला पंधरा हजारापर्यंत सुद्धा हुंडा द्यायची तयारी आहे पोफळ्यांची. करतोस का? पुन्हा जावयाला कुठेतरी एकदम वरची जागाही मिळवून देईल!

चिपळूणकर म्हणाला, सगळ्यात धाकटी देत असले तर आत्ता करतो. पण हे कोण? देशस्थ का यजुर्वेदी? यजुर्वेदी असले तरी...

भोळे म्हणाला, त्यांना यजुर्वेदीच पाह्यजे आहे. आपला लायब्रीत कधीही न जाणारा व चोपूनचापून भांग पाडणारा चमचमत्या केसांचा ठोंब्या कुलकर्णी यजुर्वेदीच आहे का रे? पोफळे चौकशी करत होते एकदा.

त्या येड्याला? त्याच्या मनानं फार चांगली आहे ही पोरगी! एम्.ए. झालीय ना ही?

भोळे म्हणाला, मधलीसुद्धा एम्.ए. झाली आहे बाबा! थोरली बरीच वयस्क असावी. तिचं काही लफडंही झालं होतं मुसलमानाच्या पोराशी. पोफळे म्हातारा साला गावोगाव हिंडत असतो आपल्या पोरींच्या कुंडल्या घेऊन. आपल्या देशात असं होऊन बसलं आहे की तरुण पोरं आणि पोरी शेजारी शेजारी रहातात पण जाती न् शाखा यांच्या चक्रव्यूहात सगळे गरगर फिरत असतात. देशपांड्या, तू करतोस का बोल थोरलीला. ऋग्वेदीही चालेल म्हणतात पोफळे.

चांगला देशपांडे म्हणाला, आमच्या वडलांना चांगली होईल ही! विचारू आपण त्यांना! ऋग्वेदीही चालेल म्हणे! च्यायला!

भोळे म्हणाले, बरं ही मधली? ती सुंदर आहे. कर विचार.

आमचं हे कोड पाहून कोण द्यायला बसलंय आम्हाला?

चिपळूणकर म्हणाला, शेंड्या तू कोण आहेस रे?

शेंडे खुर्चीवर चढून माळ्यावरची पुस्तकं चाळत होता त्यानं दुर्लक्ष केलं.

चांगला देशपांडे म्हणाला, शेंडेची कुठली तरी भलतीच जात आहे साली. स्वतःला ब्राम्हणच म्हणवतात पण हे साले!

शेंडे म्हणाला, बहिणीचं लग्न झाल्याशिवाय आपल्याला काही करता येणार नाही. शिवाय पोफळ्यांसारखा हुंडा नाही आमच्याजवळ.

वर पहात देसाई म्हणाला, ही मधली स्मार्ट आहे खरोखर! तिला काही अडचण येणार नाही. चिपळूणकर, बघ. कर विचार!

चिपळूणकर म्हणाला, नाक फार नकटं आहे तिचंसुद्धा. असल्या बायका केल्यापेक्षा कारं रहावं. बायको सुंदरच पाह्यजे असं मी तुम्हाला किती वेळा पटवून द्यावं? आधीच हिंदुस्थानात विद्रूप लोकांनी लग्न करून कुप्रजानन इतकं केलं आहे की अस्सल इंडियन सौंदर्य नाहीसं होत चाललं आहे.

चांगला देशपांडे म्हणाला, तुम्ही चित्पावन तर साले स्वतःला का देवदूतांची अवलाद समजता का बे? दुसऱ्या जाती म्हणजे तुम्हाला ओंगळ वाटतात.

शेंडे म्हणाला, पण आंतर्जातीय विवाह चित्पावनांमधेच ज्यास्त दिसतील देशपांड्या.

ते चित्पावनांच्या पोरींच्याच बाबतीत फक्त! पुण्यात वगैरे एखादं हेंदरं श्रीमंत मराठ्याचं पोरगं घेरून ह्यांच्या पोरी त्याला गटवतात. आपल्या जातीतल्या दोन खोल्यांच्या चित्पावन दरिद्री माणसापेक्षा असली श्रीमंत कुणब्यांची पोरं परवडणारच की! हुशार असतात साले हे. चित्पावन मुलगा मात्र कधी दुसऱ्या जातीच्या पोरीला करणार नाही.

-हे मात्र खरं आहे. कोकणस्थांच्या विद्रूप पोरींचं जुळत नसलं तर ते म्हणतातच करील हिला कोणीतरी देशस्थ! देशस्थही साले गोऱ्या रंगावर जातात! नकटी-तिरळी चालेल पण गोरी आहे ना असं म्हणतात!

मग चांगदेवनं केलेला पातेलंभर चहा पिऊन ते सगळे रस्त्यानं माठूराम वगैरेंच्या गमती सांगत निघाले. देसाई परवाच्या चुळबुळेंना एक्सटेन्शन द्या म्हणून ठोसरनं घडवून आणलेल्या विद्यापीठावरच्या मोर्च्यातल्या गमती सांगत होता. इकडून ब्राम्हण मुलं चुळबुळ्यांची मुदतवाढ झालीच पायजे अशा घोषणा देत गेली तर तिकडून ब्राम्हणेतर मुलं तरुण बेकारांना जागा द्या, सफेत बाल हकाल हकाल-अशा घोषणा करत आली. मग मारामारीच सुरू झाली. पुराणिकची पोरं पळत सुटली. व्हाईस-चॅन्सलर भेटायला आले तर जागेवर सापडेना.

शेंडे म्हणाला, पण सगळ्या वर्तमानपत्रांमधे उलटंच लिहून आलं. व्हाइस चॅन्सलरनं माफी मागितली वगैरे. चुळबुळ्यांना मुदतवाढ देतो असं व्ही.सी. नं माठूरामला खुद्द वचन दिलं म्हणून.

भोळे म्हणाला, निव्वळ खोट्या बातम्या मालक! ह्या भटांच्या वर्तमानपत्रांवरून पूर्वी पुराणं कशी लिहिली गेली हे लक्षात येतं. व्ही.सी. नं चुळबुळेचं सामानच डिपार्टमेंटबाहेर काढायचं ठरवलं होतं, पण मंत्र्याचा ऐनवेळी फोन आला की यंदा आधीच दुष्काळी परिस्थिती आहे, ह्या भागात विरोधी पक्षांची किरकोळ किरकोर नको. आणि माठूरामला व्ही.सी. एवढंच म्हणाले की कायदेशीर असेल तेवढंच मी करीन.

देसाई म्हणाला, एकून गोगटेबाईला कुटत ऱ्हाईल म्हातारा आणखी तीन वर्षं—

शेंडे म्हणाला, कुटणं! अगदी बरोबर शब्द काढला त्या म्हशीसारख्या बाईला! तरुणपणी साल्यांची जवानी पीएच. डी. वगैरे करण्यात वाया जाते. करिअरच्या नादात इच्छा पुऱ्या होत नाहीत—

चिपळूणकर म्हणाला, सुरुवातीला कुरूप बायकांशी लग्न करून हुद्द्यावर चढतात आणि आता हातात अशी सत्ता आली की हे उद्योग.

खरं तर चांगदेवला रात्रीपासून प्रचंड थकवा आला होता. अलीकडे जेवणं वारंवार चुकायची. अधूनमधून छाती दुखायची. सपाटून घाम सुटायचा. जागरणं चालूच होती. आज टेकडीवर जायची त्याची अजिबात इच्छा नव्हती. पण ह्या गावात आल्यापासून ह्या टेकड्या पायाखाली घालायचा विचार चालला होता. आज मित्रही अनायासे आले होते. म्हणून तो इच्छेविरुद्धच निघाला होता. घराबाहेर पडतांनाच त्याला मळमळत होतं. काय व्हायचं ते होऊ दे असा बेदरकारपणा अचानक त्याच्यावर चढला. नाहीतरी चाललं होतं ते सगळं स्वप्नातल्यासारखंच चाललं होतं. शेवट झाला तर अचानक तरी होईल.

टेकडीच्या अर्ध्यावरच बहुतेकजण थकून गप्पा छाटत बसले. शेंडेच तेवढा वरपर्यंत त्याच्याबरोबर टिकला, पण पुढे उभा चढ लागल्यावर तो दुसऱ्या वाटेनं गेला. चांगदेव सरळ वर टेकडीच्या माथ्यावर धापा टाकत चढत राह्यला. मधेच परत फिरावं असं त्याला वाटलं पण तरी डोळ्यांसमोर अंधेरी आली असतांनाही तो वर माथ्यावर आलाच. मग प्रचंड खोकला आला. नंतर हृदयात विजेसारखी प्रचंड थडथड निघून तो तिथल्या

तिथे कोसळला.

छाती दाबत उलटातिलटा होत त्यानं नजर फिरवली. पलीकडे हिरवे मऊ उतार, आकाशातले विरळ होत जाणारे ढग, ढगामागचा लख्ख प्रकाश. हाताच्या मुठीत गवत ओरबाडून ओरबाडून तो सरपटत राहिला. भिरार वहाणारा वारा. हे चाऱ्ही दिशांनी निर्मनुष्य जग पाहात असतांना त्याला भरतं आलं. आपण असू-नसू, पण हे जग, हे गवत असंच रहाणार. ही पृथ्वी फिरत रहाणार. आणि खरोखरच सगळं आकाश स्थिर राहून शरीरासकट पृथ्वी भरारते आहे असं त्याला वाटलं. हा घोंघावणारा गरगराट जाणवत असतांनाच अपरिमित झटक्यांनी तो पुन्हा बेहोष होऊन उलटातिलटा झाला. हातातलं गवत निसटत गेलं. तो निपचित होऊन पडला.

तो शुद्धीवर आला तेव्हा सगळे मित्र त्याला कसेबसे उचलून टेकडीखाली नेत होते. कसंबसं खालच्या एका शेतात नेऊन तिथल्या शेतकऱ्याला गाडी जुंपायला सांगून त्यांनी त्याला खालच्या रस्त्यावर आणलं. मग रिक्षा करून हास्पिटल.

तिथे खूप वेळ तपासणी चालली. तिथले बहुतेक डॉक्टर भोळेच्या ओळखीचे होते. चांगदेव आपला तळहात पूर्ण उघडून मागून पुढून पहात भेदरलेल्या डोळ्यांनी हॉस्पिटलचं उंच छत अजमावत पडून होता. डोळ्यांसमोर मुंबईची जुनी हास्पिटलं, जुने डॉक्टर, हृदयाच्या ठोक्यांची त्या वेळची वरखाली चढलेली-उतरलेली रेषा.

डॉक्टरला तो म्हणाला, हे काही नवं नाही. सगळं एकदा भोगून झालं आहे. पल्मनरी व्हेन्स हायपरटेन्शन. डिस्निया-असं काहीतरी. मधे पूर्ण बरं झालं होतं. हेही तेच असणार.

डॉक्टर म्हणाले, बोलू नका. बोलू नका. कंप्लीट रेस्ट.

त्यानंतर महिनाभर चांगदेव हास्पिटलमधेच होता. अनेक तपासण्या झाल्या. संपूर्ण शारीरिक आणि मानसिक विश्रांतीशिवाय दुसरा उपाय नव्हता. आणि पुन्हा ते जुनं परिचयाचं औषध.

भोळेची ह्या महिन्यात फार धावपळ झाली. सुटीत काही लिहायचं म्हणून बायकोला माहेरी पाठवलं होतं, सुटी संपून गेली तरी तिला आणायला जाणं लांबत होतं. आता चांगदेवच्या आजारानं ते आणखी लांबलं. मुरलीमोहन वगैरेंच्या सद्भावनांना आवाहन करून त्यानं आणि इतर सर्वांनीच चांगदेवकरता एक महिना मेडिकल लीव मिळवली होती. सगळे जण अधूनमधून त्याला संध्याकाळी भेटून यायचे. भोळे मात्र जवळपास रोज हास्पिटलवर जाऊन डॉक्टरांना भेटणं, चांगदेवशी गप्पा मारत बसणं वगैरे कर्तव्य म्हणून करायचा. बाकीचे मित्र त्याला चांगदेवची हालहवाल विचारात रहायचे.

भोळे एकदा मित्रांना म्हणाला, आपल्या हिंदू संस्कृतीत अशा एकाएकी कोसळलेल्या माणसांची काहीही व्यवस्था नाही. नशीब इंग्रजांनी हास्पिटलं इथे बांधली. ख्रिश्चन धर्माची एवढी तरी ओल ह्या समाजाला लागली. इथे जात, धर्म, वंश काही न पाहता निव्वळ माणूस आहे एवढं पाहून कोणालाही आत येता येतं.

मग एकदम अस्वस्थ होऊन तो म्हणाला, एवढा मोठ्ठा माणूस लहान मुलासारखा बिछान्यावर असहाय पडलेला हे मला का कुणास ठाऊक पाहावत नाही. लहान मूल तरी आईला घे म्हणून हात पुढे करतं. एवढ्या मोठ्या माणसाला घेणारं तरी कोण असणार? नुस्तं हात बिछान्यावर समांतर ठेवून पडून टकमक पाहात राहणं. म्हणून आमच्या गावाजवळच्या एका मिशनच्या हास्पिटलाबाहेर मोठ्ठया बोर्डावर लिहिलेलं मला लहानपणी फार सुंदर वाटायचं :

ज्यांना कोणी नाही त्यां तुम्हाला तो प्रभू जवळ घेईल. येशू तुमची आसवे पुसेल.

चांगदेवकडे हॉस्पिटलवर नेमानं तासभर बसून सांस्कृतिक काहीबाही बोलून भोळे पण खात घरी यायचा आणि लिहित बसायचा.

तो चांगदेवला सांगायचा, काल मी हास्पिटलकडे येत होतो. तिथे बाजूच्या घाणेरड्या वस्तीत डफ खंजिऱ्या दुरुस्त करणाऱ्या एका मुसलमानाच्या घरासमोर उभा राहिलो. आत नेहमी दारू पिऊन आरडाओरड, मारपीट करणारा तो माणूस बायकोला काठीनं अक्षरशः बडवतांना पाहून मी खलासच झालो. बायकोही रडून रडून तितक्याच संतापानं मार खात होती. शिव्या देत होती. दोन छोट्या पोरी मोठमोठ्यानं किंचाळत होत्या. त्यांचा एक दहाबारा वर्षांचा मुलगा दुकानाच्या म्हणजे घराच्याच पाटीवर बसून संतापानं घरातल्या सगळ्यांकडे पाहून ओरडत होता : तुम सब लोग दुष्मन हो. मुझे तुम सबसे नफरत है, नफरत हैऽऽ. सगळ्यांचा तिरस्कार वाटूनही मूल काय करणार? अशा दुकानाच्या पाटीवर बसून आसवं पुसून पुसून लाल झालेल्या डोळ्यांनी सगळ्या जगावर, सगळ्या संस्कृतीवर राग ओकणाऱ्या मुलांसाठी आपल्याजवळ काही नाही. त्याच्यासमोर आपलं सगळं जगणंच बेकायदेशीर आहे. असं ह्या देशात किती प्रमाणावर चाललं असेल? आपल्याला तर हा देशच नको वाटतो. मला तर हल्ली फारच मुळापासून सगळ्या गोष्टींचा विचार करावंसं वाटायला लागलं आहे. निव्वळ माणूस म्हणून.

एकदा तो चांगदेवला म्हणाला, तुला आठवतं? मागे आपल्या गोऱ्या रोमँटिक जोशाचं लग्न झाल्याबरोबर त्याच्या थोरल्या बहिणीचंही लगेच उरकलं. बहिणीच्या लग्नाचा पाच हजार रुपये हुंडा रोख देऊन उरलेले दोन हजार लवकरच आपली नवी पगारश्रेणी मिळाली की जी काय मागची बाकी मिळेल त्याच्यातून देऊ, असं जोश्यानं बहिणीच्या सासऱ्याला मान्य करायला लावलं होतं. खरं तर किती सुंदर पोरगी आहे ती? पण काय हाल बिचारीचे. आपली नवी श्रेणी लागणं सरकारी दिरंगाईत लांबत चाललं. त्यामुळे सासऱ्याला वाटलं हे बुडवणार हुंडा. त्यानं तगादा लावला. तिची सासूही उठल्या बसल्या छळायला लागली तशात तिला दिवस गेले. तरी सासू छळतच राह्यली. गरोदरपणात उपाशी ठेवणं, लवकर उठवणं, पाणी शेंदायला लावणं, कधी जळत्या लाकडानंच मारणं- असं सुरु झालं. त्यात तिचा गर्भपात झाला. इकडून हुंड्याचे उरलेले पैसे येतच नव्हते. जोशा एकटाच सगळं घर पोसतो तेव्हा देणार कुठून? मग सासऱ्यानं

तिला नुस्तं तिकिट काढून गाडीत बसवून दिलं. पैसे आणल्याशिवाय माहेरून परत यायचं नाही असं बजावलं. ती स्टेशनवर उतरली तेव्हा पाच पैसेही तिच्याजवळ नव्हते. घरी चालत आली बिचारी न् आल्याबरोबर बेशुद्ध पडली. दोन दिवस जेवायला घातलं नव्हतं, त्यात पायी. मग जोशांच्या वडलांनी संतापून तिला त्याच दिवशी पुन्हा सासरी पोचवलं. मुलगी माझी होती, आता तुमची आहे असं म्हणून तिथे पाणीही न पिता गृहस्थ एकटे परत आले! बहीण सासरी निघाली तेव्हा थरथर कापत होती असं जोशी म्हणाला.

मग भयंकर संतापून भोळे पुन्हा सांगायला लागला, हा गुलामांचाच देश आहे पूर्वीपासून. इथे सगळी आचारसंहिताच गुलामगिरीवर तयार केलेली आहे. जोशाला आणखी चार बहिणी आहेत पाठोपाठ लग्नाच्या! थोरलीला नवऱ्यानं घरी आणून दिली म्हटल्यावर खालाच्यांशी लग्नच कुणी करणार नाही ही भीती! जोशाची आईही साली म्हणत होती की मारलं झोडलं तर काय झालं? मला आणखी चार मुली आहेत. मुकाट्यानं बाबांबरोबर जा म्हणाली.

चांगदेव डोळे मिटून म्हणाला, मग काय झालं?

भोळे म्हणाला, परवाच जोशाला तार आली की बहीण बुडून मेली म्हणून. जोशा स्वतः गेला रजा घेऊन. काल रात्रीच परत आला. तो जाऊन पोहोचला तोपर्यंत बहिणीला अग्नीसुद्धा देऊन झाला होता. वाड्यातले सगळे कुजबुजत होते की पोरीला सासूनं विहिरीत ढकलून मारलं म्हणून. सगळ्यांनी पोरीची किंकाळी ऐकली.

चांगदेव दोन बोटांनी डोळे दाबून पडून राह्यला.

भोळे म्हणाला, आपण नेहमी ऐकतो अमुक बाई स्टोव्हनं भाजून मेली, अमुक बाईनं स्वतःला पेटवून घेतलं, तमुक स्त्रीनं जीव दिला. हे सगळे अत्याचार असतात, खून असतात. पण देशभर आपल्याला न कळणारं किती भयंकर प्रमाणावर चालत असेल? दुःखाची नोंद घेण्याचीसुद्धा परंपरा आपल्यात नाही. जोशाला पहाशील आता तू. एकदम म्हाताराच वाटतो. स्वतःचं लग्न झालं, त्याचं कुठल्या कुठेच. हे आई-बापांचेच संसार चालवणार तो, म्हातारा होईपर्यंत. लग्नाआधीचा त्याचा रोमँटिकपणा एकदम खलास झाला होता मुळातच नुसत्या स्वतःच्या लग्नानंच. त्यात हे एकेक प्रकार.

चांगदेव म्हणाला, लग्नाआधी रोमँटिकपणा असल्यामुळे तेवढा तरी बळी देता आला. रोमँटिकपणाही नसता तर कठीण झालं असतं.

भोळे म्हणाला, जोशी कधी स्टाफ मिटिंगांमध्ये माठूरामला विरोध करत नाही. उलट माठूरामच्याच बाजूनं मत देतो. आपले मित्र त्याला नावं ठेवतात.

चांगदेव म्हणाला, विरोध करणाऱ्यांना अशी संसार चालवण्याची न् बहिणींचे हुंडे द्यायची जबाबदारी नसते, एवढाच विरोध करण्याचा अर्थ आपण घ्यावा.

भोळे म्हणाला, मी माझा भारतीय स्त्रियांवरचा प्रचंड लेख पुरा केला. मी जमा केलेले ते आत्महत्यांचे न् छळाचे आकडे एकेक बोलते केले तर काय काय दिसेल कल्पना करवत नाही. हल्ली मला ते नवं इंद्रियचं प्राप्त झाल्यासारखं वाटायला लागलं आहे...तू ती आपल्या बंगल्याजवळ पंपाच्या आसपास फिरणारी हडकुळी, गोरी मुसलमान बाई पाह्यलीस ना अनेकदा? ती लहानशी, केस एकदम पांढरे—

चांगदेव म्हणाला, ती वेडी? बडबडणारी?

भोळे म्हणाला, तीच. केवढंसं शरीर झालं आहे तिचं? ती काय बडबडते हे मी लक्ष देऊन ऐकलं वारंवार. ती तारस्वरात जशी कुणाला समजावल्यासारखं बोलत असते- अरे घरमे जो कुछ था वो सब तुम्हारे सामने रख्खा. एक अंडा था वो बच्चोंको नही दिया लेकिन तुम्हे दिया, दुश्मन! पप्पड दिया और क्या चाहिये मेरे बैरीऽऽ हॅ हॅ हॅ हॅ ऽ अरे क्या खानेको चाहिये और तुझे ऽऽ-अशी तिची बडबड असते कायम. वेडी झाल्यावरही कुणाला तरी पटवून सांगितल्यासारखी. परवा मागची एक गोष्ट आठवून ह्याचा फटकन अर्थ लागला मला..हिचा नवरा दारू पिऊन रात्रीबेरात्री घरी येत असणार, आणि खानेको लाव म्हणत असणार आणि पोटभर खायला घरातच नसल्यानं हिला बडवत असणारं कायम. त्या रोजच्या काचणीनं न् मारानं ती वेडी झाली असणार. ते प्रेशर बिचारीच्या मनावर इतकं असणार की अजून त्याच्यातून तिची सुटका होत नाही. ही बाई आपल्या भारतीय स्त्रीचं प्रतीकच म्हणा की. दारिद्रय, भूक, उपासमार, हाल, असुरक्षितता, नवऱ्याशिवाय कुठलाच दुसरा आधार नसणं, लेंढार, चुकीच्या परंपरा, राक्षसी सहनशक्ती, प्रेशर, अपरिमित यातना—

कुठल्या गोष्टीमुळे तुला हे कळलं?

मग भोळेनं ही गोष्ट सांगितली: मी दोन वर्षांपूर्वी येवल्याला असतांना आमच्या कॉलेजात एक गोसावी जातीचा आडदांड तरुण प्यून होता. तो काराच होता, कारण आमच्या जातीत पाचसातशे रुपये मुलीच्या बापाला दिल्याशिवाय कोणी मुलगी देत नाही, असं तो म्हणायचा. बायकांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त झाल्यामुळे भारतीय स्त्रीची असहायता, पारतंत्र्य वाढलं हा सिद्धान्त अंशतःच खरा आहे हे ह्या गोष्टीवरून सिद्ध होईल. तर हा तिशीला आलेला कारा प्यून त्याच्या भावाच्या झोपडीवजा घरात रहायचा. भावाचं लग्न झालं होतं आणि त्या लग्नाला काही पैसे आमच्या प्यूननं दिले होते. त्यामुळे भाऊ त्याला घरात राहू देत असावा. भावाला तीन मुलं होती. भाऊ मोंढ्यावर धान्याची पोती वहायचा, हमाली धंदा करायचा. एकदम जनावरासारखं काम. तरुण वयातच बहुधा ते परवडतं. नंतर हे लोक निकामीच होतात. इकडे उपासमार आणि तिकडे पोती उन्हात वहायची, गावात ओढून न्यायची. तर ह्या भावाला आणि आमच्या प्यूनलाही दारू दररोज प्यायचं व्यसन. दोघे भाऊ तुफान गावठी दारू पिऊन तर्रर व्हायचे. घरात पोराबाळांना खायला आहे की नाही याची काळजी नाही. ती बाई सूत कातायला जायची त्याचे बाराएक आणे मिळायचे. हे हरामखोर रात्री उशिरा झिंगून जाणार आणि बाईला लाथ मारून उठवणार, खायचं ठेवलेलं असेल तेवढं शिवीगाळ करत खाणार, बहुधा राखून ठेवलेलं त्यांना कमीच व्हायचं. त्यामुळे बाईला दोघे मिळून शिव्या देणार, आणखी दे म्हणणार. ती आणि मुलं उपाशी राहायची पण भीतीच्या पोटी यांना सगळं राखून ठेवायची. एखाद्या वेळी घरात काहीच नसायचं, घासतेलही. तर ते तिला उठवून आजारी असली तरी त्याची पर्वा न करता काहीतरी करून घाल म्हणून कशानंही बडव बडव बडवायचे. एखाद्या वेळी काहीच नसलं तर आत्ताच्या आत्ता खुराड्यातील कोंबडी काप अन् शिजव म्हणायचे. कोंबडी शिजेपर्यंत हिला शिव्या न् मार. झोपलेल्या पोरांनाही झोपडीबाहेर फेकायचे. अशा यातना ही एकटी बाई किती दिवस सोसणार? एकदा हे दोघे असेच रात्री एक वाजता आले. घरात काही नव्हतं.

कोंबड्याही संपलेल्या. बाइला चार दिवसांपासून काम नव्हतं. दोन दिवसांपूर्वी मारल्यानं हात सुजलेला ठणकत होता. एक पोरगं मलेरियानं फणफणलं होतं. हे दोन वाजता झिंगून काहीतरी खायला कर म्हणून पुन्हा दोघेजण ओरडत हातात लाकडं घेऊन मारायला उठले. घरात काहीच नाही म्हणून तिनं रडून ओरडून घरातली सगळी मडकी उघडी केली. मला काम नाही. माझं अंग सगळं मारानं दुखतंय. पोरं भुकेली आहेत म्हणून सगळं करून झालं. हे दारूनं तर्रर होऊन लाकडांनी मारत स्टो पेटव म्हणून दरडवायला लागले. मग एका हातानं यांचा लाकडांचा मार चुकवत ती सरपटत कशीबशी स्टोजवळ गेली. स्टोमधलं घासतेल अंगावर टाकलं आणि काडी लावून घेतली. दुसऱ्या दिवशी आम्ही गेलो तर पेटून मेलेली बाई, घाबरून एक शब्द न बोलणारे शेजारचे झोपड्यांवाले, शंभर रुपये मागणारे पोलीस,आजारात रडून रडून थकून झोपी गेलेली एक मुलगी आणि आईच्या प्रेताभोवती रांगणारं एक वर्षाचं मूल, कोपऱ्यात सगळं रागानं पाहणारा एक पाच वर्षांचा पांढरा फट्ट मुलगा.

चांगदेव डोळे गच्च मिटून पडला.

जरा वेळानं डॉक्टर आले. आता केव्हाही चांगदेवला घेऊन जायला हरकत नाही असं ते म्हणाले. आता फार फार सावधगिरी बाळगली पाह्यजे. आहार सांभाळला पाह्यजे. वगैरे सगळं नीट सांगून भोळे आणि ते बाहेर पडले. भोळे त्याला म्हणाला, एकदोन दिवसांत मी बायकोला घेऊन येतो. मग काही दिवस आमच्याकडेच जेवायचं नीट होईल. परवातेरवा मी गावाहून आल्यावर इकडे येतो. तोपर्यंत इथेच थांब.

एकदोन दिवसांत बायकोला घेऊन यायचं म्हणून संसारोपयोगी सामानाची यादी करून बाजारात नाना पदार्थ घेत घेत एका मोठ्या स्टोअरमधे पाव, बिस्किटं वगैरे घेत असतांना एका अतिशय डौलदार पुष्ट बाईकडे भोळेचं लक्ष गेलं. ती धडाधडा ऐटीत निरनिराळे इंग्रजी नावांचे डबे, चॉकलेटं, सुका मेवा असे नवेनवे महाग पदार्थ मागत होती. आणि दुकानाचा मालकही इतरांकडे पूर्ण दुर्लक्ष करत मुद्दाम मुद्दाम तिच्याकडे लक्ष देत नम्रतेनं तिची एकेक वस्तू काढून अदबीनं रचून ठेवत लाया मॅडम, और क्या बाईसाब, अच्छा बाईसाब, असं म्हणत लगबग करता होता. तिनं बदाम घेतले तेव्हा शेजारच्या दुसऱ्या एका बाईनं बदाम हातात चाळून भाव विचारला. मालक दुर्लक्षित सुरात तुटकपणे म्हणाला, साठ रुपया. ती साधी बाई म्हणाली, सात रुपये? कितीचे सात? मालक डबा बंद करत म्हणाला, साऽठऽ सिक्स्टी पर किलोऽऽ...त्याबरोबर त्या गरीब बाईनं हिरमुसून हात काढून घेतला. तिकडे त्या थोराड पुष्ट बाईनं सगळे पुडे, डबे, बाटल्या पिशवीत टाकल्या, पर्समधून चिकार नोटा काढल्या. थँक्यू बाईसाऽब म्हणून मालकानं स्वतः तिची पिशवी नीट रचून बाहेर उभ्या असलेल्या तिच्या गाडीपर्यंत नेऊन ठेवली.

जाता जाता ह्या बाईनं भोळेकडे नीट रोखून पाह्यलं तेव्हा तो हसला. ती आतापर्यंतचा तिचा दिमाख एकदम विसरून आश्चर्यानं ओरडली, तुम्ही...भोळे?

भोळे मोकळं हसून म्हणाला, हो. तुम्ही गुर्जर!

ती म्हणाली, होऽ आता माईणकर. इकडे कुठे तुम्ही? अमरावती तर तेव्हाच सोडली ना तुम्ही?

मग मिनिटभर ते एकमेकांकडे पहात स्तब्ध उभे राहून त्या दोघांनी मधल्या सगळ्या फेकाफेकी करणाऱ्या काळाच्या करणीबद्दल असहाय अशी प्रतिक्रिया व्यक्त करून पूर्वीचे संबंध समोर आणायचा प्रयत्न केला. भोळेला कधी नाही ते वाटलं की आपण चांगले कपडे करून यायला पाहिजे होतं. निदान दाढी तरी...पण जाऊ द्या. एके काळी त्याची वाट पहात उभी रहाणारी, गोड गोड बोलून प्रेम करणारी ही मुलगी- आपल्या त्या काळच्या विपन्नावस्थेतही पुरुषार्थ जाणवून देणारी. पुरात वहात वहात माणसं जवळ येतात, दूर जातात...यथा काष्ठं च काष्ठं च...

हीच बाई लांबून दिसली असती तर एकदम चमकून त्यानं रस्ता बदलवला असता. पण आता एकदम समोरच म्हटल्यावर तितक्याच उत्स्फूर्तपणे त्यानं तिची चौकशी केली. मग एकाएकी तो खचत गेला. पण ती पूर्वीसारखीच हुशार होती. तिनं भर्रकन सगळी परिस्थिती सावरून घेतली. स्वतःचा गेल्या सहासात वर्षांचा इतिहास सांगून तिनं बोलताबोलता जुने संबंध सार्वजनिक करून टाकले. तसं जुनंही आता पोरकट वाटेल असंच होतं. ती म्हणाली, मला दोन मुलं आहेत. चलता का? गाडी आहे. पुन्हा सोडू आम्ही तुम्हाला...गव्हर्मेंट क्वार्टर्सवर...चला की... फारच लांब आहेत, पुन्हाबिना तुम्हाला यावसं वाटलं तरी तुम्हाला येता येणार नाही. फार जुनाट गाव आहे हे. तिकडे अजून बसफिस काही नाही. तुम्हाला मुलंबिलं काही...एकच? लग्न केव्हा केलं? इतक्या उशिरा? अरे वा, तुम्हालाच ते बंधन नको असेल. शेवटी केलंच ना? छान.

मग गाडीत ड्रायव्हिंग करता करता चाक फिरवत फिरवत समोर पहात तिनं त्याची सगळी माहिती बोलताबोलता विचारून घेतली. अर्थात त्याच्याजवळ सांगण्यासारख्या घटना काहीच नव्हत्या. ह्या गावाहून त्या गावी. पगारही सांगण्यासारखा नव्हता. तिच्याकडूनही फारसं काही ऐकण्यासारखं विशेष नव्हतं, नेहमीचंच. ज्यूनियरला लग्न, मग बदलीची तीनचार मोठमोठी गावं, मग प्रमोशनवर हे त्या मानानं जुनाट मागासलेलं गाव, नवऱ्याच्या सरकारी नोकरीचा वैताग, मुलांच्या सवयी, त्रास वगैरे. सगळं नवऱ्याचंच, स्वतःचं तसं काहीच नाही. ती काचेतून पुढल्या सरळसोट रस्त्याकडे पहात म्हणाली, किती योगायोग असतात नाही?

एवढंच तिच्या स्वतःचं तिनं सांगितलं!, तेव्हा त्यानं मान वळवून तिच्या चेहऱ्याची इकडची संपूर्ण बाजू पहिली. मुली लग्नानंतर इतक्या ओबडधोबड होतात, हे क्रूर होतं. नवरे साले बायकांना सगळ्या अंगावर बुकलत असतात की काय? त्याच्या अशा एकसारख्या पहाण्यानं तीही अस्वस्थ झाली. मग उगाच तिनं हॉर्न वाजवला.

क्वार्टर्स आले. बाजूच्या एका गुलमोहराखाली मुलं खेळत होती. तिनं गाडी थांबवली आणि ते उतरून बाजूच्या कंपाउंडमधे शिरले तेवढ्यात कंपाउंडच्या फाटकापाशीच महाराष्ट्र राज्य लिहिलेली एक जीपही थांबली आणि तिचा नवराही उतरला. जीप वळणार म्हणून भोळे रस्त्याकडे घाईघाईत गेला तर जीपही तिकडेच माघारी सरली. मग तो बावचळून डावीकडे सरला तर जीपही त्याच्या अंगावरच गर्रकन आली. कारण नसतांना तीनदा वेडेवाकडे अंगविक्षेप भोळेला करावे लागले. मग नवऱ्याची ओळख. नवरा माईणकर चाळिशीचा, थोडे थोडे मागून पांढरे केस होत आलेला, सरकारी हुद्यामुळे बोलण्यात मगरुरी संक्षेप असलेला, फेंगडा, जाड, ओरांगउटांगसारखा असा. भोळेला वाटलं विशीतल्या वर्गभगिनींवर प्रेम करणाऱ्या बावळट पोरांना त्या पोरींच्या खऱ्या नवऱ्यांचं हे चित्र माहीत नसतं. बरोबरीच्या पोरींचे नवरे आधीच मोठाले प्रत्यक्ष ओरांगउटांगसारखे नोकऱ्यांमधे प्रमोशनच्या उचापती करत असतात. मुली म्हणजे त्यांचा संसार थाटायचं यंत्रच असतात.

भोळेनं आपली भयंकर लांब पिशवी उघडून एक बिस्किटांचा पुडा बाहेर काढला. आणि तिच्या धाकट्या दीड वर्षाच्या पोराच्या हातात दिला. हे मूल उगाच इकडेतिकडे रांगत होतं. मग तिनंच त्या गुबगुबीत पोराला उचलून टीपॉयवर बाहुल्यासारखं ठेवलं.

पोरगं आईसारखंच टपोऱ्या सुंदर डोळ्यांचं होतं. भोळेनं एकटक त्या पोराकडे एकाएकी विचित्र पद्धतीनं भेदून पाहून घेतलं. त्याचे डोळे, भुवया, हनुवटी, कपाळ- आईसारखं होतं. पण डोळ्यांत बाहुल्यांचा रंग आईसारखा बदामी नव्हता. तो बापाकडून आलेला. नाक तर बापाचंच होतं. केसांचा रंग आईसारखा. भोळे त्या मुलाची प्रत्येक गोष्ट जणू काही अर्धी चिरून आईकडचा अर्धा भाग बाजूला काढून उरलेला बाबाचा भाग असूयेनं फेकत होता. मग भानावर येऊन त्यानं त्या गुबगुबीत मुलाला सबंध जवळ घेतलं. त्याला खेळायला म्हणून खिशातल्या किल्ल्यांचा झुपका दिलं. पोरगं खूष झालं. भोळेही खूष झाला. श्री. माईणकर सगळे कपडे काढून बाथरूममधे इकडेतिकडे काही करत होते.

दरम्यान ती मुलांना दिवसभर किती पद्धतशीर सगळं खायला द्यावं लागतं याची प्रचंड यादीच सांगत होती. एक मोलकरीण निव्वळ ह्या पोरांच्या खाण्यापिण्याला मदत करण्यावरच होती, म्हणजे भोळे स्वैंपाकघरात आला तेव्हा ती मोसंबी पिळत होती आणि वर्गभगिनी त्या रसात काहीतरी व्हिट-नं सुरू होणारे का संपणारे ड्रॉप्स टाकून थोरल्या पोराला पाजत होती. तिचा नवरा म्हणजे भोळेचा वर्गमेहुणा हे समाधानानं पहात होता. इतके पदार्थ आपल्या बाळाला आपण प्राध्यापक असल्यामुळे देऊ शकणार नाही याचं त्याला वाईट वाटलं.

तो म्हणाला, क्वार्टर्स फारच सुंदर आहेत.

तिचा नवरा म्हणाला, पण शेजार नीट नाही. पोरांना घरातच खेळावं लागतं. शेजारच्या पोरांना काही वळण नाही. आमचा चाललाय प्रयत्न ब्लॉक बदलून घ्यायचा. पण सगळीकडेच त्यांनी एकेका इमारतीत एक शेड्यूल्ड कास्ट ठेवला आहे, तीन दुसरे.

वर्गभगिनी म्हणाली, तसं काही आम्ही शिवाशिव वगैरे पळत नाही. जातोयेतोसुद्धा आम्ही त्यांच्याकडे. पण संस्कारही महत्त्वाचे असतात, नाही का?

वर्गमेहुणा म्हणाला, सुरुवातीला आम्हा चौघांत कोण शेड्यूल्ड कास्ट आहे हेच कळेना! मला वाटायचं खालचे जाधव आहेत. पण ते निघाले मराठा! आणि खालचे पुंड तर देशस्थ ब्राम्हण निघाले!

भोळे म्हणाला, आणि त्यांना तुम्ही वाटला असाल शेड्यूल्ड कास्ट!

वर्गभगिनी एकदमच खिदळून उठली. नवऱ्याच्या काळ्याकुट्ट रंगावर हा तिला विनोदच वाटला. वर्गमेहुणा एकदम थंड झाला. पण भोळेला तसं अभिप्रेत नव्हतं. तरी तो गृहस्थ कारण नसतांना म्हणाला, आम्ही ब्राम्हण आहोत.

त्यावर पुन्हा वर्णभगिनी आणि भोळे एकदम हासले. गृहस्थ त्यामुळे उगाच चेहरा पाडून बसला.

नंतर त्यानं थोरल्या मुलाशी दोनतीन वाक्यं इंग्रजीत सुरू केली : वॉट इज दॅट व्हिच यू आर ईटिंग? मुलगा पेरूची फोड खात म्हणाला, धिस इज पायनॅपल, डॅडी! गृहस्थ संतापून म्हणाला, गाढवा, कितीदा सांगितलं ग्वाहा... ग्वाहा. पेरू म्हणजे ग्वाहा. पायनॅपल म्हणजे अननस. जरा पोरगं बिनचूक इंग्रजी वाक्य बोललं की बाप खूष व्हायचा. तेव्हा भोळेनं नेहमीप्रमाणे मातृभाषेतूनच शिक्षण द्यावं असा बोध सुरु केला.

त्याबरोबर माइणकर गृहस्थ भडकून इंग्रजीच्या महत्त्वावर बोलत राह्यला. इंग्रजीमुळेच सरोजिनी नायडू, जवाहरलाल नेहरू वगैरे जगविख्यात लेखक झाले असंही तो म्हणाला.

भोळे म्हणाला, कोण म्हणतं हो त्यांना जगविख्यात? हिंदुस्थानाबाहेर कोणी विचारत नाही ह्यांना. आपले जगविख्यात लेखक म्हणजे मातृभाषेतून लिहिणारेच आहेत तुकाराम, बंकिम, प्रेमचंद वगैरे.

आपल्या नवऱ्याचं कोतं ज्ञान उघडकीला येतं आहे याचा वर्गभगिनीला आनंद होत होता. ह्यामुळेही माईणकर अगदी रंजीस आले. ते म्हणाले, इंग्रजी नीट नसलं तर नोकरी कोण देणार ह्यांना?

भोळे म्हणाला, नोकरीसाठी शिकवणंही बरोबर नाही.

नंतर विषयांतर म्हणून भोळेनं वर्गभगिनिबरोबर जुने कॉलेजचे विषय सुरु केले. नाटकं, सहली, काय काय मजा यायची वगैरे. आता त्यांच्या बोलण्यातून काही संशयास्पद निघतं का याकडे माईणकरांचं दुर्लक्ष केंद्रित झालं.

नंतर फराळावर संपूर्ण मन केंद्रित करून चहा घेऊन भोळे निघाला. वर्गभगिनी मनापासून म्हणाली, येत जा. वहिनींना एकदा घेऊन या. इथे माझ्या कोणीच ओळखीचं नाही. हे तर कायम दौऱ्यावरच असतात.

पण माईणकर गृहस्थ काही त्याला या असं म्हणाला नाही. मग वर्गभगिनी नवऱ्याला म्हणाली, यांना गावात सोडून येता का हो जरा. बस नाही. आता इतक्या लांब—

भोळे हातात आपली भयंकर लांब पिशवी घेऊन उभा राह्यला.

माईणकर अर्थातच कारण शोधत म्हणाले, अग...मी...मला फोनजवळ बसून राह्यलं पाह्यजे. अर्जंट ट्रंक बुक केला आहे, सातच्या आत एक्सपेक्टेड आहे.

वर्गभगिनीचा चेहरा गोरामोरा झाला. ती म्हणाली, मी सोडून येऊ का?

माईणकर म्हणाले, आणि...मी कानिटकरांनी बोलावलंय. आता येतीलच ते. काही खायचं कर की—

भोळे झटकन म्हणाला, छे छे, गाडीफिडी नको हो. अशा हवेत चालत जाणं फार आवडतं मला. बसा तुम्ही. अच्छा मिस्टर माईणकर.

एका हातात लांब भयंकर पिशवी पूर्ण भरलेली असल्यामुळे निरोप घ्यायला म्हणून भोळेनं एक उरलेला हात माईणकरांकडे पुढे केला तर त्यांनी रुक्षपणे दोन्ही हातांनी नमस्कार करूनच पाठ वळवली. मग तो नुस्ता हात वर करून धाडधाड पायऱ्या उतरून चालायला लागला. पुढे लांब टांगा टाकत पिशवी ह्या हातातून त्या हातात बदलत पाचसहा मैलांचा फटका संपेपर्यंत पूर्ण मरतुकडा होऊन तो चपला घासत एकदाचा पोफळे बंगल्यावर आला. मग वैतागून कुलूप उघडायला किल्ल्या शोधतो तर किल्ल्या नव्हत्या! खिसे पूर्ण उलटे केले पण किल्ल्या नाहीत. माईणकरांकडे राह्यल्या. आता त्यासाठी माईणकरांकडे पुन्हा जाणं नको. मग एक मिनिट पूर्ण ध्यानस्थ उभा राहून तो पुन्हा चालत चालत पंपापर्यंत आला. तिथे रिक्षा करून गावात. चौकात सुदैवानं नेहमी बसणारा कुलूपकिल्ल्यावाला म्हातारा अजून सामान गुंडाळत होता. त्याला रिक्षात बसवून पोफळेबंगल्यावर आणून वैद्यांकडून मेणबत्ती घेऊन ठाकठोक

करून एक किल्ली करून घेतली आणि दरवाजा उघडला. मग वैतागून आतले दरवाजे ढकलून तो आत शिरला आणि जरा वेळ पडून राहिला. आज ह्या माईणकर प्रकरणामुळे चांगदेवकडे जाणं राहिलं. बिचाऱ्याला सारखं पडून काळजीनं वैताग येत असेल. आधीच थोड्या दिवसांचा सोबती.

तेवढ्यात दोघेतिघे मित्र त्याला हाका मारत आले. चिपळूणकर उत्साहात म्हणाला, उठा! उद्या तुम्ही वहिनींना आणायला जाणार म्हणून कळलं. म्हटलं आज बसू माझ्याकडे पीत. गोप्या बाटल्या आणायला गेलाय. तो इकडेच येतोय. देसाई डाक बंगल्यात मटनाची जेवायची ऑर्डर द्यायला गेलाय. चला, तयारी करा. आम्ही सबंध सुटीत तुम्हाला डिस्टर्ब केला नाही हे लक्षात घ्या. तुमचं लिहिणं झालं की नाही ह्याही सुटीत? बहुधा झालंच नसेल!

शेंडे म्हणाला, याचे भारतीय लोकशाहीवरचे लेख म्हणजे वहिनींना माहेरी पाठवून एकटं रहायची सबब झाली आहे निव्वळ! वृत्तीनं कारा असलेला हा विवाहित गृहस्थ आहे.

भोळे हसून म्हणाला, एकटं रहाणं मला आवडतं. पण ह्या सुटीत दोन प्रचंड लेख पुरे केले मालक! आता टाईप करून पाठवतोच. तिसरा चाललाय. भारतीय स्त्रियांवरचा लेख अप्रतिम झालाय. चांगदेव बरा असता तर इंग्रजीचं तपासून एवढ्यात इंग्लंडमधे गेलासुद्धा असता हा लेख. दुसरा मराठी वृत्तपत्रांचं ब्राह्मणी स्ट्रक्चर हा लेखही पुरा झालाय. काय काय पेपरं वाचावी लागली भडव्यांनो अठराशे पन्नासपासून तर आतापर्यंत! असे आठेक लेख झाले की बघाल साल्यांनो माझं नाव किती होते ते.

शेंडे म्हणाला, नाव काय होणार तुझं! शेवटी वर्तमानपत्रं आमच्याच हातात असल्यावर तुला कोणी प्रसिद्धी देणार साल्या! ब्राम्हणांची बदनामी करणं परवडणार नाही तुला. पण तरी बरं झालं, तू लिहायला सुरुवात तरी केलीस!

ही सुटी कारणी लागली मालक. गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यात परीक्षेचं काम घेतलं नव्हतं मोह आवरून लिहावं काही म्हणून, तर पाहुणे येऊन बसले महिनाभर. गेल्या दिवाळीत मेहुणीचं लग्न काढलं साल्यांनी तिकडे जावं लागलं-पंधरा दिवस गेले येऊन जाऊन. तीनचार वर्षांपासून दर सुटीत असंच चाललंय. गेल्या सुटीत जरा मूड येतो तो आई वारली. आता आपण ठरवलंय कुणाच्या लग्नाला जायचं नाही की कुणाच्या मर्तिकाला जायचं नाही. किती लग्नं होणार ह्यापुढे याची मी यादी केली. भाऊ, बहिणी, मेहुणे, मेहुण्या, बहिणींचे मुलगे, भाच्या, पुतणे, पुतण्या-दीडशे होतील! आणि मरणारे कमीत कमी तितकेच वडील धरून. आयुष्य ह्याच्यासाठीच खर्ची घालावं म्हणून दिलं काय असंच वाटावं च्यायला. आपण ठरवलंय कुठे जायचं नाही.

गंगातीरकर म्हणाला, आपला प्रिन्सिपलही तुम्हाला काहीही कामं लावून देतो राव. मॅगझिन काय, हिशेब काय, गॅदरिंगचं नाटक काय, बक्षीस समारंभ काय, स्पर्धा न् हजेऱ्या-हॅट त्याच्या ए आय् सी एच् आय् जी ए एन् डी! तुम्ही आंग काढून घेत जा—

भोळे म्हणाला, आंग कसलं काढून घेणार? इतकं काम करतो म्हणून तर आमचं ह्या कॉलेजात कोणी वाकडं करू शकत नाही. नोकरी ह्या सगळ्या लिहिण्याफिहीण्यापेक्षा महत्त्वाचीच आहे. ज्याच्यावर आपलं स्वाभिमानानं पोट भरतं ती गोष्ट बैलासारखं राबूनही नीट करावी-हे चांगदेवरावचं म्हणणं ग्रेट आहे.

शेंडे म्हणाला, बरोबर आहे. आमचा कुळकर्णी कादंबऱ्या लिहितो पण जन्मभरसुद्धा एकूण रॉयल्टी मिळणार नाही एवढी त्याला एका परीक्षेचं काम केलं की मिळते. नोकरी नीटच करावी बाबा. पैशाचं एक वेळ सोडा, पण अशा लिहिणाऱ्यालाही काय किंमत आहे? अर्धे पैशे देऊन पुस्तक छापून आणतो तो कुळकर्णी. प्रकाशकाकडे खेपा, चुळबुळेसारख्याचे पाय धरून ते पुस्तक टेक्स्टबुक म्हणून लावायची धडपड.

गंगातीरकर म्हणाला, त्याहीपेक्षा प्रकाशकालाच स्वतः सर्व पैशे देऊन कवितासंग्रह प्रकाशित करणाऱ्या आपल्या जोशींच्या कवितांचं काय?

शेंडे म्हणाला, कवितेबद्दल तर बोलूच नको गंग्या. कोणी कवितेबद्दल गंभीर विचार करतो असं मला वाटत नाही. निव्वळ विदूषकी करून सगळे प्रसिद्ध कवी जगताहेत. चार मित्र वा वा करतात याच्या पलीकडे कवितेला काही अर्थ राह्यला नाही. कुठेतरी उकिरड्यावर सापडणाऱ्या शेकडो रानफुलांसारखं कवींचं झालं आहे. आजचं प्रचंड दणकट जग कवींना पेलेल असंही वाटत नाही.

भोळे म्हणाला, आता मला तसं तातडीनंच विचारप्रधान पुस्तक लिहायचं होतं भारतीय लोकशाहीच्या भविष्याबद्दल. पण लक्षात आलं आहे की फुकट ओढाताण करून बायकोला मुलासकट माहेरी पाठवून, नोकरीची फालतू कामं सांभाळून, पुन्हा शिकवायची न् अभ्यास करायची दगदग वेगळीच-तर असं सगळं करून सुटीत परीक्षेच्या पैशाला चाट देऊन बैठक मारा, जाग्रणं करा, सिग्रेटीमागून सिग्रेटी प्या, चहामागून चहा प्या, तासातासानं तंबाखूचा तोबरा द्या-असं रात्रभर करा! उगा म्हणता म्हणता टी.बी. न् कॅन्सर झाला तर औषधापुरतेसुद्धा पैशे ह्या भारतीय लोकशाहीच्या पुस्तकामधून मिळायचे नाहीत! करू सावकाश पुरं. त्याआधी लोकशाही गडगडली नाही ह्या देशातली तरी पुरे.

सगळे जण जोरात हसले. गंगातीरकर म्हणाला, म्हणजे पुस्तक लिहिणं एखादं म्हणजे दहा वर्षं आयुष्य कमी करून घेणंच आहे! मस्त आमच्यासारखं खाव् प्याव्, मजा कराव्!

भोळे म्हणाला, आत्ताच मी माझ्या एका वर्गभगिनीकडे जाऊन आलो-सरकारी बडे नोकर म्हणजे काय काय मजा असते साल्यांची. फुकट घर, वाहन, भत्ते, तुफान पगार, घरात सगळ्या मिळू शकणाऱ्या वस्तू, पोरांनी चुणचुणीत व्हावं म्हणून सगळे खेळ, मासिकं, खाणंपिणं हा हल्लीचा सुखवादी भोगवादी प्रवाह आहे. आपणच फक्त ध्येयवादाचे झेंडे उंच करून घासतेलाचे टीप हातात घेऊन हिंडत असतो ह्या दुकानातून त्या दुकानात.

चिपळूणकर म्हणाला, आपण तर हा धंदा केव्हा सुटणार ह्या काळजीत आहोत. पैसाच नाही तर दुसरं काय मिळणार प्राध्यापकांना. विरुद्ध दिशेनं पोहण्यासारखं—

भोळे म्हणाला, पैसा न मिळणाऱ्या आपल्यासारख्या बुद्धिजीवी माणसांची एकमेव भाबडी इच्छा म्हणजे नावलौकिक! पण आता ह्या समाजात भंपक लोकांनासुद्धा वर्तमानपत्री नाव इतकं मिळतं आहे की त्यातही आपल्यातल्या सुबुद्ध माणसांना शिरावंसं वाटत नाही.

शेंडे म्हणाला, म्हणजे एस्टॅब्लिशमेंटमधेच रहावं असं म्हणतोस का तू?

भोळे म्हणाला, शेंड्या! असले एस्टॅब्लिशमेंट न ॲन्टि-एस्टॅब्लिशमेंटसारखे भोंगळ शब्द पुन्हा वापरू नकोस. म्हटलं तर सगळंच एस्टॅब्लिशमेंट असतं म्हटलं तर काहीच नसतं.

शेंडे म्हणाला, आणि तुम्ही साले तसल्या फालतू बुद्धिहीन जगणाऱ्या लोकांचे आदर्श बाळगता म्हणजे तुम्ही काय मोठं चांगलं लिहिणार? इतके दिवस खरं भुकेलं आयुष्य जगला तुम्ही, एवढीच आशा आहे चांगलं लिहिण्याची. पण तुमच्यासासारख्यांना सुद्धा आता ते उमदं दुःखाचं जगणं नको वाटतं. केवढा ऱ्हास आहे हा सृजनशीलतेचा!

भोळे म्हणाला, माझ्या लोकशाहीवरच्या चिंतनाची सुरुवात इथून होते शेंडेभौ! लहानपणी भाऊ आणि मी दोघे आठ आण्यांसाठी दिवसभर बागाईतदारांच्या बागांमधे बारे धरायचो. केळीचे घड कंबर दुखेपर्यंत एक पैशाला एक असे डोक्यावर वहायचो. बारा आण्यात मैलाचे दगड रंगवायचो उन्हात पायी पायी, आणि पैशांच्या लोभानं आठ आठ मैल गावापासून लांब जाऊन पडायचो की परत गावी यायला रात्र होऊन जायची. घरात ज्वारी नसायची. त्या वेळी वडलांना हे स्वतःच्या कष्टाचे आठबारा आणे देतांनाही अभिमान वाटायचा. रविवारी सगळी शाळा सारवून मी चार आणे कमवायचो. तो उत्साह मला अजून माहीत आहे. ह्याचंच नीट विश्लेषण केलं तर हे शोषण ठरतं. एखाद्या वेळी भाऊ उगाच संतापून मला फटाफट तोंडात मारायचा. आणि आई संध्याकाळी आल्यावर हे सांगावं याची वाट पहात मी डोळे पुसत रस्त्यावर बसायचो तर संध्याकाळपर्यंत हेही विसरून जायचं. मग आई दुरून डोक्यावर सरपण घेऊन येतांना दिसली की फारसं काही आठवायचं नाही, फक्त थकून गेलेल्या तिच्या अंगावर डोकं ठेवून नुस्तं निरागस रडणं. त्या आईच्या लुगड्याचा श्रमिक वास मला अजून आठवतो. मी अभ्यास करायचो तेव्हा माझ्या चहाच्या उरलेल्या पत्तीचाच भाऊ चहा करायचा, आणि त्याच्या पुन्हा उरलेल्या पत्तीचा मी चहा करायचो. ती चव मी विसरलो नाही. म्हणून ही दारिद्र्यावरच आधारलेली पोकळ लोकशाही उलथून टाकली पाह्यजे. परवा आपल्या माठूरामनं पोराच्या मेडिकलच्या ॲडमिशनसाठी पन्नास हजार रुपये देणगी दिली. आपल्या गोएंकाशेटच्या मुलीचं लग्न झालं तर पैशाची देवघेव निव्वळ दोन लाख की अडीच लाख अशा पातळीवर चालली होती! प्रत्येक वऱ्हाडीण बाईला एक तोळ्याचं लॉकेट की दीड तोळ्याचं! कुठून सामाजिक समतेला सुरुवात करणार तुम्ही? इकडे दारिद्र्याला इतकं सृजनशील महत्त्व देऊन तिकडे हा निव्वळ पैशांचा पाण्यासारखा वापर चालल्यावर लोकशाही टिकणार कशी?

चिपळूणकर म्हणाला, भोळेसाहेब, तुमचं पुस्तक लवकर लिहून होणं आवश्यक आहे. चार लोकांपर्यंत तरी नवे विचार जाणं आवश्यक आहे. आता पुढल्या सुटीतच

जमेल ते. आपल्याकडे लिहिणाऱ्यांना काही रजा वगैरे सुद्धा नसते च्या आयला.

भोळे म्हणाला, काय करावं, काही कळत नाही. आता उद्या बायको येईल की पोराचा डायरिया न् किरकीर आणि हे आणा ते आणा पुन्हा आपलं नेहमीचं सकाळी आठपासून संध्याकाळी सहा-साडेसहापर्यंतचं टाइमटेबल न् गोंधळ न् शिकवणं न् गॅदरिंग न् सतराशे ऑफिसची न् भल्लाची कारकुनी कामं आणि पुन्हा माठूरामच्या स्टाफ मीटिंगा. पुन्हा येत्या उन्हाळ्यात बायको माहेरी जायला तयार होणार नाही. तिच्या भवजयींना तिचं तिथे रहाणं आवडत नाही. आमचं घर तर आता तुटलंच आहे. बायकोलाही आता सुटी आली की संकटच वाटतं, माझ्या आग्रहाखातर जावं लागेल म्हणून.

शेंडे म्हणाला, खरं तर भोळे, तुझं जगण्यावरच इतकं प्रेम आहे की तुला लिहिणं जमणारच नाही असं वाटतं. काहीही लिहायचं तर जीवनाच्या बाहेर यावं लागतं. तू बायकोच्या आणि पोराच्या बारीकसारीक गोष्टींतही इतका रस घेऊन गुंडाळला जातोस की विचारू नका. संसारात तुला नको तितकी गोडी च्यायला. खरा तत्त्वज्ञानी, चिंतक, कलाकार बायकापोरं उपाशी मेली तरी तिकडे लक्ष देत नाही.

तेवढ्यात चांगला देशपांडे बाटल्या घेऊन आला होता. तो म्हणाला, भोळेच्या लिहिण्याचं प्रकरण चाललंय वाटतं. च्यायला. लिहून न् वाचून ह्या देशात कधी काही झालं आहे? नाहक ही पुस्तकाची खेंगटं डोक्यावर घेऊन जगतात काही माणसं. युगं गेली पण माणूस बदलला नाही ही वस्तुस्थिती आहे. ही पुस्तकं जाळून टाकणं आवश्यक आहे जगभरची. पुस्तकं बंद झाल्यानं निदान माणूस ह्या काचाणीतून मोकळा तरी होईल. सुधारणा वगैरेंसाठी पुस्तकं उपयोगी नाहीत. रट्टे पाह्यजेत वरून. असल्या देशांना केमाल पाशा न् माओ न् स्तालिनसारखेच पाह्यजेत. भोळे, हे माझे विचारही एका तरुण सुशिक्षित प्राध्यापक सुविचारी बुद्धिमान वगैरे माणसाचे म्हणून तुमच्या पुस्तकात यायला पाहिजेत.

तेवढ्यात देसाईही आला. तो म्हणाला, चला, वाटेत तुम्हाला एक खास बातमी सांगतो. ती जयस्वाल पोरगी है ना?...त्या पोरापोरींनी परवा **ज्ञानप्रकाश मंडळ** नावाचं काही स्वतंत्र सुरू केलं नाही का?...हाँ...तीच! बाकीची पोरं ह्या खुळचट परापोरींची कायम टिंगल करू. **ज्ञानप्रकाश मंडळाद्वारे** कॉलेजातल्या मुलामुलींना ध्येयवादी प्रेरण आम्ही देणार आहोत वगैरे भाषणं करू त्यांनी उद्घाटनाच्या वेळी! तेव्हा माठूरामनीही अशीच पिढी आमच्या कॉलेजातून तयार व्हावी अशा सदिच्छा व्यक्त केल्या! चारपाच बावळट पोरंही उगाच ह्या दोनतीन मूर्ख पोरींभोवती फिरत असत्यात. पन त्येंच्यात दोनतीन श्रीमंत पोरं हुती, ते पैसाबीप्सा पुरवू ह्येंना, व्याख्यानंबिख्यानं घडवून आनू. येक अंतर्महविद्यालयीन स्पर्धेसाठी ढालबी त्येंनी स्वखर्चानंच विकत आनली हुती. हेबी जैस्वाल पोरगीनं कायम दर कार्यक्रमात आम्हाला अंधारातून प्रकाशाकडे जायचं आहे वगैरे आसलं खुळचट बोलू. तर काल संध्याकाळी ही जयस्वाल आनि ती दोनतीन

बागडे, छल्लानी वगैरे गुंड पोरं फिरायला गेली म्हने कॉलेजातून आनि तिकडे लांबवर शेतात चक्क बलात्कार केला त्यांनी जयस्वालवर. फार बोंबाबोंब झाली! नंतर जयस्वाल बेशुद्धावस्थेत सापडली. पोलीस काल कॉलेजवर आले हुते. जयस्वालच्या बापानं आज तिचं नाव काढून घेतलं. तिकडे राजस्थानात तिचं लग्न आटपूनच येणार बाप आता!

हॉ हॉ हॉ. अंधारातून प्रकाशात जाणं म्हणजे काय ते कळलं म्हणजे तिला! हॉ हॉ हॉ.

पण आता ह्या बेशिस्तीवर वगैरे माठूराम स्टाफ मीटिंगा घेणार दररोज म्हणजे आपल्यावर बलात्कार! आम्ही सर्वांनी ह्या बागडे, छल्लानी वगैरे गुंड पोरांना यंदा प्रवेश देऊ नका म्हणून लेखी दिलं होतं, पण पुन्हा ते कॉलेजात! फुकट दुष्मनी. बागड्यानं तर भल्लाला स्कूटरच मिळवून दिली बापाकडून. भल्ला त्याला काय काढणार?

सगळे चिपळूणकरच्या ब्लॉकवर येऊन पोहचले चिपळूणकरचा तीन खोल्यांचा छान ब्लॉक होता फ्रीज, कूलर, सगळ्या खोल्यांत पंखे, फर्निचर, मोठा पलंग, रॅक भरून रेकार्डी, टेपरेकोर्डर, रेडीओ, मोठा वार्डरोब भरून सुट वगैरे अनेक प्रकारचे पोशाख, कोचावर दहापंधरा वर्तमानपत्रं मासिकं वगैरे पडलेली, टीपॉयवर प्लेबॉयचे अंक-असा त्याचा आलिशान कारभार होता. चिपळूणकर दीर्घकाळ कारा असल्यामुळे घरावरच चिकार खर्च करत असावा. भिंतींवर एकही कुठे ओरखडा नाही. भिंतीच्या रंगाचाच पायजमाही त्यानं घातलेला! त्यानं आता तिशी ओलांडली होती आणि डोक्यावर संपूर्ण टक्कल पडत चाललं होतं, पण त्यानं अजून लग्नाची उमेद पहिल्याइतकीच प्रबळ राखली होती. दर वर्षी तो इकडच्या मुली मागासलेल्या आहेत असं म्हणत कॉलेजातली एखादी पुढारलेली मुलगी हेरून तिच्याजवळ जाता यावं म्हणून वाट्टेल ते करत राहायचा. बॅटमिंटनपासून तर नाटकात काम करण्यापर्यंत त्यानं गेल्या सातआठ वर्षांतल्या तीन कॉलेजांमधे अनेक प्रकार केले. पण तो फार बुजरा, भित्रा आणि लैंगिक बाबतीत अनभिज्ञ असल्यामुळे त्याचं अजून कुठे काही जुळलं नव्हतं. पण ब्लॉक तर इतका तयार होता की बायकोच फक्त बाकी होती.

त्यानं बर्फ वगैरे आणून ठेवल्यावर पुन्हा जयस्वालचा विषय काढून तो देसाईला म्हणाला, अगदी तंतोतंत बलात्कारच झाला का पण? आँ?

देसाई टाळी देत म्हणाला, थिते आमी कोणी हाजर नसल्यामुळे तंतोतंत काही सांगता येत नै, तथापि त्या पोरीबरोबर टेनिस खिळूनं तुला जे जमलं नाई ते सगळं त्या पोरांनी केलं! हू हू हू हू.

कसा काय झाला पण—

कसा मंजे? ते ह्या हेंदरीला घिऊन गेले आन् एकांतात त्येंच्यातला मानूस जागा झाला! हू हू हू! म्हून जबरसंभोग झालं! सोपं है!

पण दोघा पोरांनी केला? म्हणजे पोरीनं इतकं कसं सहन केलं असणार? पहिल्याच वेळी का नाही ओरडली?

देसाई म्हणाला, चिपळ्या, तोंडात साकर बळंबळं जरी टाकली तरी का कडू लागंल का रे? आँ? हू हू हू हू.

साल्या देसाया, आता ती तुझ्या शिकवणीला यायची त्या पोरीची गोष्ट सांग बरं.. येती का अजून ती? आँ?

आरे येऊन बशाची ती डेबरी त्याच्या आयला, संद्याकाळच्या ब्याचमधी पुना त्याच्या आयला. रोज येयाची ती, आता कसं हाकलावं ब्याद म्हनलं. आन् मी जसजसं रंगून शिकवू तस्तसं तिनं माझ्याकडं टकून बघू! मी म्हनलं. आरे त्याच्या मीतं! हू हू हूऽऽ आता आपल्या ह्या थोबाडाकडं पाहन्यासारकं काई है का? आपल्याला सोताचंच थोबाड कळत न्हाई का आरशावर? हू हू हू ऽ मी तिच्याकडं ध्यानच नै दिऊ नंतर्नतर. मंग झाली बंद. आन् शिकवणीचे दोन मैन्यांचे पैशे? पैशे दिलेच नै दोन्ही मैन्यांचे! मीबी म्हनलं प्रेम केलं कदी नै ते आपल्यावर बिचारीनं, त्याच्या खातर जाऊ द्या चाळीस रुपये! हू हू हू हू हू हू ऽ ऽ होऽऊऽपलेऽऽस!

खो खो हसत पेले हातात घेऊन सगळे चिअर्स चिअर्स म्हणाले. भोळे एकदम गंभीर होऊन म्हणाला, चिअर्स टु अवर फ्रेंड चांगदेव पाटीलज् हेल्थ?

देसाई म्हणाला, फार सिरियस आहे का पाटलाचं?

भोळे म्हणाला, वाटतंय तसं. त्याला पुढल्या वर्षी दुसरा काहीतरी धंदा शोधून द्या लेकांनो. ह्यातून वाचला हेच नशीब. असा उमदा माणूस सापडून मिळत नाही.

सगळे जण म्हणाले, अरे...काय वाट्टेल ते करू...चांगदेव ह्या पाचसहा महिन्यांतच आपला जिगर दोस्त झाला...बेष्ट माणूस...कायम अस्वस्थ वाटतो पण साला...बघू काहीतरी.

देसाई म्हणाला, मधे कुना झ्याक बाईबरोबर दिसला म्हने तो गावात कुटेकुटे. खरं का?

तो हाटेलवर रहायचा तेव्हाची ओळख होती त्यांची. मी पाह्यलय् त्या बाईला. एकदम क्लिओपात्राचीच आठवण होते. मस्त बाई होती मालक. चांगदेवकडे यायची ती केव्हाकेव्हा. गेली पण ती—

चिपळूणकर अत्यंत अस्वस्थ झाला होता. तो म्हणाला, म्हणजे जुळलं होतं का त्यांचं?....नसेल? हॅत त्याच्या. मग काय उपयोग?...पण काय रे देसाया, दैनिक समाजवाद मधे कशी नाही ती जयस्वालची बातमी?

आरे, पुरानिक कॉलेजची अशी बातमी कशी देतील दैनिक हनमंतराव? तिकडे मराठ्यांच्या कॉलेजात कुन्या पोरीला निस्तं हात लागलं की चौकडीत बातमी देतं ते! ब्राम्हनांचं कॉलेज है हे! कल्चर है हितं! हू हू हू हू.

चिपळ्याला वाटत असेल आपणच शेतात गेलो असतो तर बरं झालं असतं त्या पोरांऐवजी तिच्याबरोबर. हे हे हे हेऽ

शेंडे म्हणाला, सभ्यता आडवी येते प्राध्यापक म्हटल्यावर. नाहीतर काय आपणही गेली असतो!

भोळे म्हणाला, पण हे होतच जाणार मालक आता. किती दिवस हे पोरापोरींना दूर ठेवायचं चालवणार आपण. हे कप आणि लिप मधलं अंतर फार दिवस टिकणार नाही.

तिकडे फक्त मुलींचं कॉलेज काढलं आहे चार वर्षांपासनं तर शंभराच्यावर कधी संख्या जात नाही मुलींची. पोरी बापांना सांगतात लेडीज कॉलेजमधे नाव घातलं तर जाणार नाही म्हणून!

आपला चिपळ्यासुद्धा त्या कॉलेजकडे कधी फिरकत नाही. मेडिकल कॉलेजवर मात्र अलीकडे जातोय तो.

सुंदर मुलगी मिळालं तरच लग्न करनार म्हनतू तूऽऽ आन् मेडिकल कॉलेजवर कशाला जातूस रे भडव्या? तुला म्हाइत नै मेडिकलच्या पोरी पहिल्या वर्षी सुंदर दिस्तात आन् यम.बी.बी.यस. जाल्या की निव्वळ पाहावत नै. आमच्या लिंगायतांत असं वचन है की मुलीचं शरीर सुंदर नस्तं तर वय सुंदर आस्तं. सोळासतराची कोन्तीबी पोरगी सुंदरच आस्ते. पंचवीस उलटलं की कितीबी आसली तरी ती सुंदर म्हनता येत नै. आपलंबी तसंच है. आपुनबी तिशीनंतर म्हातारे होतो म्हना की.

एकूण सूर्य मावळल्यावर जसा छत्रीचा उपयोग होत नाही तद्वतच तिशीनंतर बायकोचा काय उपयोग?

चिपळूणकर म्हणाला, म्हणजे सोळासतरा वर्षांची पोरगी माझ्यासारख्या सत्ता वीसच्या बाप्प्यानं करावी का? आँ?

भोळे म्हणाला, शास्त्रीय दृष्ट्या दहा वर्षांचं अंतर बेस्ट असतं मालक. पहा की बाई चाळिसाव्या वर्षी म्हातारी होते. तर तिच्यात आणि तुझ्यात दहा वर्षांचं अंतर म्हणजे तू तेव्हा पन्नासचा होशील. म्हणजे ठीक होईल, पण कमी अंतर असलं की बायको चाळिशीला म्हातारी होऊन बसेल आणि तू त्याच सुमाराला उलट फार्मात असणार! म्हणजे म्हातारा व्हायला पंधरावीस वर्षं अजून उरतील आणि मग वैताग! चुळबुळेच होईल मग तुझा!

हा हा हा, हू हू हू चिपळ्याला हेही पटलं!

देसाई म्हणाला, आपला तर आता असा झाला आहे की बायको कशीबी चालेल, मुलगी असली म्हनजे झालं.

शेंडे म्हणाला, चिपळ्याचा सगळा गोंधळ झाला आहे. आपल्याला तर सुंदर बाई म्हणजे मोठी बाई वाटते, मस्त जाडजूड, गुबगुबीत, ऐसपैस. विशीतली मुलगी म्हणजे काय खरं आहे. ओढाताण?

हॅ हॅ हॅ हू हू हू! चिपळ्याला तुम्ही ज्यास्तीच गोंधळात टाकताय साल्यांनो वेगवेगळं काहीही सांगून सांगून!

भोळे म्हणाला, चिपळ्या! तुझी तूच ब्यूटीची कल्पना स्पष्ट करून घे. नाहीतर ही नको, ती नको, याच्यात पस्तिशी येईल न् मग तुझ्या इच्छा तू सामाजिक कार्य करून प्रसिद्ध वगैरे होण्यात कन्व्हर्ट करशील! जॉनसननं म्हटलंच आहे की लग्नात फारशी सुखं नसतात पण ब्रम्हचर्यात काहीच नसतात. सांग, सुंदर म्हणजे काय?

चिपळूणकर म्हणाला, ते आपल्या सगळ्यांना माहीत आहे—

भोळे म्हणाला, चिपळ्या, सगळ्यांना माहीत आहे यावरून काहीच बोध होत नाही. तुझ्या मनात साल्या प्रेम न् ब्यूटी न् सगळा गोंधळ. सौंदर्य म्हणजे निव्वळ शारीरिक असतं असाही तुझा गैरसमज झालेला आहे. दुसऱ्यांना अत्यंत सुंदर वाटणाऱ्या मुलींशी

पाच मिनिटं बोललं की मला त्या अत्यंत कुरूप वाटतात. सुंदर बायकांच्याही निव्वळ भ्रामक कल्पना आपल्यात भरून ठेवलेल्या आहेत. सगळं रोम्यांटिक जमान्यातलं आहे. रोम्यांटिक प्रेमही आता इतिहासजमा झालं आहे. कुरळ्या केसांमुळेसुद्धा प्रेम जुळणं म्हणजे काय मूर्खपणा होता पूर्वी! त्यापेक्षा जुने बालविवाह सुंदर होते. ह्या जीवघेण्या कटकटीतून माणसं मोकळी व्हायची, आणि कामतृप्ती म्हणजे निव्वळ विहितकर्म म्हणून लोक करायचे. त्या पाश्चात्य कल्पना इकडे आल्यापासून सगळा गोंधळ झाला.

देसाई म्हणाला, बिलकुल राइट बोला.

चिपळूणकर म्हणाला, म्हणजे आईबापांनी जुळवलेली लग्नंही सुंदर समजतोस का तू अजून?

भोळे म्हणाला, तेच सांगतोय मी की आपण सगळ्या पाश्चात्य कल्पनांनी आपले व्यवहार पहायला लागलो की काहीच सुंदर वाटणार नाही. आपलं बोटांनी जेवणसुद्धा सुंदर वाटणार नाही! आणि कुठलीही युरोपियन बायको कोणी केली की ती कितीही कुरूप असो, आपण रोम्यांटिकपणानं ते सुंदर समजतो. कुठलाही परदेशी चेहरा आकर्षक वाटतो! परप्रांती परजातीच्या शरीरसंबंधात अजूनही धाडसाचा अंश येतो आणि रोम्यांटिकपणानं ते आपण सुंदरच समजतो. मराठ्यांत ब्राम्हण मुलगी कोणी केली की ते सुंदर! मुंबईसारख्या शहरात आंतर्जातीय लग्न सुंदर ठरतं पण खेड्यात तसं लग्न म्हणजे किती कटकटी सोसाव्या लागतील? जे शहरात सुंदर ते खेड्यात का नसतं? एकेकाळी एक मुलगी मला सुंदर वाटायची, आता मला ह्या परिस्थितीत ती अत्यंत कुरूप वाटेल आणि लग्न एकदाच होतं! फसले म्हणजे फसलेच.

तुला काय म्हणायचंय ते सरळ सांग.

सरळ हेच की सौंदर्य म्हणजे सगळ्या गोष्टींचा सुसंवाद पाह्यजे. नुस्ता चेहरा न् केस आणि स्कर्ट, स्नोपावडर-हे नाही. तुम्ही ज्या थरात वावरता त्या थरावर सुंदर कोण हे ठरतं. मला तर बुद्धिमान मुलीसुद्धा सुंदर वाटतात.

चिपळूणकर म्हणाला, म्हणजे मला-माझ्या थरावर-कोण सुंदर असेल?

भोळे म्हणाला, बुद्धीनंही हुशार आणि बाहेरूनही चांगली असे दोन अक्ष मांडून तू आलेख काढ आणि मग मधल्या रेघेवरून पहात जा. ह्याच्यात एकाच बिंदूवर हजारो मुली बसतील त्यातली कुठलीही एक तुला चालेल. मला असं वाटतं की तुला निव्वळ बाहेरून सुंदर वाटणारी नको आहे.

शेंडे म्हणाला, पण हा स्वतः कुठल्या बिंदूवर आहे हे ठरवणारा दुसरा आलेख समाजात असतो की रे! धर्म, जात, उत्पन्न-हजार अक्ष आहेत. म्हणून आपल्या देशात पोरापोरींचे कायम वांधेच होत रहाणार. नाहीतरी लग्न झाल्यावर हे सगळं पुसलं जातं अन् बाई अन् बुवा एवढे दोनच अक्ष उरतात. शंकराची पिंड शोधणारा आपल्याकडचा कोणी प्राचीन माणूस फ्राईडचा बापच असावा.

चिपळूणकर म्हणाला, निव्वळ गांडू जमलो आहोत आपण चर्चा करणारे. आपल्या कॉलेजात ती एक झुऑलजीला पोरगी किती सुंदर होती. आम्ही एकदा ट्रिपला बरोबर होतो तर नदीत मी आंघोळ करत होता तर तिनं शिट्ट्याच मारल्या माझ्यावर! लई

चेकाळली होती त्यावेळेस. मी म्हटलं घसट करावी, पण दोन दिवसांत ती गोव्याच्या प्लेअर्सबरोबर रात्री जे गायब झाली ते सकाळीच सोडलं त्यांनी तिला. मी आपला बघू तुमचा हात म्हणून हातावर बोट टेकविण्यापलीकडे गेलोच नाही.

गंगातीरकर म्हणाला, तीच एक सुंदर पोरगी होती आपल्याकडे. तीसुद्धा गेली सोडून. सुंदर होती. काय मांड्या होत्या. बेस्ट.

चिपळूणकर म्हणाला, कसली बेस्ट साल्या. कशालाही सुंदर म्हणतोस काय? पाच मिनटं तिच्याशी बोललं की नको वाटायची ती. अगदी निर्बुद्ध. निव्वळ घोडीच.

देसाई खो खो हसून म्हणाला, द्या टाळी! बाईमधे काय पहावं हे कळेना याला अजून! बाईची परीक्षा बुद्धीवरून करायची असते का बे साल्या कधी? ह्या भोळेचं ऐकू नको लेका. हो ऽ ऊ ऽ प ले ऽऽस.

गोपाळ देशपांडे म्हणाला, म्हणून तू मेडिकल कॉलेजवर जायला लागलास वाटतं चिपळ्या हल्ली! असं नुस्तं हेलपाटे घालून काही जुळत नाही येड्याऽ. त्याला जवाहरसारखा एकदम हात घालायचंच धैर्य लागतं बेट्या.

आणि असं करता करता एखाद्या वेळी चप्पल बसली तरी निर्लज्जपणानं अपमान झटकायचंही धैर्य लागतं! हॅ हॅ हॅ ऽ

मला परवा जवाहरलाल म्हणाला, आता ह्या वर्षी तरी करतोस लग्न की नाही? का तुझ्याऐवजी ह्या वयात मी करू दुसरं लग्न? ह ह ह ह.

वयात आलेल्या पोरी येड्याच असत्यात. त्यातून हाल्ली घरातून बाहेर पडायचं स्वातंत्र्य मिळतं. मग हे जवाहर हाटेलीत निऊनंनिऊनं पुस्तकं दिऊनं हात चालवत चालवत जुळवतं बेटं वर्षाला एक तरी. बोलतंबी भयंकर काही काही सालं...येकदा सांगत हुतं की त्याची बायको येकदा रात्रीच्याला रुसली. तुमी दुसऱ्या बायांवर इतका खर्च करता, दहादहा रुपये हाटेलची बिलं भरता, आज मलाबी दाहा रुपये दिल्याशिवाय मी हात लावू देनार नै. तर जवाहरलाल काय मनलं म्हाइत है? ते मनलं, तुला? तुला दाहा रुपये? तुला म्हाईत नै दाहा रुपयांत कसा माल मिळतो ते! हॅ हॅ हॅ. निव्वळ विकृत है साला.

काही का असेना, त्याला हे जुळतं असं मला म्हणायचं आहे.

ह्यात मात्र संशय नाही. कलाच आहे ही. गेल्या वर्षी आम्ही ट्रिपला गेलो होतो बरोबर. तर साल्या जवाहरनं सुरुवातीपासून पोरींना आवडतील असे कामुक ज्योक सांगून सांगून हळूहळू पूर्ण लैंगिक वातावरण करत आणलं आणि मग किल्यात गेल्यावर दोन चेकाळलेल्या पोरींवर बरोबर लक्ष केंद्रित केलं. संध्याकाळी आम्ही तळंबिळं पाहून ठरलेल्या वेळी बसजवळ जमलो तर नेमके जवाहरलाल हजर नाहीत! मग एक चाणाक्ष पोरगी म्हणाली, आता आपल्या मुलींपैकी कोण आली नाही ते शोधा म्हणजे कळेल! मुली सगळ्या एकमेंकींकडे पहात आपण तिकडे गायब झालेलो नाही असं कुतूहलानं दाखवत मग एकदम ओरडल्या, दीक्षित! दीक्षित नाहीय्! मग बरोबर अर्ध्याएक तासानं एका बाजूनं जवाहरलाल शीळ घालत काही झालं नाही असं दाखवत, तर जरा वेळानं दुसऱ्या बाजूनं रस्ताच भुललो असं मुद्दाम दाखवत ती पोरगी दीक्षित! सगळ्यांनी मस्त टाळ्या वाजवून बस सुरू केली!

कोण ती थर्ड यिअरची दीक्षित का? कमाल आहे. एरवी कायम खाली पाहून चालते साली ती आणि कुणी शिट्टी मारली तरी तक्रार घेऊन यायची साली.

जवाहर बाकी ह्यात खरोखरच पटाईत आहे. युनिव्हर्सिटीच्या लायब्रीतली तामणेबाईही बरोबर गटवली साल्यानं. चांगली प्रौढ सज्जन बाई आहे तामणेबाई. पण जवाहरला हे माहीत की तिशीपस्तिशीची बाई एकाच नवऱ्याला कंटाळलेली असते सारखी सारखी. लग्न झाल्यावर दाहेक वर्षं नवरेही आणि बायकाही एकमेकांना कंटाळलेलेच असतात साले कायम. पार्टनर बदलायची सोयच नसते आपल्या ह्या लग्नाच्या नीतिमत्तेत.

हे अगदी बरोबर निरीक्षण आहे भोळेचं. म्हणून तर आपल्या मराठी नाटकांचा सगळी लग्नं झालेली प्रौढ जोडपी हौसफुल गर्दीनं जमतात भडवी! हेऽदणादण हासत असतात लैंगिक विनोदांना.

बंडलं मारू नको स्वतःची. तामणेबाईला घरी नवऱ्याचा फार काच होता. तिला फार छळायचा नवरा. फार संशयी होता पुन्हा. मारायचासुद्धा. बाहेरून कुलूप घालून जायचा तिला कोंडून. हे जवाहरला कळलं असेल.

चांगला देशपांडे म्हणाला, असं? आमचा एक शेजारीसुद्धा राक्षसच आहे साला. बायकोला कायम हे स्वच्छ नाही, ते धुतलं नाही, हे अळणी, ते खारट असं करून खेकसत असतो सर्वकाळ. बाई बिचारी मुकाट्यानं सहन करत असते. इतकं गुरासारखं वागवायचं म्हणजे काय? आता तिला लागोपाठ पाच मुलीच झाल्या त्याला ती काय करणार? तिला स्वैंपाकघरात नुस्त्या पोत्यावर झोपवतात साले. भट साले एकूण दुष्टच. भट भटणीला मारी हे उगाच म्हणीत आलं नाही.

भोळे गंमत म्हणून म्हणाला, तुम्ही कारे असल्यामुळे तुम्हाला उगाच नेहमीच्या व्यवहारातही स्त्रीत्वाची घोर विटंबना दिसत असेल लेकांनो. हे काय कुठल्याही घरात चालतंच. पुरुषांना बाहेर नोकरी करतांना ह्याच्यापेक्षा किती कष्ट, अपमान, अवहेलना सोसाव्या लागतात.

चांगला देशपांडे आणखी चिडून म्हणाला, म्हणून का घरी बायकोवर उट्ट काढावं? आमचा हा शेजारी तर खास हिंदू आहे भडवा. निव्वळ आर्यपुरुषच! आपण एरवीसुद्धा बायकांना फारच छळतो. आर्य! चढायचा फायदा नसता तर आपल्या हिंदूंनी बायकांना अक्षरशः गोठ्यात बांधलं असतं भोळेसर! पौर्वात्य सगळेच हरामखोर आहेत. बायकांनाच आता शहाणपण येईल तेव्हा साल्यांच्या गोट्या कपाळात जातील.

आपल्या वरच्या वर्गाच्या बायकाही गधड्याच आहेत साल्या! खालच्या वर्गाच्या बायका नवऱ्याला लाथ मारून बाहेर काढतात. स्वतः कमावतात, राबतात, स्वतंत्र असतात. जगाच्या पाठीवर कुठल्याही समाजातल्या बायकांपेक्षा आमच्या गावच्या महारणी-चांभारणी स्वतंत्र तेजस्वी आहेत. ग्रेट आहेत. ह्या वरच्या वर्गातल्या बायकांना काय स्वाभिमान आहे? काय तेज आहे? अर्ध्या बायका कुठून लग्न केलं ही चिंता वहात जगत असतात. नंतर नवराही सोडता येत नाही.

चिपळूणकर म्हणाला, याच्यावर तोडगा लव्हमॅरेज—

देसाई चिडून म्हणाला, डॅम साला लव्ह! लव्ह! लव्ह सालं पूरा न्यूसन्स असतं.

फुकट टाइम जातो आनि पुना लग्न! आनि लग्न झाल्यावर पुना एकमेक कशी निघतात ह्येची पुना अनसर्टन्टी असतेच. नव्याण्णव टक्के अनसर्टन्टी. भोळे म्हनतो तेच बरोबर की चाइल्ड मॅरेज काही वाईट नव्हतं. आपल्याला भडवे इंग्रज नावं ठेवायचे आन् आता त्येंच्यात तेराव्या वर्षापास्न पोरंपोरी चडतात सर्रास. विशीच्या आत तिकडे सगळ्यांची लग्नं झालेली असतात. इथे इंडियात सुदारना करून गेले कशाची तर सेक्स स्टार्व्हेशनची. सगळी पोरांची ऐनर्जी'त्येच्याच वाया जाते आपल्या. आमच्या आमी सुदारना करून घेतल्याच असत्या की. आमची काही बुद्धू रेस नै.

चांगला देशपांडे म्हणाला, ते जाऊ दे रे. पण आपल्या शेंड्याचंही लग्न ठरतंय हे तुम्हाला कोणाला सांगितलं का त्यानं अजून? द्या टाळी.

शेंडे चाचरत म्हणाला, कुणाचं? माझं? छे छे! माझ्या बहिणीचं चाललंय. बहुतेक जुळलंच आहे. पण पैसे फार मागताहेत साले. आधीच आमची बहीण म्हणजे अवतारच दिसण्यात. पण इतका हुंडा कुठून द्यावा हा प्रश्न पडला आहे आम्हाला—

चांगला देशपांडे म्हणाला, खरं बोल! तुझं लग्न ठरतंय! तू पोरगी पाहून आलास गेल्या रविवारी! चोरा!

आता मात्र शेंडे ओशाळून म्हणाला, कोण म्हणालं? तसं काही नक्की-म्हणजे वडील फक्त म्हणाले मला हुंडा मिळेल तो बहिणीकरता वापरता येईल-माझी अजिबात इच्छा—

हाँ! ये बात! असं बोल! सांग आता. कोण पोरगी आहे? मला तर असंही कळलं की ह्या महिन्यातच उरकतंय तुझं! खरं की नाही?

शेंडे खिन्न होऊन म्हणाला, माझं कोणी ऐकतं का घरात? वडील म्हणाले मी शब्द दिला आहे, आता तोंड दाखवायचं की नाही जातीत? अशी सुंदर मुलगी पुन्हा जातीत मिळणार नाही. पुन्हा पाच हजार कॅश मिळते आहे...पण तुला कसं काय कळलं?

सगळ्या पोरी बोलायल्या बेट्या! आणि ती तुझ्याबरोबर लॅबमधे प्रेमाच्या गोष्टी बोलणारी स्कर्टमधली फटाकडी एकदम सिनेमातल्या प्रेमभंगासारखी वागायली! अरेरे!

त्यामुळेच शेंडेचा चेहरा उतरलेला दिसतोय बरं. ह्या. रोमँटिक फटाकडीपुढे आपल्याच जातीतली साधी शालीन पोरगी तुला बेचव वाटत असणार. होय की नाही?

माझं कोणी ऐकत नाही बाबा घरात. मलाच लाज वाटतेय असं लग्न करायचं म्हणजे. घरात भावांची न् बहिणींची गर्दी आधीच, माझ्या एकट्याच्या पगारावर बाराजण कसेबसे जगतात. रोज आमटीभाकरी असते. भाजी रुपयाचीसुद्धा सगळ्यांना पुरत नाही. महागाई भयंकर झालीय. इकडे पगार हा असा. शिकवण्यासुद्धा करू देत नाहीत आपले कॉलेजवाले. तरी मी एक पाच पैशे कुठे खर्चत नाही.

इतकं करून तुझे आईवडील तुलाच शिव्या देत असतात कायम.

रेव्हेन्यूत आयुष्य काढून एक पैसा खाल्ला नाही असे मूर्ख आहेत आमचे बाप! पोरं मात्र काढून ठेवलीयत आठ. मला बऱ्याचदा वाटतं की मी पगार घरात आणतो म्हणूनच मला एवढीतरी किंमत आहे घरात. माणसाची गरज नसते पण पैशाची नक्की असते कुटुंबात. आता अशात पुन्हा हुंडा देता यावा म्हणून माझंच लग्न ठरवताहेत साले.

भोळे म्हणाला, शेंड्या, तुझ्या वडलांच बरोबर आहे. करून टाक लग्न. बहिणीचंही होऊन जाईल लगेच. पुन्हा दार दोन वर्षांनी एकेक बहीण येतेच आहे. तू करून टाक. प्रेम छंद म्हणून करावं, लग्न व्यवहार म्हणूनच. पण आपल्या जोशाच्या बहिणीचं झालं तसं तुझ्या बहिणीचं करू नकोस. हुंडा सगळा कॅश दे.

गंगातीरकर म्हणाला, पण त्या स्कर्टमधल्या संगमोत्सुक छटाकीचं काय होणार?

चंगला देशपांडे म्हणाला, तिचं तिनं बघावं. शेंड्यालाही पुढे एखाद्या मळभ आलेल्या कुंद संध्याकाळी आठवण म्हणून उपयोग होईल त्या छटाकीचा अधूनमधून! हॅ हॅ हॅ! किंवा ओवीछंदातली एखादी कविता करायला—

नऽभ भऽरऽले ढऽगांऽनीऽ
मनऽ स्फुंदुस्फुंदु रडेऽ

शेंडे म्हणाला, बहिणीसाठी...आमची जात आधीच एवढीशी...म्हटलं करून टाकावं.

गंगातीरकर म्हणाला, तू कोणत्या जातीचा रे? अजून माझ्या लक्षात येत नाही. तिरगूळ की काय तू? मग कसला बे तू ब्राम्हण?

शेंडे म्हणाला, ब्राम्हणच आहोत बे आम्ही. तैत्तिरीय अपस्तंभ म्हणतात आम्हाला. आद्य शंकराचार्य आमचेच. सबंध वैदिक धर्म आम्ही परत उभारला बेट्यांनो.

भोळे म्हणाला, म्हणजे किती देशाचं नुकसान केलं पहा. बौद्ध धर्म बरा पसरला होता—

चांगला देशपांडे म्हणाला, तरी आम्ही यांना ब्राम्हण समजत नाही. चित्पावन अन् कऱ्हाडेफिऱ्हाडेही आम्ही महापूजेसाठी बोलावत नाही. पण हेच साले स्वतःला जानवं घालून ब्राम्हण समजायले तर काय करा! वेगवेगळ्या शंकराचार्यांची सर्टफिकिटही जमवलीत ह्या शेंडेच्या लोकांनी ब्राम्हणच आहोत अशी! हू हू हू हू.

गंगातीरकर म्हणाला, जी ए एन् डी ला शेण लावून मला बैल म्हणा अशातलाच प्रकार की. हॅ हॅ हॅ!

भोळे म्हणाला, बरोबर काढलं राव! गांडीला शेण लावून मला बैल म्हणा असंच की! हे चित्पावनही साले मधेच कोकणातून उपटले न् स्वतःला अचानक ब्राम्हण म्हणायला लागले! आणि ब्राम्हण व्हायचं म्हणजे विधवा पोरींना नवरे करू द्यायचे नाहीत, घरात बोडक्या वाढवायच्या, सोवळ्याचा ताप बायकांच्या मागे लावायचा हे धंदे! प्रत्यक्ष देवदूत केलं तरी आपण हे धंदे करणार नाही. आणि काय यांच्या कादंबऱ्या म्हणजे विधवेचं केशवपन केलं शेवटून! हेच कर्मठ आणि यांचेच समाजसुधारक! म्हणजे पुन्हा लेखावर लेख लिहिणार केशवपन करू नका म्हणून-मिल्ल न् स्पेन्सर वाचून च्यामायला. सगळं विनोदी वाङ्मयच लिहिलं भटांनी! आमचे फुले नाहीतर पहा, केशवपन करू नये म्हणून न्हाव्यांचा संपचं घडवून आणला होता फुल्यांनी. तर अशा माणसाचा ही भटं उल्लेख करीनात नीट!

चांगलं देशपांडे म्हणाला, पण ब्राम्हण म्हणवण्यात आता तोटा असला तरी पेशवाईत फायदा होताच की!

भोळे म्हणाला, शेणवी नाही का पेशवाईत आग्रहानं स्वतःला सारस्वत ब्राम्हण

म्हणवून घ्यायले? नाना फडणीसानं लई छळ केला की तुम्ही ब्राम्हण नव्हत तरी शेणव्यांना लई हौस गांडीला शेण लावून घ्यायची! मुद्दाममुद्दाम ब्राम्हणांसारखे वागायचे!

भोळे म्हणाला, आमच्या कामत नावाच्या मित्राला इथे शेजारी दामल्यांकडे ब्लॉक पहायला मी गेलो आणि म्हटलं आमचे कामत ब्राम्हणच आहेत, घर द्यायला हरकत नाही. तर दामले म्हातारा म्हणतो, कामत? म्हणजे सारस्वत की? हे कसले ब्राम्हण. सारस्वताला घर दिलं की उकिरडाच करतात ते घराचा.

चांगला देशपांडे म्हणाला, सारस्वतांचं एक सोडा हो. पण सी.के.पी.! परवा मी मुंबईला वडलांबरोबर त्यांच्या मित्रांकडे उतरलो होतो. तर ते म्हणाले, इथे बरेच सी.के.पी. ब्राम्हण रहातात! आमचे वडील म्हणाले, हे परभू केव्हापासनं ब्राम्हण म्हणवून घ्यायलेत रे? अर्थात सी.के.पी. हुशार असल्यानं त्यांनी स्वतःला कधी ब्राम्हण म्हणवून घेतलं नाही ते सोडा.

भोळे म्हणाला, असं तपासत तपासत गेलं तर मुळात हिंदुस्थानात दहावीस कुळंसुद्धा प्युअर ब्राम्हणांची सापडायची नाहीत. सगळ्या धूर्त लोकांनी अर्ज करूकरू ब्राम्हण होऊन घेतलं असेल ब्राम्हनिझम्च्या चलतीत!

गंगातीरकर म्हणाला, आता काही दिवसांनी महारांचं राज्य आलं तर ह्या सगळ्या बदमाश जाती स्वतःला महार म्हणवून घेतील!

भोळे म्हणाला, पण शेंड्या, तू लग्न लवकरात लवकर उरकून घे. हे चिपळ्या न् गोप्या न् चांगदेवसारखं काही बरोबर नाही. उगाच गलबतासारखं एकट्या माणसानं भरकटत रहाणं बरोबर नाही. तुमच्या आयुष्याचा अवकाश भरून काढण्याचा हाच एक मार्ग असतो. लग्न झाल्यावर बायकोकडून एक तर आपलं घर भरलं जातं, जमिनीवरच्या जात्यापासून तर भिंतींवरच्या सामानापर्यंत घरभर वस्तूच वस्तू. मधेसुद्धा खोलीभर अधांतरी तरंगणारा पाळणा. पुन्हा बायकोकडून बरंच मोठं जग जोडलं जातं. सासूसासरे, मेहुणेमेहुण्या, येणारेजाणारे, शेजारपाजारच्या बायकामुली, लहान पोरं, हे-ते, बाळंतपणं, त्यांची धावपळ, डॉक्टरांशी ओळखी, पोरांना पाहायला येणारे लांबलांबचे नातेवाईक, औषधांचे दुकानदार, बाटल्या, दूध, मग मुलांच्या शाळा, पाठ्यपुस्तकं, पेन्सिली, वह्या, शाळेत नेणं-आणणं, मुलांचे छोटे मित्र, खेळ, गोट्या, भोवरे, पोरांना फिरायला किंवा सर्कस दाखवायला नेणं-फार घटना, वस्तू आणि व्यक्ती. एकूण पुरुष सगळा बाहेरच्या जगाचा अवयव होऊन निश्चिंत होतो. एका बायकोमुळे.

चांगला देशपांडे म्हणाला, हॅ हॅ हॅ पुन्हा वाढता खर्च, डायरिया, किरकीर—

भोळे म्हणाला, का नाही? त्यामुळेसुद्धा जगण्याचा भरीवपणा वाढतो. कोणाकरता काहीतरी केल्याची सवय आधी कुटुंबातूनच होते. आपली आध्यात्मिक उंची कारेपणापेक्षा लग्नानं निश्चितच वाढते. कष्ट घेण्याची सवय तुम्हा काऱ्यांना येतच नाही, नाहीतर हा आयुष्याचा बुडबुडा पन्नाससाठ वर्षं कसा भरून काढणार, मालक? अगदी मरेपर्यंत काहीतरी घडत रहाण्याचा हाच एक मार्ग आहे.

चांगला देशपांडे म्हणाला, हस्तमैथुनात आणि मैथुनात काही फरक आहे का सांगा.

निश्चित आहे. टेक्निकल का असेना पण आहेच. तसं जवळ कुणाला तरी घेणं हे एक सुख आहेच. हस्तमैथुनात हेच शरीर सुख तुम्ही कल्पनेतून घेत असता.

चांगला देशपांडे म्हणाला, पण आपण ह्या पोरं निर्माण करण्याच्या **निसर्गाच्या** सातत्यपरंपरेच्या राक्षसी वासनेच्या वीर्यातले आंधळे शुक्रजंतू **ठरतो-निर्बल,** वळवळणारे. आपली पोरं आपल्याला प्रेमानं स्वीकारायला **लावणारं हे तुम्ही** म्हणता ते संसारसुख म्हणजे निव्वळ दांडगावा आहे निसर्गाचा **कसली माया न्** कसली प्रीती. ही निव्वळ हुकुमशाही आहे स्वतःची पोरं म्हणजे. समजा गायींच्या कृत्रिम बीजधारणांसारखी सुंदर बुद्धिमान कर्तुत्वशाली पोरांची कृत्रिम बीजं सरकारी केंद्रात ठेवली तर कित्येक बायका चांगल्या अपत्यांसाठी अशी बीजधारणा करून घेतील, अशी माही खात्री आहे. बाप निव्वळ दुय्यम आहे, आई खरी प्राथमिक आहे. नवरा ही संस्था खतम करणं हे मुक्त समाजाचं ध्येय असलं पाह्यजे. खरं तर आयती गुटगुटीत पोरं बाहुल्या मिळतात तशी मिळायला पाह्यजेत. हे तुमचं घरोघर दूधदुभत्यासाठी म्हशी पाळण्यासारखं पोरांसाठी बायका पाळणं न् पुढची सगळी चिकचिक म्हणजे गलिच्छपणा आहे.

भोळे अतिशय चिंतेनं स्वतःशी म्हणाला, ह्या लोकांना दुरुस्त करणं कठीण आहे. आईचे धार्मिक संस्कार नसते तर आपला बुद्धिवादही ह्याच थराला कदाचित गेला असता.

भोळे बायकोला आणायला गेला त्याच्या दुसऱ्या दिवशी चांगदेवलाही हास्पिटलमधून पोफळे बंगल्यावर मित्रांनी आणलं. मग भोळेवहिनी आल्यावर चांगदेवाच्या जेवणाचंही भोळेकडेच नीट सुरु झालं. त्याला बिडी बंद, अनियमितपणा बंद, शारीरिक आणि मानसिक ताण बंद अशी ताकीद डॉक्टरांनी दिली होती. आल्याबरोबर लगेच कॉलेजात पायी जाणं सुरु झालं. डिसेंबर-जानेवारीत सगळे जण कामाला जुंपले. चांगदेवनंही एक महिन्यात बुडालेले तास ज्यादा घ्यायला सुरुवात केली. त्याचं दुखणं कोणी फारसं मनावर घेतलं नाही. नोकरी करणं आवश्यक होतं. शरीरपोषणासाठी काम आवश्यक, कामासाठी शरीर आवश्यक हे चक्र सांभाळता येणंही आवश्यक. प्रत्येक दिवस भयस्वप्न.

कामाच्या गर्दीत मित्रही हल्ली फार भेटत नव्हते. कॉलेजच्या मॅगझिनचं काम भोळे आणि चांगदेव दोघांकडे होतं. त्याचे सगळे लेख तपासून, इंग्रजी लेखांची स्पेलिंगं, व्याकरण दुरुस्त करून विद्यार्थी वैतागेपर्यंत आपण न वैतागता लेख पुन्हा पुन्हा लिहून घेणं, पुन्हा स्कॉलरशिपा, गॅदरिंगचं नाटक बसवणं, लायब्रीकरता याद्या तयार करणं हीही कामं चांगदेवमागे होती. भोळेकडे गॅदरिंगचे खेळ, स्पर्धा, बक्षिसं स्पर्धा-शिवाय प्रीलिमची परीक्षा सबंध, हिशेब, मॅगझिनसाठी छापखान्यात फेऱ्या मारणं हेही होतं. ते दोघे हल्ली पूर्ण थकून घरी यायचे. जेवतांना थोडा वेळ गप्पा मारून मग शिकवायचं वाचून झोपी जायचे. इतर मित्रांचंही अभ्यास संपवायचं पानपत चाललेलं असल्यामुळे

कोणी कोणाकडे सहसा जायचं नाही. कामामुळे स्टाफरूममधल्या कुटाळक्याही कमी झाल्या होत्या.

हल्ली माठूरामही वरच्या राजकारणात फार गुंतल्यामुळे स्टाफच्या मीटिंगाही कमी झाल्या होत्या. मधे त्यांनी एक मीटिंग घेतली आणि कन्फर्मेशनसाठी आम्हाला प्रत्येक जण कसा शिकवतो हे वर्गात बसून पाहू द्या असंच लफडं काढलं. सुदैवानं त्या मीटिंगमधे गोपाळ देशपांडे इतका तापून बोलत राहिला की त्यानं एकट्यानं हे लफडं तिथेच संपवलं. त्यामुळे इतरांना वाईटपणा घ्यायची पाळीही त्यानं येऊ दिली नाही. तो माठूरामला म्हणाला, आम्ही कसे शिकवतो हे तज्ज्ञांनी पाह्यलं तर आमची हरकत नाही. पण तुम्ही अर्धवट कच्च्या लोकांनी आमचं शिकवणं पहाणं आम्ही मान्य करणार नाही. नाहीतरी ज्याला काढायचं त्याचं शिकवणं वाईट असेच शेरे तुम्ही देणार आणि तुमची खाजगी कामं करणाऱ्यांना तुम्ही कन्फर्म करणारच. मग हा तमाशा कशाला?

सगळ्यांनी मीटिंग झाल्यावर चांगल्या देशपांडेची मनापासून पाठ थोपटली. असं दर मीटिंगमधे एकेकानं पुढं झालं पाह्यजे असं क्षीरसागर म्हणाले. माठूराम थरथर कापत निघून गेले. भल्ला त्यांना समजावत घरापर्यंत गेला.

नंतर एक मीटिंग अशासाठी घेतली की आता नवी पगारश्रेणी लागणार आहे, आणि गेल्या तीन वर्षांतली बाकी प्राध्यापकांनी संस्थेला देणगी म्हणून द्यावी. हा ठराव माठूराम-ठोसरच्या पित्त्यांनीच मांडला. माठूराम, ऋग्वेदी, ठोसर, मुरलीमोहन-सगळे ह्या मीटिंगला हजर होते. विरोध झाला तर तो मोडून काढावा ह्या तयारीनं सगळे आले होते. हा ठराव बुटक्या कुळकर्णीनं मांडला आणि तिकडंबाज वगैरेंनी त्याला पाठींबा दिला. माठूरामनं ह्या ठरावाचं अभिनंदन करून असे निःस्वार्थी प्राध्यापक आमच्या संस्थेत आहेत याचा आम्हाला अभिमान वाटतो असं अर्धापाऊन तास भाषण केलं. ही देणगी एकत्र केली तर आपण एका वर्षातच कॉलेजची इमारत पुरी करू, प्राध्यापकांना दिवसभर कॉलेजात थांबावं लागतं ते कमी होईल असं ऋग्वेदी म्हणाले.

ज्यांना वरची ग्रेड द्यायचं निश्चित झालं होतं त्या वशिल्याच्या सर्वांनी ठरल्याप्रमाणे होकारार्थी भाषणं सुरु केली. भोळे, चिपळूणकर, देसाई हेही पूर्ण तयारी करून आले होते. त्यांनी पद्धतशीर एकेक मुद्दा मांडून देण्याचा आता विचारच करता येणार नाही हे पटवून दिलं. देसाईनं उत्कृष्ट इंग्रजीत सगळ्यांना पटवून दिलं की असं केलं तर चॅरिटी कमिशनरकडून ह्याला ऑब्जेक्शन येईल. आधी पैसे मिळाले पाहिजेत, मग व्हॉलंटरी म्हणून देणग्यांचा विचार करावा. गंगातीरकर कधी नीट इंग्रजी न बोलणारा, तोही संतापाच्या भरात एकदोन वाक्यं बिनचूक इंग्रजी बोलून गेला. शेंडेनं माठूरामच्या बाजूनं मत दिलं याचं सगळ्यांना आश्चर्य वाटलं.

मग माठूराम, ठोसर वगैरे संस्थेचे पदाधिकारी विरोध करणाऱ्यांना बेईमान, शिरजोर म्हणाले. तेव्हा भोळे, गोपाळ देशपांडे, याज्ञिक हे पदाधिकाऱ्यांनी माफी मागावी अशी मागणी करून अडून बसले. शेवटी पुन्हा थरथरत माठूराम मीटिंग सोडून गेले. गर्दीतच हीही मीटिंग संपली. नंतर ऋग्वेदी म्हणाले, आमच्या संस्थेत हे एलिमेंट आम्ही राहू देणार नाही. ह्या सगळ्यांना पुढच्या जूनमधे इथून उचलणार.

त्यानंतर बरेच दिवस स्टाफ मीटिंग झाली नाही. माठूरामना व्हाइस-चॅन्सलर

करायचं त्यांच्या ग्रुपच्या मंडळींनी ठरवलं होतं. शिवाय त्यांना इलेक्शनचं तिकीट मिळायचंही चाललं होतं. त्यामुळे ते मंत्री व्हायचीही स्वप्नं पहात विविध सामाजिक कार्यांत फार पुढाकार घेत होते. त्यांनी एक **जातिनिर्मूलन संस्था** स्थापून तिची दैनिक समाजवाद मधून खूप प्रसिद्धी सुरू केली होती. ह्या संस्थेचं काम करायला म्हणून पुराणिक कॉलेजातले नेहमीचे यशस्वी कलाकार प्राध्यापक चिकार काम करत होते. ही मंडळी हल्ली नेहमीचे तासही घेत नव्हती. पण **जातिनिर्मूलन संस्थेचा** वर्तमानपत्रांतून गवगवा फार करून घ्यायचा असल्यानं माठूराम उत्साहात चर्चा, व्याख्यानं, परिसंवाद घेत होते. ह्या वेळी व्हाइस-चॅन्सलर म्हणून त्यांचाच नंबर लागणार असं संस्थेतले सगळेच ब्राम्हण हल्ली बोलायला लागले होते. हा चान्स गेला की मग माठूरामला वयामुळे पुन्हा संधी मिळणं कठीण होतं. आतल्या गोटातून अशीही बातमी फुटली होती की, दुसऱ्याच एका मराठा माणसाला व्हाइस-चॅन्सलर करायचं ठरलं आहे. त्यामुळे अधूनमधून माठूराम सरकारवर चिडून भाषणं करायचे. क्वचित विद्यार्थ्यांना ह्या वर्षाच्या परीक्षेची फी माफ करावी कारण अनेक जिल्ह्यांत दुष्काळ पडला आहे, असंही शेवटी शेवटी ते म्हणायला लागले. माठूरामनं चिथावलेल्या विद्यार्थ्यांनी नंतर सर्व कॉलेजं बंद पाडून फी माफ झालीच पाह्यजे असा प्रचंड मोर्चा काढला. पुराणिकमधली बरीच प्राध्यापक मंडळी ह्यात पुढाकार घेत होती. जे ह्यात पडले नाहीत त्यांची नोंदही संस्थेचे लोक घेत होते.

पुढेपुढे असं अस्थिर वातावरण निर्माण झालं की जिकडे तिकडे कॉलेजं बंद, विध्यार्थ्यांचे बहिष्कार, प्रतीबाहिष्कार, संप, भाषण, मोर्चे, दगडफेक, पुढाऱ्यांच्या भाषणाच्या जाहिरात, पत्रकं, प्रतिपत्रकं, विद्यापिठावर मोर्चे, पोलिसांचा बंदोबस्त-असं सगळं. माठूरामच्या कॉलेजमधल्या ऑफिसात हल्ली कधीही अभ्यास न करणाऱ्या विद्यार्थीनेत्यांची झुबड असायची. माठूराम उद्या कुठे काय करायचं याचं रोज जातीनं मार्गदर्शन करायचे. दैनिक समाजवाद च्या दर अंकात माठूरामचा फोटो आणि भाषणांचा वृत्तांत देऊन देऊन त्यांची प्रतिमा वाढवायचा हणमंतराव ठोसरांचा कार्यक्रमही जोरात सुरु झाला. संस्थेतल्या सर्व ब्राम्हणांना माठूराम व्हाइस-चॅन्सलर व्हायची स्वप्नं पडत होती. ब्राम्हण पुढाऱ्यांनी मग महार पुढाऱ्यांशी संगनमत करून व्हाइस-चॅन्सलर हटाव अशी जोरात चळवळ सुरु केली. सध्याचा व्हाइस-चॅन्सलर मराठा असल्यानं त्यानं मग मराठा पुढाऱ्यांकडे धाव घेतली. मराठा पुढारी म्हणाले, तुम्ही गेली तीन वर्षे हवेत वावरत होता! जातपात मी मानत नाही म्हणून भाषणं ठोकत होता! आमची माणसं सोडून ब्राम्हण माणसं विद्यापीठात भरत होता! आता आणखी एक टर्म पाहिजे म्हणून तुम्हाला जातीची आठवण आली काय? ह्यामुळे व्हाइस-चॅन्सलरची पंचाईत झाली. विद्यापीठात ब्राम्हण आणि मराठा गुंड पोरांच्या गटांमधे मारामाऱ्या व्हायला लागल्या.

तशात ठोसरांनी दैनिक समाजवाद मधे व्हाइस-चॅन्सलर दारू पिऊन रस्त्यात पडले होते अशी मोठी बातमी टाकून दिली. नंतर त्यावर पत्रव्यवहार. नंतर आठेक दिवसांनी हरिजन महिलेवर बलात्कार अशी मोठी बातमी. खाली हा बलात्कार एका पाटलानं केला अशी ठळक माहिती. त्यामुळे हरीजनांचे मोर्चे निघायला लागले. गावात

अस्थिरतेचं वातावरण निर्माण केल्याबद्दल माठूराम व ठोसर यांच्या तेजस्वी बुद्धीमत्तेचं सर्वांनी तोंड भरून कौतुक केलं. इतर पुण्या-मुंबईच्या वर्तमानपत्रांनीही जातिप्रेम दर्शवून अशाच बातम्या द्यायला सुरुवात केली. एकूण सुसंस्कृत माणसाला ह्या दहशतीच्या वातावरणात गप्प बसण्याखेरीज दुसरं काही एक करता येण्यासारखं नव्हतं.

ह्या व्हाइस-चॅन्सलरला पूर्ण बदनाम करून सोडावं ह्यासाठी यंदा काही झालं तरी परीक्षा होऊ देऊ नये, असं माठूराम आणि ठोसर वगैरे ब्राम्हण पुढाऱ्यांनी ठरवून टाकल्यामुळे विद्यार्थ्यांचं अभ्यासावरचं लक्ष उडालं. हळूहळू हे सर्व विद्यार्थ्यांच्यात पसरल्यामुळे वेगळंच वातावरण निर्माण झालं. पोरं कॉलेजभर हैदोस घालत असायची. रोज भानगडी व्हायच्या. मधूनमधून मॅनेजमेंटवाल्यांच्या गुप्त बैठकी होऊन त्यांचे निर्णय पित्त्या प्राध्यापकांना सांगितले जात. मग हे प्राध्यापक इतर प्राध्यापकांना अमुक अमुक करावं लागेल असं सांगायचे. मग स्टाफ मीटिंगमधे बहुमताने तेच निर्णय पास व्हायचे.

उदाहरणार्थ, माठूराम वगैरेंनी असं ठरवलं की यंदा लवकर अभ्यासक्रम संपवू नये, कारण मार्चच्या सुमारास आंदोलन करायचं असल्यामुळे विद्यार्थी आपापल्या घरी निघून जाता कामा नये. त्या सुमारास विद्यार्थी लागतील.

लगेच हे तिकडंबाज देशपांडे व नेहमी सूट घालून येणारा शिंगरू यांनी सर्वांना कळवलं. काही प्राध्यापक म्हणाले, दरवर्षी तर उलट असा आदेश येतो की प्री-डिग्रीची सगळी लेंढार फेब्रुवारीच्या आत कॉलेजातून हाकलली पाहिजे. यंदा मार्चपर्यंत कसे वर्ग घेत रहायचे? वर्गात आताच अर्धी मुलं येईनाशी झालीत. कॉलेजात मात्र येऊन धुडगूस घालत असतात, वर्गात कोणी येत नाही.

कधीही बिल न देणारा यजुर्वेदी म्हणाला, अहो मुली येतात म्हणून ही पोरं येतात. वर्गच बंद केले तर मुली येत नाहीत, मुलंही येत नाहीत. म्हणून ऑफिशिअली वर्ग बंद करता कामा नये.

आजपर्यंत एकही पुस्तक विकत न घेतलेला मराठीचा प्रा. जोशी व काही गंभीर वृत्तीचे माठूरामच्या मर्जीतले तीनचार प्राध्यापक त्यांना जाऊन ह्यासंबंधी बोलले. तर माठूराम चिडून म्हणाले, लवकर वर्ग संपवा म्हणजे काय? दोन हजारातले दीड हजार विद्यार्थी प्री-डिग्रीचे आहेत. ह्या प्री-डिग्रीच्या आठ तुकड्यांची लाखो रुपये फी येते म्हणून तर कॉलेज चालतं. म्हणून तुमच्या नोकऱ्या टिकतात. त्यांना नीट शिकवणं आपलं कर्तव्य आहे. प्राध्यापकांनी प्रदीर्घ सामाजिक दृष्टिकोन बाळगला पाहिजे.

आता मार्चपर्यंत तास चालू ठेवायचे म्हटल्यावर सगळ्या प्राध्यापकांना राम आठवला. गंगातीरकर वगैरेंनी ज्यादा तास घेऊन अभ्यासक्रम संपवला होता, त्यांच्यावर पुन्हा सगळं शिकवत रहायची पाळी आली. पुढेपुढे तर एकाच धडा सहाव्यांदा चालला आहे असं काही जण म्हणायचे. पण सगळेजण उत्सुकतेनं परीक्षा बंद आंदोलनाची वाट पहात बसले.

नंतर गॅदरिंगही यंदा उशिरा घ्यावं असं ठरलं. पंधराएक दिवस गॅदरिंगचे कार्यक्रम लांबवण्यात आले. हे इतके कार्यक्रम पार पाडण्यासाठी प्राध्यापक वाटून देण्यात आले.

पुढे गॅदरिंगही संपलं. नेहमीप्रमाणे गॅदरिंग म्हणजे नुस्ता शिमगा होता. विद्यार्थ्यांच्यात सर्वत्र प्राध्यापकांनी बसावं म्हणजे आरडाओरड कमी होईल असं भल्लानं ठरवलं, पण अश्लील आरडाओरडा तरीही झालाच. बहुतेक प्राध्यापक शरमेनं माना खाली घालून निघून गेले. काही बाणेदार प्राध्यापकांची विद्यार्थ्यांशी बाचाबाची झाली. भल्ला म्हणाला, गॅदरिंग होऊ द्या, मग ह्या विद्यार्थांना कडक शिक्षा करू. पण नंतर नेहमीप्रमाणे काहीच झालं नाही. बाणेदार प्राध्यापक म्हणाले, ह्यापुढे आम्ही इतरांसारखे शहाणे होऊ.

भोळेला ह्या कुठल्याच प्रकारात रस नव्हता. गेली चार वर्षं हेच सगळीकडे चाललेलं त्यानं पाहिलं होतं. त्यामुळे तो दिलेलं काम नीट करून त्याबद्दल विसरून जायचा. त्यानं मॅगझिनसाठी काम पुरं करत आणलं. प्राचार्यांनी आपला आणि माठूरामचा फोटो मॅगझिनसाठी दिला होता. स्वतःचा टेबलावर काहीतरी लिहीत व वर पाहून स्मित करत आहोत असा आणि माठूरामचा नेहरूसारखा हातावर हनुवटी टेकवून विचारात गर्क असा. भोळेनं दोन्ही फोटो मॅगझिनमधे टाकले नाहीत.

भल्ला म्हणाला, प्रोफेसरसाब, हमारा और चेरमनका फोटू हरसाल आता है. ट्रॅडिशन है. अपने क्यूं ड्रॉप कर दिये? सेक्रटरीका भी नही डाला?

भोळे म्हणाला, दरसाल असतोच तेव्हा यंदा पुन्हा कशाला? कोण बदलतो दरसाल इथे की फोटो द्यावे? संस्थेची काटकसरीची पॉलिसी आहे त्याला अनुसरून मी ह्या फोटोंचे पाचेकशे रुपये बचत केली.

मॅनेजमेंटवाल्यांनीही मॅगझिन पाहून आपले फोटो नसल्यानं तोंड कडवट केल्याचे रिपोर्ट आले.

त्यावेळी अचानक थंडीची भयंकर लाट आली. अशा कुडकुडवणाऱ्या थंडीत भल्या पहाटेच एकदा एक माकडवाला छोटंसं माकडाचं पिलू घेऊन भिक मागत पोफळे बंगल्याच्या दाराशी आला. पोफळे बंगल्यात अलीकडे एक रोगट कुत्रं रात्रंदिवस बसलेलं असायचं. ह्या कुत्र्याला मारून टाकावं असे अनेक अर्ज भोळे आणि खुद्द पोफळे ह्या दोघांनी म्युनिसिपालटीत केले होते, पण ते अजून जुळलं नव्हतं. हे कुत्रं माकडवाल्याला पाहाताच वसवसून माकडाच्या अंगावर धावलं. माकडानं असा भयानक विचित्र आवाज काढला की चांगदेवनं असा आवाज कधीच ऐकला नव्हता. म्हणून घाबरूनच तो बाहेर आला. माकडवाला कुत्र्याला काठीनं दूर हुसकत होता, तरी ते फिरून माकडाला चावायला धावून येत होतं. ते धावत आलं की माकड भेदरून झटकन माकडवाल्याला अत्यंत केविलवाणं बिलगत होतं. माकडाचा होश उडाला होता. आधीच थंडीच्या कडाक्यात हे माकडाचं पिलू अक्षरशः हातपाय आखडवून दातावर दात वाजवत मुठीएवढा चेहरा करून होतं. त्यात पुन्हा ह्या ओंगळ केस गळून गेलेल्या कुत्र्याच्या भीतीनं ते निव्वळ थरथरत होतं.

चांगदेवला पाहताच माकडवाल्यानं कुत्र्याला काठीनं लांब ठेवत आपल्या अंगावरचं

संपूर्ण फाटकं कांबळ सावरत माकडाच्या गळ्यातल्या दोरीला हिसका देऊन त्याला जमिनीवर उभं केलं. आणि तो म्हणाला, सलाम कर बेटा साबको, सलाम. है ऽ है ऽ अरे सलाम कर!

माकडानं मांड्यांमधले पोटाशी आवळून ठेवलेले एवढे एवढे विचित्र कापणारे हात बाहेर काढून चांगदेवला कसाबसा धांदरट सलाम केला आणि पुन्हा बाजूला दात दाखवून गुरगुरणाऱ्या कुत्र्याकडे केविलवाणं पाहात ते शरीराची घडी करून काकडून जमिनीवर बसून राह्यलं. मग चांगदेव आत गेला आणि आपली एक भारी कापडाचा ढगळ मनीला घेऊन आला. मग तो माकडवाल्याला म्हणाला, ये इसके लिये है. पेहनाव इसको.

माकडवालाही हसला. त्यानं माकडाचे हात धरून त्याला तो प्रचंड मनीला चढवला. गुंड्या लावल्यावर ते फाटकं माकडही एकदम माणसासारखं रुबाबदार दिसायला लागलं. कुत्रंही आता त्याच्या अंगावर धावून यायचं थांबलं.

चांगदेव माकडवाल्याला म्हणाला, याच्याच अंगावर राहू द्या. काढायचा नाही. नही साब. हमारा पेट भरता इसपर. ठंडसे मर गया तो फिर जंगलमे घूमना- इतने सुबह ऐसे ठंडीमे कायकू घूमना शुरू किया?

माकडवाला अजीजीनं म्हणाला, दो दिनसे ना मेरे पेटमे कुछ है ना इसके. क्या करना साब. शहर आते आते ये ठंड गिर गया. कोई देखनेकोभी घरके बाहर नही आ रहा. मग माकडवाल्याला आठ आणे देऊन मनीला माकडालाच ठेव असं बजावून चार चांगदेव परत फिरला. थंडीत कुडकुडत आपला मनीला सावरत दोन पायांवर कधी चार पायांवर मानेतल्या दोरीचे हिसके सांभाळत रस्त्यावर चालणाऱ्या माकडाच्या पिलाकडे चांगदेव अत्यंत काळजीपूर्वक पाहात होता.

तेवढ्यात भोळे थंडीनं कुडकुडत घराबाहेर आला आणि म्हणाला, काय गोंधळ चालवलाय मालक इतक्या पहाटेपहाटे? हे कुत्रं सालं तापदायक झालं आहे इथे. म्युनसिपालटीवालेही येत नाहीत आणि पोफळेबाई आमच्याशीच भांडते की आम्हीच ह्याला खायला घालतो म्हणून हे इथे सोकावलं. आम्ही नाही घालत. कुणाला चावलं की कठीण होईल. ह्याला मारायचा कार्यक्रम आपणच एकदा करू केव्हातरी. असली सार्वजनिक कामं सुद्धा आपल्याशिवाय कोणी करत नाही. नियम आहेत, आरोग्याखातं आहे, निवडून दिलेले लोक आहेत, पगारी स्टाफ असतो-पण दरवर्षी शेकडो लोकांना पिसाळलेली कुत्री चावतात. पुन्हा घेत बसा इंजक्शनं किंवा मरा टाचा घासत.

मग चांगदेवला म्हणाला, चहाला बोलावून तो म्हणाला, सकाळीसकाळी दानधर्म केला वाटतं तुम्ही आज.

चांगदेव म्हणाला, माकडाला सदरा घातलेला पाहावा एवढ्याचसाठी आठ आणे दिले मी. त्या कपडे घातलेल्या माकडामुळे मला एकाएकी इतिहासाचं सार लक्षात आलं.

भोळे चाट पडून म्हणाला, कशालाही चिरंतन संदर्भ देण्याची ही तुझी खास हिंदू भारतीय पद्धत आहे-जी मला कधीच आवडत नाही, पण एक पद्धत म्हणून ती अतिशय ग्रेट वाटते.

चांगदेव म्हणाला, मी स्वतःपुरता विचार करणारा माणूस आहे. आपल्याला काही पद्धतबिद्धत नाही. ते सामाजिक वगैरे सगळं तुझ्याकडे लागलं. माणसानं स्वतः नीट राहावं, बाकी कशाची गरज उरत नाही.

हल्ली तू फार स्वतःपुरतं पाहायला लागला आहेस. अशानं तुझ्या जगण्यातला बंदेपणा नाहीसा होईल. अगोदरच ह्या सडलेल्या समाजात जगणं म्हणजे—

चांगदेव म्हणाला, तरीही मला हे सगळं अतिशय आवडतं. मी पहिल्याइतकाच बंदा खणखणीत राह्यली नसेन कदाचित...कारण मी केव्हाही फटदिशी खलास होणार हे तुला डॉक्टरांनी सांगितलंच असेल परवा?

भोळे त्याची नजर चुकवत दुःखी होऊन म्हणाला, छे,छे, उगीच काहीही बोलू नकोस.

चांगदेव स्वतःशी प्रसन्न हसला आणि म्हणाला, पूर्वीची समाधी लावून हळूहळू प्राण सोडण्याची कला कोणाजवळून शिकता आली तर मी तयार आहे. उंबरठ्यावर बसणाराला इकडचं काय तिकडचं काय सारखंच.

मग भोळेनं विषय बदलून आता परीक्षा सुरू होतील, आपल्याला दोघांनाही परीक्षेच्या कामात अडकवायचा भल्लाचा बेत झाला आहे, पण आपण दोघेही नकार देऊ-वगैरे गप्पा सुरू केल्या.

विद्यापीठाकडून यंदाच्या परीक्षांच्या सूचना, वेळापत्रकं आली. ह्या वर्षीच्या परीक्षांमध्ये गोंधळ, दगडफेक आणि मारामाऱ्या होणार हे पुराणिकमधल्या सगळ्यांना माहीत असल्यानं पुराणिक कॉलेजच्या केंद्रावर भल्लाला परीक्षांचे मदतनीस म्हणून काम करायला कोणी प्राध्यापक तयार होईनात. गरीब भोगीशयनम् आणि याज्ञिक हे दोघे जण दरवर्षी भल्लाचे मदतनीस असायचे आणि भल्ला सगळं परीक्षेचं जीवघेणं काम ह्या दोघांकडून दाबून करून घ्यायचा व स्वतः आराम करत प्रमुख म्हणून रोजचे पंचवीस रुपये पगाराशिवाय फुकटात पदरात पाडून घ्यायचा. यंदा भोगीशयनम्ला आतून असं निश्चित कळलं होतं की त्यांची बदली संस्थेच्या अंजनगावच्या भिकार कॉलेजात करायचं ठरलं आहे. भोगीशयनम् म्हणाले, इतकी वर्षं मरमर करून ह्यांनी मला काय दिलं? साउथ इंडियन म्हणजे गुलामच वाटतात का ह्यांना. शिवाय यंदा आपल्या सेंटरवर सगळ्यात गोंधळ होईल. आपण परीक्षेचं काम करणार नाही. याज्ञिक तर वरची ग्रेड मिळणार नसल्यानं कॉलेज सोडायचं ठरवून होते.

मग भल्लानं भोळे आणि चांगदेव या जोडीला बोलावून घेतलं. तो विशाल हसून म्हणाला, आइये, चाय वगैरा मंगाऊ क्या? बैठेंगे, जरा गपसप करेंगे.

भोळे हसून म्हणाला, काहीतरी काम करून घ्यायचं दिसतंय आमच्याकडून!

हॉ हॉ हॉ! तुम बडे शैतान हो, हमेशा बुराही सोचते हो यार!

असं म्हणून मग हळूहळू भल्लानं मुद्द्याला हात घातला. ह्या वर्षी तुम्ही दोघांनी अंडरस्टडीचं काम घ्यावं. बरं होईल, दोघांचाही इथे चांगला वेळ जाईल, वगैरे.

भोळे म्हणाला, माझं खूप लिहायचं पडलं आहे. मी दोन वर्षांपासून पेपर तपासायचंही काम करत नाही हे तुम्हाला माहीत आहे. पैसाही नको, आपलं काम सुटीतच होतं. पैसेका सवाल नही भोलेसाब. ये बात अपने सबके प्रेस्टिजकी है. तुम जैसे सिन्सीअर सच्चे दिलके आदमी इस साल तो मेरे साथ रेहना जरुरी है.

चांगदेवनं दुसरी युक्ती काढली. तो म्हणाला, मला परीक्षा ही अत्यंत घाणेरडी गोष्ट वाटते. इतका भ्रष्टाचार चालतो ह्या परीक्षांमधे—

इसलिये तो तुम्हारे जैसे अपराइट आदमीकी सक्त जरूरत है पाटीलसाब! हमने ये गंदगी साफ करने चाहिये.

भोळे चिडून म्हणाला, साहेब, आधी आपल्या संस्थेतली गंदगी साफ करना चाहिये.

भल्ला मूर्ख चेहरा करून म्हणाला, वोभी तुम्हारे जैसेही टीचर कर सकेंगे भोलेसाब...आप समझदार आदमी है! आखिर तुम्हे और मुझेभी इस सिस्टिममे क्या फ्रीडम है बोलिये! जैसे तुम वैसा मैं-फिर हाँ कह दो एक्झामके लिये. प्रोफेसरसाब, तुमभी हाँ कह दो. एक्झामही अपनी आजकी सिस्टीमकी रिॲलिटी है. इसको ॲक्सेप्ट करना. भागनेसे क्या होगा? आखिर सार्त्र और कामू यही कहते है! लिखते क्या घरमे बैठकर? ये जो रॉ लाइफ है उससे जादा किताबो में क्या हो सकता है?

मग भल्ला खाजगीत त्यांना म्हणाला, माठूरामचं असं म्हणणं आहे की काही झालं तरी आपल्या कॉलेजवर तरी परीक्षा सुरळीत पार पाडायच्या. आपल्याकडे गोंधळ झाला तर माठूरामचे शत्रू त्याचं भांडवल करतील. आपण परीक्षा नीटच घेतल्या पाहिजेत वगैरे.

भोळे म्हणाला, पण हे आपलेच लोक दुसरीकडे गोंधळ करणार आहेत, त्याचं काय? विद्यार्थी गुंड नेत्यांना यांनीच लावून दिलं आहे करा गोंधळ म्हणून. रोज ह्या विद्यार्थांचे फोटो आणि नावं दैनिक समाजवाद मधून येताहेत. त्याचं काय?

वो अलग बात है. दॅट इज द पार्ट आफ द गेम. पोलिटिक्स इज पॉलिटिक्स प्रोफेसरसाब. हम अपना काम करेंगे, वो उनका करेंगे.

दीडतास हे असं चाललं होतं. शेवटी भोळे आणि चांगदेव थकून गेले. जाताजाता भोळे सांगून आला की आमची दोघांचीही परीक्षेचं काम करायची इच्छा नाही. पण बळजबरीनं दिलंच तर आम्ही अंडर प्रोटेस्ट काम करू.

स्टाफरुममध्ये क्षीरसागर म्हणाले, अहो हा चीफ सुपरिंटेंडेंट म्हणून नुस्ते पैसे घेतो. काम सगळं अंडरस्टडीला करावं लागतं. शिक्षाच आहे ती. भयंकर काम असतं. रोज सकाळी सहा वाजता येऊन नंबर खडूनं टाकत बसावं लागतं, प्रश्नपत्रिका कार्यक्रमानुसार हॉलवाइज लावून ठेवाव्या लागतात, उत्तरपत्रिका एकेक मोजून हॉलवाइज लावाव्या लागतात, विषयावारी पोरांची बसायची व्यवस्था करावी लागते. जरा चुकलं की पोरं आपला गळा धरतात. भल्ला आपल्याकडे बोट दाखवून सुटतो. पुन्हा कोणी इन्विजलेटर आला नाही, कुठे चुकीचे प्रश्न आले, कुठे कमी प्रश्नपत्रिका आल्या, नंतर गठ्ठे बांधा, नीट चारचारदा मोजून नंबर टॅली करा, कमी ज्यास्त झाले तर रात्रभर झोप येत नाही, पार्सली करा, पत्ते लिहा, मवाली पोरं परीक्षकांचे पत्ते मागतात, नाही दिले तर ती पुन्हा वेगळीच भानगड, धमक्या, वाईटपणा, खोटे आरोप, शिव्या,

कॉपी धरलेल्यांचे ताप, अहो रात्री बाराबारापर्यंत हे लाख तापवून शिक्के मारायचं काम चालतं. ह्यातलं बरंचसं खरं तर भल्लाचं काम असतं. पण तो येतो अकरा वाजता आणि निघून जातो सहालाच. पान खात फक्त बराबर गिनके बांधे न? असं विचारतो.

याज्ञिक म्हणाले, यंदा पोरं चिडली आहेत. आधीच वर्गच झाले नाहीत मोर्चांमुळे तर लिहिणार काय? मारतीलच आपल्याला. फार मोठं राजकारण आहे ते मुख्यमंत्र्यापर्यंतचं! मी तर इन्विजिलेशनसुद्धा नको म्हणणार आहे आयत्या वेळी मेडिकल सर्टफिकिट देऊन. आधीच माठूराम आम्हाला हाकलायच्या मागे आहे! चूक झाली की तेवढं पुरेल!

क्षीरसागर म्हणाले, ज्या अर्थी तुम्हा दोघांना भल्लानं बोलावलं त्याअर्थी तुमच्यावर माठूरामची करडी नजर आहे हे निश्चित. भल्लाला हा सेन्स बरोबर आहे. आणि बायकोला कसं एका वर्षात पेपरसेटर न् मॉडरेटर केलं पहा की. आरामचा आराम आणि पैसाचा पैसाही. बायकोचे पैसे, पुन्हा आपण चेअरमन असतोच एफ्.वाय्.चा, पुन्हा दुसऱ्या वर्षाचे पेपर, इकडे चीफ सुपरिंटेंणशिपचे दीड महिनाभर पंचवीस रुपये रोज. तीनचार हजार रुपये सहज कमावतात हे नवराबायको.

विद्यासागर म्हणाले, आणि हमाली कामं मात्र भोळे न् पाटील न् आम्हाला. मॅगझिन, गॅदरिंग, खेळ, लायब्रीचे हिशेब, स्कॉलरशिपा, टाइमटेबलं, इ.बी.सी., फ्रीशिपा- काय काय कामं देतो आपल्याला. आणि ह्या पाटलांची तब्येत चांगली नाही हे माहीत नाही का मवाल्याला? मग? आणि ते जी.डी. देशपांडे न् बुटका कुलकर्णी न् जोशी न् ते सगळे पित्ते वर्षभर तरी काय काम करतात हो? त्यांना का नाही बोलावलं आज?

क्षीरसागर म्हणाले, त्यांच्याकडे दरवर्षी गॅदरिंगच्या फिशपॉंडचं काम असतं की. स्वतःच्या लोकांवर चांगले फिशपॉंड निवडायचे आणि तुमची आमची बदनामी करणारे फिशपॉंड मात्र सेन्सॉर करायचे नाहीत.

याज्ञिक म्हणाले, स्वतःच घालतात हो हे असले फिशपॉंड्स्. त्या ऋषिपाठकाला दरवर्षी देवमाणूस असा फिशपॉंड आणि मला?... तुमचं इंग्रजी सुधरा असा. दरवर्षी असं कोण पोरं देणार?

क्षीरसागर म्हणाले. जावं सोडून आता इथून झालं. फार झालं हे. वाट्टेल तसे मेमो देतो. वाट्टेल तेव्हा घरून बोलावून घेतो. अगदी पोट भरायला इथे राह्यल्यासारखं फिलिंग आणतो हा भल्ला. वरतून तसं सांगतात त्याला. हाही काय करणार? आता ह्या वयात सामानसुमान हलवून नव्या कॉलेजात प्रोबेशनवर दिवस काढायचं नशिबात दिसतंय आमच्या. तुमचं जुळतंय का हो कुठे?

याज्ञिक म्हणाले, कळेल ह्या महिन्यातच. मोठ्यानं बोलू नका.कुणाजवळ बोलू नका.

क्षीरसागर म्हणाले, आमच्याकरताही पहा हो कुठे. म्हाताऱ्या बैलासारखं झालंय आमचं इथे. मग काय पाटील, करणार का भल्लाच्या हाताखाली परीक्षेचं काम? का हो भोळे?

चांगदेव म्हणाला, आता आज्ञाभंग करण्याचा आपल्यात उत्साह नाही.

भोळे म्हणाला, मी काम करणार, पण भल्लाकडून दुप्पट काम करून घेणार.

कसा येतो अकराला आणि जातो सहाशी ते बघतोच मी. त्याची सही घेणार जिथेतिथे. आला नाही तर परीक्षा होणार नाही! त्यालाच पश्चात्ताप होईल मला मदतनीस घेतल्याचं. बघा तुम्ही. आणि सगळ्यांना झाडून इन्विजीलेशन देतो. बघाल तुम्ही. प्रिन्सिपलच्या बायकोला इतरांइतकंच आणि सकाळीसुद्धा. पहाच आता तुम्ही. पुन्हा पुढल्या वर्षी मला विचारणार नाही तो असं पिंगवतो त्यालाच मी!

याज्ञिक म्हणाले, भोळे करील त्याला टाइट!

भोळे म्हणाला, पुन्हापुन्हा कॉलेजं बदलायचा न् इंटरव्ह्यू देत नवऱ्यामुलीसारखं हिंडणं बोअर झालंय मालक. नवीनवी कॉलेजं आता पाहायची नाहीत. कुठे काही फरक नसतो. आता एकतर हा धंदाच सोडून द्यावा नाहीतर आहे तसं चालवत राहावं. आणि किरकोळ भांडण्यात आपली शांती घालवण्यात अर्थ नाही.

शेवटी माठूरामला व्हाइस चॅन्सलरपद मिळणार नाही अशी चिन्हं दिसायला लागली, कारण माठूराम जातीय राजकारण करतो असं चॅन्सलरचं मत झालं. त्याऐवजी इतर जातीचे उमेदवार पुढे आले. त्यामुळे नवसमाज कॉलनीत हल्ली गुप्त खलबतं चालली होती. विद्यापीठात गोंधळ करून राज्यसरकारच उलथून पडण्याचा कट काही असंतुष्ट काँग्रेसवाल्यांनीही सुरु केलाच होता. त्यांच्याशी संगनमत करून माठूराम-ठोसर पूर्ण कंबरा कसून आखाड्यात उतरले. विद्यापीठातल्या भ्रष्टाचाराच्या अनेक गोष्टी जमवण्यात आल्या. ह्या कामी विद्यापीठातल्या ब्राम्हण अधिकाऱ्यांचा पद्धतशीर वापर करण्यात आला. मुंबईतल्या एका जातीय ब्राम्हण संपादकाला सर्व माहिती पुरवण्यात आली. इकडे विद्यार्थ्यांनी गोंधळ सुरू केला की तिकडे मुंबईहून विद्यापीठावर एक लेखमाला सुरु करण्याचं ह्या जातीय ब्राम्हण संपादकानं कबूल केलं. काही झालं तरी सरकार बदनाम होईल हे ह्या मंडळीचं सामुहिक ध्येय होतं. त्यातून विद्यापीठाची घडी किती विस्कटेल, विद्यार्थ्यांमधे गुंड नेतृत्वाची परंपरा सुरु होईल, जातीय विष तरुण पिढीतही शिरेल, परीक्षा लांबून हजारो विद्यार्थ्यांचं कायमचं नुकसान होईल याचा विचार कोणी केला नाही.

ह्या आगीची सुरुवात एका क्षुल्लक प्रकरणावरून झाली. प्रोफेसर चुळबुळे विद्यार्थ्यांना पक्षपाती वागवतो असं ब्राम्हणेतर विद्यार्थ्यांनी एक पत्रक काढलं. शिवाय चुळबुळेंनी आपल्या विभागात एका बाईला लायकी नसतांना आधी संशोधनसहायक म्हणून आणि मग लेक्चरर नेमून घेतलं आणि ते तिच्याशी रत होत असतांनाचे फोटो आमच्याकडे आहेत असंही ह्या पत्रकात होतं. असे बरेच आरोप करून ह्याची चौकशी झाली पाह्यजे असं विद्यार्थ्यांनी व्हाइस-चॅन्सलरला कळवलं. ह्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी व्हाइस-चॅन्सलरनं एक समिती नेमली.

ही समिती ज्या दिवशी नेमली त्याच दिवशी विद्यापीठातल्या ब्राम्हण अधिकाऱ्यांनी ठोसरला हा प्रकार कळवला. त्याचबरोबर दुसऱ्या दिवशी दैनिक समाजवाद मधे व्हाइर चॅन्सलर जातीय कसा आहे ह्यावर मोठा अग्रलेख आला. नंतर रोज वेगवेगळ्या नावांनी

विद्यापीठात कुणाचे मार्क कसे वाढवले जातात, कुणाला मेडिकल कॉलेजमधे कसा प्रवेश मिळाला अशी पत्रंही नेमानं यायला लागली. त्याबरोबर चुळबुळेंचे करुण असे फोटो पहिल्या पानावर टाकून अशा थोर विद्वानांची ह्या विद्यापीठात कदर होत नाही असे लेखही दैनिक समाजवाद मधे यायला लागले.

शेवटी चुळबुळ्यांसंबंधीच्या चौकशी समितीनं आपला गुप्त अहवाल विद्यापीठाला अत्यंत गुप्तपणे सादर केला. त्याच अहवालाची एक प्रत संध्याकाळच्या आत ठोसरांनाही मिळाली! चुळबुळेंवरील बरेच आरोप खरे असून त्यांना बडतर्फ करावं असं कमिटीनं सुचवलं होतं.

चुळबुळेंना बडतर्फ करायच्या आतच माठूराम एकाएकी मंडप टाकून भरचौकात उपोषणाला बसले. व्हाइस-चॅन्सलर बदलल्याशिवाय आपण उपोषण सोडत नाही असं त्यांनी वर्तमानपत्रांना दिलं. पुण्या-मुंबईच्या वर्तमानपत्रांमधेही व्हाइस-चॅन्सलरविरोधी लेख आले.

पुराणिकचे नेहमीचे यशस्वी प्राध्यापक तयारीत होतेच. त्यांनी वेगवेगळ्या समित्या स्थापन करून माठूरामला आपला पाठिंबा दर्शवला. एका **विद्यार्थी कृती समिती** नं परीक्षेवर बहिष्कार टाकण्याची दैनिक समाजवाद प्रेस मधे आधीच छापून ठेवलेली हजारो पत्रकं वाटली. मग वेगवेगळ्या जातींच्या विद्यार्थी संघटनांनीही परीक्षेवर बहिष्कार पुकारला. असंतुष्ट कॉंग्रेसवाल्यांनीही परीक्षेवर बहिष्कार घाला असं आपापल्या गटांना सुचवलं. दैनिक समाजवाद मधे **आमरण उपोषण : - वा दिवस** अ॰ पाटी लावलेला मंडप आणि त्यात माठूराम महात्मा गांधीसारखे बसलेले असे फोटो रोज यायला लागले.

ह्यावेळी गावातल्या काही विचारवंत शहाण्या मंडळींनी विद्यार्थ्यांना असं आवाहन केलं की, विद्यापीठाच्या कारभारात राजकारणी मंडळींनी ढवळाढवळ करणं गैर आहे, परीक्षेवर बहिष्कार घालणं कुणाच्याच हिताचं नाही वगैरे. ह्या पत्रकाची कोणत्याही वर्तमानपत्रानं दखल घेतली नाही. त्या दिवशी ह्या पत्रकावर सह्या असलेल्या लोकांच्या घरांवर विद्यार्थ्यांनी दगडफेक करून मोठा गोंधळ केला. ह्यात भोळेमुळे पोफळेबंगल्याच्याही काचा फुटल्या आणि पोफळेचा रक्तदाब फुकट वाढला. चुळबूळ्यांना बडतर्फ करू नका, कुलगुरूंना हटवा अशा घोषणा देत विद्यार्थी मोकाट फिरू लागले. विद्यापीठाच्या आवाराला होळीचं स्वरूप आलं. कुलगुरू मुख्यमंत्र्यांना भेटून आले. मुख्यमंत्री म्हणाले, माला उलथून टाकण्याचाच हा डाव आहे. तुम्ही परीक्षा व्यवस्थित घ्या. पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त राहील. बाकीच्या गोष्टी मी बघतो.

मग मुख्यमंत्र्यांनी सूत्रं हलवून दोन दलित नेत्यांना काही जागा देऊ केल्यामुळे दलित विद्यार्थी शांत झाले. दोन असंतुष्ट कॉंग्रेसवाल्यांना लवकरच मंत्रिपद देतो असं आश्वासन दिल्यामुळे बरेच मराठा विद्यार्थ्यांचे गट परीक्षेला बसलं पाहिजे अशा घोषणा देऊ लागले. कोणीतरी निनावी पत्रक काढून माठूराम रात्री गुपचूप दुध पितो असं छापलं. आता माठूराम गटाचा चडफडाट झाला. उपोषणाला आठ दिवस होऊनही उलट नेहमीच अपयशाच पदरी पडतं आहे, हे लक्षात आल्यावर माठूराम जास्तच संतापले. तरी ठोसरांनी दररोज दैनिक समाजवाद मधे उपोषणाच्या बातम्यांनी वन्ही

तेवत ठेवला. रोज दैनेक समाजवाद मधे माठूरामला भेटून गेलेल्या लोकांची लांब यादी छापून यायची. त्यात एरवीसुद्धा माठूरामकडे येणारे पाचपंचवीस लोक, बहुतेक पुराणिकमधलेच प्राध्यापक, कारकून, शिपाई, सुतार गवंडी ह्यांचीही नावं असायची. आता अनेक पुढारी मंडळी माठूरामनं उपोषण सोडावं याची खटपट करत होते. पण आधीच राजकारणात आयुष्यभर फजित पावलेल्या ह्या गटाला ही शेवटचीच आत्मगौरवाची संधी आहे असं वाटतं राह्यलं. ठोसरादी ब्राम्हण नेतेही हा सामना अटीतटीचा करावा म्हणून माठूरामला सर्व शक्तीनिशी पाठिंबा देत राह्यले.

हल्ली भोळे, चांगदेव आणि भल्ला विद्यापीठाच्या परीक्षांचं कारकुनी काम करत बसायचे. भल्लाला कुठलंच काम नीट कळत नसल्यानं तो निव्वळ वेळ लावत बसायचा. तिकडे माठूराम-ठोसर कंपूनं विद्यापीठात भयंकर गोंधळ माजवला तरी माठूरामच्या राजकारणावर कधीही आपलं मत प्रदर्शित करायचं नाही असं भल्लाचं धोरण होतं.

बाकीचे प्राध्यापक अधूनमधून डोकावून गप्पा मारून जायचे. गुंडेचा नेहमीप्रमाणे रोज एक वाजता येऊन नमस्ते प्रिन्सिपलसाब, कैसा है भोलेसाब- -असं म्हणत फोन ताब्यात घ्यायचे आणि गावातल्या तमाम ठोक व्यापाऱ्यांना फोन लावत प्रत्येकाला धान्याचे भाव मारवाडीत विचारून नोंद करून घ्यायचे. सगळे कुलकर्णी-देशपांडे-जोशी वगैरे प्राध्यापक हल्ली स्टाफरूममध्ये येऊन कुचाळक्या करत चहा पीत, बटाटेवडे खात परीक्षांच्या भवितव्यावर, विद्यापीठावर, नव्या श्रेणीवर, प्रमोशन्सवर आणि महाराष्ट्र टाइम्स वाचून जागतिक राजकारणावर बोलायचे, पाचकळ विनोद करत बसायचे आणि सर्वांना एकमेकांचा संपूर्ण उबग आल्यावर जांभया देत ऊन वाढायच्या आत घरी परतायचे. मग चिकार जेवून दुपारभर लोळून संध्याकाळी याच्यात्याच्याकडे जाऊन गप्पा मारत वेळ काढायचे. नंतर रात्री दैनिक समाजवाद च्या कचेरीत जाऊन ठोसरांसमोर दिवसभर गावात घडलेल्या उलाढालींसंबंधी वृत्तनिवेदनात्मक दरबार भरवून रात्री उशीरा घरी परतायचे. त्यातल्या त्यात तिघेचौघेच आपला वेळ अभ्यासात, वाचण्यात घालवायचे. चांगला देशपांडे हल्ली विद्यापीठाच्या लायब्रीत जाऊन बसायचा. चिपळूणकरांचंही वाचन चाललेलं असायचं.

परीक्षा होणार की नाही हे इतके दिवस निश्रित नसल्यानं विद्यार्थी टांगलेल्या मनःस्थितीत होते. आता एकदम परीक्षा घेणारच म्हटल्यावर अर्ध्या विद्यार्थ्यांची झोप उडाली. ज्यांची नीट तयारी झाली नव्हती तेही आता परीक्षेवर बहिष्कार टाकावा असं म्हणायला लागले. ज्यांची घोकंपट्टी तयार होती ते वैतागून गेले, कारण परीक्षा लांबल्या तर आयत्या वेळी पुन्हा इतकी घोकंपट्टी होईलच याची खात्री नव्हती. सगळं वातावरण इतकं गोंधळाचं झालं की काय होईल हे कुणाला कळेना. शिवाय यंदाच्या गोंधळामुळे मुलांचा नीट अभ्यास झाला नव्हता, त्यामुळे परीक्षा झाल्याच तर विद्यार्थी उघडउघड मोठ्या प्रमाणावर कॉपी करणार अशा वार्ता यायला लागल्या. प्राध्यापक घाबरले,

आपण कुठेकुठे भ्रष्टाचार रोखणार? असं तत्वज्ञान करून कामाला तयार झाले.

भल्ला संपुर्णपणे गांगरून गेला आणि कैसा होगा, कैसा होगा म्हणत राह्यला. विद्यापीठाकडून प्रश्नपत्रिकांचे गठ्ठे आले तसा भल्लाला घाम सुटला. तो सारखा खुर्चीवर चुळबुळत विद्यापीठात फोन करायचा की गोंधळ समजा झालाच तर काय करायचं? भोळे म्हणाला, सगळ्या पालकांना परीक्षा व्हाव्याशा वाटतात. सगळ्या अभ्यासू मुलानं परीक्षेला बसावंसं वाटतंय. पण चार गुंड पोरं सबंध परीक्षाकेंद्र उधळून लावू शकतात ही आपल्या पुचाट लोकशाहीची वस्तुस्थिती आहे. प्रत्येकजण निर्भय झाल्याशिवाय ही चार गुंडांच्या धक्क्यानं कोसळणारी कागदी लोकशाही निरर्थक आहे.

चांगदेव म्हणाला, आपण मास्तरं ह्या पद्धतीतले महत्त्वाचे घटक, पण आपलं तरी पोरांवर काय वजन आहे? आपण मास्तरं म्हणजे शिकवणारी टेपरेकॉर्डरं आणि पेपर तपासणारी कॉम्प्युटरं झालो आहोत. कोणीही एखादं फडतूस मॅनेजर किंवा पुढारी चार पोरांना नोकऱ्या तरी देऊ शकतो. आपण पुस्तकं वाचून निव्वळ ज्ञानदान करणारे हिजडे झालो आहोत.

पहिल्याच दिवशी सकाळपासून कॉलेजवर गोंधळ सुरु झाला. परीक्षेला बसायची इच्छा असणारी गरीब पोरं भीतभीत वर्गात जाऊन बसली. भोळे स्वतः कॉलेजच्या दाराशी उभा राहून बहिष्काराचे फलक घेऊन घोषणा देणाऱ्या विद्यार्थ्यांना समजावत होते. मध्यमवर्गी अभ्यासू शांत मुलंमुली आणि शिल्लक असलेल्या पैशात परीक्षेचे दिवस काढून लगेच गावाकडे निघून जायचं अंदाजपत्रक केलेली खेड्यावरची गरीब पोरं हळूहळू इकडून तिकडून आत जाऊन बसली. बहिष्कारवाली पोरं भोळ्यांभोवती जमा होऊन भोळ्यांना रस्त्यातून दूर व्हा म्हणत ढकलाढकली करायला लागली. शेवटी भोळे संतापून ओरडले, परीक्षेला ज्यांना बसायचं आहे त्यांच्यावर तुम्ही गुंडगिरीनं दडपण आणता आहात. ह्या गरीब पोरांना तुमच्यासारखी इथे गावात घरं नाहीत. परीक्षा लांबल्या तर यांना घरी जाऊन पुन्हा यायला पैसा नाही. यांना भांडीकुंडी विकून इथे शहरात शिकायला यावं लागतं. आता पुन्हा इथे यायचं तर मायबापाचं रक्त आटेल ह्यांच्या. बहिष्काराचं हे राजकारण निव्वळ स्वार्थी, जातीय आहे. तुम्ही त्यात पडू नका. वगैरे.

त्यावर एक विद्यार्थी पुढारी म्हणाला, कुलगुरूंची नेमणूक जातीय निकषातून होते हे तरी खरं आहे की नाही?-हे तुम्हाला माहीत असून तुम्ही विद्यापीठात काय करता? हे आधी सांगा. दुसरा म्हणाला, परीक्षेत विद्यापीठातल्या अधिकाऱ्यांच्या पोरांचे मार्क सर्रास वाढवले जातात त्याबद्दल तुम्ही काय करता? एक म्हणाला, तुम्हाला पेपर तपासून पैशे कमवायचे असतात म्हणून परीक्षा व्हाव्यात असं म्हणता?

त्यांना भोळे म्हणाला, हा भ्रष्टाचार परीक्षेवर बहिष्कार टाकून मिटेल असं तुम्हाला वाटतं का? तुम्ही परीक्षापद्धती सुधारण्यासाठी चळवळ करा. असं जाहीर करा की ही शिक्षणपद्धती बदलल्याशिवाय आम्ही परीक्षेला बसणार नाही! मग आम्ही

प्राध्यापकसुद्धा तुम्हाला पाठिंबा देऊ.

विद्यार्थी पुढारी म्हणाला, आम्ही सुरुवात करू! आणि तुम्ही आम्हाला पाठिंबा देणार! हे शोभतं का सर तुम्हाला? तुम्हीच का नाही सुरुवात करत? आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ!

भोळेला काही पुढे बोलता येईना. नवी पिढी ज्यास्त हुशार होते आहे, हे पटलं. तो निव्वळ तार्किक काहीतरी बोलत राहिला आणि पोरांशी हुज्जत घालत राहिला. लहानपणी आम्ही रानातला डिंक गोळा करून परीक्षेची फी द्यायचो, आता तुम्हाला सरकार शिकवते-असं काहीतरी तो सांगत राहिला. तेवढ्यात घंटा देऊन भोळेनं पेपर सुरू करून टाकला, आणि विद्यापीठात फोनही केला की आम्ही व्यवस्थित परीक्षा सुरु केली आहे. दुसऱ्या केंद्रांवर हे कळवा म्हणजे त्यांना आधार वाटेल.

त्याला उत्तर म्हणून विद्यापीठातली अधिकारी म्हणाला, दुसऱ्या केंद्रावर कळवा हे तुम्ही आम्हाला कोण सांगणार?

भोळेनं हरामखोर म्हणून फोन ठेवून दिला.

नंतर अर्धा तास सगळं व्यवस्थित चाललं. नंतर गावातल्या इतर केंद्रांवरून विद्यार्थ्यांची जी गर्दी पुराणिकवर उलटली की रस्ता भरून गेला. पुराणिकमधे लिहीत बसलेले पण पेपर कठीण वाटलेले बरेच विद्यार्थीही बरी संधी आली म्हणून एकदम झुंबड करून उठले. नापास व्हायची खात्री आधीपासून असलेले तर बाहेरच आले. बाहेरून दगडांचा मारा सुरू झाला. चार पोलिस होते ते कुठल्या कुठे गायब झाले. काही गुंड पोरं कॉलेजच्या मागच्या गल्लीतून आत आली आणि खिडक्यांमधे उभी राहून आतल्या लिहीत बसलेल्या पोरांना दम द्यायला लागली: उठा बे भडव्यांनोऽ उठरे चष्म्याऽ, अगऽ एऽ चल ये भाईर, आरे पुन्हा परीक्षेला बसावंच लागंल! या भाईर!-असा कल्ला सगळ्या बाजूंनी सुरू झाला. ह्या चाऱ्ही बाजूंनी तुटलेल्या मोहोळाला रोखणं कठीण झालं. काही जण तरीही लिहीतच राहिले, मग तर कोणी ओरडलं, क्या लिखते बे च्यूतेऽमाँके लवडेऽ. एकदोन एकदोन विद्यार्थ्यांचे पेपरच खिडकीतून हात लांबवून पळवले. मग सगळीच पोरं बाहेर आली.

भल्लानं लगेच विद्यापीठात फोन केला. पोलीस पाठवा. गोंधळ झाला आहे. तिकडून उत्तर आलं, सगळीकडे परीक्षा केंद्रं उधळली गेली आहेत. परीक्षा रद्द झाल्या असं समजा.

मग परीक्षा अयशस्वी केल्याच्या आनंदात माठूरामनी आपलं आमरण उपोषण तात्पुरतं स्थगित केल्याची घोषणा केली. तिकडे मुख्यमंत्र्यांनी सी.आय.डी. रिपोर्टवर दोन दिवस विचार करून कुलगुरूंना सांगितलं की आणखी काही दिवस परीक्षा लांबवा. मी मुख्यमंत्री असेपर्यंत तरी तुम्हाला मी काढत नाही.

मग परीक्षा लांबवल्या ह्या यशाच्या मुहूर्तावर माठूरामनी आपलं आमरण उपोषण सोडलं.

तेवढ्यात तिकडे मुख्यमंत्रीच बदलणार अशा बातम्या आल्या. एकदम राजकारण उलटलं. दैनिक समाजवाद मधेही परीक्षा फार लांबल्या तर विद्यार्थ्यांचं अपरिमित नुकसान होईल असे अग्रलेख यायला लागले. कोणी म्हणालं सरकारनं ठोसर-माठूराम यांना चिकार आठदहा लाख रुपये लाच दिली. दुसरे म्हणाले, सरकार मूर्ख आहे का अशांना इतकी लाच द्यायला. नुस्ता कागदाचा कोठा वाढवून दिलाय फक्त दैनिकासाठी.

अजून दैनिक समाजवाद मधे भ्रष्टाचारी कुलगुरूला लवकर हटवा अशा बातम्या, पत्रं, अग्रलेख येतच होते. पुन्हा माठूराम दुसऱ्यांदा आमरण उपोषणाला बसतील अशीही धमकी होती.

त्यामुळे आता घेण्यात येणाऱ्या परीक्षांना पुन्हा बहिष्काराची भीती होतीच. त्यामुळे पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात परीक्षा घ्यायचं ठरलं. पोलिसांचा एक जथा प्रत्येक परीक्षाकेंद्रावर शेवटपर्यंत राहील असं कुलगुरूंनी जाहीर केलं.

तेव्हा भोळे म्हणाला, ह्यानंतर दरवर्षीच पोलिसांनीच परीक्षा घेतल्या तर किती बरं होईल? पेपर तपासण्याचंही काम पोलिसांनीच करावं, रिझल्टही पोलिस स्टेशनवर प्रसिद्ध करावे. ही आपली लोकशाही!

मग एप्रिलमध्ये ऐन उन्हाच्या तलखीत पुन्हा दुसऱ्यांदा परीक्षा घ्यायचं ठरलं. मध्यंतरी मुख्यमंत्री बदलल्यामुळे इकडेही जुने व्हाइस-चॅन्सलर गेले आणि नवे व्हाइस-चॅन्सलर आले. आता माठूराम-ठोसर यांचा उत्साह खलास झाला होता. तरी आपल्याला व्हाइस-चॅन्सलर केलं नाही या सूडानं ते पुन्हा परीक्षांमधे गोंधळ करायची गुप्त बातमी सरकारला लागली होती. म्हणून ह्या वेळी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला. परीक्षा सुरू व्हायच्या आदल्या दिवशी पुराणिकवर वीस हत्यारबंद पोलिस हजर झाले. शिवाय माठूरामच्या कॉलेजमधेच अचानक गडबड सुरू करायचा गुप्त बेत सी.आय.डी. तर्फे कळल्यामुळे जाधव नावाचे एक हुशार इन्स्पेक्टर खास पुराणिक केंद्रावर नेमलेले होते. ते रिव्हाल्वर वगैरे लावून भल्लाच्या ऑफिसात ठाण मांडून बसले.

शिवाय विद्यापीठाकडून जॉइंट चीफ सुपरिंटेंडेंट म्हणून उत्कृष्ट इंग्रजी पण जोरदार मराठी बोलणारे प्राध्यापक गेंगाणे नावाचे एक सत्तावीस वर्षं प्राध्यापकीचा दीर्घ अनुभव असलेले शांत, तपकीर ओढणारे, कायम बोलत राहणारे अनुभवी गृहस्थ पुराणिकवर नेमण्यात आले. गेंगाणे हे अत्यंत आनंदी, लठ्ठ, ठेंगू गृहस्थ होते. त्यांच्या चेहऱ्यावर कसलीही काळजी दिसत नव्हती.

गेंगाणेंनी आल्याआल्याच पद्धतशिरपणे भल्ला, चांगदेव, भोळे आणि इन्स्पेक्टर जाधव या सगळ्यांची घरगुती चौकशी करून किती मुलं आहेत, किती पगार, घरभाडं किती देता, दुध रोज किती घेता, बायको-सासुरवाडी श्रीमंत आहे की कशी-वगैरे माहिती विचारत विचारत आइस्क्रीम वगैरे मागवून ऑफिसातलं वातावरण चांगलं करून टाकलं. मग गेंगाणे तपकीर ओढत परभारे गोटेराव प्यूनला म्हणाले, आरे, होस्टेलमधली एखादी खात आण बरं, हिकडे स्टोअररुममधे टाक. गादी है आपली. आनि एक नवा माठ घिऊन ये. रोजचा भरून ठिवायचा बरं! आपल्याला खाट आन् माठ असली की फिकीर नाही महिनाभर. कॉलेज बरं गावातच आहे. उठल्या उठल्या

गल्लीत चाहा पिऊनं पुन्हा खाटेवरी! लायब्रियनला म्हनावं पेपरं आजपासून हिकडेच टाकायला सांगत जा. मी वाचून ठिवत जाईन.

मग गेंगाणे भल्लाला म्हणाले, मी आतापरेंत बेचाळिस जाइंट चीप सुपरिंटेणशिपा केल्या हैतं ठिकठिकानच्या कॉलेजांमधी. सगळीकडे आपलं हेच! मानूस परीक्षाकेंद्राबाहेर हलता कामा णये! तर तं परीक्षा सुरळित चालती! लॉज् न् फॉज् म्हणजे काय खरं न्हाय. खरं का खोटं?

पहिल्या पेपरच्या दिवशी सकाळी सात वाजताच भल्ला कॉलेजवर हजर झाला, इतका तो घाबरला होता. आज काहीतरी भयंकर प्रकार आपल्या कॉलेजात होणार अशी त्याला वार्ता लागली असावी. तो वारंवार विद्यापीठात फोन लावून आमच्याकडे सगळं ठीक चाललं आहे असं कळवत होता. बाहेर पोलीस उभे असूनही चारपाच गुंड मुलं साळसुदासारखी आतबाहेर येतजात होती त्यामुळे भल्लाला घाम फुटत होता. एकदा न राहवून भल्ला भोळेला कानात म्हणाला, ही गुंड पोरं काहीतरी करणार बरं. जपून वागा. तुमचा मला भरोसा वाटत नाही. तुम्ही उगा धराल त्यांना!

चांगदेव म्हणाला, इन्स्पेक्टर जाधवना सांगू का?

भल्ला घाबरून म्हणाला, नही नही नही बाबा, व्हेन व्हेन देअर इज फिजिकल थ्रेट, देन देन ओन्ली यू शुड लुक आफ्टर यूवर ओवन सेफ्टी! तुम बच्चे ही भोले! किसने अंधेरेमे ॲसिड फेका, छुर्रा मार दिया तो क्या करोगे पागल? तुम कुछ मत करो. आखिर तुम मेरे असिस्टंट हो! चूप रहो.

मग ते दोघे उत्तरपत्रिका मोजत हॉलवारी रचत राह्यले. इन्स्पेक्टरना विशेष काम नसल्यामुळे ते सकाळीसकाळीही जांभया देत होते. प्राध्यापक गेंगाणे हे इन्स्पेक्टर जाधवबरोबर विनोदी गप्पा करत शांत तपकीर ओढत बसले होते. ते जाधवना म्हणाले, हे तुमच्या कमरेचं पिस्तूल खरंच है का निस्ता चांबड्याचा टोबरा है व्हो?

मग जाधवनी हसून आतलं खरोखरचं रिव्हॉल्वरच काढून दाखवलं! गेंगाणे एक नवी अद्‌भुत चीज पाह्यल्याच्या कुतूहलात उठून उभेच राह्यले. जाधव म्हणाले, लांबून काय पहाता हो? ते काय बॉम्बफीम्ब आहे का काय? पाहा, घ्या की हातात.

गेंगाणे आश्चर्यानं रिव्हॉल्वर हातात घेत म्हणाले, आमी अर्धमागधीचे लेक्चरर! हे सगळं नवंच की हो आमाला. कसं काय मारायचं ह्यातलं? निस्तं डोक्यावरी मारलं की झांज यिऊन पडंल की व्हो चोर ह्येच्यानं! ही ही ही ही!

जाधव त्यांना कशा गोळ्या मारतात, कसा हात काटकोनात वाकवून नेम धरतात वगैरे प्रात्यक्षिक करून सांगत होते.

गेंगाणे म्हणाले, आता तर गोळ्या न्है नं ह्येच्यात?...मंग् ठीक है, मंग् ठीक है! गोळी म्हनजी जोरातच जात असंल बावा येच्यातून! वाटतंच!

असं म्हणत गेंगाणे ते रिकामं पिस्तूल हातात घेऊन जाधवनी दाखवलं होतं तसं करायला लागले. एक डोळा लावून समोर इकडेतिकडे खिडकीतून दारातून पहात ते

म्हणाले, म्हंजी हा खालचा चाप दाबला की सुटलीच मनायची गोळी! वा! काय शोध लावलेत जाधवसायेब! वा! जनरल नॉलेज झालं की आपलं आज.

आमी आमच्या मदल्या पोराला सैनिकी स्कूलमधे घालू मनतोय. फार बदमास ते मदलं आमचं. इची लेक आमी निस्ते अर्धमागधी शिकिवलो सत्तावीस वर्सं पाहा.

आसं काई माइतीच नवतं. बरं झालं आता मैनाभरी तुम्ही आमच्याबरोबर आसनार. जनरल नॉलेजसाठी मनतो!

असं म्हणून गेंगाणे पवित्र्यात उभे राहून ढेरी शक्य तो ताठ करत दरवाज्याकडे पिस्तूल रोखून उभे राह्यले. आपण हिटलर वगैरेच आहोत असं त्यांना वाटायला लागलं.

तेवढ्यात दरवाज्याबाहेर काही बाचाबाची ऐकायला आली आणि दारातून दोन पोलिस आणि गोटेराव प्यून एका तगड्या गुंड पोराला घेऊन ऑफिसात आले. आत येईपर्यंतही हा गुंड मुलगा शिवीगाळ करत गुर्मीतच ओरडत होता.

ऑफिसात शिरल्याशिरल्या त्या पोराला योगायोग म्हणून समोर पिस्तूल रोखन एक डोळा लावून नेम धरणारे गेंगाणेच दिसले आणि त्याचा संपूर्ण होश उडून गेला. चेहरा पांढराफट पडला, बोबडी वळली आणि तो परभारे डोळे पांढरे करून ततपप करत म्हणायला लागला, नाही...नाही सर...मी नाही ..मी नुस्ता...

गेंगाणेंना आणि दुसऱ्यांनाही ह्या प्रकारची कल्पना नव्हती. गेंगाणे तर एका डोळ्यानं पिस्तुलाच्या टोकावरच पाहात होते. समोर हा पोरगा असं काय करतो म्हणून गेंगाणेंनी दोन्ही डोळे उघडले. गोटेराव भल्लाला सांगत होता, हे पोरगं हॉलमधार फटाके पेटवीत हुतं. परीक्षा होऊ देनार नाय म्हनलं पुन्हा! पकडलं तर आईमाईवरनं गाळ्या देयाला लागलं. लई गुंड है हे.

आता अचानक हा पोरगा थरथर कापत उभा होतं. आणि गेंगाणेंनाही सगळा प्रकार लक्षात यायला दोन मिनटं लागली. मग आता आणखी गंमत करावी,म्हणून गेंगाणे पिस्तूल पुढे रोखून धरत प्रचंड गर्जना करत म्हणाले, हॉऽ! हॅण्डस अप! वॉट्ट डू यू मीन? ॲऽ? आयऽ शूटिंग यु! हॅण्ड्स अप! हॉऽ ! जैसे थे! हात वरी!

गांगरलेल्या त्या पोरानं एकदम हात वर केले.

गेंगाणे पिस्तूल वरखाली करत म्हणाले, हॉऽऽ! क्या करनेको आया था? सच बोऽल! नही तो गोली मार दुंगा! हॉऽ! हॅण्डस् अप, शट अप! ह्ये खालचं घोडमं ओढलं की सूंऽऽ गोळी सुटती! हाऽ!

तो पोरगा डोळ्यात पाणी आणून म्हणाला, नाही सर मी-मी नुस्ता-नको नको नको-वाचवा हो सर मला-मी...नाही नाही नाही मला सोडून द्या सर. मी पुन्हा येणार नाही...नाही नाही...

गेंगाणे पिस्तूल रोखवून म्हणाले, असाचा असाच मागे जा. गेट आउट! चलो, हात वर करूनच मागे जा. पुन्हा दिसलास हितं तर-फॉऽऽड-चल, चल पीछे. हॉऽ!

तो गुंड पोरगा हात वर ठेवून मागेमागे सरकत दारात अडखळत मधेच मागे पाहात, पुढे पिस्तुलाकडे घाबरून नजर लावत बाहेर निसटला आणि एकदम कॉलेजबाहेर पळत सुटला.

मग ढेरी सावरून अत्यंत उंच सूर काढून काढून गेंगाणे जे हसायला लागले ते

जाधवांच्या अंगावरच कोसळले. जाधवही खो खो हसत होते. गेंगाणे हसता हसता इतके घाबरले की त्यांना नंतर श्वासही घेववेना आणि मग तर ते बेशुद्ध होऊनच खाली कोसळले!

मग त्यांना शुद्धीवर आणण्यात दोघे पोलिस, भोळे, भल्ला, गोटेराव, आणखी एक प्यून असे सगळे धडपडून धावपळ करायला लागले. काय करावं कुणाला कळेना. तिकडे पावणेदहा वाजायला आले आणि एकेक इन्व्हिजिलेटर्स पेपर घ्यायला ऑफिसात घाईघाईत यायला लागले. मुलंही जमा झाली. ऑफिस भरून गेलं. बिल न देणारा यजुर्वेदी म्हणाला, यांना डॉक्टरकडे न्या. मोठ्यानं तोंड धुणारे शास्त्री म्हणाले, कांदा आणा हो कांदा. गोटेराव म्हणाला, हे का घर हाये व्हो कांदे मिळायला?

इतक्यात चिपळूणकर आत आला आणि म्हणाला, पोरं गोंधळ करताहेत, लवकर घंटा दे रे गोटेराव. ऑं, काय झालं हो?

भोळेनं झटपट चिपळूणकरचा बूट काढला आणि गेंगाणेंच्या नाकाशी धरला. लगेच गेंगाण्यांचा श्वास मोकळा झाला आणि ते उठून बसले. मग भल्ला म्हणाला, दस बज गये भोले! चली चलो, पेपर उठाव देर हो गयी!

लगेच गेंगाण्यांच्या लक्षात सगळा प्रकार आला आणि ते म्हणाले, घड्याळ मागे करा. पैली बेल द्या! घाबरायचं काम नाय. मी आहे! घड्याळ मागे करा. हाँ! पावणेदहा वाजवा न् पैली बेल द्या.

एकूण हा सुरुवातीचा गोंधळ सोडला तर बाकी परीक्षेत महिनाभर काहीही गैरप्रकार झाला नाही. उलट ह्या प्रकरणाची जेव्हा जेव्हा आठवण व्हायची तेव्हा सगळेजण गोटेराव धरून पुन्हापुन्हा मनसोक्त हसून घ्यायचे.

असे प्राध्यापक गेंगाणे हे हास्यरसाचा पुतळाच होते. ह्याउलट जाधव गंभीर रसाचे द्योतक होते. त्यांना नुकतंच प्रमोशन न मिळाल्यामुळे तर ते सामाजिक मूल्यांवर जास्त बोलायला लागले होते. नुकतेच ते एका कुमारीच्या खुनाच्या केसमागे होते आणि धागेदोरे लागले होते. तेवढ्यात त्यांना तातडीनं बोलावून इकडे परीक्षाकेंद्रावर पाठवून दिल्यामुळे ते फारच खिन्न झाले होते. ते म्हणायचे, आता खून शोधल्याचं क्रेडिट वशिल्याच्या इन्स्पेक्टरला जाणार! धडपड मी केली! सगळ्यात भ्रष्ट, गलिच्छ खातं कोणतं असेल तर इंडियन पुलीस! निव्वळ करप्शन. कॉन्स्टेबलपासून वरपर्यंत हप्ते. करप्शन.

गेंगाणे म्हणाले, आमच्या शिक्षनखात्याचा तुमी अपमान करीत आहात इन्स्पेक्टर जाधव. हे आजचे पेपर परीक्षकाकडे जायच्या आधीच ह्यातले कोण फर्स्टक्लास येनार हे ठरलेलं है, हे तुमाला म्हाईत है?

मग ह्यावरच गेंगाणे आणि जाधव यांची गंभीर चर्चा चालायची. अधूनमधून ते मारामारीवरच यायचे. मग गेंगाणे गोटेरावला म्हणायचे, च्या आन बाबा सगळ्यानला, त्याच्या आयला. मग तपकीर ओढली की ते पुन्हा शांत, विनोदी व्हायचे. मग पुन्हा ते

जाधवची गंमत करून दुसऱ्या गप्पा सुरू करायचे. गेंगाणे उत्कृष्ट इंग्रजी बोलायचे आणि वेळोवेळी भल्लाच्या चुका बोलता बोलताच दुरुस्त करायचे. गेंगाणेंना प्रत्येक गोष्ट ज्ञानसंग्राह्य वाटायची. जनरल नॉलेज पाह्यजे, असं ते स्वतःशी वारंवार म्हणायचे.

एकदा स्वतःचे हजार रुपये देऊन पुण्याच्या प्रकाशकाकडून कवितासंग्रह छापून आणणारा कवी जोशी ऑफिसमध्ये बसला असतांना गेंगाणेंनी त्याची संपूर्ण ओळख करून घेतली. मग गेंगाणे म्हणाले, मलाबी कवितासंग्रह ल्याहावा, कथासंग्रह ल्याहावा असं वाटे व्हो विद्यार्थीदशेमधी—

जोशी त्यांना म्हणाले, असा एकदम सबंध कथासंग्रह न् कवितासंग्रह लिहिता येत नाही साहेब!

गेंगाणे म्हणाले, आँ? म्हनजे? मंग् कसं काय? जनरल नॉलेज म्हनून विचारतो- आम्ही बॉर्डरवरल्या खेडवळ कॉलेजात जल्म घालवला, पुने न् मुंबईमदल्ला फरक नीट कळेना. मग सांगा बरं कवी, कसं ल्याहायचं संग्रह—

जोशी म्हणाले, अहो एकेक कविता न् कथा लिहून होत असते, वेळोवेळी छापून होत असते, त्या सगळ्या नंतर एकत्रित करायच्या.

गेंगाणे टाळी देऊन म्हणाले, घ्या! आम्ही एकदम पुस्तकच पाहतो की व्हो! हे माहीत अस्तं तर लिवलं नस्तं आम्ही थोडंथोडं कविता, कथा काही काही! जनरल नॉलेज पायजे!

असं गेंगाणेंच कायम चाललेलं असायचं. हळूहळू सगळ्यांच्या लक्षात आलं की हा गृहस्थ भासवतो तितका मूर्ख नाही. बाजूला भोळे, चांगदेव आणि भल्ला परीक्षेचं काम करत असायचे. परीक्षा आत सुरळीत सुरु झाल्या होत्या आणि पोलिसांना तसं काहीच काम नव्हतं. अधूनमधून स्टाफचे प्राध्यापकही तिथे गप्पा मारायला यायचे, चहासिग्रेटी पिऊन पुन्हा वर्गावर जायचे. गेंगाणे प्रत्येकाला पुन्हा पुन्हा आदरानं तपकीर पुढे करायचे पण सगळेजण तुच्छतेने तपकीर नाकारायचे.

भोळे स्वतः व्यवस्थित काम करायचाच पण भल्लालाही तो काम करायला लावायचा. भल्ला कामचुकार म्हणून प्रसिद्ध होता. उदाहरणार्थ, पेपर जमा झाल्यावर तपासतांना आणि गठ्ठे बांधताना तो गोटेरावला तातडीन पिटाळून पानं मागवायचा आणि तोंडात पान टाकून चांगदेवकडे सगळ्या उत्तरपत्रिकांचा गठ्ठा देऊन आपण नुस्तं यादीवर पाहत हूं हूं करत बसायचा. हे दोनतीन दिवस लक्षात आल्यावर भोळे मुद्दाम पेपरावरचा नंबर चुकीचा वाचून पुढे पेपर उलटायचा. तेव्हा भल्ला नाइलाजानं त्याला हातानं थांबा म्हणून वैतागून खुर्चीवरून उठून खिडकीतून थुंकून येत म्हणायचा. गलत है, गलत है, फिरसे बोलो! मग भोळे मागचा पेपर पुन्हा काढून बरोबर नंबर वाचायचा! असं खोडसाळ दर पाच मिनटांनी करून भल्लाला उठायला लावून लावून शेवटी भल्लाकडेच पेपर देऊन भोळे मोकळा व्हायचा. भल्ला आल्याशिवाय प्रश्नपत्रीकांचं कपाट आपण उघडायचं नाही हाही नेम त्यानं शेवटपर्यंत पाळला. त्यामुळे भल्लाला धडपडत साडेनऊशी यावंच लागायचं. भल्ला वैतागला.

एकदा चिपळूणकरानं एका पोरीची कॉपी पकडून पेपर भल्लाकडे पाठवून दिला. भल्लानं ऐसा नही करना बेटा असं म्हणून तिला पुन्हा हॉलमध्ये पाठवून दिलं आणि पेपर लिहू दिला. त्यामुळे चिपळूणकर गरम होऊन गेला. पेपर संपल्यावर गठ्ठा देऊन ते भोळे, चांगदेव दोघांना चहासाठी बाहेर घेऊन गेला. शोभामधे ते तिघे

भल्ला किती भंपक आहे याच्यावर बोलत बसले. तेवढ्यात मागच्या टेबलावर तिघे विद्यार्थी येऊन बसले.

चहा मागवून एक विद्यार्थी म्हणाला, परीक्षेला बसलो असतो तर युनिव्हर्सिटीत काही किल्ल्या फिरवून पास तरी व्हायचा चान्स होता. आता बसलोच नाही

म्हणजे संपलंच. तसा अभ्यासही केला नाही म्हणा! मूडच नव्हता अभ्यासाचा.

दुसरा म्हणाला, अभ्यास! अभ्यास करून कुठे मार्क पडतात का भडव्या! एफ्.वाय्.ला मी वर्षभर अठरा अठरा तास अभ्यास करायचो पण फर्स्ट क्लास आलाच नाही. आणि गेल्या वर्षी एस्.वाय्.ला निव्वळ शेवटच्या पंधरा दिवसांत अभ्यास केला तर पासष्ट टक्के मार्क!

तिसरा म्हणाला, हॅ हॅ हॅ, लिहिण्यावर अन् अभ्यासावर का मार्क पडतात बे लेका कधी? गेल्या परीक्षेत मी चक्क पुस्तक पुढे ठेवून पेपर लिहिला तरी पस्तीस मार्क पडले मला! म्हणजे पेपर नीट वाचला असेल का भडव्या एक्झामिनरनं?

निव्वळ पानं पाहून मार्क देतात मादरचोद. पण नेणार कोणाकडे गाऱ्हाणं? बाप फुकटच शिव्या देतो साला मलाच.

पहिला म्हणाला, माझा भाऊ प्रीडिग्रीला पाच पेपरांना व्यवस्थित बसला आणि शेवटच्या सहाव्या पेपरला आजारी पडला एकाएकी, म्हणून बसलाच नव्हता. तरी

त्याला सहाव्या पेपरात तीस मार्क पडले होते मार्कमेमोवर! आहेस कुठे तू! आम्ही गेलो कंप्लेंट घेऊन म्हणे वरच्या नंबराचे मार्क चुकून पडले असतील! आयला,

अशी परीक्षापद्धती आहे आपली—

दुसरा म्हणाला, पण तीसच मार्क पडले म्हणून तुम्ही कंप्लेंट घेऊन गेलात! चाळीस पडले असते तर गेलाच नसता तुम्ही!

पहिला म्हणाला, उघड आहे!

तिसरा म्हणाला, आपल्या देशपांडेसरांनी पंचात्तर मार्क दिले म्हणालास ना रे तू. तरी तुझा फर्स्ट क्लास कसा चुकला त्यावेळी?

दुसरा म्हणाला, झुऑलॉजीत मार खाल्ला रे त्याच्या आयला. केला प्रयत्न सगळीकडून पण तुला माहीतच आहे भावे किती खाडू माणूस आहे ते. एक मार्क वाढवणार नाही म्हणाला, आणि साल्यानं तिकडे चाळीस चाळीस मार्क वाढवलेत त्याचं काय? त्या ऋसिपाठकानं—

तिसरा शू शू करत म्हणाला, अबे मागे मास्तर बसलेयत. हळू बे. चला त्याच्या आयला-इथे कशाला मरतात भडवे हे? वर्षभर वर्गात साल्यांची थोबाडं दिसतातच, पुन्हा इथेही!

हे तिघंजण गेल्यावर चांगदेव म्हणाला, निदान आपल्यासमोर असं बोलू नये एवढी किंमत पोरं आपल्याला देतात हे काय कमी आहे. काय धंदा आहे आपला! यापेक्षा

बुटपॉलिशवाला जास्त स्वाभिमानानं पोट भरतो—

भोळे चांगदेवला अडवून म्हणाला, तू हा धंदा अजून किती वर्षं करशील अंदाजे?

चांगदेव कप फिरवत म्हणाला, खरं तर दुसरी कुठलीही नोकरी मिळाली की मी हे सोडतो. पण पुढल्या वर्षी मी इथे रहाणार नाही.

नक्की?

अगदी लगेच.

भोळे समाधानानं चिपळूणकरला म्हणाला, आता काही दिवसांनी आपल्या गव्हर्निंग कौन्सिलची मीटिंग होणार आहे. तसं कुणाला काढायचं, कुणाला प्रमोशन द्यायचं हे ठरलेलं असणार.

चिपळूणकर चहा संपवून म्हणाला, चला, साल्या भल्लाला सुनावतो जरा. आम्ही कॉप्या धराव्या आणि ह्यानं बेटाबेटा करून पोरांना सोडून द्यावं! पुन्हा पेपर लिहायला ऐटीत येतात आपल्यासमोर तीच पोरं हॉलमधे.

मग ते कॉलेजवर आले. भल्ला नेहमीप्रमाणे टपाल टराटरा फाडत वरती नावं लिहित ढीग करत बसला होता. गुंडेचा तिकडे पेपर सुरु करून भल्लाकडे फोनवरून मारवाडीत किराणा मालाचे भाव विचारत तिथेच बसले होते. गेंगाणे पाय लांब करून गुंडेचाकडे विनोदानं पहात पसरले होते. आल्याआल्या चिपळूणकरनं भल्लावर हल्ला चढवला. भल्ला समजणुकीच्या सुरात हसत हसत त्याला पटवून देत होता की, भई ये सब सिस्टिम सड गयी है? हम लोगोने थोडा लीनिअन्ट ॲटिट्यूड लेना चाहिये. बच्चे आजकल कंट्रोलके बाहर गये हुये है. पुछो अपने गेंगानेसाबको.

गेंगाणे म्हणत होते, चिपळूणकरसाहेब, पोरीची कॉपी पकडणं मंजी सोपं असतं का व्हो? हितं लेडीपैकी इन्विजिलेटरीण आना, चोळी तपासा, लुगडं फेडा-हॅत तिची बा झौ. पोरं संतापली की फार वाईट असतं हाँ! अगदूरच आपुन तापल्या तव्यावरी बसलोय...आता हेच बगा, आजच्या सकाळच्या प्रश्नपत्रिकेमधी चुका हैतं चारपाच. पैलाच प्रश्न बगा, निस्ता पॅसेज दिला है. त्याचं का समरी करा का काँप्रिहेणशण करा का टरान्सलेशन करा का काय करा-काय समजावं पोरांनी? विद्यापीठाला मघा भोळेनी फोन केला तर वेळ संपून गेला पण त्यांचं उत्तर नाही. व्हाइस-चॅन्सलर मुंबईला मीटिंगला, कंट्रोलर दौऱ्यावर, असिस्टंट कंट्रोलर गेला घरी-क्लार्क म्हणतो मी काय करू? असं है! आपूनच कशाला शिस्त आन् नियम पाळा? खरं का खोटं?

इन्स्पेक्टर जाधवही तिथली एक मराठीची प्रश्नपत्रिका वाचत वेळ काढत बसले होते. ते प्रश्नपत्रिका चिपळूणकरापुढे धरून म्हणाले, वाचा...

प्रश्न १. ससंदर्भ स्पष्टीकरण करा:-

*(अ)* बायको नसली तर घर व स्मशान सारखेच*!*

काय उपयोग याचा? याचं स्पष्टीकरण काय करणार पीयूसीची कोवळी पोरं.

गुंडेचा भाव नोंदलेले कागद गुंडाळत म्हणाले, हल्ली पोरंही अभ्यास नको म्हणतात फार, जाधवसाहेब. नुस्त्या नोट्स् उतरून द्या म्हणतात. खेड्यातून बाराशेच्या खालच्या उत्पन्नाची खोटी सर्टफिकटं मिळवतात सरपंचाला दहावीस रुपये खाद देऊन.

जाधव म्हणाले, हेच सरपंच झेड्.पी. चालवतात न् ह्या जिल्हा परिषदा देश चालवतात. तुम्ही काही म्हणा भोळेसाहेब, एकदा आर्मीनं हा देश ताब्यात घेतल्यावाचून सुधारणा सोडा.

गुंडेचा म्हणाले, इतकं टोकाचं मी म्हणणार नाही. पण काहीतरी आपल्या वेळी होता तसा ध्येयवाद, स्टॅण्डर्डस्ची कदर तरुणांना मिळेल असं शिक्षण दिलं पाहिजे.

भोळे म्हणाला, घेणाराच्या पात्रतेवरच शिक्षण द्यावं लागतं मालक. खेड्यांतून झोपड्यांतून येणाऱ्या पोरांना ध्येयवादी म्हणवून घेणंसुद्धा परवडत नाही. त्यांना कसंतरी डिग्री घेऊन निसटायचं असतं. साधी नोकरी मिळाली तरी त्यांची इतिकर्तव्यता संपते. ते वर्तमानपत्रांतून फक्त ह्याची त्याची नावं वाचतात. पुस्तकं कुणीही कुणाचीही वाचलेली नसतात. टेक्स्टबुकंसुद्धा कोणी विकत घेत नाही. सरकारनं फुकट शिक्षण केलंय म्हणून लोंढेच्या लोंढे येताहेत. तशी हुशार मुलं असतात थोडीशी, पण त्यांना खऱ्या अर्थानं शिकवलंच जात नाही. इतका पैसा दक्षिणेसारखा सरकार खर्च करतं पण ह्या पैशांचा खरोखर काय उपयोग होतो हे सरकारला कळवून घ्यायचीही इच्छा नाही.-फी माफ, शिका, रहा कुठेही,

डिग्र्या घ्या आणि गप्प बसा असं सरकारचं धोरण आहे. पोरं आता आंदोलनं करायलीत पण सगळी जातवार चळवळ चाललेली आहे. पोरांना कामंच नाहीत काही! करणार काय दुसरं! वर्तमानपत्रं वाचायची, भावना भडकवणारे भेटले की हैदोस मांडायचा. देश खड्ड्यात चाललाय नकळत पाहा! अशी ही तरुण पोरं आठआठ वर्षं शहरात काढून निरुद्योगी होतात, नोकरीच्या आशेवर कशाबशा परीक्षा देतात, मग धड शेतीलाही लायक नाही, धड शिक्षण नाही असे एम्.ए.- एम्.एस्सी. होताहेत पोत्यांनी.

गेंगाणे म्हणाले, आन् मंग नौकऱ्या मिळत नै म्हून मोचें न् पत्रकं काढत्यात, इची लेक.

भोळे म्हणाला, तरी आता सगळीकडे शिक्षण स्वस्त झाल्यानं झोपड्या-झोपड्यांतूनही स्वाभिमान यायला लागला हे काय कमी आहे गेंगाणेसाहेब. मरण खरं आमचं शिकवणाऱ्यांचं आहे. कसंही शिकवून पोट भरायचं!

जाधव म्हणाले, एक कॉन्फिडेन्शिअल गोष्ट सांगतो, परीक्षा सुरु व्हायच्या आदल्या दिवशी आम्ही चारपाच स्टुडंट लीडरना अटक केली. मी स्वतः होतो ऑपरेशनला.

पण काय कंडिशनमध्ये राहतात आपले हे ग्रॅज्यूएट विद्यार्थीसुद्धा! कुठेतरी गलिच्छ खोल्यांमध्ये ऱ्हातात, घरून बाजरीची पोती घेऊन येतात, हातानं स्वैंपाक करतात. बाथरूमसंडास तर सोडाच पण रॉकेलसाठीही रांगा लावाव्या लागतात ह्या पोरांना. कसा काय शिक्षणावर विश्वास बसणार सांगा.

चिपळूणकरला ह्या चर्चेत काहीच रस नव्हता आणि मुद्दा सोडून पुन्हा हे लोक

तात्त्विक बोलायला लागले म्हणून तो चिडून भल्लाला म्हणाला, पण सर, मी रिस्क घेऊन त्या गुंड पोरीला इथं आणलं तर तुम्ही सोडून द्यावं म्हणजे मी मधल्यामधे खलास झालो त्याचं काय?

गुंडेचा म्हणाले, बरोबर आहे भल्लासाहेब चिपळूणकरचं. गरीब पोरं बिचारी वर्षभर धडपडत असतात त्यांनासुद्धा ही सवलत का नये देऊ?

गेंगाणे आत्मविश्वासानं म्हणाले, अव्हो तिकडं फिजिक्सचा पेपर आठ दिवस आधीपासनं फुटला है त्याचं काय? वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालंय!

चिपळूणकर चिडून म्हणाला, गेंगाणेसाहेब, काय मी म्हणालो त्याचा न् याचा काय संबंध?

गेंगाणे गडबडून पुन्हा आत्मविश्वासानं म्हणाले, तसं नाही. प्रोफेसर, मी-मंजे आता तुम्हाला एक गोष्ट सांगतो. मंजे स्टोरी आहे-एकोनीसशे किती साल पाहा-तर इंटर नापास होऊन बेकार हुतो मी तेव्हा. तेव्हा आमच्या जत संस्थान-जत संस्थानचे बरं आम्ही-गेली मना ती संस्थानांची शान आता..हाँ, तर महाराजांच्या बागेत मला तीन महिने आमच्या-काय मनता तुमच्याकडे त्याला-आपल्या बायकोच्या बहिणीची बायको-हॅ हॅ हॅ-काय बोलतो हो मी! माफ करा जाधवसाहेब, मंजे त्याची बायको आन् आमची लक्ष्मी ह्या सख्ख्या बहिनी बहिनी व्हो...हाँ साडू! आमचा साडू मोठा पुढारी हुता जत संस्थाणातला-पुढारी म्हंजे जो नोकऱ्या लावून देतो तोच की व्हो!-तं आमच्या साडूनं महाराजाकडे शब्द टाकला म्हनून नौकरी मिळाली बागेत गेटकीपरची. तीबी दिली सोडूनं नंतर बी.ए.चं जुळलं त्यामुळे...हाँ, तर आमची ड्यूटी मंजी महाराजाच्या बागेतनं जानाऱ्यायेनाऱ्याची पूर्न तपासनी करून सोडायचं. काय द्राक्षी असायची जाधवसाहेब, पाटीलसाहेब! मातीच वेगळी पाहा आमच्या जतची...हाँ, तर पुडं पुडं इची लेक असं हुयाला लागलं की द्राक्षीच चोरायला लागले व्हो लोक! आपले लोक मंजी का खरे असतात व्हो? रस्त्यात बोलट दिसलं तरी कोनी पाहात नै ना आसं पाहूनी गुपचीप खिशात टाकतात इची लेक!...हाँ तर मला वॉर्निंग आली चिपळूनकरसाहेब. मंग मी ज्याला त्याला पूर्न तपासायलाच लागलू...अशात एक सांजला एक बाई गेट सोडून तिकडून लऽगऽबऽगऽ कुंपनाखालूनं जायला लागली बागेमधूनं परभारं! पुना झपाझपा, लुगड्याचा घोळ आवरत. ॲहॅ! मी गेटपर्यंत जाऊन वरडलूच, ओऽय, हिकडं ये ठैरो! बाई आली मंग गेटपाशी. मटलं काय असंल तुज्यापाशी तर कबूल व्हो. टाक! बाई मनाली, काय नाय बाबा, कामाला उशीर झालासा म्हून चालली व्हती मी तिकडूनी. मी मनलं, ते काही नाही, दाखीव, काय है तुज्याजवळ. पुना बाई ऐकंना. उलटं निसटायली. आरे त्याच्या! मंग मी आडवाच झालू मनलं, दाखीव! तशी बाई जे संतापून मनाली, काय बघायचं बघ भाड्या! अनि एकदम काष्टा फेडून लुगडंच हेऽ वरते केलं बाबा! हु हु हु हु! तवापास्नं आपन ठरीवलं की कोनाला दाखीव असं मनायचं नाही! हू हू हू! काय कॉप्या पकडता चिपळूनकरसाहेब पोरींच्या! हू हू हू हू!

सगळे जण, चिपळूणकरासकट खदाखदा हसले.

मग गेंगाणे म्हणाले, आता जाधवसाहेब मनले ते खोटं है का? थोडं तरी काही जनरल नॉलेज त्या प्रश्नपत्रिकेमधी है काय? सांगा. येक काईतरी कुनाच तरी क्रिटीकचं

वाक्य, आन् फुडं डॅश मारून डिस्कस! पाच मिनटामधी प्रश्न काढून होतील हे सगळे. छे! फुकटचा पैसा कमावतात आपले प्राध्यापकंबी.

जाधव म्हणाले, आमचे सर ह्या प्रकाराला डिस्कस थ्रो म्हणायचे!

ह्यावर प्रचंड हसत गेंगाणे खूष होत्साते ओरडले, च्या सांगा हो भल्लासायेब!

दुसऱ्या कॉलेजांमधी जॉइंट चीपची काय बडदास्त असते- मूरगी दारू...तुमाला च्यासुद्धा सांगावा लागतो मंजे काय? हॅ हॅ हॅ. किती जनरल नॉलेज वाढतं आहे! वा! डिस्कस थ्रो! हू हू हू हू!

गुंडेचा म्हणाले, मूरगी-दारू म्हणजे खंडेलवालच्या कॉलेजचं सांगताय काय तुम्ही गेंगाणेसाहेब! विद्यापीठात पत्रकं वाटलीयत पोरांनी परवा खंडेलवालच्या पराक्रमाबद्दल!

गेंगाणे खडबडून ताठ बसून म्हणाले, कोन? आपला प्रिन्सिपल गोविंददास खंडेलवाल? काय झालं? पत्रकं वाटली? बरं झालं च्या मारी मी. कुनी वाटली? काय है त्येच्यात?

गुंडेचा म्हणाले, वाचण्यासारखं आहे पत्रक ते. पोरं फार हुशार झाली आहेत मात्र! GOLDEN CHANCE असं हेडिंग छापून खाली खंडेलवालच्या कॉलेजात काय काय प्रकार चालतात ते कलमं घालून लिहिलं आहे. स्टाइल फार आवडली आपल्याला पत्रकातली.

भल्ला म्हणाला, मेरे नामपेभी आया था वो पॅम्फलेट. था इधर किधर.

भोळे म्हणाला, मला दाखवलं नाही ते भल्लासाब?

गुंडेचा डोळा मारून म्हणाले, भल्लासाबके जिगर दोस्त है वो! फिर? क्यों दिखायेंगे?

भल्ला घाबरून म्हणाला, नही यार. कुछबी बकवास मत करो.

गुंडेचा म्हणाले, तो खंडेलवाल हमेशा चेअरमन असतो. आणि मीटिंगला आला तरी खिशात नंबरांच्या चिठ्ठ्या घालून येतो तो. मार्क वाढवणं चैन म्हणून करतो तो. कसे काय असे लोक विद्यापीठात पावरफुल होऊन बसले म्हणजे आश्चर्य वाटतं.

गेंगाणे म्हणाले, पत्रकात काय काय है?

गुंडेचा म्हणाले, चार हजार रुपये भरा आणि खंडेलवालच्या कॉलेजात परीक्षेला बसा...असं पहिलं कलम आहे जाहिरातीसारखं! एक्स्पर्ट सुपरव्हिजनखाली कॉपी करण्याची सोय! परीक्षा सुरू व्हायच्या आधी दोन तास प्रश्नपत्रिका मिळतील! घरी पेपर घेऊन जावा आणि रात्री लिहून आणा! अशी पंधरा कलमं आहेत. आता ही सगळी अतिशयोक्ती असली तरी थोडंफार तरी होत असेल की हो!

गेंगाणे म्हणाले, कायबी अतिशुयोक्ती नाय! डिट्टो खरं है! मी व्हतो बाबा थितं दोन वर्सांपूर्वी-जाइंट चीप सुपरिंटेण म्हनून! आपल्याला तर बाबा कदी त्या खंडेलवालच्या गावाभाईर पडतो असं झालं व्हतं बाबा. हे पाहा चिपळूनकर-सायेब, तिकडे अशा परीक्षा हुतात हे आमी सोता पायलं है! आनि तुमी हितं कुटे बोटभर चिठ्ठी पोरीजवळ सापडली तर रिपोर्ट करा मनता राव! हा काय न्याय झाला का राव? सांगा!

गुंडेचा म्हणाले, जॉइंट चीफला धमक्या देऊन कुलूप लावून ठेवतात म्हणे. खरं का

गेंगाणेसाहेब-तुम्ही होता तिथे तेव्हा खरंखोटं तुम्हीच सांगू शकाल.

गेंगाणे म्हणाले, अव्हो, थितं बसमधनं उतरल्यापासनं एका प्यून मानसाला जे तुमच्या उरावरी बसीवतो ता खंडेलवाल ते परीक्षा संपेपरेंत! रात्री झोपायलासुद्धा बाजूच्या खाटेवरी तो! आता मी कदी दारू घेनार है का? पन मलाबी पाजिवली व्हो बळजबरी करू करू. हेऽ ओकलोच मी. अरंरंरंरंरं. बरं आपल्या फक्त सह्या घेतो घरच्या घरी! कॉलेजवर येयाचा तरास कशाला घेता साहेब-असं गोड बोलतो वरतूनं! मी एकदा गेलोच बुवा हिंमत धरूनं! काय वर्गावर्गातनं लेक्चररं सांगताहेत न् पोरं लिहून घेताहेत असं! एका वर्गात तर पोरंच नाही! मी विचारलं खाडेलवालला तर साला मवाली मनतो, पेपर घरी लिहून होताहेत, रात्री पॅक होतील! पाह्यलं मनला डोळ्यांनी? आत जावा!-मी आलू मुकाट्यानं खोलीवरी. खरा रिपोर्ट दिला तर मार खाल्ला मागे एकानं असं त्याचा प्यून मला सांगत बसला त्या रात्री. हॅत त्याच्या आयचा प्रिन्सिपल खंडेलवाल! मी इतकी कॉलेजं पाह्यली पन हे भयंकर हुतं बाबा. आपुन गरीब मानूस, चार पोरं मागे-पुना नको मानलं मी अशी आडगावची कॉलेजं बापा! पैशापायीच तर हे धंदे कराया लागतात मना, पन जरा मानानं मिळाला तर बरा पैसाबी.

गुंडेचा म्हणाले, काढताहेत म्हणे यंदा त्याला तिथून. इतके दिवस बापूरावांना मतं मिळवून घ्यायला म्हणून उपयोगी होता तो. आता बापूरावाला तिकिटच मिळणार नाही तेव्हा खंडेलवाल आपोआपच खलास होणार.

चिपळूणकर म्हणाला, पेपरमधे येत नाही का हे?

गुंडेचा म्हणाले, पन्नास वेळा आलंय खंडेलवालवर दैनिक समाजवाद मधे. पण ह्या वर्तमानपत्रांनी आधीच खोटं लिहून लिहून पत घालवली आहे. आता खरोखर जरी एखाद्या गुंडावर लिहिलं तरी लोक म्हणतात बामणाचा धंदाच आहे तो इतरांच्या कॉलेजांची बदनामी करायचा. ह्या जातीयतेमुळे बदमास लोकांचं फावतं बघा.

चिपळूणकर म्हणाला, आता आपले विद्यार्थीच आगी लावतील कॉलेजांना आणि युनिव्हर्सिट्यांना, तर हा प्रश्न सुटेल.

गुंडेचा म्हणाले, विद्यार्थी? काही दम नाही हे आपल्या विद्यार्थ्यांच्यात. खोटी उत्पन्नाची सर्टिफिकिटं आणून फी माफ करून घेणारे ऐंशी टक्के! बाकीचे नोकरी मिळावी म्हणून शिकणारे. असले विद्यार्थी का सुधारणार ही गटारं! सावलीतली कामं हवीत यांना. खुर्चीवर बसायची हौस ज्याला त्याला!

चिपळूणकर म्हणाला, अशा कॉलेजात भोळेसारख्यांना पाठवावं, मग सरळ होतो खंडेलवाल.

गुंडेचा म्हणाले, दुरून सगळं वाटतं. एकदा तिथे गेलं म्हणजे टेरर असते टेरर! आजपर्यंत कित्येक जाऊन आले आणि गप्पच बसले की! पैसा मिळाला विद्यापीठाकडून बस्स!

भोळे म्हणाला, टेरर! काय बिशाद आहे आपल्याला दम देईल कोणी. आणि काय करेल करून करून खंडेलवाल, खून करेल फार तर! पण त्याला धडा तर शिकवूच!

भल्ला म्हणाला, इधर बैठेबैठे काम करनाभी नही चाहते थे यार भोले तुम! तुम क्या समाजको ठीक करेंगे! हॅ हॅ हॅ! परीक्षाके पेपर जाँचनेको ना कहते तुम! तुम क्या करोगे

ऐसी कामे? आयव्हरी टावरमे रहनेवाले!

भोळे म्हणाला, तुमचंही बरोबर आहे भल्लासाब. प्रत्येक माणूस पक्का होईपर्यंत हे प्रश्न मिटणार नाहीत. आता भ्याड लोकांचीच संख्या वाढते आहे. एकानंच काय काय करावं सांगा!

जाधव म्हणाले, मास एज्युकेशनमुळे व्हायलं हे सगळं. क्वालिटी राह्यली नाही- दीडदीडशाचे वर्ग म्हणजे—

चिपळूणकर म्हणाला, वर्गात वीस मुलं बसवली काय न् दीडशे बसवली काय, तसा काही फारसा फरक पडणार नाही हो आजच्या शिक्षणाच्या क्वालिटीत! अशी शिक्षणपद्धती झाली आहे आजची! उद्या टॅक्स भरणारेच सरकारला म्हणतील की हा सगळा बट्ट्याबोळ आमच्या पैशांवर चालतो तो बंद करा, तरच हे थांबेल. किंवा ही ग्रॅज्युएट भुतंच सरकारच्या उरावर बसतील. नोकऱ्या द्या शिकवलं तर! तेव्हा काही करील भडवी सरकार!

जाधव म्हणाले, आमच्या वेळी नापास होणारे सरळ शेतीफितीला लागायचे. बापही रद्दी पोरांना शेतीवर लावायचे. आता एटीकेटी, ग्रेसमार्क न् सवलती म्हणजे जो मॅट्रिक झाला की तो सरळ एम्.ए.पर्यंत जातोच. शिक्षणासाठी काही किंमत द्यावी लागत नाही. आमच्या वेळी मॅट्रिकलासुद्धा बसायचं म्हणजे बैलगाडीनं जिल्ह्याच्या गावी कुठेतरी धर्मशाळेत आठ दिवस मुक्काम करावा लागायचा. आता सगळंच स्वस्त झालयं. सरकारच चांगलं मिळेना आपल्याला. नाहीतर असं पाह्यजे की अभ्यास करत नाही? चल धरणावर माती वहायला, चल रस्त्यावर खडी फोडायला! निव्वळ तरुण पोरांच्या मागे हे डिग्र्यांचं भूत लावून दिलंय पाहा सरकारनं. सरकारच चांगलं पाह्यजे.

चांगलं सरकार कुठून येणार हो. पोरांनीच नक्षलवादी व्हायला पाह्यजे आता.

जाधव म्हणाले, नक्षलवादी होणं काय ह्या मराठी पोरांना जमेल? आमच्या पोलिसांचं टॉर्चर सुरू झालं की साले लाथा झाडून नको नको म्हणणार हे! हे इकडे तिकडे दगडं मारणं न् काचा फोडणं ठीक आहे आपल्या पोरांना. हिंमत आहे का आपल्या पोरांची आयुष्य बरबाद करून घ्यायची? ह्या साल्यांना इस्तरीचे कपडे न् हिंदी सिनेमे न् खुर्चीतल्या नोकऱ्या पाह्यजेत कारकुनं व्हायला जन्मभर. शहरं पाह्यजेत, हुंडा पाह्यजे. ह्या आशेवर तर जगतात आपले तरुण लोक. भुक्कड साले.

भोळे म्हणाला, जाधव म्हणतात ते खरं आहे. आपल्या सगळ्या समाजात शहरी जीवनाचं इतकं प्रचंड आकर्षण निर्माण करून ठेवलं आहे की ते कधी कमी होणार नाही. इतके दिवस खेड्यातून लोंढेचे लोंढे शहरात घुसले आणि आता शहरं पॅक होऊन गेली. तरी हे लोंढे कमी झाले नाहीत. शहरात शिकायला येणाऱ्या ह्या झुंडी पुन्हा खेड्यात जायचं नाही ह्या तयारीनंच येतात. तिकडे दोर कापून आता शहरात वाव नाही म्हटल्यावर ह्या पोरांना शहराबद्दल विचित्र प्रेम आणि द्वेष वाटतो. शिकून खेड्यात परत जाणं ह्यांना आणि ह्यांच्या आईबापांनाही लांच्छनास्पद वाटतं. हल्ली तर शिकत असतांनाच पुढे बेकार होऊन परत गावी जावं लागणार ही शक्यता दिसू लागल्यामुळे ह्या गावझुंडी संतापून गेल्या आहेत. त्यामुळे जरा शहरात गडबड करायची संधी आली की हे लोक शहरात गोंधळ उडवून द्यायला तयारच असतात. खेड्यात कधी चळवळी

करत नाहीत ही पोरं!

गुंडेचा म्हणाले, तरी आपली पोरं फार सोशिक आहेत हो. कन्सेशनसाठी चार-चार तास उन्हात रांगा लावून उभे राहतात बसस्टेशनवर तिकिटाच्या खिडकीपाशी. एक ज्यादा खिडकी गर्दीच्या दिवसात का उघडू नये एस.टी. वाल्यांनी? तेवढा एक कारकून टेंपररी नेमावा, त्यालाही नोकरी मिळेल, लोकांचाही ताप वाचेल.

चिपळूणकर म्हणाला, कल्पनाशक्तीच नाही ह्या लोकांना आणि एकूण माणसंही इतकी झाली आहेत की माणसाला किंमतच राह्यली नाही. त्यामुळेच भ्रष्टाचारही वाढला आहे. जादा माणसांमुळे दारिद्रय वाढतं, मग भ्रष्टाचार आलाच.

गुंडेचा म्हणाले, भ्रष्टाचार काही लोकसंख्येमुळे आणि दारिद्र्यामुळे वाढला असं नाही हो. मंत्र्यांची पोरं पास करा म्हणून आपल्यावर दडपण येतंच की नाही? मंत्र्यांच्या पोरांना समजा नाही मिळाले ज्यादा मार्क तर काय बिघडेल त्यांचं? आपल्या रक्तातच भ्रष्टाचार आहे. घाणेरडी रेस आहे आपली.

जाधव म्हणाले, उलट ह्या वरच्या लोकांमुळेच भ्रष्टाचार वाढला असं म्हणेन मी. एखाद्या मंत्र्याचं, पंतप्रधानाचं पोरगं शिंप्याचं दुकान टाकून बसलं आहे असं दिसतं का तुम्हाला? एखाद्या प्रोफेसरचं किंवा डॉक्टरचं पोरगं प्राथमिक शिक्षक का होऊ नये? सगळ्या वर गेलेल्या लोकांना वाटतं की आपलं अपत्य आणखीन वरच्या पातळीवर राहावं. त्यामुळे भ्रष्टाचार वाढतो. नवा चातुर्वर्ण्य सुरू झालाय पहिल्यापेक्षा आणखी कठीण असा. जन्मानंच श्रेष्ठत्व मिळतंय हल्ली तर.

चांगदेव म्हणाला, मला स्वतःला ह्या बापाच्या वशिल्यानं क्लास वन मधे गेलेल्या गुलछबू पोरांपेक्षा ती रस्त्यावर उसाचा रस विकणारी, गाडी ढकलत ढकलत नेणारी फाटक्या कपड्यातली गरीब मुसलमानांची पोरं ग्रेट वाटतात. ह्यांच्यात जास्त डिग्रिटी आहे आपल्या बुद्धिजीवी प्राण्यांपेक्षा.

चिपळूणकर म्हणाला, त्याच्यात काय डिग्रिटी असणार? उलट हा गलिच्छ क्लास नाहीसा झाला पाह्यजे. ज्याला त्याला किमान स्वाभिमान असलेली राहणी मिळायला पाह्यजे. म्हणजे तुम्ही पुन्हा जुना ब्राम्हनिझम टिकवणार. खराटा चालवणारा, चामडं शिवणारा माणूस शूद्रच राहणार आणि हे नवे ब्राम्हण वरतीच राहणार. ह्या वरच्या लोकांना थेट फिजिकली खाली ओढलं पाह्यजे.

भोळे म्हणाला, त्याला फार कठोर व्हायला पाहिजे—

गुंडेचा म्हणाले, अहो पण अपत्यप्रेम ज्याला त्याला असणारच की. आपल्याच मुलांसाठी लांड्यालबड्या करणं हा नैसर्गिक भाव आहे. चिपळूणकरचं पोरगं जर पुढे बी.ए.ला बसलं समजा आणि तुमच्याकडे त्याचे पेपर आले समजा आणि चिपळूणकर तुम्हाला जरा बघा बरं पोराकडे असं म्हणाले समजा, तर तुम्ही काय करणार? सांगा!

भल्लाही म्हणाला, वी लिव्ह इन सच ए सोसायटी प्रोफेसरसाब कि तुम्हारे बच्चे भूखे मरेंगे-कोई पूछेंगा नही. उधर इंग्लंड फ्रान्समे ठीक है कि तुम्हारा पैर टूट गया तो सरकार तुम्हे पेन्शन देगी. ऐसे देशोमें एक्झिस्टेंशिआलिजम वगैरा सब चलता! इधर क्या है?

भोळे म्हणाला, पण आपल्या शहरी नोकऱ्या करणारांचं आयुष्य पाहवत नाही हो.

काय ह्या खेडुतांना सकाळी धडपडत स्वच्छ कपडे घालून नोकरीवर जायची हौस! काय ह्या खेड्यातल्या दांडग्या निरोगी पोरी नोकरीवाल्याशी लग्न करून शहरात पिवळ्या होत जगत राहतात. त्यापेक्षा खेड्यातले दोन बिघे जमिनीवर राबणारे नवराबायको जास्त मानानं राहतात. हे तत्त्वज्ञान आम्हाला चांगदेव पाटलानं शिकवलं. हे आमचे गुरू आहेत असल्या बाबतीत.

तिकडे गेंगाणे चांगदेवच्या कानात वाकून म्हणाले, आमच्या आईला आम्ही लहानपणी केव्हा केव्हा म्हनू की आये, काय रोजरोज शेतात जातीस? तर आमची आई डाफरून म्हनू, बामनांच्या बायकांवानी दिवसभर घरात फोद्याला वारा घालत बसू का आमी कुनबी पन काट्टयांनो!...हल्ली हे असं वारा घालायसाटीच सगळ्यांची धडपड चाललीय मना की! द्या टाळी.

गुंडेचा म्हणाले, ह्यालाच ब्राम्हनायझेशन म्हणतात!

भोळे म्हणाला, काय लाट येते पाहा की सगळेच तिच्यात सापडतात. ज्याला त्याला पांढरी कॉलर पाह्यजे. ही लाट पलटवली पाह्यजे केव्हा तरी. शहरी नवरे, शहरी जावू—

चिपळूणकर म्हणाला, सुरुवातीला हे स्थलांतर रोमँटिक असतं. नंतर यांची पोरंही जेव्हा शहरातच राहू म्हणतील, तेव्हा तुमच्या अपत्यप्रेमाच्या सिद्धान्ताप्रमाणे हेच बाप आपल्या पोरांच्या सुखासाठी त्यांना आणखी वरच्या नोकऱ्या मिळवून देण्यासाठी काहीही करायला कचरत नाहीत. वशिले, लाचलुचपत, देणग्या, भ्रष्टाचार-काहीही. ही वरचे जॉब मिळवायची शर्यत संपणार कुठे? फार अस्वस्थ करणारी बाब आहे—

भोळे म्हणाला, आता मुद्यावर आलास. त्याची काळजी करू नकोस. राजकारणातले लोक ह्याला बरोबर तोडगा काढतात. ऐनवेळी घटिकायंत्र उलटं करून टाकण्याची ताकद त्याच लोकांमधे असते. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही-हा एक मोठा महत्त्वाचा सिद्धान्त वाटतो मला.

एकदा दुपारचा पेपर सुरू करून एक फेरी मारून यावी म्हणून रोजच्याप्रमाणे चांगदेव जिना उतरून येत होता. जिन्याच्या भिंतीला टेकून सावलीत एक पोलिस त्याचा दंडुका फरशीवर दोन्ही तळहातांनी हुबेहूब लाटण्यासारखा पुढेमागे फिरवत होता! अगदी बायकोसारखं मान तिरपी करून उभा आडवा तिरपा दंडुका फिरवून पोळी केल्यासारखं. पोलिस ह्या पोळी लाटण्याच्या क्रियेत इतका तल्लीन होऊन गेला होता की चांगदेव तिथे उभा असल्याचंही त्याला भान नव्हतं. पोलिस अगदी तरुण, मर्द, रुबाबदार मिशांचा होता, आणि त्याची कोनेदार टोपी त्याच्या बायकी अभिनयाला मजेदार दिसत होती.

तिथून हळूच पाय न वाजवता चांगदेव पुन्हा जिना उतरून ऑफिसात आला.

ऑफिसात भल्लाच्या टेबलासमोर एक कोट, टोपी, धोतर असे केस पिकलेले वयस्क गृहस्थ अदबीनं उभे होते. चांगदेव आल्यावर त्यानं चांगदेवलाही दोन्ही हात जोडून नमस्कार केला. भल्ला चांगदेवला म्हणाला, ये भाईसाब शिल्पकार है. देखिये

जरा क्या कहना चाहते है यें. मै जरा ये पेपर गिन रहा हू. ये साला भोले मुझे कामसे मार डालेगा. हॅऽ

चांगदेव त्या गृहस्थांना बसा म्हणाला. ते चेहऱ्यावर लाचारी, आशा दाखवत मागे सरकत बसले. हे गृहस्थ पुतळे करायचं काहीतरी काम कॉलेजनं द्यावं अशी विनंती करायला मुद्दाम आले होते. हातात कपड्यांची मोठी पिशवी, टायरच्या चपला, पायांवर धूळ.

सगळ्यांकडे आळीपाळीनं पाहात नम्रपणे आपलं एकेक वाक्य सगळ्यांना नम्र वाटेल असं बोलत हे शिल्पकार म्हणाले, मी फार चांगले पुतळे करतो साहेब. आता स्वत:बद्दल कसं सांगणार...अगदी हुबेहूब-गांधी, सुभाष, आंबेडकर, सरस्वती-काहीही.

भल्ला मधेच विनोदी हसत म्हणाला, मेरा स्टॅच्यू बनाओगे? हॅ हॅ हॅ.

भल्लाचा चांगदेवला अत्यंत संताप आला. तो शांतपणे शिल्पकाराला म्हणाला, कशाचे पुतळे बनवता तुम्ही?

पाषाण कोरतो साहेब मी स्वतः. धुळ्याला लक्ष्मीबाई झाशीवालीचा अश्वारूढ पुतळा माझाच आहे. किंवा तुम्ही कधी इंदूरला गेला असाल... तर तिथे खुटाळ चौकात सुभाषचंद्रचा पुतळा...मी केला आहे तोसुद्धा, ब्रॉन्झमधे!

जाधव, गेंगाणे दोघेही म्हणाले, आपण. पाह्यली नाही बुवा ही गावं.

शाळा, कॉलेज मदत करतील तरच काही काम होईल साहेब. मी फार उत्कृष्ट पुतळे करतो. पाहा काही ऑर्डर देता आली तर-गांधी, नेहरू, पटेल कोणीही!

भल्ला विनोदानं म्हणाला, हम किसका स्टॅच्यू बनायेंगे पाटीलसाब? तुम्हारा बनायेंगे? हॉ हॉ हॉ.

आता भोळेही भल्लावर चिडून शिल्पकाराला म्हणाला, अहो, इथे प्रिन्सिपलच्या हातात काही नसतं. साधी डिंकाची बाटली घ्यायची तर माठूभाईची परवानगी लागते! माठूरामकडे जायला हवं होतं तुम्ही. पण त्यांनाही तुमची कला आवडेल असं नाही.

मग भल्ला गप्प बसला. जाधव म्हणाले, पण का हो, तुम्ही कसे पुतळे करता हे कसं कळणार आम्हाला...कशावरून ठरवणार?

शिल्पकार गृहस्थ काय बोलावं ह्या विचारात असतानाच चांगदेव म्हणाला, म्हणजे मेडिकल रिप्रेझेंटेटिवसारखं किंवा पापड विकणाऱ्यांसारखं मोठमोठे अवजड पुतळे घेऊन फिरावं काय यांनी? कमाल करता जाधव तुम्हीही!

जाधव ही अडचण लक्षात आल्याबरोबर म्हणाले, नाही नाही, मला खरोखरच इंटरेस्ट आहे. नगराध्यक्ष आमचे मित्र आहेत. ते एकदा म्हणाले होते शिवाजीचा पुतळा बसवावा म्हणून. चौकाचौकात शोभा म्हणून काही ठेवावं असं ते पुणं पाहून आल्यावर म्हणाले होते...

शिल्पकार हात जोडून म्हणाला, सांगा साहेब त्यांना! आजपर्यंत मी शंभराच्यावर पुतळे केले आहेत. पण अलीकडे-कुठे हिंडावं आमच्यासारख्यांनी स्वतःची स्तुती करत? पुतळ्यांची शोभा तरी कशी वर्णन करावी कोणापाशी? तशी मला पोट भरायची काळजी नाही. माझा मुलगा आता नोकरीला लागला आहे, पण हातात कला आहे पूर्वीपासूनची. म्हटलं जरा फिरून पाहावं कोणी मनाजोगत काम देईल तर!

चांगदेवला त्याचा अजीजीचा सूर आवडला नाही. पण तो पोटभरू कलाकार नसावा असं निश्चित वाटत होतं. एरवी शिल्पकला मरू घातलेलीच आहे तेव्हा जातिवंत कलाकारालाही असे दिवस येणं काही अनैसर्गिक नाही. कित्येक कला मेल्या, तेव्हा शिल्पकलेचं काही विशेष नाही. हल्ली प्रचंड जनसमुदायाला रिझवणाऱ्या कलांचे दिवस आहेत तेव्हा अशा कलाकाराला कोण विचारणार? मग जास्त उत्सुकता म्हणून भोळे शिल्पकाराला म्हणाला, तुम्ही फक्त पुतळेच करता का?

शिल्पकार गृहस्थ आश्चर्यानं भोळेकडे पाहात म्हणाला, दुसरं काय मागतात लोक सांगा! शंकराच्या पिंडी आणि नंदी दरसाल! फार झालं तर हनुमान न् विठ्ठलरुकमाई करायचा चान्स येणार, तेबी मोठी बाब वाटते. राजेमहाराजे गेले, नबाबबी गेले. आता कोण बोलावतं आम्हाला? आंबेडकर एक कदर करणारा माणूस होता. त्यांनी त्यांच्या मिलिंद कॉलेजसाठी माझ्याकडून न्यूटनपासून अशोकापर्यंत सगळ्यांचे पुतळे करून घेतले. ती दोनअडीच वर्षं माझी कधी भुलणार नाही अशी गेली साहेब. नंतर कोणी तसा माणूस मला भेटला नाही. आता ह्या शंकराच्या पिंडी न् नंदी कोरणं आलं नशिबी? आणि हात चालू नाय राह्यला तर काय सुदारणा होणार साहेब? सांगा.

जाधवनी शिल्पकाराला पत्ता दिला आणि आज संध्याकाळी या, आपण जाऊ असं सांगितलं. मग शिल्पकार गृहस्थ सगळ्यांना हात जोडून निघाले.

जाधव म्हणाले, खरंच अशा कलावंतांना स्कोपच राह्यला नाही की हो. अजिंठा वेरूळ करणारे, मुसलमान आल्यानंतर कुठे गायब झाले का पाटेवरवंटे करायला लागले कुणास ठाऊक. आपल्या देशात काही नीट उंच वाढतच नाही. आता एखाद्यानं अशा कलेवर जगायचं म्हणजे तो मरायचाच हल्ली.

भोळे म्हणाला, हल्ली दोन धंदे ठेवावे अशांनी. एक चालू धंदा आणि घरात खरा नाद असेल तो.

चांगदेव म्हणाला, किंवा वास्तुकलेसारख्या कला व्हाव्या सगळ्याच-की त्या निव्वळ उपयोगीच असाव्या सगळ्या. सगळ्या बाया वेश्या झाल्यावर पातिव्रत्याची कल्पनाच खोटी ठरते तसं.

सगळे हसले, पण नेमके नेहमी हसणारे गेंगाणे एकदम गंभीर होऊन अत्यंत दुखऱ्या सुरात म्हणाले, नाशिकजवळची वणीची देवी पाहिली है तुमी कुनी? काय प्रचंड मूर्ती है. रौद्र गंभीर करून वत्सल सगळे भाव देवीच्या चेहऱ्यावर नुस्ते थरकत असतात. बिचाऱ्या कोन्या अज्ञात रानटी कलाकारानं प्राचीन काळात करून ठेवली असंल? पंढरीचा विठोबा तुमी कोनी पाह्यलाय? कमाल है तुमा सगळ्यांची? किंवा तुळजापूरची भवानी? नाही? तुमचं आयुष्य व्यर्थ है! लाखो लोक ज्या थोर कला पाहायला दरवर्षी जात्यात, त्या तुमी शिकलेले लोक पाहात नाही! छेऽ कायतरी बिघडलं है आपल्या समाजात. नजर उचलवत नाही अशा मूर्ती आहेत व्हो!

त्या दिवशी संध्याकाळी परीक्षा संपली. गेंगाणे आणि जाधव चांगदेव, भोळे भल्ला

यांना छातीशी छाती लावून भेटले. जाधव म्हणाले, कसा छान गेला पहा एक महिना. तुमचं शिक्षणक्षेत्र काही म्हणा वरचंच आहे. उद्यापासून आता आमचं पोलीसखातं.

गेंगाणे म्हणेल, खरचं, ह्या सगळ्यांनी किती कल्चरल वाटत होतं हो इथे. जनरल नॉलेज म्हणजे किती. असं वातावरण नस्तं हो कुठे. भल्लासाहेब, तुमच्या स्टाफबद्दल आमच्या मनात आदर निर्माण झाला. नमस्कार भोळेसाहेब. नमस्कार पाटीलसाहेब, ओळख ठेवा.

नंतर ते दोघे गेले. भल्ला, भोळे आणि चांगदेव परीक्षेचे सगळे फॉर्म्स, उरलेली स्टेशनरी, हिशेब असं सगळं रात्री बारापर्यंत करत बसले. मग संपलं एकदाचं म्हणून उरावरचा धोंडा निघाल्यासारखे ते दोघे घरी आले.

त्यानंतर भोळे सुटीभर लेखनवाचनात बुडून गेला. त्यानं पुन्हा बायकोला माहेरी पाठवून दिलं.

चांगदेवनं सुरुवातीचा महिनाभर वाचायची काढून ठेवलेली पुस्तकं रात्रंदिवस वाचून काढली. मग चांगली पुस्तकं संपली तेव्हा तो शहारून उठला. लांब तापलेले उन्हाळ्याचे दिवस आणि अंगावर कोसळणारा एकटेपणा. त्यानंतर त्यानं पुन्हा रात्रीबेरात्री गावाबाहेर हिंडणं सुरू केलं. तो आपला हात उलटासुलटा करून पाहात म्हणायचा, हे हात आहेत तसे किती हिंस्त्र दिसतात. काहीतरी कला निर्माण करणं सोडलं तर खुनशी गोष्टींसाठीच यांचा उपयोग होऊ शकतो. हात रिकामे ठेवणं बरोबर नाही.

एकदा भोळे त्याला म्हणाला, तू कायम हात उलटासुलटा करून पाहात बसतोस. त्यापेक्षा हे कुत्रं आपल्याकडे ताप देत असतं त्याचं कर काही तरी. ते आता नक्की पिसाळलंय. काल भांडीवालीला चावलं. याचा निकाल लावलाच पाहिजे मालक. म्युनसिपालटीवाले साले हरामखोर आहेत. आपल्या देशात नागरिकांनीच टॅक्स भरावा, नागरिकांनीच प्रश्न सोडवावेत. सरकार नागरिकांचं काही देणं लागत नाही.

चांगदेव वैतागून म्हणाला, नागरिकांचे सगळेच प्रश्न सोडवणारं सरकार नागरिकांवरच पकड घट्ट करील ते ह्या देशातल्या नागरिकांना चालेल काय?

भोळे म्हणाला, तू हा कुत्र्याचा प्रश्न कसा सोडवतोस हे आधी सांग. कुत्र्यानं चावलेला माणूस मरतांना तू पाह्यला नसशील. भयंकर—

चांगदेव म्हणाला, मला कधी ह्या कुत्र्याचा त्रास होत नाही. उलट मी आलो केव्हाही बाहेरून की ते शेपटी हालवून दूर पळतं. दुसऱ्या कोणाला चावेल त्याचं त्यानं काय ते करावं. दुसऱ्याचाही विचार आपणच करावा, सगळ्यांचे प्रश्न सरकारनंच सोडवावे असं तुम्ही ठरवलं भोळेसाहेब तर तुम्हाला नीट जगताच येणार नाही. पोफळे कधी आपला विचार करतो? अन्नमंत्री कधी भूकबळींचा विचार करतो? इथे समाज नावाची गोष्टच अस्तित्वात नाही. आपापली तुंबडी भरण्याकरता समाज उभारलेला हा देश आहे. तुम्ही कुठवर ह्या समाजासाठी कष्ट सोसणार?

हा तुझा हिंदू विचार पुरे झाला. हे वर्तुळ आपणच तोडलं पाह्यजे. तू ह्या कुत्र्याचा प्रश्न मिटवून दाखव. बाकी चर्चा नको.

मला त्यात इंटरेस्ट नाही.

उद्या माझ्या मुलालाच ते चावलं तर? मी म्हणतो म्हणून मला मदत कर. मला एकट्याला हा विष घालण्याचा कार्यक्रम पार पाडणं कसंतरीच वाटतं. इथेच मारलं तर पुन्हा दुर्गंधी. लांब जावं लागेल च्यायला. मग?

चांगदेव आपला हात उलटासुलटा पाहात पंजा विस्तारून नाइलाजानं म्हणाला, ठीक आहे. चला. काय करू या?

भोळे म्हणाला, तू फार उमदा माणूस आहेस. तर मी गावातून विष घेऊन येतो. तू तुझ्या ह्या लाडक्या कुत्र्याला बाहेर काढ. गावाबाहेर नेऊन मारू. केकही घे बरोबर.

ठीक आहे. तू परभारे नाक्यावर ये. मी इकडून कुत्र्याला घेऊन येतो. नीघ. केकमधे विष नीट घालता येईल. मग तू ह्या कुत्र्याला म्हण की पाव मिळत नसेल तर केक खा.

मग भोळेनं गावात सायकल पिटाळली. तोपर्यंत चांगदेव कपडे घालून तयार झाला. ते कुत्रं नेहमीप्रमाणेच खिडकीतून दिसत होतं. चांगदेव त्याला नेहमी उरलेला पाव टाकून द्यायचा. आता ते पुढच्या लांब पायांवर सडकं तोंड हेलकावत हॅ हॅ करत लाळ गाळत बसलेलं होतं. उन्हानं आणि त्या कुत्र्याच्या तशा बसण्यानं चांगदेवचं डोकं क्षुब्ध झालं. तो मोठ्यानं म्हणाला, चल, आज काही झालं तरी तुला संपवून टाकू. रोजचा दिवस सारखाच असतो, जगतोस तरी कशाला बेट्या?

कुत्र्यानं वर मिचमिच्या डोळ्यांनी पाहून त्याला साथ दिली. गोचीडांना चावतांना स्वतःच जखमी केलेली लाल शेपटी दुखरेपणानं हलवली.

मग सायकल काढून तशा आगीसारख्या उन्हात चांगदेव बाहेर आला. काखेतला केक कुत्र्याला दाखवत तो म्हणाला, चल, उठ.

कुत्रं अंग हलवून केककडे पाहात उठलं आणि त्याच्या जवळ आलं. मग थोडासा तुकडा त्याला टाकून उरलेला केक त्यानं हातातच ठेवला. कुत्र्यानं जमिनीवरचा तुकडा मातीसकट जिभेनं उचलून गिळला आणि ते वेगानं अवजड दुखरी शेपटी हलवू लागलं. मग चांगदेवनं केक एका हातात ठेवून सायकल सुरू केली. केकच्या आशेनं कुत्रं जमेल तितक्या शक्तीनं त्याच्या मागून धावायला लागलं. मधेच ते जमीन हुंगून खाकरून पुन्हा सायकलकडे पळत यायचं. कुठेकुठे मुतायचं. नंतर मुतणं कमी झालं. ते फार मागे राह्यलं की चांगदेव पाय टेकवून उन्हाची तिरीप सोसत मागे पाहात ओरडायचा,लिवलिव, चऽल, पळ.

की कुत्रं शक्ती नसून धावत राहायचं. असं नाक्यापर्यंत चाललं. नाक्यावर हातातला केक खिशात टाकून चांगदेव एक पाय टेकवून सायकलवरच थांबला. कुत्रंही अदबीनं विश्वासानं आशाळभूत पाहात बाजूला बसलं. थोड्या वेळान भोळे आला. मग काही न बोलता ते दोघे सायकली मारत रस्त्याला लागले. कुत्रंही हळूहळू त्यांच्या मागे येत राह्यलं. कदाचित आता ते केक विसरूनही गेलं असावं. निव्वळ आपल्या एका हितचिंतकामागोमाग विश्वासानं जाणं एवढाच विचार त्याच्या डोक्यात असावा.

शहराची हद्द संपून रेल्वेचे रूळ लागले, त्यानंतर फॅक्टऱ्यांच्या रांगांमधून ते दोघे बाहेर आले. दोघे जण उन्हाच्या झळी तोंडावर घेत पुढे आणि मागे चाऱ्ही पाय घासत घासत येणारा धुळीचा एक ढग. वीतभर जीभ लांब करून ते पळायची कोशीस करत होतं. पण दमून ते कोलमडेल असं चिन्ह दिसत नव्हतं. चार पायांमुळे प्राण्यांना फारच

आत्मविश्वास असतो.
पुढे एक पायवाट लागली. आसपास बाभळीची झाडं. एका बाजूला फॅक्टऱ्यांतल्या लोकांसाठी झोपडंवजा हाटेल. त्यातला माणूस बाकावर झोपी गेला होता. बाकी सर्वत्र सुन्न. उन्हाशिवाय काही नाही.
भोळे म्हणाला, पुरे की मालक आता. असंच तुम्ही काशीपर्यंत नेताय काय कुत्रं मारायला?
चांगदेव म्हणाला, ह्याला मारत बसण्यापेक्षा ते समोर खेडं दिसतंय तिथे सोडून येऊ कसं?
भोळे वैतागून थांबला. त्याला हे पसंत नव्हतं. चांगदेव म्हणाला, तू इथे ह्या हाटेलात थांब. मी बरोबर करतो सगळं.
भोळे संतापूनच झोपड्याकडे वळला. चांगदेव सरळ पुढे निघाला. कुत्रंही त्याच्या मागोमाग गेलं. असे ते दिसेनासे झाले. भोळे दातात काडी घालत हाटेलच्या बाकड्यावर बसून राह्यला. अर्धा पाऊण तास झाला असेल, भोळे मधूनमधून त्या पायवाटेकडे डोळे लावून दातात कडी फिरवत राह्यला. मग लांबवर भलतीकडून चांगदेव शेतातूनच सायकल पायीच पळवत येतांना दिसला. धडपडत तो सायकलीसकट पायवाटेला लागला आणि घामाघूम होऊन धापा टाकत भोळे बसला होता तिथे आला.
भोळे वैतागून म्हणाला, तुला धाप लागेपर्यंत काही करायचं नाही म्हणून सांगितलंय बाबा डॉक्टरांनी च्यायला.
चांगदेव दम घेत घेत म्हणाला, सोडून आलो साल्याला. तिथल्या कुत्र्यांनी घेरलं त्याला आणि मी वेड्यावाकड्या गल्ल्यांनी पार तिकडून उकिरड्यांमधून असा निसटून आलो. बरं झालं, तडफडाट करून मारण्यापेक्षा—
म्हणजे इथल्या लोकांना चावायला सोडून आलास तू ते कुत्रं. एकूण उपयोग काय?
जरा वेळानं भोळे पायवाटेकडे संशयास्पद पाहात उठून म्हणाला!, पहा! ये इकडे. पहा. आलं ते परत!
चांगदेवनं पाह्यलं. कुत्रं पुन्हा संथ गतीनं उन्हातून रस्ता काटत बरोबर परत येत होतं. भुतासारखं दिसत होतं. मग ठरल्यासारखं ते तिथेच येऊन धापा टाकत चांगदेवकडे नजर लावत समाधानानं बसून राह्यलं.
भोळे म्हणाला, काढ तो केक. तुला जमणार नाही ते.
मग चांगदेवकडचा केक घेऊन आत जाऊन खिशातली पुडी सोडून त्यानं गुपचूप केकमधे विष भरलं. मग बाहेर येऊन केक कुत्र्यापुढे ठेवत तो म्हणाला, बघ आता.
कुत्र्यानं दमलेली कंबर कष्टानं उचलून केकपर्यंत तोंड पुरवलं. थोडं हुंगून मग सरळ तोंडावर संशय दाखवत ते जीभही न लावता परत जागेवर जाऊन लांब जीभ काढून चांगदेवकडे पाहात बसलं. आता मात्र भोळे पूर्ण खलास झाला. म्हणाला, केक नीट बंद करून बाहेर एक कण लागणार नाही असं विष भरलंय. पण पहा काय बुद्धी असते प्राण्यांना. चांगदेवराव तूच टाक बाबा. तुझ्याच हातचं खाईल ते. ऊठ.
चांगदेव म्हणाला, असं मी त्याला फसवणं माणुसकीला धरून होणार नाही. त्याचा

विश्वासघात करणं बरोबर नाही.

मग काय? चलायचं ह्याला घेऊन घरी?

मारायचंच न ह्याला? बघ आता. आता आपण माणूसच म्हटल्यावर काहीही क्रूर करू शकतो. हा आपला हातच बघ की. इकडून हा तळहात जरा रेषांनी अद्भुत तरी दिसतो. पण मागून पाहा किती हिंस्त्र वाटतो. माणसाच्या हिंस्त्रतेचं हे चिन्हच आहे. हा आपल्या मानवजातीचा इतिहासच आहे. पंजा. क्रौर्य.

असं म्हणत तो हात उलटासुलटा पाहात उठला. मग एकाएकी बाजूला पडलेलं एक लाकूड घेऊन ते दोन्ही हातात नीट तोलत तो कुत्र्याकडे आला. ते आता दमछाक झाल्यानं ग्लानीत पडलं होतं. डोळे मिटून घेतले होते. त्याला लाकूड घेऊन येतांना पाहाताच ते खडबडून उठलं आणि दोन पावलं मागे सरकलं. मग संतापून दात खात त्यानं लाकूड डोक्यावरून फिरवून कुत्र्याच्या पाठीवर हाणलं. पहिल्या रपाट्यात कुत्रं भयंकर घोगरा आवाज काढून गिरक्या घेत पळत सुटलं. मग दुसऱ्या रपाट्यात ते स्वतःभोवती गिरक्या घेत राहिलं आणि कोलमडलं. तोंडातून फेस. मग त्यानं जवळचा एक प्रचंड दगड उचलून त्याच्या डोक्यात घातला. हातपाय झटकत कुत्रं लोळलं आणि एक मिनटात डोळे उघडे ठेवून शांत झालं. मग तिथे थुंकून तो परत फिरला आणि भोळेला हक्कानं म्हणाला, झालं?

भोळे चकित होऊन उभा होता, तो त्याचे पाय धरून म्हणाला, मानलं बाबा तुला. तू माझा गुरूच आहेस. भयंकर आहेस. चांगदेवो गुरुमाउली.

ह्या विचित्र गोंधळानं इतका वेळ उठून बसलेला हाटेल चालवणारा माणूस म्हणाला, वा! काय जोरात लंबं केलं व्हो! ह्येला म्हंते मानूस! चाहा करू का?

भोळे थुंकत म्हणाला, चहा? छे छे आता दोन दिवस जेवण जाणार नाही. आता चहा कसला घेणार? मला तर ओकारीच येते आहे. मळमळतंय्.

चांगदेव जोरजोरात श्वास घेत म्हणाला, कशामुळे खावंप्यावंसं वाटत नाही? काय वैज्ञानिक संबंध ह्याच्या मरायच्या आणि तुझ्या खाण्याचा?

भोळे शरण गेल्यासारखा म्हणाला, काहीतरी संबंध आहे गुरुमहाराज!

बाबा रे, जगाशी जीव इतका निगडित झालेला असतो की हा संबंध हिंसेनं नाहीसा करणं नीचपणाचं असतं. हे तुला जाणवलं म्हणून तुझ्या जीवानंही तुझ्याशी युद्ध पुकारलं. आता हा प्रकार पूर्ण विसरून जाईपर्यंत तुझा जीव आणि तुझं शरीर यांच्यात शत्रुत्व राहील.

मग ते दोघे ऊन चिरत सायकलींवरून परत आले. आल्याआल्या भोळे प्रचंड ओकत राहिला. दोन दिवस त्याला जेवण गेलं नाही. चांगदेव एरवीच सुटीत दोदोन दिवस जेवत नव्हता. जेवण बंद केल्यानं बरचं अध्यात्मिक वाटतं असं तो म्हणायचा.

तशात गावात एकाएकी भयंकर दंगा सुरू झाला. इतक्यात भयंकर उन्हानं सगळ्यांचीच डोकी सणकतात. मग नेहमीप्रमाणे दंगे.

त्या दिवशी एकाएकी दुपारी सगळीकडे धावाधाव ऐकायला आली. रस्त्यावरून भरधाव मोटारी, रिक्षा पळत होत्या. पोफळे बंगल्यातले सगळेजण गलबलाट करून उठले आणि धडाधडा दारं वाजली. पोफळ्यांनी बाहेरच्या दाराला कुलूप लावून टाकलं. एक गृहस्थ तशात दारावरून उडी टाकून आत आसरा मागायला लागला. गावात मुसलमान मोहल्ल्यात अचानक भोसकाभोसकी सुरू झाल्याचं तो सांगत होता. पोफळ्यांनी आतलं दार उघडून संशयानंच त्याला आत घेतलं. सगळे जण वर गच्चीवर घाबरत गेले. तो गृहस्थ गावातल्या एका वस्तीकडे बोट दाखवून म्हणाला, तिकडे सगळ्या झुंडी जमा झाल्यायत. एका मुसलमानानं गाय कापली. मुसलमान गुंड घरात घुसून घुसून हिंदूंना मारताहेत. कयामत की रात!

जरा वेळानं त्या वस्तीतून धुराचे लोट वर यायला लागले. तो गृहस्थ म्हणाला, मुसलमान वस्ती पेटली. ती कापडदुकानांची रांगच पेटतेय वाटतं. शाब्बास! असंच पाह्यजे देशद्रोह्यांना.

पोफळे गच्चीवर येत म्हणाले, पोलिसचौक्या सगळ्या एन्गेज्ड, कुठेही फोन लागत नाहीय्. आपलं घर हे असं एकटं बाजूला. बाजूच्या वस्तीतून लोक आले तर आपले पाच मिनटात मुडदे पडतील.

पोफळेबाई डोळ्याला पदर लावून खाली जात म्हणाली, तुला एक लक्ष बेल वाहीन देवा, आम्हाला वाचव. शुभा, देव पाण्यात घाल ग बाई. परमेश्वरा!

गावातून गलबलाट ऐकायला येत होता. मग अंधार पडत चालला तशा आणखी ठिकठिकाणी आगी लागल्या. सगळ्यांचा थरकाप उडाला. गावातून बंदुकीच्या फैरी ऐकायला येत होत्या. मधूनच पोलिसांच्या गाड्या भरधाव निघून जायच्या. बाकी लांबून ऐकायला येणारा कोलाहल. बंगल्यात कोणीही दिवा लावला नाही. पोफळ्यांनी बंगल्याची सर्व दारं आतून लावून कुलपं घालून सगळ्यांना काठ्या, विळ्या, चाकू घेऊन आपल्याकडेच बसायला या म्हणून सांगितलं. त्यांनी नेहमीच्या जातीय गप्पा सुरू केल्या. चांगदेवला त्यात आता काहीही रस वाटत नव्हता. सगळं नेहमीसारखंच. रात्रभर कोणी झोपलं नाही. नुस्तं वाऱ्यानं काही वाजलं की सगळे घाबरून उठायचे.

नंतर नेहमीच्या शुष्क खोट्या चर्चा. मेलेल्यांच्या हकीकती. खोट्या बातम्या. अशुभ वातावरण. त्यानंतर आठ दिवस कायम कर्फ्यू होता. हाटेलं, खाणावळी बेमुदत बंद. दूधवाला बंद. घरात खाण्यापिण्याचं सगळं संपलेलं. गहू, ज्वारी उकडून घुगऱ्या करुण खाणं चाललं. भोळेनं आग्रहच केला तर चांगदेव थोडंसं खायचा. बाकी कडकडीत उपवास. नंतर थोडा थोडा कर्फ्यू उठला, पण फक्त जेवायला बाहेर जायचं टाळून चांगदेव घरातच क्षुब्ध पडून रहायचा. हळूहळू गावात सगळं ठिकठाक झालं.

नंतर दिवसेंदिवस उन्हाळा वाढत गेला तसतसा चांगदेव ज्यास्तज्यास्त अस्वस्थ होत गेला. पुन्हा त्या स्तब्ध लोखंडी दुपारी भडकून उठल्या. वस्तूंचे अर्थ सुटू लागले. एकटेपणामुळे वातावरणात जाणवणारे हादरे. रिकाम्या पोटी निरुत्साह. खाट, उशी, छत. एकसारखा वहाणारा रात्र आणि दिवस पुसून टाकणारा काळाचा अजस्त्र स्रोत. दुपारीच भर उन्हात एकटंच कुठेतरी बाहेर रस्ते तुडवत हिंडून पाय दमवणं. आलटून पालटून त्याच रस्त्यांवरून परत घरी. चांदण्यात वडाखालून सरकत घरासमोर. पुन्हा अंधारात कुलूप चाचपून आत. खिशातली एकेक वस्तू रिकामी करून कपडे उतरून शेवटी शरीरही उतरवता येत नाही याची जाणीव. निव्वळ संवेदनांचे लोळ मनातून कातत मनाभोवतीच दाही दिशांनी फेकत संपूर्ण अनाकार होत होत स्वतःचं अवकाशात रूपांतर होत जाणं.

कधी बाहेरच्या पायरीवरून आकाशात वेड लावणारे तारे न्याहाळत रात्री. आणि ह्या शरीराला आणि मनाला कसल्याही आकांक्षांची जयमाला नाही ह्या वेदनेनं आतल्या आत कोसळणारे अज्ञेय झरे.

एका दुपारी तो गावाबाहेर लांब कुरणं तुडवत चालत राहिला. चालता चालता टूरिस्ट हाटेलच्या मागच्या नाल्यातून रोशन बागेत आला. बागेचं शेवटचं टोक बघावं म्हणून तो डोंगरापर्यंत जाऊन पोहोचला. तिथे आडवं वळून मग पुन्हा तिकडच्या टोकापर्यंत. सगळीकडे गावात, झुडपं, अधूनमधून प्रचंड वारूळं, पक्षी, मधेच पूर्वी केव्हातरी वाढवलेलं दाट जंगल-हे सगळं मनात भरून गेल्यावर त्याला एकाएकी आनंद वाटायला लागला. झाडांमधून झिरपणाऱ्या सूर्यप्रकाशाकडे पाहतांना त्याला वाटलं, जग स्वच्छ आहे. आकाश स्वच्छ आहे. पक्षी स्वच्छ आहेत. आनंदोत्सव कर. कारण आपल्याला त्याशिवाय दुसरं गत्यंतर नाही. हे सगळं चांगलंच आहे. त्याचा स्वीकार कर. सगळा आनंद तुझ्याकडे झेपावून येतो आहे... हृदयातून आनंदाच्या बुडबुड उर्मी दाटून आल्यासारख्या दाटून वर येत राहिल्या आणि त्याला गोड गुंगी आली.

तो उठला तेव्हा संध्याकाळ झाली होती. झाडं प्रेमानं ऊर दाटून आल्यासारखी सबंधच्या सबंध हालत होती.

मग तो रस्ता कुठे असावा ह्या अंदाजानं कुठेतरी चालत आला. लांबून बागेच्या कोपऱ्यातून मुलं खेळत असल्याचे सुंदर आवाज ऐकायला आले. तो तिकडे वळला. पक्ष्यांचे खूप पिंजरे सुरू झाले. त्यांचा कलकलाट. मग वानरांचे पिंजरे लागले. मुलांकडे पहात बारकीबारकी माकडं गमती करत होती. पुढे एक भला मोठा ठसठशीत मुद्रांचा चित्ता पुढल्या एका पायावर डोकं ठेवून माणसासारखा एका कुशीवर लोळत पडला होता. दुसरा एक चित्ता वारंवार मोठा लाल जबडा उघडून घशात काहीतरी अडकल्यासारखा खाकरत होता. पुढे हरणांची लांब लांब जाळीदार घरं. नंतर खूप चालत गेल्यावर एकदोन रिकामे जाडजूड पिंजरे. त्याच्यापुढे एक सुंदर काळे पट्टे

असलेला वाघ उगाच इकडून तिकडे येरझारा घालत राहणारा. त्याच्यापुढे दुसरा वाघ पूर्ण झोपी गेलेला. त्याच्या तोंडाभोवती माशा उठत बसत होत्या.

तिथे कोपऱ्यावर झाडाखाली बिडी पीत बसलेल्या नोकराला तो म्हणाला, हे वाघ इतके रोड कशामुळे झाले हो? ठेवता कशाला इथे यांची सोय रहात नाही तर?

त्या नोकराच्या शेजारीच एक झाडूवालीही बिडी पीत बसली होती. ती बाई चांगदेवकडे पहात म्हणाली, दोन मारले ह्या भाडखाऊंनी, आता हेबी मारनार! रोज मुन्शीपालटीतून चार किलो मटन मिळतं तेबी हे शिपाई लोक घरी घेऊन जात्यात, विकून पैशे खात्यात. गरीब जनावरांना काहीबी सडकं मटन खाऊ घालत्यात.

नोकर नुस्ता हसला. तो म्हणाला, हितं मानसायला खायाला मिळंना-जनावाराचं काय घेती बाय!

तिथे पुढे एका बारक्याशा झाडावर कितीतरी काळ्या चिमण्या प्रचंड चिवचिवाट करत बसत उठत होत्या. एवढ्याशा जागेवर त्यांचा जीवघेणा गलबलाट चालला होता. तांबड्यालाल आकाशाच्या कडेवर हे असं काळ्या चिमण्या कायम वर उडवणारं झाड विचित्र दिसत होतं..मग कुठूनकुठून रस्ता सोडत पुन्हा घेत गावापर्यंत आल्यावर समोर येईल त्या गल्लीबोळातून आडवातिडवा गलबललेली घरं दोन्ही बाजूंनी ऐकत तो एका **घरगुती खाणावळ** अशी पाटी असलेल्या घरात जेवायला शिरला. अनेक दिवसांनी जेवून पुन्हा बाहेर जात राह्यला. गावाला वळसा घालणाऱ्या वडाच्या झाडांच्या मोठ्या रस्त्यावर पाय पडेल तेव्हा त्याला गावाच्या तिकडच्या टोकावरचं ह्याच रस्त्यावरचं आपलं घर एका पावलाच्या अंतरावरच आहे असा अजस्त्र भास झाला. चालत गेल्यावर एका दिव्याखाली एक माणूस पाय वाकवून वाकवून निरीच्छपणे सायकलमध्ये पंपानं हवा भरतांना दिसला. नंतर थोड्या वेळानं धडाधडा बंद होत जाणारी दुकानं, हाटेलं. एका उघड्या हाटेलमध्ये तो चहा सांगून बाहेरच्या तुरळक रहदारीकडे पहात बसला. जरा वेळानं हेही हाटेल बंद होत आलं. मग पुन्हा त्याचा फार दिवसांपासून दोस्त झालेला परिचयाचा झगझगीत रस्ता. परिचयाची वळणं. पुन्हा लांब रस्ता चालूच. रस्त्यानं सों सों करत एक अवजड ट्रक त्याच्या अगदी एकदोन इंचांवरून धडधडत गेली. समोर पेट्रोलपंपावरची उंच आकाशाला चिमटणारी निऑनच्या प्रचंड टायरची उघडणारी मिटणारी जाहिरात. वर भराभरा वितळ ढगांमधून सरकणारी तरी तिथल्या तिथेच रहाणारी चंद्रकोर. हवेत खदखदणारा उकाडा. रेटणारे पाय. लांब प्रचंड समप्रकाशित रस्ता.

बंगल्यासमोर त्याला दिसलं की आतल्या बागेमधल्या आंगणात त्याच्या खोलीच्या दाराशीच आंगणभर पोरी वेगवेगळे खेळ मांडून झिम्मा फुगड्यांचा हैदोस करत आहेत. तरी तो सरळ आत शिरला. त्याला पाहून गाणं म्हणणाऱ्या, फेर घालणाऱ्या मुली एकेक अशा थांबत गप्प होत गेल्या. दारात बसलेल्या दोन तरुण थोराड मुलीही उठून झटकन पदर उगाच सावरत बाजूला उभ्या राह्यल्या. एकदम चिडीचूप स्तब्धता खिशात आधीच चाचपून तयार ठेवलेल्या किल्ल्या काढून नेहमीचं परिचयाचं कुलूप त्यानं उघडलं, लाथेनं दार ढकललं, पुन्हा पाठमोरंच दार बंद करून कडी घातली. आणि तो आतल्या अंधाऱ्या खोलीत शिरला.

त्याबरोबर बाहेर पोरींनी इतका वेळ दाबून ठेवलेलं निर्हेतुक यौवनिक हसणं एकदम उसळलं. मग त्यानं अंधारातच खिसे रिकामे केले अत्यंत झोप आल्यानं तो तसाच आडवा झाला. डोळे आतल्या आत करकरले. डोळ्यांपढे एकदम काजवे चमकून गेले. आणि तो झोपी गेला.

मधे केव्हातरी जाग आली तेव्हा दारंखिडक्या फटाफट वाजत होत्या. तो उठला आणि दारंखिडक्या बंद करत असतांनाच बाहेरचं प्रचंड वादळाचं थैमान पाहून त्याला बरं वाटलं. जरा वेळ ते पहात असतांनाच गडगडाट सुरू झाला. मग विजा. कुठेतरी कडाडून वीज पडली. वारा कमी झाला. मग ताडताड थेंब सगळीकडून वाजायला लागले. नंतर एकाएकी सगळीकडेच दिवे गेले. संपूर्ण अंधार. लांब कुठेतरी सगळ्या दिशा पेटल्यासारखा विदुयल्लोळ.

दारू उघडून तो बाहेर पावसात उभा राहून मातीचा वास घेत राहिला. शिंतोड्यांनी शरीर एकदम गार झालं. मग सरीच अंगावर कोसळायला लागल्या. मातीचा आणखी उग्र वास. समोर राहून राहून एकीसारख्या दुसऱ्या नसलेल्या विजांच्या उभ्या खालीवर जाणाऱ्या लखलखीत रेघा. सगळं आसमंत पावसानं झाकलेलं. आणि पाऊस अंगावर कोसळतच राह्यला. त्याला स्थिती झाली. सगळं पोकळ आयुष्य भरून वहात आहे असं वाटायला लागलं.

बाहेरच्या पावसाचा अत्यंत थरकाप उडवणारा नाद संपूर्णपणे शरीराआत रिचवत तो म्हणाला, ह्या घनघोर सृष्टितत्त्वाचा एक भाग म्हणून आपलं अस्तित्व आहे. हा अवघा डोंगर पोकळ असे : कोणी इथले रिगणेनिगणे जाणे ना. मी अनादीचा अस्वस्थ गा. माते अस्वस्थाते स्वस्थ कोजो गा. ह्या संकुचित खंडित समाजजीवनामध्ये मला संपूर्ण अस्तित्व ओतता येत नाही. मी कोणाला बांधलेलो नाही. मला घरदार नाही. जातिधर्म नाही. खुंटदावे नाही. आईबापांचा स्वग्रामाचा **स्वसं** बंधियांचा मी त्याग केला आहे. हे घनघोर उग्र सृष्टितत्त्वा, मला शुद्ध जीव कर की जेणेकरून मी निखळ जीवसत्त्व होईन.

मग त्याला कुठेतरी गरागरा फिरवणारी प्रचंड भोवळ आली आणि तो तोल सांभाळत बसत उठत जमिनीवर कोसळला. मग त्याच्या डोळ्यांसमोरून सरकत राहिले सगळे मागचेपुढचे चेहरे आपले परके सगळे. सकाळ संध्याकाळ ऊन चांदणं घरं गावं रस्ते वर्षं सगळी एकमेकांपासून सुटी होत पुन्हा एकत्र होत राहिली. डोळ्यांसमोर एकदा अंधार, नंतर एकदा लख्ख उजेड. जणू काही आतापर्यंतचे सगळे दिवस एकत्र आणि सगळ्या रात्री वेगळ्या एकत्र. पुन्हापुन्हा झेपावणारे नवे ढग आणि पुन्हापुन्हा डोक्यावरून निघून जाणारे शेवटचे ढग. हवेत दिवसभर झगमगणारे प्रकाश. आकाशात लांबलांब पट्टे अदृश्य सूर्याचे. अदुभत शांत एकाकी रात्री. चंद्रकोरी घराघरावर झाडाझाडावर कललेल्या. सुखी स्थिर स्तब्ध गतिविरोधी झाडं. पुन्हापुन्हा

तसेच झाडांच्या सावल्यांच्या हलत्या फुग्यांमधले ऐषआरामी रस्ते. ढिगांसारखे रोजचे अंधार. पुन्हापुन्हा माती भिजून उगवणारं चिरंतन गवत. घनघोर बरसणारे ढग. लहानपणचे धोंडीचे सूर : बरस रेऽ बरस रेऽ. मेघुराया बरस रेऽ . पुन्हा गडगडाट. तुताऱ्यांचे हृदयभेदी ललकार. आपल्या मनात अजून एक जागा असतेच की जिथे आपल्याला जायचं असतं. भिंतींना आतून बाहेरून सुरुंग पेरलेले असतात, एखादा असा दिवस येतो की सुरुंग धडाडू लागतात आणि शरीराचे स्फोट. सगळ्या गोष्टी आपल्यापासून जाणाऱ्या असतात. आपल्याशिवायही ह्या प्रिय गोष्टी इथे अशाच रहाणार हेही काय कमी आहे. जमीन पारखी होऊन आपोआप पाय उचलले जातात. मग प्रचंड उलथापालथ. हृदय दुभंगून टाकणाऱ्या प्रबळ विजांचा कडकडाट.

आणि मग ह्या कोलाहलात त्याच्यावर घनदाट असा नसतेपणाचा काळोख कोसळला. आपल्याला स्थळकाळानं फेकून दिल्यानंतरही आपण आता कुणाचेच कुणी नाही. कशाचेच काही नाही. मुक्तीचा निरतिशय आनंद. आपण आसमंतात स्थिरावलो आहोत. आपल्याच अस्तित्वाच्या आसाभोवती हे सगळं असेलनसेल त्यासकट करकरत फिरतं आहे. सूर्यमालिकेसकट नक्षत्रांकित आकाशासकट हे सबंध अंतराळ आपल्याच आसाभोवती. आपणच हे सगळं अफाट अंतर, आपणच ह्या अंतराला धरून ठेवणारा प्रखर विद्युत्बिंदू.

चांगदेव चतुष्टय : ४

# झूल

भालचंद्र नेमाडे

'झूल'च्या शेवटी चांगदेवच्या संवेदनांच्या यात्रेला अंतिमता प्राप्त होताना दिसते. बाहेर पावसात उभा राहून मातीचा वास घेताना त्याच्या जीवनयात्रेच्या शोधाचे रहस्य त्याला कळते. महानुभावी गोसाव्यासारखी त्याची 'स्थिती' होते. त्याच्या अस्तित्वाचे प्रयोजन त्याला कळल्यावर तो म्हणतो, ''हा अवघा डोंगर पोकळ असे. कोणी इथले रिगणेनिगणे जाणे ना. मी अनादीचा अस्वस्थ गा. माते अस्वस्थाते स्वस्थ कीजो गा. हे घनघोर उग्र सृष्टितत्त्वा, मला शुद्ध जीव कर की जेणेकरून मी निखळ जीवसत्त्व होईन.'' चांगदेवच्या जीवनाचे हे सारतत्त्व आहे. समाजजीवनात स्वत:ला झोकून जगताना काहीही जीवनाचे तत्त्व त्याच्या हाती येत नाही. स्थळे बदलली तरी समाजाचे खंडितपण-किडलेपण प्रत्येक ठिकाणी त्याला आढळते. ज्या निकोप जीवनाची धारणा त्याने बाळगलेली असते ते जीवन आणि शुद्ध अंत:करणाची माणसे त्याला आढळत नाहीत. तो अस्वस्थ होत जातो आणि स्वत:ची नैतिकता कुठेही ढळू नये म्हणून जास्तीत जास्त निकोप जीवन जगत आला आहे. त्यात त्याच्या मनाला मृत्युजाणिवेचा स्पर्श होऊन तो मूळ सृष्टितत्त्वाशी आपला संबंध जोडतो आणि शरीरभावनेतून मुक्त होऊन आपल्या संपूर्ण अस्तित्वाचेच विसर्जन करून तो सृष्टितत्त्वाचाच भाग बनून जातो. चांगदेव हा योगी नाही. संन्यासीही नाही. शुद्ध जीवन जगण्याचा हव्यास असलेला बुद्धिमान आणि अत्यंत हळव्या संवेदनांनी व्याप्त असलेला तरुण आहे.

– डॉ. किशोर सानप
('भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी' मधून)

(म-४३९)

पॉप्युलर प्रकाशन
www.popularprakashan.com
मुखपृष्ठ : निर्मिती ग्राफिक्स